04-04-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A 1
ASJ/ SBT/ MHM/ 14:00

**( सभापतीस्थानी : मा. सभापती )**

**प्रश्नोत्तरे**

**तोंडी उत्तरे**

**रोजगार हमी योजनेतील मजुरांच्या दराबाबत**

**(१) * १८१६ प्रा. शरद पाटील , श्री. जयंत पाटील , प्रा. बी. टी. देशमुख :** सन्माननीय रोजगार हमी योजना मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोजगार हमी योजनेतील मजुरांच्या दराबाबत मा.उपमुख्यमंत्री यांचेकडे सभापती पंचायत समिती तासगांव यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १६ ऑगस्ट, २००४ अन्वये निर्गमित केलेल्या दरपत्रकाचे पुनर्विलोकन करण्यात येत आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तद्नुसार शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणताच निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राणा जगजितसिंह पाटील, श्री.हर्षवर्धन पाटील यांच्याकरिता** : (१) होय.

(२) व (३) लोकप्रतिनिधींनी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने दिनांक १६ ऑगस्ट २००४ अन्वये निर्गमित केलेल्या दरपत्रकातील दरांचे पुनर्विलोकन दरसूची अभ्यास समिती कडून करुन घेण्यात आले असून त्यांनी सादर केलेल्या पुनर्विलोकन अहवालावर उचित कार्यवाही करण्यात येत आहे.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, मला प्रश्न क्र. 2 च्या उत्तरामध्ये पुढीलप्रमाणे दुरुस्ती करावयाची आहे. " सुधारीत दरपत्रकाचे आदेश दि. 31 मार्च 2005 रोजी निर्गमित करण्यात आले आहेत. ते 1 एप्रिल 2005 पासून लागू करण्यात आले आहेत. "

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, सदरहू आदेशान्वये दरसूचीमध्ये कोणती सुधारणा करण्यात आली आहे ? तसेच ही सुधारीत दरसूची सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, सदरहू दरसूची सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल. यामध्ये जवळपास 39 बाबी आहेत.

..2..



.....1816.....

प्रा. बी. टी. देशमुख : यामध्ये किती वाढ झाली आहे, हे मा. मंत्रिमहोदय आम्हाला ढोबळमानाने सांगतील काय ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, बाब क्र. 1 ते 8 अंतर्गत सहा ते सात टक्के वाढ झाली आहे.

प्रा. बी. टी. देशमुख : ही यादी आजच सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल काय ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, ही यादी आजच सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, कोणत्या कारणामुळे रोजगार हमी योजनेचे दर कमी करण्यात आले होते ? तसेच आता कोणत्या कारणासाठी हे वाढविण्यात आले आहेत ? तसेच कोणत्या नियमाने हे नवीन दर जाहीर करण्यात आले आहेत ? या ठिकाणी जे 39 आयटेम सांगण्यात आले आहेत, त्यामध्ये किती टक्के वाढ करण्यात आली आहे ? तसेच यापूर्वी जे दर कमी करण्यात आले होते, ते कोणत्या लोकप्रतिनिधींच्या शिफारशीनुसार कमी करण्यात आले आहेत ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, ऑगस्टमध्ये दरामध्ये बदल केल्यानंतर अनेक लोकप्रतिनिधींची सूचना आली होती. त्या सूचनांचा आधार घेऊन तसेच पुन्हा एकदा सगळ्या बाबींची तपासणी करुन हे दर ठरविण्यात आले आहेत. प्रत्येक बाबीसाठी वेगवेगळे दर आहेत ?

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, रोजगार हमी योजनेवर काम करणा-या मजुरांच्या मजुरीचे दर कमी का करण्यात आले होते ? कोणत्या लोकप्रतिनिधीनी दर कमी करण्याबाबत शिफारस केली होती ? त्यांची नांवे आपण या ठिकाणी आम्हाला सांगू शकाल काय ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, रोजगार हमी योजनेमध्ये प्रामुख्याने रस्त्यांची तसेच खडीकरणाची कामे केली जातात. अनेक रस्त्यांच्या कामांबाबतच्या तक्रारी आमदारांनी तसेच लोकप्रतिनिधींनी केल्या होत्या. एक कि. मी. रस्त्याच्या कामाचे एस्टीमेट 25 लाख रुपये करण्यात आले होते. म्हणून याबाबत रिव्हयू घेण्यासाठी एक समिती निर्माण करण्यात आली होती.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....1816.....

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. कामाच्या एस्टीमेटमध्ये आणि मजुरांच्या मजुरीमध्ये फार फरक आहे. कामांच्या एस्टीमेट बाबत अनेक तक्रारी आहेत, याची मला जाणीव आहे. म्हणून माझ्या प्रश्नाचे उत्तर माननीय मंत्रिमहोदय देत नाही. माझा प्रश्न असा आहे की, मजुरीचे दर कमी करण्याबाबत कोणी शिफारस केली आहे ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मा. राज्यमंत्र्यांनी तसे म्हटले नाही. रोजगार हमी योजनेचे दर कमी असल्याबाबत आमदारांनी तक्रारी केल्या होत्या. या दरात बदल करा, असे आमदारांचे म्हणणे होते. दराबाबतच्या तक्रारी जेव्हा शासनाकडे प्राप्त झाल्या, तेव्हा एक कमिटी निर्माण करण्यात आली. त्या समितीने हे दर ठरविले आहेत.

( यानंतर श्री. सरफरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 1816...

श्री. हर्षवर्धन पाटील...

परंतु त्या नंतर संघटनेबरोबर चर्चा करण्यात आली. माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे त्या संदर्भात सुधारीत रेट तयार केले. त्या संबंधीचा जी.आर. 31 तारखेला निर्गमित करण्यात आला. आणि त्याची संपूर्ण दर सूची सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, ऑगस्टच्या जी.आर. प्रमाणे जो बदल करण्यात आला, त्याबाबत काही लोकप्रतिनिधींनी तक्रार केली. प्रश्न असा की, सांगली जिल्हयातील तासगाव पंचायत समितीच्या सभापतींनी पहिल्यांदा तक्रार केली, त्या प्रमाणे अनेक लोकप्रतिनिधींनी तक्रार केली. जे दर कमी केले ते कां केले हे माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांचे म्हणणे बरोबर आहे. त्या अनुषंगानेच माझा प्रश्न असा आहे की, मजुरीचे दर कमी करण्याचे कारण काय होते?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, आपण म्हणाल्याप्रमाणे रोजगार हमी योजनेचे दर 1 ते 2 टक्क्यांनी कमी केले नाही.परंतु लिड आणि लिफ्टच्या बाबतीत दर कमी झाले होते. मघाशी माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे अ.क्र. 1 ते 8 मध्ये लिड आणि लिफ्टच्या बाबतीत 7 ते 8 टक्के वाढ झाली आहे. दुसरी गोष्ट अशी की, रोजगार हमी योजनेच्या कामामध्ये पाटबंधारे विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या डीएसआर मध्ये फरक आहे. त्याबाबत ॲट पार एकच नियम सगळीकडे असला पाहिजे. सर्व ठिकाणी एकवाक्यता असली पाहिजे याचा विचार करुन एकाच शासनामध्ये दोन डिपार्टमेंटचे वेगवेगळे डीएसआर असणे बरोबर नाही. त्या संदर्भात हे दर रिवाईज केले व त्यासंबंधी संघटनेबरोबर चर्चा करुन सुधारीत आदेश काढण्यात आले.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**जडचिरोली जिल्ह्याप्रमाजे विदर्भातील यवतमाळ व बुलढाजा या**

**दो-ा जिल्ह्यांत येजाऱ्या उद्योजां-ाा ज रातू-ा वजळज्याबाबत**

**(2) * 2996 श्री. रमेश ाि ेसे , प्रा. जोजेंद्र ज वाडे** : स-मा-ा-नीय उद्योज मंत्री पुढील जोष्टींचा जुलासा ज रतील ज ाय :-

(1) जडचिरोली जिल्हयाप्रमाजे विदर्भातील यवतमाळ व बुलढाजा या दो-ा जिल्ह्यात येजाऱ्या उद्योजां-ाा ज रातू-ा सवलती देज्याबाबत शास-ास्तरावर ज ार्यवाही सुरु आहे हे जरे आहे ज ाय,

(2) असल्यास याबाबतची सद्य:क्स्थती ज ाय आहे ?

**श्री. राणा जगजितसिंह पाटील, श्री.अशोज चव्हाज यांच्याकरिता** : (1) हे जरे -ाही.

(2) प्रश्-ा उद्भवत -ाही.

श्री. रमेश निकोसे : सभापती महोदय, गडचिरोली जिल्हयाला करामध्ये सवलती दिल्या. त्या प्रमाणे विदर्भातील यवतमाळ व बुलढाणा हे दोन जिल्हेही मागास भागातील आहेत. या जिल्हयात नवीन उद्योगधंदे सुरु करावयाचे असतील व त्या भागाचा विकास करावयाचा असेल, त्या भागाला आर्थिक व सर्वांगीणरित्या प्रगत करावयाचे असेल तर त्यासाठी सवलती कां देण्यात आल्या नाहीत? दुसरा प्रश्न असा की, यवतमाळ व बुलढाणा जिल्हयासाठी भविष्यात अशाप्रकारची योजना शासनाकडे आहे काय?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : गडचिरोली जिल्हा हा विना उद्योग जिल्हा म्हणून 1985 मध्ये डिक्लेअर करण्यात आला. त्यामुळे त्या जिल्हयाला ठराविक सुविधा देण्यात आल्या, विशेष अनुदान देण्यात आले. यवतमाळ व बुलढाणा जिल्हयामध्ये मिडियम स्केल व लार्ज स्केल इंडस्ट्री असल्यामुळे त्या ठिकाणी अनुदान देणे शक्य नाही. सद्यस्थितीत यवतमाळ व बुलढाणा हे दोन्ही डी+ जिल्हे आहेत. त्याठिकाणी वेगळे अनुदान, कॅपिटल इन्सेंटीव्ह 35 टक्क्यापर्यंत उपलब्ध आहे. त्याचप्रमाणे इंडस्ट्री अनुदान योजनेंतर्गत 25 लाखापर्यंत मर्यादा दिली आहे. त्याचप्रमाणे जकातीच्या संदर्भात ग्राह्यस्तरीय गुंतवणुकीनुसार 100 टक्के जकात देण्यात येते तिची कालमर्यादा 12 वर्षे आहे व विद्युत शुल्क माफी 15 वर्षासाठी केली आहे.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, गडचिरोली हा उद्योगहीन जिल्हा आहे. त्यामुळे या जिल्हयाच्या विकासासाठी शासनाने विशेष तरतूद व सोयी सवलती देऊन या जिल्हयाला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. 2996 ...**

प्रा.. जोगेंद्र कवाडे....

औद्योगिकदृष्टया सक्षम करण्याचा प्रयत्न केला. त्याच बरोबर बुलढाणा जिल्हा देखील जवळपास उद्योगहीन जिल्हा नसला तरी उद्योगाची मोठया प्रमाणात तरतूद नसलेला जिल्हा आहे. म्हणून बुलढाणा जिल्हयाला औद्योगिक दृष्टीने सक्षम करुन रोजगाराची जास्तीत जास्त सुविधा उपलब्ध करण्यासाठी गडचिरोली जिल्हयासारख्या सवलती देण्याची योजना शासन आखणार आहे काय?

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2996 . . . .

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, सध्या बुलढाणा जिल्हयामध्ये मिडिअम आणि लार्ज स्केल उद्योगाची 16 युनिटस् असून 328 कोटी रुपयांची गुंतवणूक झालेली आहे. यापूर्वी 2001-2002 मध्ये औद्योगिक धोरण जाहीर झाले होते. आता 2005 मध्ये नवीन औद्योगिक धोरण जाहीर होईल. त्यावेळी बाकीच्या राज्यातील काही भागांमध्ये यासंदर्भात कोणत्या सवलती दिलेल्या आहेत, याची आम्ही माहिती घेत आहोत. अशा वेळी यवतमाळ आणि बुलढाणा हे जे औद्योगिकदृष्टया मागास जिल्हे आहेत, त्यांच्यासाठी 2005 च्या औद्योगिक धोरणामध्ये खास योजना जाहीर करु.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, बुलढाण आणि यवतमाळ जिल्हयांमध्ये अनेक ठिकाणी एम.आय.डी.सी.चे बोर्ड लागलेले आहेत आणि तेथील जागा ॲक्वायर केलेली आहे. पण त्याठिकाणी एकही उद्योग सुरु झालेला नाही. तर ही अवस्था केव्हा दूर होणार आहे ? तसेच ज्या ठिकाणी एम.आय.डी.सी.चे बोर्ड लागलेले आहेत, तेथे उद्योग सुरु करण्याच्या बाबतीत शासनाचे काही धोरण आहे का ?

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, हे खरे आहे की, राज्यामध्ये अनेक ठिकाणी एम.आय.डी.सी.च्या जागा उपलब्ध असताना तेथे उद्योगधंदे सुरु झालेले नाहीत. परंतु आपण डी-लायसिंगच्या धोरणाप्रमाणे, एखाद्याने आपला उद्योग घेऊन अमुक ठिकाणी जावे, त्याशिवाय त्याला उद्योगाचे लायसन्स मिळणार नाही अशी कोणालाही सक्ती करु शकत नाही. अगोदर केंद्र शासनाकडे आणि राज्य शासनाकडे योजना होती की, प्रत्येक उद्योग सुरु करण्यासाठी लायसन्स घ्यावे लागत होते. पण आता नवीन धोरणाप्रमाणे कोणताही उद्योग सुरु करण्यासाठी लायसन्सची आवश्यकता नाही. याबाबतीत उद्योगधंदे सुरु करण्याकरता पोषक वातावरण निर्ताण करणे, पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणे एवढयापुरतीच शासनाची भूमिका मर्यादित आहे. विदर्भातील अनेक जिल्हयांमध्ये, मराठवाडयातील अनेक जिल्हयांमध्ये या गोष्टींबाबत जाणीव होत आहे हे खरे आहे. म्हणून भविष्यात औद्योगिक धोरण जाही करीत असताना या विभागांसाठी वेगळया सवलती कशापध्दतीने देता येतील, जेणेकरुन त्याठिकाणी उद्योग काढण्यास उद्योजक आकर्षित होतील, या दृष्टीने निश्चित विचार केला जाईल.

डॉ.एन.पी.हिराणी : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की,

. . . .सी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2996 . . . . .

डॉ.एन.पी.हिराणी . . . .

गडचिरोली हा बॅकलॉगचा जिल्हा आहे आणि तेथे एकही इंडस्ट्री नाही म्हणून शासनातर्फे करामध्ये सवलत दिली जात आहे. मघाशी सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी जो मुद्दा उपस्थित केला, त्याप्रमाणे विदर्भातील जवळजवळ सर्व जिल्हयांमध्ये इंडस्ट्री नाही असे म्हटले तरी चालेल. त्या भागातील लोकांची वर्षानुवर्षापासून ही ओरड आहे की, मुंबई,पुणे,नाशिक इ.भागांमध्ये उद्योजकांचा ओढा आहे आणि मराठवाडा व विदर्भात इंडस्ट्री आली पाहिजे, पण त्यासाठी त्या उद्योगाला इन्सेन्टीव्ह मिळत नाहीत. म्हणून उद्योजक तेथे येण्यास धजत नाहीत असे चित्र आहे. त्या भागातील शेकडो-पाचशे एकर जमीन ॲक्वायर करुन तेथे एम.आय.डी.सी.चे बोर्ड लागलेले आहेत. पण दोन-चार चिल्लर उद्योग सोडले तर बाकी तेथे कोणतेही मोठे उद्योग नाहीत. त्यामुळे याबाबतीत विचार करुन काहीतरी मार्ग काढणे आवश्यक आहे. तेव्हा विदर्भामध्ये औद्योगिकीकरण होईल यादृष्टीने काही ठराविक योजना अंमलात आणण्याचा शासनाचा विचार आहे का ? फक्त कर सवलत देऊन या योजना कार्यान्वित होणार नाहीत. तर तेथे ज्या इंडस्ट्रीज् सुरु होत आहेत, त्याबाबतीत संबंधित विभागाने लीड घेऊन त्यांना इन्सेन्टीव्ह देता येतील का ? जेणेकरुन ठराविक कालमर्यादेमध्ये या विभागाचे औद्योगिकीकरण होईल. यादृष्टीने शासन काही उपाययोजना करणार आहे का ?

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, याठिकाणी यवतमाळ आणि बुलढाण्याच्या बाबतीत प्रश्न उपस्थित झाला आहे. आजही विशेष भांडवली अनुदान दिले जाते, व्याज अनुदान योजना आहे, जकात परतावा, विद्युत शुल्क माफ इ.चार-पाच पध्दतीने ज्या काही सवलती देणे शक्य आहे, त्यादृष्टीने धोरणात्मक निर्णय जाहीर केलेला आहे. अशा वेळी जर एखादे मोठे युनिट, ज्याची गुंतवणूक 500 कोटी रुपयांपेक्षा अधिक असेल तर अशा युनिटसाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत केली आहे आणि या समितीला वेगळे अधिकार प्रदान केले आहेत की, राज्यात जर 500 ते 600 कोटीपेक्षा जास्त गुंतवणूक असलेली इंडस्ट्री येणार असेल तर त्यांना सवलती देऊन, ती इंडस्ट्री विशिष्ट भागामध्ये आकर्षित करण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/ पूर्वी सौ.रणदिवे... 14:15

ता.प्र.क्र.9296 (पुढे चालू....

श्री.अशोक चव्हाण (पुढे चालू....

किंवा त्या ठिकाणी करणे शक्य असेल, अशाद्योगाला विशेष सवलती प्रदान करण्याच्याबाबतीत मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती आहे. त्या समितीला पूर्ण अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. जर त्या भागामध्ये नवीन उद्योजक येत असतील तर त्यांच्याबाबतीत जरुर विचार करता येईल.

श्री.जयंत प्र. पाटील : सभ्ंापती महोदय, व्हॅटच्या नवीन कायद्याप्रमाणे या सवलती शासन ठेवणार आहे काय ? ज्या जमिनी भूसंपादन केलेल्या आहेत त्या जमिनीवर अद्याप उद्योग सुरु होत नाहीत, त्या जमिनी पुन्हा संबंधित शेतकऱ्यांना शासन परत करणार आहे काय ?

श्री.अशोक चव्हाण : व्हॅटच्या इम्पीकेशन्स काय आहेत, हे मला आता सांगणे कठीण आहे, तो विषय वित्त विभागाशी संबंधित आहे. तरी देखील त्याबाबतची माहिती घेऊन निश्चित माहिती सभागृहासमोर ठेवता येईल. दुसरा सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केला तो असा की, जमिनी संपादन करुन त्याचा उपयोग झाला नसेल, तर त्या जमिनी परत करता येतील काय ? मला या ठिकाणी सांगितले पाहिजे की, सर्वोच्च न्यायालयाने याबाबतीत निर्णय दिलेला आहे की, संपादित केलेली जमीन एकदा घेतल्यानंतर ती पब्लिक ऑक्शन शिवाय परत करता येणार नाही. अशाप्रकारचा सुप्रीम कोर्टाचा निर्णय असल्यामुळे, यामध्ये दुसरा निर्णय घेता येणे शक्य नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या ठिकाणी यवतमाळ आणि बुलढाणा जिल्हयाच्या संबंधाने प्रश्न उपस्थित केलेला असला तरी त्यामधून शासनाने आपली धोरणात्मक भूमिका मांडलेली आहे,त्याबद्दल प्रथम मंत्रीमहोदयांना धन्यवाद देऊ इच्छितो. सभापती महोदय, आपल्यालाही कल्पना आहे की, शेकडो हेक्टर जमीन आरक्षित केलेली आहे, ताब्यात घेतलेली आहे, परंतु उद्योग उभे राहिलेले नाहीत. परंतु मंत्रीमहोदयांनी बोलताना सांगितले की, उद्योग काढण्यासाठी कोणालाही परवानगीची आवश्यकता नाही. उद्योग काढण्यासाठी सरकारच्या परवानगीची आवश्यकता नसेल तर उद्योगामध्ये नोकऱ्या देणेही माझ्यावर बंधन नसावे, अशाप्रकारचा जर बाहेर संदेश केला तर ते बरोबर नाही. कारण ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची जमीन संपादन करुन उद्योगाकरिता ती आरक्षित करतो, त्यावेळेस त्या भागातील तरुणांना उद्योग मिळावा असा मूळ उद्देश सरकारचा असतो. तेव्हा या संदर्भात आपण बंधन घालणार आहात काय,



SKK/ MHM/ SBT/

ता.प्र.क्र.2996 (पुढे चालू...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

हा मूळ प्रश्न आहे. दुसरा प्रश्न असा की, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी शेतकऱ्यांच्या जमिनी परत करण्याबाबत प्रश्न विचारलेले आहे. आरक्षित केलेली जमीन 15-20 वर्षे किंवा 25 वर्षे ठेवूनही त्या ठिकाणी उद्योग नगरी उभी राहिली नाही तर ती जमीन त्या संबंधित शेतकऱ्याला परत देण्याच्या संदर्भात विचार केला पाहिजे. याच सभागृहामध्ये कायदा करुन कृषी महामंडळाची अतिरिक्त जमीन संबंधित शेतकऱ्याला परत केली, तेव्हा तशाप्रकारचा कायदा आणून त्या शेतकऱ्यांना ती जमीन परत करता येईल काय ? आरक्षण केल्यानंतरही 25 वर्षे जमीन पडूनच रहाणार आहे. किंवा त्या संदर्भात उच्च न्यायालयामध्ये अपील करणार आहात काय ?

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय लॉ ऑफ द लॅन्ड आहे, देशाचा कायदा आहे. त्यामुळे कोणतीही जमीन संपादित केल्यानंतर ती जमीन परत करायची असेल तर जाहीर लिलावाशिवाय करता येणार नाही, किंवा अन्य दुसऱ्या पब्लिक परपजकरिता ती जमीन वापरता येते. परंतु जमीन परत करायची असेल तर जाहीर लिलावाशिवाय दुसरा पर्याय नाही. सन्माननीय सदस्यांनी कृषी महामंडळाच्या जमिनीच्या संदर्भात सांगितले, परंतु त्याबाबतची माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. या सभागृहात त्याबाबत काय उत्तर देण्यात आले याची मी चौकशी करेन. परंतु सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे पब्लिक ऑक्शन शिवाय जमीन परत करण्याबाबतीत काही करता येणार नाही.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जो प्रश्न उपस्थित केला तो असा की,अनेक कारणांकरिता आपण भूसंपादन करतो. अनेक वर्षे ती जमीन सरकारच्या ताब्यात असते. दुर्दैवाने त्याचा वापर झाला नाही. सुप्रीम कोर्टाने निर्णय दिला की, याबाबत पब्लिक ऑक्शन शिवाय अन्य काही मार्ग नाही.. याबाबत आपण कायदेशीरदृष्ट्या तपासावयास सांगावे की,सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निर्णयाच्यादृष्टीने अन्य पर्याय शोधून काढून त्या शेतकऱ्यांना ती जमीन परत देण्याच्यादृष्टीने काय करता येईल, यादृष्टीने तपासावे.

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, आपल्या निदेशाप्रमाणे ॲडव्होकेट जनरलचा सल्ला घेऊन, जी कायदेशीर बाजू आहे ती तपासून निश्चित याबाबतची माहिती घेता येईल

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

ता.प्र.क्र.2996 (पुढे चालू....

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हिराणी यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्याचे उत्तर आले नाही. सनमाननीय मंत्री महोदयांनी इन्सेन्टीव्ह वाचून दाखविले. ते विकसित भागासाठी आणि अविकसित भागासाठी लागू असतील तर उद्योजक अविकसित भागामध्ये जात नाहीत. सभापती महोदय, सत्यशोधन समितीने पर लाख लोकसंख्येमध्ये किती लोकांना फॅक्ट्री एम्प्लॉयमेंट आहे, हा क्रायटेरिया धरुन कोण मागे आहे, कोण पुढे आहे हे काढलेले आहे. मराठवाड्यातील आणि विदर्भातील दोन-तीन जिल्ह्ये सोडले तर सारे जिल्ह्ये हे राज्य सरासरीच्या खाली आहेत. माझा पॉइन्टेड प्रश्न आहे. विकसित भागामध्येही तेच इन्सेन्टीव्ह आणि मागासलेल्या भागामध्येही तेच इन्सेन्टीव्ह असे असेल तर उद्योजकांनी एवढा रस्ता तोडून गडचिरोली, बुलढाणा किंवा यवतमाळला जावे काय, असा प्रश्न आहे. म्हणून माझे मुद्देसूद असे म्हणणे आहे की, इडस्ट्रीमधील अतिशय मागे जे जिल्ह्ये आहेत, त्या जिल्ह्यांना ग्रेडेड इन्सेन्टीव्ह....

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MHM/ SBT/ प्रथम श्री. किल्लेदार... 14:20

ता.प्र.क्र. 2996..

प्रा. बी. टी. देशमुख..

त्या जिल्हयात ग्रेडर तेथे जाईपर्यंत इन्सेन्टिव्ह दिला तरच उद्योजक तेथे जातील. उत्तेजनाची समानता असेल तर मागास भागामध्ये कां जावे? म्हणून माझे म्हणणे असे आहे की, धोरण म्हणून, मग तो एखादा कोकणातील जिल्हा असेल, मराठवाडयातील जिल्हा असेल, विदर्भातील जिल्हा असेल, साईन्टीफिक इंडिकेटीर जे फॅक्ट फॉईडिंग समितीने दिलेले आहेत,ते मागे दिलेले आहेत .तेंव्हा त्यांना वाढीव स्वरुपाचे इेन्सिन्टिव्ह देण्याचे धोरण आपण स्वीकाराल काय?

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य,प्रा. बी. टी. देशमुख यांनी अत्यंत योग्य मुद्दा त्यांच्या प्रश्नामध्ये उपस्थित केला आहे. ही वस्तुस्थिती आहे. राज्यातील अविकसित भागाच्या सवलती, हया राज्यातील विकसित भागाच्या सवलतीबरोबर असतील तर त्या ठिकाणी कोणी जाणार नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. आणि म्हणून मराठवाडा आणि विदर्भातील अविकसित भागामध्ये इंडस्ट्रिज नाहीत किंवा कोकणातील भागात इंडस्ट्रिज नसतील,अशा बाबतीत विशेष सवलत देण्याच्या बाबतीत शासन लवकर धोरणात्मक निर्णय घेण्याच्या मनस्थितीमध्ये आहे. राज्यामध्ये आज जेवढया इंडस्ट्रीज असोसिएशन आहेत, मग त्या एम.आय.डी.सी. असतील,त्यांच्याशी चर्चा करुन, त्यांची काय मागणी आहे किंवा उद्योग त्या ठिकाणी नेण्याकरिता कसा धोरणात्मक नवीन निर्णय घेणे आवश्यक आहे, याबाबतीत चर्चा करु, शासन धोरणात्मक निर्णय मराठवाडा, विदर्भ आणि कोकणातील अविकसित भागासाठी लवकर जाहीर करील.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, सवौच्च न्यायालयाचा दाखला देत मंत्रिमहोदयांनी आरक्षणाचा मुद्दा उपस्थित करुन, जमिनी परत करता येणार नाहीत, असे सांगितले.आणि त्या जमिनींचे "पब्लिक ऑक्शन "करावे लागेल असे सांगितले. साधारणत: 1960 साली सुरु झालेल्या औद्योगिकरणाच्या प्रोसेसमध्ये उदात्त हेतुने,शेतक-यांनी जमिनी दिलेल्या आहेत. पण बहसंख्य कारखाने बंद पडून, तेथे युजर चेंज झालेले आहेत. शेतक-यांनी एखाद्या उद्योगासाठी विशिष्ट हेतुने ती जमीन दिलेली होती, त्यामुळे औद्योगिकरणाला चालना मिळाली. आता युजर चेंज झालेले

..2..

ता.प्र.क्र. 2996..

श्री. जितेंद्र आव्हाड..

आहते. आपले व्हीवज् चेंज झालेले आहेत. हा युजर आणि व्हीवज् चेंज झाल्यानंतर, पब्लिक ऑक्शनची गरज असतांना,शासकीय अधिका-यांना हाताशी धरुन, काही जमिनीवर तर युजर यूजचा आदला-बदल करीत गृहनिर्माण संकुले उभे झालेली आहेत. जवळ जवळ दहा ते पंधरा हजार कोटी रुपयांच्या औद्योगिक जमिनींचे असे गृहनिर्माण संकुलामध्ये रुपांतर झालेले आहे. तर महाराष्ट्र शासन युजर आणि युजचा जो वापर आहे, त्यामध्ये पायबंद घालून, हया जनिमी फक्त जर औद्योगिक कारणासाठी वापरल्या जाणार नसतील तर त्या जमिनी ताब्यात घेणार आहे किंवा त्याचे पब्लिक ऑक्शन करणार आहे काय?

श्री. अशोक चव्हाण :सभापती महोदय, एम.आय.डी.सी.मध्ये जमिनीचा वापर हा कितपत औद्योगिक वापरासाठी झाला पाहिजे. किती एम.एल.टीस् साठी झाला याला काही निश्चित निकष लावण्यात आलेले आहेत.सन्माननीय सदस्यांनी एखादी स्पेसिफिक केस सांगितली आणि उदाहरण दिले तर निश्चित त्यावर शासनाला कारवाई करता येईल.

-----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**जोजी (ता.जि.वर्धा) लघुपाटबंधारे प्रज ल्पाच्या बांधज ामाची सद्यस्थिती**

**(3) * 1835 श्री. व्हि. यू. डायजव्हाजे , प्रा. बी. टी. देशमुज , श्री. वसंतराव जोटरे , श्री. ाासाहेब बोरस्ते , श्री. जी. एल. अैापूरे** : स-मा-ा-नीय जलसंपदा (ृ ष्जा जोरे पाटबंधारे महामंडळ वजळू-ा) व लाभजेत्र विज ास मंत्री पुढील जोष्टींचा ज़ुलासा ज रतील ज ाय :-

(1) वर्धा जिल्ह्यातील 530 हेक्टर सिंच-ा जमता उपलब्ध ज रु-ा देजाऱ्या दि-ांज 6-9-2001 च्या ि-र्जया-ो रुपये 494.40 लज प्रशासज़ीय मा-यता प्राप्त जोजी (ता.जि.वर्धा) लघुपाटबंधारे तलाव/मातीचे धरज या लघु प्रज ल्पास लाजजाऱ्या व-ा जमि-ीच्या ि-र्व-ी ज रजास मंजुरी मिळज्यासाठी दि-ांज 20-1-2005 जिंवा त्या दरम्या-ा पाठविज्यात आलेल्या प्रस्तावास प्रधा-ा मुज्य व-ासंरजज (मध्यवर्ती), भोपाळ यांची मंजुरी मिळज्याच्या प्रश्-ाची सद्य:क्स्थती ज ाय आहे,

(2) उक्त प्रस्तावास मंजुरी मिळाली असल्यास, जेव्हा,

(3) अद्याप मंजुरी मिळाली -ासल्यास, विलंब होज्यास जोजत्या अडचजी आहेत व त्या दूर ज रज्यासाठी शास-ा-ो ज ाय उपाययोज-ा जेली आहे वा ज रज्यात येत आहे ?

**डॉ. सूनील देशमुख श्री.अजित पवार यांच्या करिता** : (1) सदर व-ा प्रस्तावाबाबत जेत्रिय ज ार्यालय, पक्श्चम जेत्र, भारत सरज ार, पर्यावरज व व-ा मंत्रालय, भोपाळ यां-ी दि.9.3.2005 अ-वये उपक्स्थत जेलेल्या मुद्यांची पुर्तता ज रज्याची ज ार्यवाही जेत्रियस्तरावर सुरु आहे.

(2) व-ा प्रस्तावास अद्याप मंजुरी मिळालेली -ाही.

(3) सदर व-ा प्रस्तावावर भोपाळ येथील ज ार्यालया-ो दि.9.3.2005 रोजीच्या पत्रा-वये उपक्स्थत जेलेल्या मुद्यांची पूर्तता ज रज्याबाबतची ज ार्यवाही सुरु आहे.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे :सभापती महोदय, सिंचनाचा मोठा अनुशेष असलेला वर्धा जिल्हा आहे. हा गोजी पाटबंधारे प्रकल्प मातीचे धरण असलेला आणि पाच कोटी रुपये खर्चाचा आहे. याला प्रशासकीय मान्यता दिनांक 6 मे,2001 ला मिळाली. त्याबाबीला तब्बल चार वर्षे झालेली आहेत.अजूनही वन खात्याची मंजुरी मिळालेली नाही. हा प्रश्न एक महिन्यापूर्वी दाखल केला असतांना उत्तरामध्ये असे सांगितलेले आहे की, दिनांक 9.3.2005 अन्वये उपस्थित केलेल्या मुद्यांची पूर्तता करण्यात येत आहे. म्हणून माझा पहिला प्रश्न असा आहे की, वन जमिनीच्या नर्वनीकरणास आठ-दहा दिवसात मान्यता मिळेल काय? या धरणाचे पूर्वीचे नियोजन डिस्टर्ब

झालेले आहे, म्हणून आता नवीन नियोजन काय केलेले आहे? सन 2005-2006 मध्ये आपण या धरणासाठी काही तरतुद केलेली आहे काय? असल्यास, किती रुपयांची तरतूद केलेली आहे?

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1835. . .

डॉ. सुनील देशमुख :सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, सर्व पुर्तता करुन, हा प्रस्ताव भोपाळला पाठविला होता. पण त्यांनी 9.3.2005 ला नुकताच तो प्रस्ताव परत पाठविलेला आहे. तातडीने त्या प्रस्तावाची पूर्तता करुन, तो प्रस्ताव परत पाठवला आहे. अत्यंत छोटे असे दोन मुद्दे त्यांनी उपस्थित केले होते.3 हेक्टर 25 गुंठे एवढी ती जमीन आहे आणि त्यामध्ये फक्त तीनच झाडे आहेत आणि त्यासाठी ही सगळी खटाटोप करावी लागली आहे.

यानंतर श्री. बरवड ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 1835 .... डॉ. सुनील देशमुख ....

सगळा प्रस्ताव आम्ही परिपूर्ण करुन पुन्हा परत पाठविलेला आहे. त्यांच्याकडून प्रस्ताव मान्य होऊन आल्यानंतर तातडीने कार्यवाही करण्यात येईल.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सन 2005-06 मध्ये किती तरतूद केली आहे आणि नसेल तर केव्हा करणार आहात ? किती वर्षामध्ये, किती महिन्यांमध्ये हे पूर्ण करणार ? याबाबत काय नियोजन केलेले आहे ? याबातीत आपल्याला नियोजन करावे लागेल.

डॉ. सुनील देशमुख : सन 2004-05 मध्ये 25 लाख 13 हजार एवढे अनुदान प्राप्त झाले होते त्यातील फक्त 4 लाख रुपये खर्च करु शकलो. कारण हे काम पुढे सरकले नाही. 4 लाख रुपये खर्च हा प्राथमिक गोष्टींसाठी केलेला आहे. तिकडून प्रस्ताव पारित होऊन आल्यावर तातडीने कार्यवाही करु.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, 6.9.2001 ला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. आपला नियम असा आहे की, पाच वर्षे झाल्यानंतर पुन्हा सुधारित प्रशासकीय मान्यता द्यावी लागते. माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, यामध्ये वनाच्या बाबतीत अतिशय किरकोळ अडचणी आहेत. वन विभागाची मान्यता भोपाळच्या कार्यालयाने किंवा वन विभागाच्या कार्यालयाने द्यावयाची आहे. याबाबतीतमध्ये निश्चित अधिकाऱ्याकडे जबाबदारी सोपवून त्याला हे सर्व प्रोसेसिंग करण्यासाठी विशेष जबाबदारी त्यांच्याकडे सोपविणार काय ?

डॉ. सुनील देशमुख : त्याप्रमाणेच आम्ही निर्देश दिलेले आहेत. 14 मार्च, 2005 ला आपल्याकडे प्रस्ताव परत आला. 18 मार्च, 2005 ला वर्धा येथील डेप्युटी कॉन्झर्व्हेटर ऑफ फॉरेस्ट यांच्या कार्यालयाकडे प्रस्ताव दिला. त्यांनी 21 मार्च, 2005 ला चीफ कॉन्झर्व्हेटर ऑफ फॉरेस्ट यांच्या कार्यालयाकडे पाठविला. 24 मार्च, 2005 ला हा प्रस्ताव नोडल ऑफीसरकडे गेलेला आहे. या सात दिवसांमध्ये एवढी कार्यवाही केलेली आहे. आपण एका स्पेशल अधिकाऱ्याला नेमून हे तातडीने पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करु.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM

## ठाणे-बेलापूर औद्योगिक पट्टयाला विशेष उत्पादन क्षेत्राचा दर्जा देण्याबाबत

**(४) * २८१७ श्री. जितेंद्र आव्हाड , प्रा. जोगेंद्र कवाडे , प्रा. फौजीया खान , श्री. जगन्नाथ शेवाळे , डॉ. वसंत पवार , श्री. सदाशिवराव पोळ , श्री. वसंतराव चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक ४३१ ला दिनांक १४.१२.२००४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय उद्योग मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील जाय :-

(१) राज्याला सर्वाधिक महसूल देणाऱ्या ठाणे औद्योगिक पट्टयाला विशेष उत्पादन क्षेत्राचा दर्जा देज्यासंदर्भात टास्क फोर्सने शासनास सादर केलेल्या अहवालातील शिफारशींबाबत करण्यात येत असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रश्नी करण्यात येत असलेल्या कार्यवाहीचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(३) उक्त प्रश्नी अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत व लवकरात लवकर कार्यवाही करण्यासाठी शासनाने कोणत्या प्रकारे पाठपुरावा केला आहे वा जरज्यात येत आहे ?

**राणा जगजितसिंह पाटील, श्री.अशोक चव्हाण यांच्याकरिता** : (१) -ाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) महाराष्ट्र विशेष आर्थिक क्षेत्र व निर्दिष्टित क्षेत्र अधिनियम,२००४ (प्रस्तावित) बाबत विधेयकाचे प्रारुप केंद्र शासनाच्या प्रशासकीय मंजूरीसाठी सादर केले आहे. तसेच याबाबत केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या अभिप्राय/सूचना संदर्भात राज्य शासनाच्या विविध विभागाकडे विचार विनिमय सुरु आहे.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, महाराष्ट्राच्या खऱ्या औद्योगिकीकरणाची सुरुवात ज्या पट्टयात झाली त्या पट्टयाचे नाव ठाणे, बेलापूर पट्टा आहे. किंबहुना महाराष्ट्राला आर्थिक गती आणि आर्थिकदृष्टया मजबुती देण्याचे काम तसेच पूर्ण जगामध्ये महाराष्ट्राचे नाव करण्याचे काम या औद्योगिक पट्टयाने केलेले आहे. आज या औद्योगिक पट्टयाची परिस्थिती अतिशय दयनीय आणि मरणासन्न आहे. त्या ठिकाणचे 72 टक्के उद्योगधंदे बंद आहेत. या भागामध्ये म्हापा, बेलापूर, वागळे इस्टेट अशा दोन तीन एमआयडीसीज आहेत. अशा वेगवेगळया एमआयडीसीजमध्ये रेट्‌सच्या बाबतीत समानता नाही. त्या ठिकाणी रेट्‌सच्या बाबतीत फरक आहे. ठाण्याचा भाव साडेआठ हजार रुपये आहे आणि म्हापा येथील नवीन इंडस्ट्री असताना त्या ठिकाणी साडेतीन हजार रुपये भाव आहे. यातील फरक बघून औद्योगिकीकरणाची गती म्हापा येथे जास्त आहे आणि ऐतिहासिक अशा ठाणे एमआयडीसी पट्टयातील उद्योग बंद पडावयास लागले आहेत. म्हणून दहा किलोमीटरवर

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM

ता. प्र. क्र. 2817 ....... श्री. जितेंद्र आव्हाड .....

असलेल्या एमआयडीसीमध्ये समानता आणणार काय ? ही समानता आणत असताना माननीय मुख्यमंत्र्यांनी केलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, ठाणे, बेलापूर पट्टयाला उर्जितावस्था देण्यासाठी विशेष सवलती ठाणे, बेलापूर पट्टयाला देणार आहोत कारण महाराष्ट्रातील सर्वात जास्त उद्योगधंदे या ठिकाणी आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांनी केलेल्या निवेदनावर शासन गंभीर आहे काय ? अशा परिस्थितीमध्ये शासन काय सवलती देणार आहे ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, रेट्समध्ये जी विषमता आहे त्याची नीट माहिती घेऊन येत्या महिनाभरात निर्णय घेण्यात येईल. दुसरी जी बाब चर्चेला आली ती म्हणजे डेसिग्नेटेड एरियाचे कंसेप्ट प्रपोज करीत आहोत. त्याचे बिल तयार करुन केंद्र शासनाकडे पाठविले आहे. स्पेशल इकॉनॉमिक झोन आणि डेसिग्नेटेड एरिया या भागामध्ये जे उद्योग सुरु होतील त्यांना कराच्या बाबतीत आणि कामगारांच्या बाबतीत वगैरे विशेष सवलती देण्यात येणार आहेत. निश्चितच हा भाग डेसिग्नेटेड एरिया म्हणून डेसिग्नेट झाला की निश्चितपणे सुधारणा होईल.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2817..

श्री.अनंत तरे : सभापती महोदय, प्रश्न क्रमांक मध्ये असे विचारले होते की, ठाणे औद्योगिक पट्टयाला विशेष उत्पादन क्षेत्राचा दर्जा देण्यासंदर्भात टास्क फोर्सने शासनास सादर केलेल्या अहवालातील शिफारशींबाबत करण्यात येत असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय असे विचारले होते त्याला नाही असे उत्तर दिलेले आहे. हा अहवाल पूर्ण कधी होणार आहे ? ठाणे औद्योगिक पट्टयाला विशेष उत्पादन क्षेत्राचा दर्जा देण्यासंबंधी टास्क फोर्सने अहवाल शासनाला सादर केलेला आहे. ठाणे जिल्हयाच्या शहरात व परिसरामध्ये अनेक कंपन्या बंद पडलेल्या आहेत त्या कंपन्या औद्योगिक पट्टयाच्या क्षेत्रात सुरु करण्यासाठी किंवा दुस-या कोणत्याही कंपन्यांमध्ये विलिन होण्यासाठी बंधन आणले आहे काय ?

श्री.अशोक चव्हाण : डेसिग्नेटेड एरिया ॲक्टमध्ये बदल करण्यासंबंधीच्या प्रस्तावाबाबत केंद्र शासनाकडून निर्णय घ्यावा लागेल. त्याच्यामध्ये अनेक कायद्यांमध्ये बदल किंवा शिथिलता आणावी आणि एक खिडकी योजना सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. ठाणे व बेलापूर या शहरापुरते हे मर्यादित नाही तर ते धोरण सबंध राज्यात लागू होणार आहे. सिटीमध्ये असलेल्या सवलती देणे यासंबंधी केंद्राकडून चौकशी करण्यात आली असून त्यांनी काही माहिती मागविली आहे ती माहिती आम्ही त्यांना देणार आहोत. परंतु जागा वापराबाबत बंधने आणावी लागतात, पण बंधने जास्तीत जास्त आणली तर त्याच्यातून गुंतागुंत होणार असेल तर तसे करणे उचित होणार नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, ठाणे शहरामध्ये व परिसरामध्ये औद्योगिक क्षेत्राचे निवासी क्षेत्रात बदल झालेले आहेत असे मंत्रिमहोदयांनी सांगितले आहे. माझा प्रश्न असा आहे की, अशा किती औद्योगिक एरियात बदल करण्याची शासनाने परवानगी दिली आहे ?

श्री.अशोाक चव्हाण : हा डेसिग्नेट एरिया ॲक्ट आणि स्पेशल इकोनॉमी झोनचा प्रश्न आहे. काही ठिकाणी जागेचा गैरवापर होत आहे किंवा जागेच्या वापरामध्ये बदल करुन जागेचा दुरुपयोग केला जातो असे मा.सदस्यांना अभिप्रेत असावे.

2....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MHM/

ता.प्र.क्र.2817.....

श्री.जयंत प्र.पाटील : आपल्या विभागाने परवानगी दिली आहे. मा.सदस्य श्री.अनंत तरे यांनाही हाच प्रश्न अभिप्रेत आहे. व्यवसाय वा उद्योगधंदे करण्यासाठी शेतक-यांनी आपल्या जमिनी दिल्या होत्या, ठिकाणी आता निवासी क्षेत्र झालेले आहे.

श्री.अशोक चव्हाण : एमआयडीसी एरियामध्ये उद्योगधंद्याला प्राधान्य आहे. परंतु 60 टक्के जागा ही औद्योगिक कारणासाठी वापरावी, इतर जागा त्याठिकाणच्या सोयी सुविधांसाठी वापरावी असे बंधन आहे. ठाणे एमआयडीसीत किंवा अन्य परिसरामध्ये जागेचा दुरुपयोग झाल्याची माहिती आमच्याकडे दिल्यास आणि ज्यांनी त्या जागेच्या वापरात बदल करुन नियमाचे उल्लंघन केले असेल अशा प्रकरणांची तपासणी करुन त्यावर निश्चित कारवाई केली जाईल.

प्रा.जोगेंद्र कवाडे : पहिल्या प्रश्नाला उत्तर आलेले नाही. ठाणे-बेलापूर औद्योगिक पट्टा राज्याला अधिक महसूल देणारा औद्योगिक पट्टा आहे, त्याला विशेष उत्पादन क्षेत्राचा दर्जा देण्यासंदर्भात टास्क फोर्सने अहवाल दिलेला आहे. त्या अहवालातील शिफारशी काय आहेत आणि त्या शिफारशींवर कार्यवाही करण्यासाठी शासनाकडून विलंब का होत आहे याचा खुलासा करावा.

श्री.अशोक चव्हाण : मॅकेन्सीच्या टास्क फोर्सने दिलेला अहवाल शासनास प्राप्त झालेला आहे. त्यात त्यांनी असे म्हटले आहे की, "The Govt. of Maharashtra should revive the Thane-Belapur industrial belt by offering state sponsored, SEZ like incentive including progressive labour laws and captive power plants. We propose that this area be desginated as the first state sponsored special manufacturer zone. In order to revive this once vibrant production centre, we will need to create better infra-instructure to devote more of the years tax collection to its' development". हा प्रस्ताव आल्यानंतर शासनाने मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती त्या समितीनेही शासनाकडे अहवाल दिलेला आहे. यामध्ये कामगार कायदा किंवा पर्यावरणासंबंधीचे मुद्दे आहेत. अशा 4-5 ठिकाणी कायद्यात शिथिलता आणावी लागेल किंवा बदल करावे लागतील आणि त्यासाठी केंद्र सरकारच्या निदर्शनास आणून दिलेले आहे. यासंबंधी त्यांनी अधिक माहिती शासनाकडे मागविली आहे. हा अहवाल 2003 सालाच्या अखेरीस सादर झाला आहे.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 2817 पुढे सुरु... (श्री. अशोक चव्हाण पुढे सुरु...)

गेल्या वर्षभरामध्ये त्यात बरीच प्रगती झालेली आहे. डेसिग्नेटेड एरिया ॲक्ट तसेच स्पेशल इकॉनॉमिक झोन हे दोन प्रस्ताव केन्द्र शासनाच्या विचाराधीन असून त्यासंदर्भातील बिले पारित झाल्यानंतर यामधील ब-याचशा गोष्टी मार्गी लागतील.

श्री. जितेंद्र आव्हाड : डेसिग्नेटेड झोनचा प्रस्ताव केन्द्राकडे पाठविलेला आहे. माझा प्रश्न असा आहे की, हा डेसिग्नेटेड झोन ठाणे जिल्ह्याच्या कोणकोणत्या भागात विभागलेला आहे. डेसिग्नेटेड सीमा सांगितल्या जातील काय ? महाराष्ट्र शासनाने 1960 साली शेतक-यांच्या जमिनी घेऊन एमआयडीसीच्या बाहेर देखील उद्योगधंदे उभारण्यास परवानगी दिली होती. येथील किती उद्योग बंद आहेत आणि किती उद्योग चालू आहेत ? तसेच किती उद्योग बंद करुन त्याठिकाणी रेसिडेन्शीयल कॉम्प्लेक्स उभारले गेलेले आहेत याची माहिती मा. मंत्री महोदय सभागृहाच्या पटलावर ठेवतील काय ?

श्री. अशोक चव्हाण : डेसिग्नेटेड एरिया ॲक्ट हा संपूर्ण महाराष्ट्राला लागू होईल. को-ऑप. इंडस्ट्रीयल एस्टेट तसेच इंडस्ट्रील टाऊनशीपच्या बाबतीत जी काही कार्यवाही करावयाची असते त्यासाठी नगरपालिका, ग्राप पंचायत , जिल्हा परिषद अशा ठिकाणी अर्ज करुन ती प्रक्रिया त्रासदायक होण्यापेक्षा एक खिडकी पध्दतीखाली ही परवानगी दिली तर कामे लवकर होतील अशी कल्पना आहे. मा.सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे ज्या औद्योगिक जागेचा वापर गृहनिर्माणाकरिता विशिष्ट मर्यादेच्या पलिकडे केला असेल तर ती बाब तपासून निश्चित कारवाई करता येईल.

श्री. अनंत तरे : एकीकडे शासन उद्योगधंद्यांना प्रोत्साहन देण्याचे काम करते. परंतु दुस-या बाजूला अशा उद्योगधंद्याच्या जागेवर रेसिडेन्शियल कॉम्प्लेक्स उभे रहातात. त्या कॉम्प्लेक्सना एमआयडीसीचे पूर्वी असलेले कनेक्शन आजही चालू ठेवलेले आहे. तेव्हा ज्या ठिकाणी औद्योगिक क्षेत्र बंद करुन रेसिडेन्शियल कॉम्प्लेक्स उभारलेले आहेत, त्या ठिकाणचे एमआयडीसीचे नळाचे कनेक्शन बंद करण्यात येईल काय ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 2817 पुढे सुरु...

श्री. अशोक चव्हाण : हा प्रश्न डेसिग्नेटेड झोन किंवा स्पेशल इकॉनॉमिक झोन पुरता मर्यादित प्रश्न आहे. तरीही मा.सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे इंडस्ट्रियल एस्टेस्टसाठी दिलेले नळ कनेक्शन किंवा इतर फॅसिलिटीजचा दुरुपयोग झाला असेल तर त्याबाबतीत तातडीने कारवाई करता येईल.

--

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ SBT/

**अमरावती शहरासाठी वाढीव पाणीपुरवठा योजना टप्पा दोनची सद्य:स्थिती**

**(५) * १९३३ प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , श्री. वसंतराव खोटरे , श्री. नानासाहेब बोरस्ते , प्रा. शरद पाटील : दिनांक ९ डिसेंबर, २००३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या दिनांक ८ डिसेंबर, २००३ रोजी तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील प्रश्न क्रमांक ३६८०३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती शहरासाठी वाढीव पाणीपुरवठा योजना टप्पा दोन या प्रकल्पाच्या बांधकामासाठी महापालिकेने हुडकोला सादर केलेला १२.५० कोटी रुपयाचा कर्जाचा प्रस्ताव हुडकोने मंजूर केला असून प्रत्यक्ष निधी उपलब्ध करण्यात आला आहे काय,

(२) असल्यास, पुढे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप निधी उपलब्ध करण्यात आला नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रणजित कांबळे, श्री. अजित पवार यांच्याकरिता** : (१) नाही. हुडकोने २१ नागरी पाणीपुरवठा व मलनिस्सारण योजनांसाठी एकूण रु.३२२.९६ कोटी कर्ज मंजूर केले होते. त्यामध्ये अमरावती पाणीपुरवठा योजनेसाठी रु.१२.५० कोटी कर्जाचा समावेश होता. या कर्जामध्ये समाविष्ठ इतर नागरी स्वराज्य संस्थांनी हुडकोच्या अटी व शर्तीची पुर्तता न केल्यामुळे हुडकोने दिनांक २६-२-२००४ च्या पत्रान्वये संपूर्ण कर्ज रद्द केले आहे.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------

प्रा. बी.टी.देशमुख : छापल्याप्रमाणे जे उत्तर आहे त्या उत्तरामध्ये उद्योगाच्या विरुध्द परिस्थिती आहे. उद्योगामध्ये परिस्थिती अशी आहे की, विकसित भागामध्ये ज्या सवलती आहेत त्या अविकसित भागात नाहीत त्यामुळे कोण येत नाही. पाण्याच्या बाबतीत परिस्थिती अशी आहे की, विकसित भागातील कोणी तरी काही केले म्हणून अविकसित भागाला कर्ज मिळत नाही. सोलापूर नगरपालिकेने पैसे फेडले नाहीत म्हणून अमरावती भुयारी गटार योजनेला पैसे देता येत नाहीत असे लेखी कळविलेले आहे. आता तो प्रश्न नाही. कारण त्या प्रश्नाची मी नोटीस दिलेली नाही. आताच्या प्रश्नाला असे उत्तर दिलेले आहे की, "हुडकोने 21 नागरी पाणीपुरवठा व मलनिस्सारण योजनांसाठी एकूण रु. 322.96 कोटी कर्ज मंजूर केले होते. त्यामध्ये अमरावती पाणीपुरवठा योजनेसाठी रु. 12.50 कोटी कर्जाचा समावेश होता. या कर्जामध्ये समाविष्ट इतर नागरी स्वराज्य संस्थांनी हुडकोच्या अटी व शर्तीची पूर्तता न केल्यामुळे हुडकोने दिनांक 26.2.2004 च्या पत्रान्वये संपूर्ण कर्ज रद्द केले आहे." माझे म्हणणे असे आहे की, ही सारी व्यवस्था तयार आहे. परंतु डिस्ट्रीब्युशनमुळे अडलेली आहे. 8-10-12 कोटी रुपये इमर्जन्सीमध्ये अनेकदा खर्च करावे

...4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 1933 पुढे सुरु... (प्रा.बी.टी. देशमुख पुढे सुरु..

लागतात. तसा प्रश्न नाही. पाणी पुरवठा मंडळाने अतिशय उत्तम त-हेने ही योजना चालविलेली असून ती दरवर्षी प्रॉफीटमध्ये आहे. माझे म्हणणे असे आहे की, यांना एवढा निधी उपलब्ध झाला तर डिस्ट्रीब्युशन सिस्टीम तयार करुन लोकांना ताबडतोब पाणी मिळू शकेल. उन्हाळ्याचे दिवस आहेत. बाकीचे काही मी बोलत नाही. मा.मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मिटींग झाली. ...

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MHM/ SBT/ प्रथम श्री.शिगम 14:40

ता.प्रक.1933.. प्रा.बी.टी.देशमुख...

त्या बैठकीचे फोटो वृत्तपत्रात छापून आलेले आहेत. या बैठकीस उपस्थित असलेले सगळेच मंत्री चांगले दिसत आहेत. ओरिजनल पेक्षा फोटोत सर्व मंत्री महोदय चांगले दिसत आहेत. सभापती महोदय, माझा लहानसा प्रश्न आहे.12.50 कोटी रुपयांची तरतूद ही वेगळी कुठून तरी करा. सभापती महोदय, व्याजाचे दर अतिशय कमी झालेले आहेत. एस्क्रो अकाऊंट त्यांनी करुन दिलेले आहे.शासनाची हमी आहे. अशी सर्व परिस्थिती असताना एका गावातील योजनेसाठी 12.50 कोटी रुपये मिळू नये ही गोष्ट मला योग्य वाटत नाही. माझे म्हणणे असे आहे की, तुम्हाला काय करावयाचे आहे ते करा. आठ दिवसामध्ये, पंधरा दिवसामध्ये, वा उन्हाळयामध्ये कामी पडेल अशी व्यवस्था शासनाकडून केली जाईल काय ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय,खरे तर या योजनेकरिता शासनाने स्वत: लक्ष देऊन 10 कोटी 18 लाख रुपयांचे अनुदान पहिल्यांदाच उपलब्ध करुन दिलेले आहे. एल.आय.सी. कडून आणि खुल्या बाजारातून येथे जवळपास 21 कोटी 27 लाख रुपये कर्ज त्या ठिकाणी उपलब्ध करुन दिलेले आहे. सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी जो मुद्दा सांगितला तो खरा आहे. हुडकोकडून या कामासाठी 12.50 कोटी रुपये मिळणार होते. परंतु त्या 21 योजनेमधल्या 12 वेगवेगळया शहरांनी कागदपत्रांची पूर्तता न केल्यामुळे ते कर्ज हुडकोने दिले नाही. त्यासंदर्भात आम्ही असाही प्रयत्न केला की, ती शहरे त्यांच्या कागदपत्रांची पूर्तता करुन देत नाहीत.अमरावती शहराने त्यांची स्वत:च्या कागदपत्राची पूर्तता करुन दिलेली आहे. या 322 कोटी रुपयांमध्ये अमरावती शहराचा जेवढा हिस्सा आहे तेवढे कर्ज तुम्ही आम्हाला मंजूर करुन द्या म्हणजे ती योजना आपल्याला कार्यान्वीत करता येईल. यासाठी शासनाची हमी द्यावयाची होती ती देखील देण्यात आली होती. म्हणजे शासनाने सातत्याने अशीच भूमिका घेतली हे काम लवकरात लवकर मार्गी लागावे. परंतु हुडकोने ते मान्य केले नाही. हुडकोने हे एक पॅकेज तयार केलेले आहे. पॅकेजमधील एका योजनेला आम्ही अशा प्रकारचे कर्ज मंजूर करणार नाही. आता पुन्हा प्रश्न निर्माण झाला की, हे 12.50 कोटी रुपये कसे द्यावयाचे. यामध्ये 7.50 कोटी रुपयांची जबाबदारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने उचलण्याचे ठरविलेले आहे. लवकरच त्यासंदर्भातील बैठक लावली जाईल. महामंडळा समवेत बैठक घेऊन 7.50 कोटी रुपये या कामासाठी उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही केली जाईल. मात्र 5 कोटी रुपये विदर्भ वैधानिक विकास महामंडळाकडून

2...

ता.प्रक.1933

श्री. अजित पवार..

करुन घेतले गेले पाहिजेत. याबाबतीत महामंडळाच्या अधिका-यांशी देखील मी बोललेलो आहे. परंतु ते म्हणाले की, आता 31 मार्च हा दिवस आलेला आहे. 1 एप्रिल नंतर नवीन आर्थिक वर्ष सुरु होत आहे. नवीन आर्थिक वर्ष सुरु झाल्यानंतर यासंबंधीचा प्रस्ताव मंजूर करण्यासाठी तुम्हाला मदत करु असे त्यांनी मला सांगितले आहे. विदर्भ वैधानिक विकास महामंडळाकडून 5 कोटी रुपये आणि 7.50 कोटी रुपये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या स्वत:च्या निधीतून उपलब्ध करुन देऊन 12.50 कोटी रुपये उपलब्ध करुन देऊन राहिलेले अर्धवट काम पूर्णत्वाला न्यावयाचे अशा प्रकारे पाणी पुरवठा विभागाचा प्रस्ताव आहे आणि तशी कार्यवाही चाललेली आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे त्यातील सुरुवातीचा भाग वस्तुस्थितीवर आधारीत आहे. मी मघाशी सांगितले की, 31 मार्च रोजी यासंबंधीची बैठक झालेली आहे. त्या बैठकीतील सर्व मंत्र्यांचे फोटो अतिशय चांगले आहेत. माननीय मुख्यमंत्री खूर्चीवर बसलेले आहेत. माननीय मंत्री महोदय उपस्थित आहेत,माननीय पालक मंत्री उपस्थित आहेत, त्या ठिकाणचे माजी आमदार उपस्थित आहेत. आपण 12.50 कोटी रुपयांमध्ये दोन भाग केलेले आहेत. 5 कोटी रुपये विदर्भ वैधानिक विकास मंडळाकडून मिळतील असे माननीय मंत्र्यांनी सांगितले. परंतु त्या मंडळाकडचा कारभार 31 मार्च नंतरच सरु होईल. आपण या संदर्भातील निर्णय घेतलेला आहे. 7.50 कोटी रुपये जे आहेत आठ दिवसात, पंधरा दिवसात उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता यासाठी आहे की, त्या ठिकाणी पाणी उपलब्ध आहे. त्या ठिकाणी फक्त डिस्ट्रीब्युशन सिस्टीम तयार नाही.उन्हाळयात अनेक ठिकाणी पाण्याच्या अडचणी येतात. मी अनेक कॉलन्यांची नावे सांगू शकतो. मी मुद्दाम नावे वाचून दाखवित नाही. वैधानिक विकास महामंडळाचा 5 कोटीचा प्रश्न मी आता उपस्थित करु इच्छित नाही. परंतु 7.50 कोटी रुपये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून उपलब्ध होणार आहेत . माझा एवढाच प्रश्न आहे की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या कामासाठी 7.50 कोटी रुपये आठ दिवसात, पंधरा दिवसात उपलब्ध करुन देईल काय ?

यानंतर श्री.कानडे..

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 1933 पुढे सुरु...

श्री. अजित पवार : सभापती महोदय, याठिकाणी या योजनेसाठी लागणारा पैसा कर्जाद्वारे उभा करुन द्यावयाचा होता. तरी देखील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने आपल्या बैठकीमध्ये हा विषय आणून साडेसात कोटी रुपये उपलब्ध करुन देण्याच्या बाबतीत निर्णय घेतलेला आहे. ही बैठक लवकरात लवकर त्याठिकाणी लावली जाईल आणि तशा प्रकारची कार्यवाही केली जाईल.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, जीवन प्राधिकरणाने योग्य निर्णय घेतला आहे. का घेतला याचा विचार केला तर सोअर्समधून पाणी आणण्यासाठी खर्च करावे लागत होते. टाक्या बांधण्यासाठी ऑलरेडी खर्च करावयाचे होते. ही योजना त्यांची आहे. गेली पाच वर्षे या योजनेतून मंडळाला चांगले उत्पन्न होत आहे. म्हणून हा निर्णय योग्य आहे. दोन लाईन टाकल्या तरी दुस-या-तिस-या दिवसापासून उत्पन्न सुरु होते. माझी शासनाला विनंतील आहे की, यासदंर्भातील बैठक येत्या 8-10 दिवसात बोलवावी आणि निर्णय घ्यावा म्हणजे निश्चितपणाने बैठकीसाठी मुदत दिली तर योग्य होईल. प्राधिकरणाला मी धन्यवाद देतो की त्यांनी ही योजना अतिशय चांगली पध्दतीने चालविली आहे. बैठक घेण्यासाठी निश्चित अशी मुदत देण्याबाबत शासनाला कोणती अडचण आहे ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, सभागृहामध्ये उत्तर दिले जाते त्यासंदर्भात त्या दिवसांमध्ये नक्कीच कार्यवाही होते. मंडळाची बैठक घेण्यासाठी बाकीचे सन्माननीय सदस्य उपस्थित रहावे लागतात. मी यापूर्वीच सांगितल्याप्रमाणे याबाबतीत आमचा पॉझीटीव्ह ॲप्रोच आहे. 12-15 कोटी इतर वित्तीय संस्थांकडून उभे करावयाचे होते. त्याबाबतीत मंडळाने निर्णय घेऊन साडेसात कोटी रुपये उपलब्ध करुन दिले. विदर्भ वैधानिक विकास मंडळाकडून 5 कोटी रुपये दिल्यावर काम होईल. मा.सदस्य बैठक घेण्यासाठी निश्चित कालावधी देण्याचा आग्रह धरीत आहेत. बैठकीची निश्चित तारीख मला सांगता येणार नाही. टेक्नीकल बाबी असतात त्या तपासून घ्याव्या लागतात. तेवढा निधी उपलब्ध आहे काय ? साडेसात कोटी लगेचच देऊ शकतात काय या सगळया आर्थिक बाबी तपासून पहाव्या लागतात. सभागृहामध्ये मी बैठक घेण्याबाबत निश्चित मुदत देऊ शकलो नाही तर लवकरात लवकर हे काम केले जाईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, तत्कालिन पाणी पुरवठा मंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी 17.12.99 रोजी ता.प्र.क्र.33517 ला यासंदर्भात लेखी उत्तर दिले होते. 1996 सालातील ही

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1933 पुढे सुरु..

प्रा.बी.टी.देशमुख ...

योजना आहे आणि 3 वर्षामध्ये 30-32 कोटी रुपये खर्च झालेले आहेत. श्री.आर.आर.पाटील यांनी स्पष्टपणाने सांगितले होते की, 2001 सालापर्यंत ही योजना कार्यान्वित करण्यासाठी निधी उपलब्ध करुन दिला जाईल आणि तशा प्रकारचे आदेश जीवन प्राधिकरणाला दिले जातील. सभापती महोदय, एका मोठया भागाला पाणी पुरवठा होत नाही. निर्णय झालेला आहे आणि साडेसात कोटी रुपये प्राधिकरणाकडून दिले जातील. खर्चाच्या कंपोनंटमधील एक भाग जीवन प्राधिकरणाने उचलला हा अतिशय व्यावहारिक आणि योग्य निर्णय आहे. योजना मंडळाकडून चालविली जाते आणि मंडळाला यामध्ये फायदा आहे. माझा प्रश्न असा आहे की, यासंदर्भात बैठक घेण्यासाठी निश्चित असा कालावधी ठरविण्यासाठी अडचण काय आहे ? सभागृहामध्ये हा प्रश्न आल्यानंतर या योजनेच्या बाबतीत अविकसित भागाचे पैसे भरले नाहीत त्यांनी कंप्लायन्स केला नाही इतर नगरपालिकांनी भरले म्हणून यांना देणार नाही. साडेबारा कोटीचा आग्रह धरला नाही. पाच कोटी रुपयांच्या बाबतीत अडचण आहे ती समजू शकतो. साडेसात कोटी रुपये देणार ही गोष्ट चार महिन्यांपासून आम्ही ऐकत आहोत. याबाबतीत निश्चित अडचण काय आहे ती सांगितली पाहिजे. मंत्रीमहोदयांनी सांगितल्यानंतर ही गोष्ट छोटी आहे. यात काही अडचण येईल असे मला वाटत नाही. माझी अशी इच्छा आहे की, उन्हाळयाला तोंड देण्याच्या अगोदर या योजनेसाठी निधी उपलब्ध झाला पाहिजे आणि याबाबतीत 10-15 दिवसात मंडळाला निर्णय घेण्याचे आदेश दिले पाहिजेत.

यानंतर श्री. गायकवाड ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तां.प्र.क्र. 1933...

श्री.अजित पवार : सभापती महोदय,सन्माननीय सदस्य वारंवार असे सांगत आहेत की, विकसित भागांनी कागदपत्रांची पूर्तता केली नाही म्हणून हे पैसे आम्हाला मिळालेले नाहीत. त्यांनी जे सांगितलेले आहे ते चुकीचे आहे.ज्यांच्याकडून कागदपत्रांची पूर्तता झालेली नाही तो थोडासा मागसलेला भाग समजला जातो. बीड, जालना, लातूर,उस्मानाबाद,आंबेजोगाई,उदगीर,परभणी,चन्द्रपूर,वर्धा,मालेगाव, औरंगाबद इत्यादी भागातून सुध्दा कागदपत्रांची पूर्तता झालेली नाही. त्यामध्ये काही मराठवाडा, विदर्भ आणि खानेदशमधील भाग आहे.त्यामुळे विकसित भागांनी कागदपत्रांची पूर्तता केलेली नाही त्यामुळे आम्हाला पेसे मिळालेले नाहीत असे रेकॉर्डवर चुकीचे राहता कामा नये म्हणून त्यासंबंधीचे उत्तर देण्याची वेळ माझ्यावर आली आहे.सन्माननीय सदस्यांचा दुसरा प्रश्न असा आहे की, माननीय मंत्रीमहोदय पंधरा दिवस किवा वीस दिवस अशी कालमर्यादा का सांगत नाहीत ? सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारत असतांना असेही सांगितले होते की, गेल्या वर्षीच्या 31 मार्चला माननीय मुख्यमंत्र्यांनी या संदर्भात एक बैठक घेतली होती. त्या बैठकीच्या वेळी घेण्यात आलेले फोटो चांगले आले आहेत. माननीय मंत्रीमहोदयसुध्दा फोटोत चांगले दिसत आहेत. प्रत्यक्षात मंत्री जसे दिसत आहेत त्यापेक्षासुध्दा फोटोत चांगले दिसत आहेत .अमादारांचे फोटोसुध्दा चांगले आलेले आहेत. वगैरे वगैरे सर्व गोष्टी त्यांनी रेकॉर्डवर आणल्या आहेत. मागच्या वर्षीच्या 31 मार्चला बैठक झाल्यानंतरसुध्दा आता 31 मार्च 2004 उलटून गेलेले आहे तरी सुध्दा या कामाच्या बाबतीत पुढे काहीही प्रगती झाली नाही.त्याचबरोबर सन्माननीय सदस्यांनी असेही सांगितले होते की, त्या खात्याच्या तत्कालीन मंत्रिमहोदयांनी आम्हाला आश्वासन दिले होते परंतु ते आश्वासन पाळले गेले नाही. सभागृहाला सांगितलेली गोष्ट कृतीत आणली पाहिजे. या योजनेसाठी जीवन प्राधिकरणाने 7.50 कोटी रुपये देण्याचे कोणतेही धोरण नव्हते.यासाठी जो काही शासनाचा हिस्सा द्यावयाचा असतो त्याबाबत सन्माननीय सदस्यांनी असे मान्य केले आहे की, शासनाने शासनाचा हिस्सा दिलेला आहे.बाकीची जी रक्कम कर्जातून उभी केली जाणारी आहे. ती रक्कम देण्याच्या बाबतीत विलंब होत आहे.या शहराला पिण्याचे पाणी दिले गेले पाहिजे. म्हणून हा प्रश्न उपस्थित होण्याच्या अगोदर आमच्या स्तरावर एक बैठक झाली होती. त्यामध्ये 7.50 कोटी रुपये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून आणि 5 कोटी रुपये विदर्भ वैधानिक विकास मंडळाकडून 5 कोटी घेण्यासाठी त्यांच्याशी चर्चा केली

2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

होती. या संदर्भात विदर्भ वैधानिक विकास मंडळाचे असे म्हणणे आहे की 31 मार्चच्या अगोदर आम्ही हे पैसे देऊ शकत नाही.ते सुध्दा 5 कोटी रुपये देण्याच्या बाबतीत खात्री देऊ शकत नाही. आता नवीन आर्थिक वर्ष सुरु झालेले आहे. तेव्हा या दोघांशी समन्वय साधून त्यांच्याकडून लवकरात लवकर 12.50 कोटी रुपये दिले जातील . सन्माननीय सदस्य असे म्हणतील की,पंधरा दिवसात किंवा वीस दिवसात हे पैसे दिले जातील असे सांगण्यात यावे परंतु असे सांगितल्यानंतर जर त्या काळात काही झाले नाही किंवा त्यात काही अडचणी आल्या तर ते योग्य होणार नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी बैठक घेऊन सुध्दा या बाबत काही अडचणी आल्या होत्याच . मी सभागृहाला एवढीच खात्री देऊ इच्छितो की ,पुढच्या येणा-या अधिवेशनामध्ये अशा प्रकारे 12.50 कोटी रुपयांच्या निधी करता सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी. देशमुख यांना प्रश्न विचारावा लागणार नाही

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांच्या उत्तरामुळे माझे समाधान झाले आहे.

**सभापती** : ठीक आहे .

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## सिंधुदूर्ग जिल्हयातील रोजगार हमी योजनेच्या कामाबाबत

**(६) * ५०६२ कर्नल सुधीर सावंत** : सन्माननीय रोजगार हमी योजना मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग जिल्हयातील रोजगार हमी योजनेंतर्गत सन २००३-२००४ व २००४-२००५ मध्ये शास-ाा-ने किती कामे मंजूर केली त्यापैकी किती कामे सुरु झाली आहेत,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार प्रलंबित कामे सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.राणा जगजितसिंह पाटील, हर्षवर्धन पाटील यांच्याकरिता** : (१) स-न २००३-२००४ मध्ये ४०२५ कामे मंजूर केली त्यापैकी २३६४ कामे सुरु झाली आहेत व सन २००४-२००५ मध्ये ३७२० ाामे मंजूर केली त्यापैकी २९६७ कामे सुरु झाली आहेत.

(२) मजुरांना रोजगार पुरविण्याच्या दृष्टीने सध्यस्थितीत पुरेशी कामे सुरु आहेत. आवश्यकता भासल्यास उर्वरित कामे सुरु करण्यात येतील.

----------

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय,पहिल्या प्रश्नाच्या उत्तरात असे सांगण्यात आले आहे की, सन 2003-2004 मध्ये 4025 कामे मंजूर केली त्यापैकी 2364 कामे सुरु झाली आहेत व सन 2004-2005 मध्ये 3720 कामे मंजूर केली, त्यापैकी 2967 कामे सुरु झाली आहेत. परतु हे उत्तर खरे नाही. कामे जर सुरु करण्यात आली असतील तर त्यापैकी किती कामे पूर्ण झाली आहेत हा महत्वाचा प्रश्न आहे.याचे कारण असे की, दोन महत्वाच्या कारणांमुळे कामे पूर्ण होत नाही. त्यातील पहिले कारण असे आहे की, रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग या जिल्हयांमध्ये शेत तळी,शेत विहिरी अशा प्रकारच्या ब-याच कामाचे बांधकाम करण्यासाठी कुशल कामगारांची गरज असते.त्यामुळे जोपर्यन्त अकुशल कामगारांचे काम पूर्ण होत नाही तोपर्यन्त कुशल कामगारांना काम करण्यास परवानगी मिळत नाही. तसेच त्या कामाच्या निविदा काढता येत नाही.त्यामुळे आज पर्यन्त कोणतीही कामे पूर्ण झालेली नाहीत.रस्त्याच्या कामाच्या बाबतीत सांगावयाचे तर कोणत्याही रस्त्याचे काम सुरु सुध्दा झालेले नाही. कारण त्यासाठी कुशल कामगार लागतात. या संदर्भात मला माननीय मंत्रिमहोदयांना पहिला प्रश्न असा विचारावयाचा आहे की, जी कामे सुरु करण्यात आलेली आहेत त्यापेकी किती कामे पूर्ण झाली आहेत ?त्याचबरोबर कुशल कामगारांचा प्रश्न आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

4...

ता.प्र.क्र 5062...कर्नल सावंत ...

अकुश काम झाल्यानंतर कुशल काम करण्यासाठी परवानगी घ्यावी लागते तेव्हा या प्रक्रियेसाठी किती वेळ लागतो ? आणि जिल्हा स्तरावर ही परवानगी का देण्यात येत नाही ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील :सभापती महोदय, 2003 - 2004 साली सुरु केलेल्या कामाची संख्या 4000 च्या आसपास आहे त्यापैकी सुरु झालेल्या कामाची संख्या 2 हजार 300 या आसपास आहेत. त्यापैकी कच्चा बंधा-याची 1900 च्या आसपास कामे पूर्ण करण्यात आली आहेत वनराई बंधा-याची 400 च्या आसपासस कामे पूर्ण करण्यात आली आहेत. सन्माननीय सदस्यांनी रस्त्याच्या कामाच्या बाबतीत जी अडचण नमूद केली आहे ती खरी आहे. मजुरांची उपस्थिती कमी राहते त्यामुळे ..

नतर श्री.सुंबरे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/SBT/MHM/MAP/KGS. श्री. गायकवाड नंतर --- 14:55

श्री.राणा जगजितसिंह पाटील (पुढे चालू...) ता.प्र.क्र. 5062 ...

त्यामुळे शासनाचे असे मत झालेले आहे की, बाहेरच्या राज्यातून जे लमाण समाजाचे लोक येत असतात त्यांना तात्पुरती रेशनकार्डे देवून त्यांना या कामांवर सामावून घेण्यात यावे.

श्रीमती सुधा जोशी : अध्यक्ष महाराज, आता माननीय मंत्री महोदयांनी उत्तरात सांगितले आहे की, मजुरांना रोजगार पुरविण्याच्या दृष्टीने सद्य:स्थितीत पुरेशी कामे सुरू आहेत. तर किती मजुरांना तेथे कामाची आवश्यकता होती आणि किती मजुरांना 2003-04 सालामध्ये कामे उपलब्ध करून आपण दिली आहेत ? अध्यक्ष महाराज, 2004-05 ची आकडेवारी कदाचित आपल्याकडे नसतील म्हणूनच मी त्या अगोदरच्या वर्षामधील आकडेवारी विचारली आहे ती कृपया सांगावी.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : अध्यक्ष महाराज, 2003-04 ची माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नसल्याने ती माहिती मी पटलावर ठेवतो आणि शेल्फवर सध्या 700 कामे असून जवळपास 10 मॅनडेजची ही कामे आहेत.

कर्नल सुधीर सावंत : अध्यक्ष महाराज, माझा प्रश्न मघाशी अपूर्ण राहिलेला आहे तो कुशल कामांच्या बाबतीतील आहे. म्हणजे अकुशल कामे झाल्यानंतर कुशल कामासाठी परवानगी घेऊन नंतर निविदा काढण्याच्या प्रक्रियेला फार मोठा विलंब लागतो. त्यामुळे हे अधिकार जिल्हा स्तरावर असले पाहिजेत. हा अधिकार जिल्हा स्तरावर नसल्यामुळे त्या भागामध्ये ही कामे सुरूच झालेली नाहीत. तेव्हा कुशल कामांच्याबाबतीत, एकूण कामाला मंजुरी देतानाच, मंजुरी देऊन हा प्रश्न आपण सोडविणार का ?

श्री. हर्षवर्धन पाटील : अध्यक्ष महाराज, ही गोष्ट खरी आहे की, प्रथम केवळ अकुशल कामे घ्यावीत आणि ती झाल्यानंतरच मग कुशल कामांसाठी परवानगी घेऊन ती पूर्ण केली जावीत अशी आपली पध्दत आहे. आता येथे सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, आपण त्या भागातील कामांची माहिती द्यावी. म्हणजे मग त्या भागातील राहिलेल्या कुशल कामांना मंजुरी लगेच देण्यात येईल.

प्रा. जोगेंद्र कवाडे : अध्यक्ष महाराज, 2003-04 मध्ये 4025 कामे मंजूर असताना तेथे केवळ 2364 कामे सुरू झालेली आहेत आणि 2004-05 मध्ये 3720 कामे मंजूर असताना त्यापैकी 2967 कामे सुरू झालेली आहेत. म्हणजे मंजूर कामे जास्त असतानाही प्रत्यक्षात सुरू झालेल्या

..... L 2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. कवाडे (पुढे चालू...) ता.प्र.क्र.5062 ...

कामांची संख्या कमी आहे याचे कारण काय ? आणि आवश्यकता असतानाही रोजगार हमी योजनेतून मजुरांना कामे दिली जात नाहीत अशा तक्रारी आहेत, हे खरे आहे काय ?

श्री. राण जगजितसिंह पाटील : अध्यक्ष महाराज, सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या बाबतीत सांगावयाचे तर तेथे शेल्फवर पुरेशी कामे आहेत आणि मंजूर केलेल्या कामांच्या तुलनेत सुरू केलेली कामे कमी आहेत यावरूनच आपल्या लक्षात येईल की, तेथे मजुरांची उपलब्धता कमी आहे.

श्री. अनंत तरे : अध्यक्ष महाराज, सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये एक तर रोजगार नाही. शासनाच्या माध्यमातून स्थानिकांना रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून कामे द्यायची असताना परप्रांतातून येणाऱ्या लोकांना ही कामे देता येतात का ? आणि बऱ्याच भागामध्ये कंत्राटी पध्दतीने कामे दिली जात आहेत हे खरे आहे काय ? असल्यास, अशा कंत्राटी पध्दतीने कामे देणे बंद करणार का ?

श्री. हर्षवर्धन पाटील : अध्यक्ष महाराज, कोकणामध्ये स्थानिक मजूर मिळत नाहीत ही गोष्ट खरी आहे. म्हणूनच त्या 2-3 जिल्ह्यांपुरते मर्यादित तात्पुरत्या स्वरूपाची रेशनकार्डे देण्याच्या सूचना आपण दिलेल्याआहेत. विशेषत: लमाण जमातीचे लोक येतात त्यांच्या माध्यमातून ही कामे करून घेण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. दुसरे असे की, तेथे ठेकेदारी पध्दतीने बरीच कामे होतात अशा तक्रारी आहेत. वास्तविक यासाठी दक्षता पथके आपण नेमलेली आहेत आणि त्यांच्या माध्यमातून अशा आलेल्या तक्रारींबाबत निश्चित कारवाई केली जाईल.

*****

(यानंतर श्री. जागडे ..... एम 1 ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**श्री.आर.आर.पवार कार्यकारी अभियंता यांनी पाटबंधारे विभागात लाखो रुपयांचा केलेला गैरव्यवहार**

**(७) * १९४९ श्री. संजय दत्त , श्री. धनाजी साठे , मेजर सुधीर सावंत :** सन्माननीय जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) व लाभक्षेत्र विकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुळूंज स्कीम पूना (ता.पंढरपूर,जि.सोलापूर) येथील पाटबंधारे विभागाच्या कामात श्री.आर.आर.पवार तत्कालीन कार्यकारी अभियंता,पुणे यांनी सन २०००-०१-२००२ मध्ये उपअभियंता श्री.जाधव व श्री.मोरे यांच्या संगणमताने लाखो रुपयांची बोगस बिले काढलेली आहेत हे खरे आहे ज ाय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, त्यानुसार दोषी असणा-या अधिका-यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुनील देशमुख, श्री.अजित पवार यांच्याकरिता** : (१) नाही, मात्र या कामाबाबत तक्रार प्राप्त झ ाली होती.

(२) याबाबत दक्षता पथकाकडून प्राथमिक चौकशी करण्यात आली. त्यामध्ये तथ्य आढळून आले न ाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, श्री. आर. आर. पवार यांच्याविरुध्दच्या तक्रारीचे स्वरुप काय आहे ? तसेच 2000-2001 आणि 2001-2002 या वर्षाचे लेखा परिक्षण पूर्ण झाले आहे काय?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, गैरव्यवहाराबाबतच्या दोन तक्रारी करण्यात आल्या होत्या. पहिली तक्रार श्री. एकनाथ काकडे यांनी केली होती. परंतु या बाबतचा शोध घेण्याचा प्रयत्न केला तेव्हा असे दिसून आले की, तक्रार करणारी व्यक्ती अस्तित्वातच नाही. तरी देखील

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....1949.....

श्री. अजित पवार :

त्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली. त्यावेळी यामध्ये कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार झाला नसल्याचे दिसून आले. त्यानंतर दुसरी तक्रार श्री. अशोक सोनावणे, संपादक नव मार्मिक यांनी केली होती. या बाबत पाटबंधारे दक्षता पथकाने दि. 10.2.2003 रोजी सर्व चौकशी केली आहे. दक्षता पथकाचे अधिक्षक अभियंता, पुणे यांनी या बाबतची चौकशी केली आहे. त्याप्रमाणे या तक्रारीमध्ये कोणत्याही प्रकारचे तथ्य नसल्याचे दिसून आले. या ठिकाणी निनावी अर्जान्वये ही तक्रार करण्यात आली होती. तसेच दुस-या तक्रारकर्त्याने नंतर असे लिहून दिले आहे की, "आता या बाबत माझी काहीच तक्रार नाही."

**सभापती :** प्रश्नोत्तराचा तास संपला.

--

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>सभागृहाच्या कामकाजासंबंधी</u>

**सभापती** : दि. 1 एप्रिल 2005 रोजी प्रश्नोत्तराच्या तासाच्या वेळी दोन प्रश्नकर्ते सदस्य सभागृहात उपस्थित नव्हते. त्यामुळे ते प्रश्न त्या दिवशी सभागृहात चर्चेला आले नाहीत. याकडे माननीय सदस्यांनी लक्ष देण्याची आवश्यकता आहे. मी या बाबत सर्व गटनेत्यांची बैठक घेतली आहे. त्यांच्याशी चर्चा केली आहे. त्याप्रमाणे सर्व गटनेत्यांनी आपल्या सदस्यांना योग्य त्या सूचना द्याव्यात. माननीय सदस्यांनी प्रश्न विचारल्यानंतर त्याचे उत्तर येण्यासाठी वेळ जातो तसेच पैसाही खर्च होत असतो. अशा वेळी प्रश्नकर्ते उपस्थित राहत नसतील आणि तो प्रश्न चर्चेला आला नाही तर सर्व पैसा फुकट जाण्याची शक्यता आहे. आता काही कारणासाठी माननीय सदस्य सभागृहात उपस्थित राहू शकत नसतील तर त्यांनी या बाबतची पूर्वकल्पना आपल्या गटनेत्यांना किंवा विरोधी पक्षनेत्यांना किंवा संसदीय कार्यमंत्र्यांना द्यावी. आता याबाबत अगोदर कल्पना न देता माननीय सदस्य गैरहजर राहणार असतील तर पुन्हा त्यांचा प्रश्न आल्यानंतर तो स्वीकृत करावयाचा की नाही, याचा विचार पीठासीन अधिकारी म्हणून करावा लागेल.

तसेच दि. 1 एप्रिल 2005 रोजी आपण अशासकीय कामकाज पूर्ण करु शकलो नाही. म्हणून या दिवसाचे अशासकीय कामकाज बुधवार, दि. 6 एप्रिल 2005 रोजी सकाळी 10.00 ते 12.30 या वेळात पूर्ण करावयाचे आहे. त्यामुळे आता अशासकीय कामकाजावर अन्याय होणार नाही, असे मला वाटते.

--

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री. रणजित कांबळे ( ग्रामविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यावरील लेखा परीक्षा पुनर्विलोकन बाविसावा अहवाल सन 2002-2003 सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यावरील लेखा परीक्षा पुनर्विलोकन बाविसावा अहवाल सन 2002-2003 सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. रणजित कांबळे ( ग्रामविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिधुदूर्ग, नाशिक, धुळे, नंदूरबार, जळगांव, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातूर, अमरावती, अकोला, वाशिम, बूलढाणा, यवतमाळ, नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोल या जिल्हापरिषदांचे सन 2003-2004 चे वार्षिक प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिधुदूर्ग, नाशिक, धुळे, नंदूरबार, जळगांव, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातूर, अमरावती, अकोला, वाशिम, बूलढाणा, यवतमाळ, नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोल या जिल्हापरिषदांचे सन 2003-2004 चे वार्षिक प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

( यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख (सार्वजनिक बांधकाम मंत्री): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादितचा सन 2000-2001 व 2001-2002 चा पाचवा व सहावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादितचा सन 2000-2001 व 2001-2002 चा पाचवा व सहावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला.

---

श्री. राणा जगजितसिंह पाटील (कृषी राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचा सन 1998-99 व 1999-2000 चा हिशेब व लेखा परिक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचा सन 1998-99 व 1999-2000 चा हिशेब व लेखा परिक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला.

----

श्री.रणजित कांबळे (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने डॉ. अभय बंग यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या बालमृत्यू मूल्यमापन समितीचा व्दितीय व अंतिम अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : डॉ. अभय बंग यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या बालमृत्यू मूल्यमापन समितीचा व्दितीय व अंतिम अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी. : -ियम 93 अ-वये सूच-ा.**

**सभापती** : मा-ा-ीय सदस्य श्री जयंत पाटील यां-ी "अलिबाग तालुक्यात वाघ्रण खाडीवरील खारभूमी योजनेंतर्गत खारभूमीचे काम योग्य न झाल्यास जवळ जवळ 500 ते 700 एकर भात शेतीत समुद्राचे खारे पाणी शिरुन भातशेती नष्ट होण्याची निर्माण झालेली भीती" या विषयावर -ियम 93 अ-वये सूच-ा दिली आहे. तो -ियम 93 चा विषय होत -ासल्या-े, मी सूच-ोस अ-ुमती -ाज ारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने -िवेद-ा ज रावे.

माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर व इतर यांनी "दधम बु. (जि.अकोला) येथे इंदिरा आवास योजनेंतर्गत सन 1998-2000, 2000-2001 या तीन वर्षात बांधण्यात आलेली घरकुले निकृष्ट दर्जाची असणे" या विषयावर -ियम 93 अ-वये सूच-ा दिली आहे. तो -ियम 93 चा विषय होत -ासल्या-े, मी सूच-ोस अ-ुमती -ाज ारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने -िवेद-ा ज रावे.

माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते व इतर यांनी "अंबरनाथ नगरपालिकेच्या व ठाणे महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळांना वेतन अनुदान 4 महिन्यांपासून प्राप्त झाले नसणे, त्यामुळे शिक्षक शिक्षकेतरांची होत असलेली उपासमार" या विषयावर -ियम 93 अ-वये सूच-ा दिली आहे. तो -ियम 93 चा विषय होत -ासल्या-े, मी सूच-ोस अ-ुमती -ाज ारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने -िवेद-ा ज रावे.

माननीय सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "अहमदनगर जिल्हयातील पाथर्डी तालुक्यातील अनेक गावातील शेतकऱ्यांच्या वीज पंपाचे कनेक्शन राज्य वीज मंडळाच्या कर्मचाऱ्यांनी तोडल्यामुळे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे झालेले नुकसान" या विषयावर -ियम 93 अ-वये सूच-ा दिली आहे. तो -ियम 93 चा विषय होत -ासल्या-े, मी सूच-ोस अ-ुमती -ाज ारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने -िवेद-ा ज रावे.

माननीय सदस्य श्री. अनंत तरे व इतर यांनी "पनवेल येथील सिडकोच्या साडेबारा टक्के योजनेचा गैरफायदा घेऊन सिडकोच्या एका कर्मचाऱ्याने घरासमोरील जागेवर अतिक्रमण करुन करोडो रुपयांची जमीन गिळकृंत केल्याबाबत" या विषयावर -ियम 93 अ-वये सूच-ा दिली आहे. तो -ियम 93 चा विषय होत -ासल्या-े, मी सूच-ास अ-ुमती -ाज ारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने -िवेद-ा ज रावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मा. सभापती....**

माननीय सदस्य सर्वश्री शरद पाटील व इतर यांनी "दिनांक 1.4.2005 रोजी पळूस, जि. सांगली येथील सहाय्यक उपनिबंधक श्री. जगन्नाथ कांबळे यांचा राजकीय कार्यकर्त्यांनी केलेला निर्घृण खून" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख व इतर यांनी "यवतमाळ येथील विना अनुदानित समाज कार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अनुदानाच्या निर्णयासंदर्भात गेले 33 दिवस साखळी उपोषण केल्यानंतर दि. 28 मार्च, 2005 पासून आमरण उपोषण करण्याचा घेतलेला निर्णय" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनास अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, कृपया आपण शासनाला निवेदन लवकर करण्यास सांगावे अशी माझी आपणास विनंती आहे.

**सभापती** : या विषयावर गुरुवारी निवेदन होईल असे संबंधित मा. शिक्षण मंत्र्यांनी पहावे. माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण व इतर यांनी "मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या लालबाग येथील बहुमजली संक्रमण शिबिरातील गाळे केवळ उपकर प्राप्त इमारतीमधील भाडेकरुंना पुनर्रचनेच्या काळात राहण्याकरिता राखीव असतांना देखील विकसितकाराने बदक चाळीतील भाडेकरुंना तेथे जागा न देण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनास अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझी आपणास विनती आहे की, भाडेकरु रस्त्यावर असल्यामुळे दोन दिवसात निवेदन करण्यास आपण शासनाला सांगावे.

**सभापती** : शासनाने तीन दिवसात निवेदन होईल असे पहावे.

----

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/KGS/MAP पूर्वी श्री.सरफरे . . . . 15:10

93 अन्वये दिलेल्या सूचनांच्या निवेदनांसंबंधी

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, शुक्रवार, 1-4-2005 रोजी "जळगाव-जामोद तालुक्यातील (जि.बुलढाणा) गडगांव गड येथील मातंग समाजातील एका मुलीवर केलेल्या बलात्काराच्या" संबंधातील निवेदन होणार होते. पण ते आजच्या कार्यक्रमात दाखविण्यात आलेले नाही.

**सभापती** : याबाबतीत मी पाहतो आणि जर आज होणार नसेल तर ते उद्या घेण्यात येईल अशी व्यवस्था करतो.

----

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, दि.1-4-2005 रोजी "राजर्षी शाहू महाराजांचा नवी दिल्ली येथील संसदेच्या आवारात पुतळा उभारण्यासंबंधात" जी नियम 93 अन्वये सूचना दिली होती. त्याचे निवेदन करण्यात येणार होते . . . . .

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी माझ्याकडे टिपण द्यावे. मी काय ते पाहतो.

-----

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.व्ही.यू.डायगव्हाणे आणि इतर सन्माननीय सदस्यांनी नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती. त्यासंदर्भात दि. 28 मार्च 2005 रोजी सदर सूचनेच्या वेळी सभागृहात दिलेल्या आश्वासनानुसार मी पुढीलप्रमाणे निवेदन करु इच्छितो. "सन्माननीय सदस्य श्री.व्ही.यू.डायगव्हाणे आणि इतर सन्माननीय सदसयांनी खाजगी माध्यमिक शाळांना . . . .

**सभापती** : माननीय मंत्री महोदयांनी निवेदन वाचण्याची गरज नाही. आपण निवेदन प्रस्तुत केले एवढे म्हणावे.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, ठीक आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, जर हे निवेदन आम्हाला सर्क्युलेट झाले असते, तर ते याठिकाणी वाचण्याची गरज नाही. पण हे निवेदन आम्हाला मिळालेले नसल्यामुळे माननीय मंत्री महोदयांनी येथे वाचावयास हवे.

**सभापती** : माननीय मंत्री महोदयांनी सन्माननीय सदस्यांना निवेदन उद्या सर्क्युलेट करावे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, ठीक आहे.

04-04-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) O-2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

औचित्याच्या मुद्यासंबंधी

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, विधानसभेमध्ये माननीय मंत्री महोदयांनी वैधानिक विकास मंडळाच्या बाबतीत अधिकृतरित्या घोषणा केलेली आहे. तशा प्रकारची घोषणा या सभागृहामध्ये देखील होणे आवश्यक आहे. कारण तो धोरणात्मक भाग आहे आणि वैधानिक विकास मंडळाच्या भवितव्यावर अनुशेष असलेल्या भागातील विकासाचा प्रश्न अवलंबून असल्यामुळे त्याबाबतची घोषणा येथे होणे आवश्यक असल्यामुळे आपण शासनाला याबाबतीत निर्देश द्यावेत अशी आमची अपेक्षा आहे.

**सभापती** : विधानसभेमध्ये माननीय मंत्री महोदयांनी वैधानिक विकास मंडळाच्या बाबतीत जी घोषणा केलेली आहे, त्याबाबतीत आजच शासनाकडून वरिष्ठ सभागृहामध्ये देखील निवेदन होईल हे माननीय वन मंत्र्यांनी पहावे.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, ठीक आहे.

----

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

**सभापती** : मी औचित्याच्या मुद्याच्या बाबतीत अद्याप निर्णय घेतलेला नाही. या सभागृहात अधिकृतरित्या आपण औचित्याच्या मुद्यांना परवानगी देत नाही. त्यामुळे याबाबतीत सन्माननीय सदस्यांनी मला माझ्या दालनामध्ये भेटावे. जेणेकरुन तुमचा एखादा प्रश्न असेल तर तो सोडविण्यासाठी तुम्हाला मला मदत करणे शक्य होईल. अन्यथा औचित्याचे मुद्दे घ्यावयाचे असतील तर याबाबतीत गटनेत्यांची बैठक घेऊन त्यामध्ये याबाबतीत निर्णय घ्यावा लागेल. ज्यापध्दतीने विधानसभेमध्ये औचित्याच्या मुद्यांची पध्दत आहे, त्यापध्दतीने करावे लागेल आणि मग मी औचित्याच्या मुद्यांना अधिकृतपणे परवानगी देणे योग्य होईल. अन्यथा काही वेळेला असे होते की, औचित्याच्या मुद्याच्या नावाखाली आपण एकेक तास चर्चा करतो आणि मग अन्य सन्माननीय सदस्यांवर सुध्दा अन्याय होण्याची शक्यता असते. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी मला दालनामध्ये येऊन भेटावे.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मी एक चर्चा करण्यासाठी औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत नाही.

. . . .ओ-3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : माझे असे म्हणणे आहे की, मी याबाबतीत माझा निर्णय दिलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी मला दालनामध्ये येऊन भेटावे. जेणेकरुन अन्य मार्गाने किंवा अन्य आयुधाचा वापर करुन तो मुद्दा कसा मांडता येईल यादृष्टीने आपणास मदत करतो.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मग हा मुद्दा आज कसा मांडता येईल ?

**सभापती** : तुम्ही मला दालनामध्ये येऊन भेटा.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

**सभापती** : मी कोणाच्याही औचित्याच्या मुद्याच्या बाबतीत परवानगी देणार नाही.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय,माझी आपल्याला एक विनंती आहे. सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडेसाहेब औचित्याचा मुद्दा मांडण्यासाठी उभे आहेत. आपण व्यक्त केलेली भावना बरोबर आहे की, सभागृहात औचित्याच्या मुद्यावर चर्चा होते. कधी-कधी दोन मिनिटे चर्चा होते आणि कधी-कधी विषयच अतिशय महत्वाचा असतो, त्यामुळे त्यावर ब-याच वेळ चर्चा होते. तरीपण सन्माननीय सदस्यांना महत्वाचे प्रश्न उपस्थित करण्यासाठी हा अधिकार मिळालेला आहे.त्यांना एक प्रिव्हीलेज मिळालेला आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, सन्माननीय सदस्यांनी आपला मुद्दा दोन मिनिटांमध्ये मांडल्यावर, आपल्याला जर तो मुद्दा योग्य आहे असे वाटले तर आपण तो ठेवावा आणि याबाबतीतील ही संधी, आमचा अधिकार अबाधित ठेवावा. या सभागृहाच्या ज्या प्रथा आणि परंपरा आहेत. त्यानुसार एखाद्या वेळी चर्चा होते, नाहीतर होत नाही. तेव्हा सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांना आपण दोन मिनिटे बोलू द्यावे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**सभापती** : आपण यापूर्वी सभागृहात औचित्याचे मुद्दे उपस्थित करण्यासाठी परवानगी देत होतो.पण विशेष उल्लेखाचे पाच मुद्दे घेण्यात यावेत असा आपला नियमाप्रमाणे निर्णय झाला, त्यावेळेपासून औचित्याच्या मुद्यांना जी परवानगी दिली जात होती, ती बंद केली. माननीय विरोधी पक्षनेते म्हणतात, त्याप्रमाणे एखादा मुद्दा अतिशय महत्वाचा असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मा.सभापती (पुढे चालू...

पण त्याच नियमाचा आधार घेऊन असे अनेक सन्माननीय सदस्य मुद्दे उपस्थित करतील, तेव्हा पिठासीन अधिकारी म्हणून मला काही मर्यादा घालणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्य श्री.कवाडेसाहेबांच्या वयाचा आणि अनुभवाचा विचार करता, त्यांना दोन मिनिटे त्यांचे म्हणणे मांडण्यास परवानगी देतो.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझा पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी वैधानिक विकास महामंडळाच्या संदर्भाने खालच्या सभागृहात शासनाने निवेदन केले असल्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला. माझी विनंती राहील की, या सभागृहामध्ये या विषयावर शासनाने निवेदन केल्यानंतर त्यावर आम्हाला बोलण्याची परवानगी द्यावी. कारण वैधानिक विकास मंडळ, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळे निर्माण केलेली आहेत. कोकणासाठी वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्याची मागणी सातत्याने केलेली आहे. खालच्या सभागृहामध्ये 1989 साली एकमुखाने कोकण विकास मंडळ स्थापन करण्याविषयी मागणी केलेली आहे परंतु अजूनही याबाबतची कार्यवाही झालेली नाही. या सभागृहामध्ये या विषयाचे निवेदन शासनातर्फे केले जाईल, तेव्हा आम्हाला आमचे मते मांडण्यासाठी परवानगी द्यावी,ही विनंती.

-

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मला पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन मांडण्यासाठी माझ्या वयाचा, अनुभवाचा विचार करण्यापेक्षा प्रश्न किती गंभीर आहे हे मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. आपल्या देशातील नामवंत 'टाईम्स ऑफ इंडिया'च्या 2 एप्रिलच्या अंकामध्ये आणि 'दै.सम्राट' या अंकाच्या 3 एप्रिलच्या अंकामध्ये आपल्या राज्याचे पोलीस महासंचालक सन्माननीय श्री.कश्यप साहेबांनी पोलीस दलातील विशेष पोलीस महासंचालक, नागरी संरक्षण, श्री.उध्दव कांबळे या आयपीएस अधिका-यांच्या संदर्भात अत्यंत अपमानजनक, जातीयवादी शब्द उच्चारले आणि त्यांनी त्यांना अपमानकारक वागणूक दिली, अशाप्रकारची वर्तमानपत्रामध्ये बातमी आलेली आहे. राज्यात शांतता व सुव्यवस्था आणि जातीय सलोखा, जातीय सुरक्षितता, सामाजिक सुरक्षितता लक्षात घेऊन असे प्रकार आमच्या राज्याच्या सर्वोच्च पोलीस अधिकारी करत असतील तर शासन त्याबाबत कोणती कारवाई करणार आहे ? मागासवर्गीय अधिकाऱ्यांना शासन संरक्षण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

प्रा.जोगेंद्र कवाडे (पुढे चालू....

देणार आहे की नाही याबाबत शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मी औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे. आपण बोलण्याची परवानगी दिल्याबद्दल आभारी आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जोगेंद्र कवाडे यांनी औचित्याचा मुद्दा उपस्थित केला, तो अत्यंत महत्वाचा आहे. महाराष्ट्रामध्ये जातीय सलोखा रहावा, जातीजातीमध्ये आपापसात मतभेद होऊ नयेत, शांतता व सुव्यवस्था रहावी, चांगल्या प्रकारचे जीवन जगता यावे, या दृष्टीने त्यांनी मुद्दा उपस्थित केला, तो अतिशय योग्य आहे. याच अनुषंगाने मी आणखी एक मुद्दा उपस्थित करणार आहे. मुंबई शहरातील रंगशारदाच्या संदर्भात जातीयवादी, मनुवादी अशाप्रकारचा उल्लेख महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाचे उपाध्यक्ष श्री.उत्तम खोब्रागडे यांनी मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या पत्रात केलेला आहे. खरे तर आय.ए.एस. अधिकाऱ्यांनी या संदर्भातील वाद अशाप्रकारे करायला नको. त्यांनी विधानसभेचे विरोधी पक्ष नेते सनमाननीय श्री.नारायण राणे यांच्याविषयीसुध्दा अतिशय हीन उद्‌गार काढले, त्यांच्याबद्दल जातीयवाचक उद्‌गार काढले. यामुळे त्यांनी जातीजातीमध्ये तणाव निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. आय.ए.एस. अधिकाऱ्यांनी हे टाळणे आवश्यक आहे,असे करुन चालणार नाही, ते जबाबदारीच्या जागेवर आहेत, त्या ठिकाणाहून बेजबाबदार उद्‌गार काढणे हे लोकशाहीला घातक आहे. तेव्हा याही अधिकाऱ्यांच्या संदर्भात योग्य ती कारवाई करण्यात यावी. सन्माननीय सदस्य श्री.कवाडे यांनी जो मुद्दा मांडला त्याला मी पाठिंबा देतो.

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : माननीय वन मंत्र्यांनी याबाबतीत नोंद घ्यावी.

श्री. बबनराव पाचपुते : ठीक आहे.

------

**पृ.शी./मु.शी.: औचित्याच्या मुद्याबाबत**

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, औचित्याच्या मुद्दान्वये मी अतिशय गंभीर आणि महत्वाचा विषय उपस्थित करु इच्छितो. पूर्ण कोकणात आज मासेमारी बंद आहे. कारण सगळया....

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, एकदा या औचित्याच्या मुद्दाची व्याख्या करावी लागेल. औचित्याच्या माध्यमातून राज्यात येणा-या संकटांच्या बाबतीत मुद्दा उपस्थित करण्यात येणार असेल तर मग नियम 93 कशासाठी आहे. आपल्याकडे सर्व वैधानिक आयुधे असतांना एखादा विषय राजकीयदृष्टया खेचून नेण्यासाठी आणि आम्हीच हा विषय मांडला, हे दाखविण्यासाठी औचित्याच्या मुद्दाद्वारे हा कोकणातील मच्छिमारांचा मुद्दा मांडणे, योग्य होणार नाही. म्हणून सभापती महोदय, माझी अशी विनंती आहे की, औचित्याचा मुद्दा एकदा डिफाईन करा. औचित्य म्हणजे काय? सभागृहाचे संकेत पायदळी तुडवल्यानंतर किंवा कुठेतरी त्याचे डेव्हिएशन केले तर तो औचित्याचा मुद्दा होऊ शकतो.म्हणून असे विषय औचित्याच्या मुद्दाच्या माध्यमातून मांडणे गैर आहे, असे माझे म्हणणे आहे.

**सभापती** :सन्माननीय सदस्यांना मी सांगेन की, दहा मिनिटापूर्वी याबाबतीत मी स्पष्ट कल्पना दिलेली आहे. विशेष उल्लेखाबाबतची तरतूद असतांना आणि ती नियमाखाली आपण स्वीकारली असताना मग औचित्याच्या माध्यमतून मुद्दा उपस्थित करण्यास कोणाही सदस्याला परवानगी देणे बरोबर नाही, असे माझे मत आहे. तथापि मी आता कर्नल सावंत यांना परवानगी दिलेली आहे.त्यांनी एका मिनिटात त्यांचे म्हणणे मांडावे. परंतु ते म्हणणे मांडीत असतांना राजकीय भावनेने प्रेरित होऊन मांडले असे होता कामा नये.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, सन्मानीय सदस्य कर्नल सुधीर सावंत जो मुद्दा उपस्थित करीत आहेत तो विषयच औचित्याच्या मुद्याला धरुन नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, श्री. सुधीर सावंत हे मेजर होते ते आता कर्नल झालेले आहेत असा या सभागृहात मुद्दा उपस्थित झाला होता. ते नेमके कोण आहेत याबद्दल आपल्याला माहिती आहे काय?

सभापती : ते एक लष्करी अधिकारी होते.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना माझ्या रँक बद्दल फारच काळजी दिसते. म्हणून मी स्पष्टीकरण करतो की, आजच्या घडीला मी कर्नल आहे. पण लोक मला मेजर म्हणून ओळखतात त्यामुळे मेजर बोलतात. त्यामुळे आपण त्याची गंभीर दखल घेऊ नये. अशी विनंती आहे. मागच्या वेळेला मी मेजर होतो.

सभपती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा असा की, पूर्ण महाराष्ट्रात मासेमारी बंद आहे. त्याचे कारण असे की, व्हॅट लागू झाल्यानंतर डिझेलवरच्या सबसीडीबद्दल काय परिस्थिती आहे याबद्दल लोकांमध्ये संभ्रम आहे. डिझेलसाठी पूर्वी 35 टक्के सेल टॅक्स होता तो चालू राहणार आहे काय? याबद्दल मच्छिमारांच्या मनामध्ये शंका आहे. त्याबद्दल आतापर्यंत स्पष्टीकरण झालेले नाही. पूर्ण कोकणात मच्छिमारी बंद आहे. म्हणून सन्माननीय अर्थमंत्र्यांनी याबाबत निवेदन करावे अशी माझी विनंती आहे.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ MAP/ प्रथम श्री. किल्लेदार... 15:20

**पृ.शी.**: मुंबईतील खटाव मिल बंद असणे.

**मु.शी.**: मुंबईतील खटाव मिल बंद असणे याबाबत श्री. मधुकर चव्हाण , वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. गणेश नाईक ( उत्पादन शुल्क मंत्री ) :: सभापती महोदय, श्री. मधुकर चव्हाण यांनी "मुंबईतील खटाव मिल बंद असणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** :निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, गेल्या आठ वर्षात सहा हजार कामगारांना कसे देशोधडीला लावले हे मी अर्ध्या मिनिटात माननीय मंत्रिमहोदयांच्या लक्षात आणून देतो आणि त्यानंतर माझे एक-दोन प्रश्न विचारतो. 1995 साली ही मिल विकण्याची परवानगी दिली आणि पंधरा कोटी रुपये बी.आय.आर.एफ.कडे भरण्यास सांगितले. ते पैसे भरले नाहीत. तसेच मार्च,1997 रोजी एक कोटी दोन लाख रुपये बिल दिले नाही. खटावच्या मालकाने ते बिल जाणूनबुजून ठेवले आणि ती मिल डबघाईला आली आहे असे सांगितले. नंतर बोरिवलीची जमीन विकण्याची परवानगी मागितली, ती परवानगी शासनाने दिली. परंतू नंतर त्या जमिनीला योग्य भाव नाही म्हणून ती जमीन त्याने विकली नाही. नंतर बोरिवली येथील अतिरिक्त जमीन विकण्यास परवानगी मागितली. तीही जमीन विकली नाही. दिनांक 14 मार्च, 1997 रोजी प्रधान सचिव यांनी आय.सी.आय.सी.आय., आय.डी.बी.आय., आय.सी.एफ.सी. या वित्तीय संस्था बरोबर एक बैठक घेतली आणि हिरानंदानींना बोलावले. त्या वेळी या सगळया वित्तीय संस्थांनी संगितले की, या मिलची एक रुपया कर्ज देण्याची पत नसल्यामुळे आम्ही त्यांना एक पैसाही देणार नाही. त्यानंतर हिरानंदानी यांनी दिनांक 20 मे 2003 रोजी पत्र लिहिले की, त्यांची एक पैशाची सुध्दा योग्यता नसल्यामुळे मी ही मिल विकत घेऊन विकसित करु शकणार नाही. नंतर यांनी एक युक्ती केली की, बोरिवली आणि भायखळा या दोन्ही मिलची जागा विकायला मला परवानगी द्या, आणि येथील कामगारांना महाडला नेण्याची मला परवानगी द्या,अशी त्यांनी मागणी केली.

यानंतर श्री. बरवड ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

हा अजब न्याय आहे. म्हणजे मुंबईतील कामगार महाडला जाणार होते काय ? तेही त्या ठिकाणी त्यांनी ऐकलेले नाही. त्याच्यानंतर दिनांक 7.6.2004 रोजी माननीय मुख्यमंत्र्यांकडे बैठक झाली आणि त्यांनी 104 कोटी रुपये देणी देण्यासाठी 15 दिवसांचा अवधी मागितला. त्याबद्दलही काही झ ाले नाही. मला असे वाटते की, जेवढे लक्षात आले तेवढे प्रामाणिक उत्तर देण्याचा प्रयत्न माननीय मंत्रिमहोदयांनी केलेला आहे त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करतो. मी असे म्हटले होते की, गेल्या आठ वर्षाच्या काळात 386 कामगार हे नैराश्याने आणि वैफल्याने मृत्युमुखी पडले हे खरे आहे काय ? त्याबाबत या ठिकाणी भयानक असे उत्तर दिले आहे. या निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, सदर मिलच्या कामगारांचा नैराश्य व वैफल्यग्रस्त होऊन मृत्यू झाला किंवा या मिलच्या कामगारांनी आत्महत्या केली याबाबत संबंधित पोलीस ठाण्यामधील अभिलेख पडताळून पाहिले असता याबाबत तशी नोंद असल्याचे आढळून आले नाही. नैराध्याने मृत्यू झाला तर कोणी तिकडे नोंद करावयास जातो काय ? कोणी आत्महत्या केली असेल तर त्या ठिकाणी नोंद होते. वैफल्याने निराश होऊन नैसर्गिक मृत्यू झाला तर पोलीस स्टेशनला नोंद करीत नाहीत. दुसरी गोष्ट अशी की, 7 जून रोजी तत्कालीन माननीय मुख्यमंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे यांनी, जे वेगवेगळे खटले या सगळया लोकांना नाराज करण्यासाठी किंवा त्यांना हैराण करण्यासाठी भरले होते ते खटले त्वरित मागे घ्यावे असे आदेश दिले होते. जून महिन्यापासून आतापर्यन्त श्री. आर. आर. पाटील यांच्याकडे फाईल पडून आहे. हे कोणत्या कार्यक्षमतेचे लक्षण आहे ? यासंदर्भात माझे तीन प्रश्न आहेत. पहिला प्रश्न असा की, ही मिल कोणी विकत घेऊन ताब्यात घेण्यास तयार नाही. मालक ती विकण्यास तयार नाही. अशा वेळी म्हाडातर्फे ही मिल विकत घेऊन ती आपण विकसित करु शकता काय ? दुसरा प्रश्न असा की, आपण त्वरित सात आठ दिवसांमध्ये मालकाची बैठक बोलवून कामगारांची देणी देण्यासाठी प्रायोरिटीवर, युध्द पातळीवर अशा तऱ्हेची बैठक घेऊ शकता काय ? या ठिकाणी सगळे उत्तर पाहिले तर ते प्रामाणिकपणे दिलेले आहे. या ठिकाणी आग लागली असे उत्तर दिले आहे. आपण प्रामाणिक उत्तर देऊन मान्य केले आहे त्याबद्दल माननीय मंत्रिमहोदयांचे अभिनंदन करतो. चार नमुन्यांवर पेट्रोलियम हायड्रोकार्बाइड सारखे रॉकेलचे अवशेष सापडले. याचा अर्थ मिलला आग लावली. मिलला आग लावणाऱ्यांवर कारवाई करणार

श्री. मधुकर चव्हाण .....

काय ? म्हाडातर्फे ही मिल विकसित करुन कामगारांची देणी देऊन उरलेल्या जमिनीवर मध्यमवर्गियांसाठी घरे बांधणार काय ? त्वरित देणी देण्यासाठी सात आठ दिवसात संबंधितांची बैठक घेणार काय ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी पोटतिडिकीने या ठिकाणी कामगारांची बाजू मांडलेली आहे. 6 हजार कामगार वंचित आहेत हे निवेदनामध्ये मी स्पष्ट केलेले आहे. गिरणी मालकाबरोबर झालेल्या बैठकीचा तपशील दिलेला आहे. आय.एफ.आर आणि बी.आय.एफ.आर. कडे दिलेल्या सर्व बाबींचा तपशील दिलेला आहे. शासनाची मानसिकता कामगारांना न्याय देण्याची आहे. म्हणून सन्माननीय सदस्यांनी जी अंतिम मागणी केलेली आहे त्याप्रमणे मालक आणि संबंधित अधिकारी यांच्याबरोबर बैठक लावली जाणार आहे. निश्चितपणे या अधिवेशनाच्या कालखंडामध्येच याबाबतीत बैठक लावली जाईल. म्हाडामार्फत या गिरणीच्या जागेचा विनियोग करुन कामगारांची देणी, अन्य घटकांची देणी देण्याच्या अनुषंगाने कसा प्रयत्न होणार आहे याबाबत सन्माननीय सदस्यांनी मागणी केली. ही बाब तपासून शक्य असेल तर म्हाडामार्फत सुध्दा ही जागा विकसित करुन कामगारांची देणी आणि सर्वच बाबतीत त्या ठिकाणी निर्णय घेतला जाईल.

-----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

**पृ. शी.** : अमरावती येथील राजश्री कॉलनीत राहणारी कु. दिपाली विश्वासराव कुलकर्णी या मुलीवर स्पिरीट टाकण्याची घडलेली घटना.

**मु. शी.** : अमरावती येथील राजश्री कॉलनीत राहणारी कु. दिपाली विश्वासराव कुलकर्णी या मुलीवर स्पिरीट टाकण्याची घडलेली घटना याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, सागर मेघे, जगदीश गुप्ता, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री अरविंद सावंत, विलास अवचट, अनंत तरे, डॉ. दीपक सावंत, श्री. अनिल परब वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, सागर मेघे, जगदीश गुप्ता, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री अरविंद सावंत, विलास अवचट, अनंत तरे, डॉ. दीपक सावंत, श्री. अनिल परब वि. प. स. यांनी "अमरावती येथील राजश्री कॉलनीत राहणारी कु. दिपाली विश्वासराव कुलकर्णी या मुलीवर स्पिरीट टाकण्याची घडलेली घटना" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, ही अतिशय दुर्दैवी अशी घटना आहे...

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी निवेदनावर एकच प्रश्न विचारावा. आपला आदर राखून मी एखाद दुसरा जादा प्रश्न विचारण्याची संधी देतो पण मग बाकीचे सन्माननीय सदस्य मला विचारतात. मला त्यांना उत्तर द्यावे लागते.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझी माननीय मंत्रिमहोदयांना विनंती आहे. मी व्यक्तीशः या परिवाराला ओळखतो. आपण या ठिकाणी चुकीचा रेफरंस दिलेला आहे. यामध्ये चुकीची माहिती दिलेली आहे. आपण यामध्ये अशी माहिती दिलेंली आहे की, श्री. राजू वानखेडे तिच्या घरी आला व त्याने तिच्या अंगावर घासलेट टाकून तिला पेटविले. ती त्यांचेवर प्रेम करीत होती. असे निवेदनात म्हटले आहे. ती मुलगी त्याच्यावर प्रेम करीत नव्हती. तो तिच्यावर प्रेम करीत होता. हे एकतर्फी प्रेम होते. त्या मुलीच्या मृत्यूनंतर या उत्तरामुळे त्या मुलीबद्दल गैरसमज पसरेल. ती एका चांगल्या परिवारातील मुलगी होती. तिचे त्याच्यावर प्रेम नव्हते. त्याचे तिच्यावर एकतर्फी प्रेम होते. तिने लग्नाला नकार दिला म्हणून त्याने तिला पेटविलेले आहे. या निवेदनामध्ये वाक्य लिहिण्यामध्ये तुमची चूक झालेली आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MAP/ KGS/ श्री.बरवडनंतर 15:30

श्री.नितीन गडकरी...

तेव्हा ही दुरुस्ती करुन हे वाक्य काढून टाकावे.

**उप सभापती** : निवेदनामध्ये चुकीचे आले असेल तर ते वगळावे असे मी निदेश देतो. कारण वर्तमानपत्रामध्ये आलेल्या बातम्या मी वाचल्या आहेत की, हे एकतर्फी प्रेमप्रकरण होते.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझे त्या मुलीच्या आईशी बोलणे झाले आहे. आमच्या पक्षातर्फे मी त्या कुटुंबाला मदत पाठविली आहे. तेथील ब-याच लोकांशी माझी चर्चा झ ाली आहे. याप्रकरणी अमरावतीच्या महिला संघटनांनी उज्वल निकम यांची सरकारी वकील म्हणून नेमणूक व्हावी अशी मागणी केली आहे त्यासंबंधी मी आपल्याशी बोलणार आहे. या निवेदेनामध्ये तिचे त्याच्यावर प्रेम होते असे म्हटले आहे ते चुकीचे आहे. असे नाही तर त्या मुलाचे तिच्यावर एकतर्फी प्रेम होते, तिने लग्नाला नकार दिल्यामुळे त्याने हा प्रकार केला आहे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : तिच्या मृत्यूपूर्वी जबानीमध्येच तसा उल्लेख आलेला आहे.

**उप सभापती** : कोणत्या प्रेसमध्ये काय उल्लेख आला आहे यापेक्षा वस्तुस्थिती जास्त महत्वाची आहे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : मुलीने तिच्या मृत्यूपूर्वी जबाब दिला आहे. त्यामध्ये तिने म्हटले आहे.

श्री.नितीन गडकरी : मी मंत्रिमहोदयांना जबाबदारीने सांगतो. आपल्याला विनंती करतो की, आपण मिनिटभर जे काय असेल ते पुन्हा तपासून पहावे. पण आज निवेदन वितरित करण्यात आलेले आहे. कमीत कमी तिच्या मृत्यूनंतर तिच्याबद्दल वाईट चर्चा होऊ नये म्हणून हे वाक्य वगळण्यात यावे.

**उप सभापती** : यासंबंधी योग्य तपासणी करुन नंतर सुधारित निवेदन वितरित करावे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आपणही आणि मा.विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले आहे. ते वाक्य राहू नये एवढीच विनंती केलेली आहे. मी स्वत: जाऊन त्या मुलीच्या आईला भेटलो आहे. अत्यंत दुर्दैवी अशी ही घटना घडलेली आहे. गेल्या अनेक वर्षामध्ये असा प्रकार चालू आहे तो अत्यंत निषेधार्ह आहे. त्या कुटुंबाने आणि संपूर्ण शहरातील नागरिकांचे असे म्हणणे आहे की, एवढे क्रुर कृत्य करणा-या माणसासंबंधी उद्या कोणत्याही प्रकारे शासनाकडून गफलत होता कामा नये. त्या मुलीची आई मला म्हणाली की, बी.टी.सर, माझी मुलगी गेली परंतु इतर कोणाच्याही बाबतीत असा प्रकार

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

घडता कामा नये त्यामुळे त्याला ठामपणे शिक्षा झाली पाहिजे. त्यासाठी महाराष्ट्रातील उत्तम वकीलाची नेमणूक करावी. श्री.उज्वल निकम यांची याप्रकरणी फौजदारी प्रॉसीक्यूटर म्हणून आपल्यातर्फे नेमणूक करावी. या गुन्हयासाठी न्यायालयामध्ये उत्तम पाठपुरावा करावा कारण अशी पुन्हा कोणाची हिंमत होता कामा नये. हे केवळ तिच्या आईचे नाही तर संपूर्ण गावाचे म्हणणे आहे. त्यादृष्टीने शासन पॉझिटिव्ह निर्णय घेईल काय ?

**उप सभापती** : श्री.उज्वल निकम यांची नेमणूक करावी.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मा. ज्येष्ठ सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी सूचना केल्याप्रमाणे कार्यवाही केली जाईल.

**उप सभापती** : मी मघाशी म्हटल्याप्रमाणे तो मजकूरही वगळण्यात यावा.

श्री.नितीन गडकरी : हे निवेदन छापील स्वरुपात वितरित केलेले आहे त्यातील मी मघाशी म्हटल्याप्रमाणे तिच्याबद्दल जो उल्लेख आला आहे तो वगळण्यात यावा.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : होय, वगळण्यात येईल.

------

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : खामगाव नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांनी नियमबाहय, घटनाबाहय व गैरकायदेशीर कार्यवाही करणे.

**मु.शी.** : खामगाव नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांनी नियमबाहय, घटनाबाहय व गैरकायदेशीर कार्यवाही करणे याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता वि.प.स. यांनी "खामगाव नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांनी नियमबाहय, घटनाबाहय व गैरकायदेशीर कार्यवाही करणे "या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती मा.सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MAP/ KGS/

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, येथे लिहिले होते की, रोकड वही मुख्याधिका-याच्या सहया असल्याचे आढळले. माझ्याकडे नगरपालिकेचा पंचनामा आहे. त्या नगरपालिकेचे अध्यक्ष श्री.सु.बो.देशपांडे, मुख्य लिपिक श्री.वामनराव आसोरे, वि.म.उंबरकर,रोखपाल, श्री.च.ह.पुरोहित, नगरसेवक, या लोकांनी त्यांनी लेखापाल व रोख कॅशबुक जे आहे ते तपासण्यासाठी आणले त्यावर त्यांची सही आढळलेली नाही. माझ्याकडे मूळ पंचनामा सहीसहित आहे. असे असताना शासनाने दिलेल्या उत्तरावरुन त्याची बाजू सावरण्यासाठी का प्रयत्न केला जात आहे ? त्याला वाचविण्यासाठी हे करीत आहात का ? सरकार म्हणून देणे बरोबर आहे काय ? माझ्याकडे असलेला लेखी पंचनामा चुकीचा आहे काय ? मी खोटा पंचनामा आणला आहे काय, आपल्याल पहावयाचा असेल तर तो बघून घ्या. आपण कशाच्या आधारे उत्तर दिले आहे ? दुसरे असे की, हे जे सन्माननीय मुख्याधिकारी आहेत यांच्याविरुध्द तेथील नगरसेवकांनी नगरपालिकेमध्ये ठराव पास केलेला आहे. तुम्ही लोकशाही परंपरेतील आहात. तेथे भा.ज.पा.सत्तारुढ आहे परंतु आमदार काँग्रेसचे आहेत. त्या मुख्याधिका-यांनी दोघांचीही कामे करावीत. परंतु एखाद्याने नगरपालिकेचे कामच करावयाचे नाही आणि चुकीचे पुरावे देणे हे योग्य नाही त्यामुळे त्यांची बदली करावी अशी नगरसेवकांनी मागणी केली आहे.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 15:35

(श्री. नितीन गडकरी पुढे सुरु...)

त्या ठिकाणी दुसरा सीओ द्या. हे त्याला काढू इच्छित नाहीत. अशा प्रकारचे राजकारण होत नाही. तेव्हा त्या सीओची बदली करण्यात येणार आहे काय ?

श्री.राजेश टोपे : मा. विरोधी पक्षनेते श्री. नितीन गडकरी यांनी सांगितल्याप्रमाणे 23 मार्चला ठराव पास करण्यात आला. 30 मार्चला शासनाला त्या ठरावावी प्रत प्राप्त झाली. नगरपरिषदेच्या 11 सन्माननीय सदस्यांनी 308 अन्वये जिल्हाधिका-यांकडे अपील दखल केलेले आहे. त्यावर 12.4.2005 रोजी सुनावणी ठेवली आहे. जिल्हाधिका-यांकडून जो काही अहवाल प्राप्त होईल त्याप्रमाणे शासन कारवाई करील.

श्री. नितीन गडकरी : या सीओने 14 महिन्यापासून कॅशबुकावर सह्या केलेल्या नाहीत. याबाबतीत नगराध्यक्षांनी जिल्हाधिका-यांना एक तक्रारीचे पत्र दिले. सभापती महोदय, याठिकाणी दिशाभूल करणारे उत्तर दिले जात आहे. माझ्याकडे जो पंचनामा आहे तो सभापती महोद, आपण स्वत: पहावा. मी याठिकाणी खरे बोलत आहे. या निवेदनामध्ये "रोकड वहीवर मुख्याधिका-याच्या सह्या असल्याचे आढळले आहे" असे उत्तर दिलेले आहे. या अधिका-याला हे शासन कशाकरिता वाचवत आहे ? कशाकरिता अशा प्रकारचे राजकरण केले जात आहे ? सभापती महोदय, माझी आपणास विनंती आहे की, हा पंचनामा आपण पहावा आणि याबाबतीत आपण निर्णय द्यावा. नगरपरिषदेच्या सर्व सदस्यांची मागणी आहे की, या सीओचे व्यवहार चांगले नाहीत, त्याला बदलून दुसरा सीओ द्यावा. माझ्याकडे नगरपरिषदेचे डॉक्युमेंट आहे. मग अशा प्रकारे दिशाभूल करणारे उत्तर माननीय मंत्री महोदय का देत आहेत याचा जाब त्यांना विचारला पाहिजे.

श्री. राजेश टोपे : पंचनामा खोटा आहे की खरा आहे.....ज्याअर्थी 11 सदस्यांनी निवेदन दिलेले आहे, त्याअर्थी त्याबाबतीत सुनावणी होणार आहे..

श्री. नितीन गडकरी : माझा हरकतीचा मुद्दा आहे. आता मला सिरिअसली बोलले पाहिजे. सभापती महोदय, या विधानपरिषदेमध्ये आम्ही प्रश्न विचारातो म्हणजे हा आमचा नाटक मंडळींचा प्रोग्रॅम नाही. या सभागृहाला एक सॅक्टीटी आहे. उत्तर देत असताना ते सत्यस्थितीच्या आधारावर दिले पाहिजे, असा लोकशाहीचा संकेत आहे. कळत नकळतही त्याबाबतीत सभागृहाची दिशाभूल होता कामा नये. अशा प्रकारची दिशाभूल केली तर ती लांच्छनास्पद अशी गोष्ट होईल. प्रस्तुत

..2..

(श्री. नितीन गडकरी...)

प्रकरणी सीओने 15 महिन्यापासून कॅश बुकावर कोठल्याही प्रकारच्या सह्या केल्या नाहीत. त्यानंतर नगराध्यक्ष, कॅशिअर, हेड क्लार्क यांनी पंचनामा करुन, सह्या करुन जिल्हाधिका-यांकडे तक्रार केली. या प्रकरणी आम्ही नियम 93 अन्वये सूचना दिली होती. त्यानंतर त्यासंदर्भात काम करण्यासाठी विभागाला एकच दिवस मिळाला. लगेच या प्रकरणी चौकशी झाली आणि लगेच उत्तर लिहून दिले की, रोकड वहीवर मुख्याधिका-याच्या सह्या असल्याचे आढळले. आता याबाबतीत जिल्हाधिकारी चौकशी करणार आहेत. माझा पहिला प्रश्न असा आहे की, मी दिलेला पंचनामा हा नगरपरिषदेचे अधिकृत डॉक्युमेंट आहे. या प्रकरणी माननीय मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर वेगळे आहे. त्यांनी दिलेल्या उत्तरामुळे त्यांनी सभागृहाची दिशाभूल केलेली आहे. तेव्हा या दिलेल्या उत्तराबद्दल माननीय मंत्री महोदयांनी आपली चूक दुरुस्त करावी आणि सभागृहाची क्षमा मागावी. जर ते क्षमा मागत नसतील तर, सभापती महोदय, माझ्या मुद्यांच्या आधारावर आपण सीओची बदली करण्याचे आदेश द्यावेत अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. राजेश टोपे : माननीय विरोधी पक्षनेते श्री. नितीन गडकरी यांचे म्हणणे असत्य आहे असे मी म्हणत नाही. या प्रकरणी खरे-खोटे तपासण्याच्या दृष्टीकोनातून जिल्हाधिकारी 12 तारखेला निर्णय घेत आहेत.

श्री. नितीन गडकरी : मग जिल्हाधिका-यांच्या निर्णयाच्या आधी अशा प्रकारचे उत्तर का दिले...

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मला संरक्षण हवे आहे. केलेल्या चौकशी नुसार रोकड वह्या तपासल्या त्यावेळी सह्या आढळल्या अशा प्रकारची माहिती मला प्राप्त झालेली आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MAP/ KGS/ प्रथम श्री.शिगम 15:40

श्री. राजेश टोपे ..

सभापती महोदय, या ठिकाणी माननीय विरोधी पक्ष नेते सांगता आहेत ती गोष्ट खरी असेल तर ..

श्री. पांडुरंग फुंडकर : माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी नगरपरिषदेचे अधिकृत डाक्युमेंट आपल्याला दिलेली आहेत..

श्री. राजेश टोपे : माननीय विरोधी पक्ष नेत्यांची माहिती खरी समजून ही बाब जिल्हाधिक-यांच्या निदर्शनास आणून देण्यात येईल. यासंबंधी जिल्हाधिकारी जो अहवाल पाठवेल त्यावर योग्य तो मेरीट प्रमाणे निर्णय घेतला जाईल.

**उप सभापती** : माननीय मंत्र्यांनी सांगितले आहे की, 12 तारखेस जिल्हाधिकारी यांनी सुनावणी ठेवलेली आहे. जिल्हाधिकारी यांचा जो अहवाल येईल तो सभागृहासमोर ठेवावा.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मला आपल्याकडून निर्णय हवा आहे. या ठिकाणी त्यांनी सहया केलेल्या आढळून आलेल्या आहेत याचा अर्थ त्यांनी कुठल्याही प्रकारची अनियमितता केलेली नाही अशा प्रकारचा स्पष्ट निर्वाळा माननीय राज्य मंत्र्यांनी आपल्या उत्तरात दिलेला आहे. मी आपल्याकडे नगरपरिषदेचे डाक्युमेंट सादर केलेली आहेत. त्यात हेड क्लर्क आणि कॅशियरच्या सहया आहेत. गेल्या 15 महिन्यापासून नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी यांनी सहया केलेल्या आहेत त्यासंबंधीचे लिगल डाक्यूमेंट आपल्याकडे दिलेले आहे. माझे डाक्यूमेंट नगरपषिदेचे अधिकृत आहेत.तेथील कर्मचारी सरकारी आहेत. त्यांच्या त्या डाक्यूमेंटवर सहया आहेत. तो संपूर्ण रेकॉर्ड तुम्हाला दिलेला आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, मी आपणाकडे सादर केलेल्या कागदपत्रांच्या अनुषंगाने माननीय राज्यमंत्री महोदय उत्तर दुरुस्त करण्यास तयार नाहीत. ते असे म्हणतात की, जिल्हाधिकारी यासंबंधी ठरवतील. जिल्हाधिकारी यासंबंधी ठरवतील असे उत्तर त्यांना या ठिकाणी द्यावयाचे होते तशी माहिती निवेदनाच्या उत्तरात द्यावयास पाहिजे होती. त्यांनी ते म्हटले नाही. जिल्हाधिकारी यांनी यासंबंधीचा निर्णय घेण्या अगोदर त्याला सर्टिफिकेट देऊन टाकले.त्यांनी सहया केला असा निर्णय देऊन टाकला. जेव्हा मी मुद्दा उपस्थित केला, तेव्हा राज्यमंत्र्यांनी खुलासा केला की, जिल्हाधिकारी याबाबतीतील निर्णय घेतील. या ठिकाणी जी माहिती दिली आहे त्यातून सभागृहाची दिशाभूल झालेली आहे. सभागृहाचा अवमान झालेला आहे. म्हणून माझी आपल्यामार्फत विनंती आहे की,

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

आपण त्यांना माझे डाक्युमेंट द्या. त्यांना या प्रकरणाबाबतची पूर्ण चौकशी करावयास सांगा.सदर उत्तर दुरुस्त करुन नंतर सभागृहास सादर करण्यास सांगावे. तो पर्यन्त हे निवेदन रोखून धरावे अशी माझी विनंती आहे. माझे जर डाक्युमेंट चुकीचे असतील तर मी दिलगिरी व्यक्त करण्यास तयार आहे.

प्रा.जोगेंद्र कवाडे : नगरपरिषद,खामगाव येथील मुख्याधिकारी त्यांची बदली करावी, त्यांना कुठे पाठवावे, त्यांच्या बाबत काय करावे यासंबंधी माननीय विरोधी पक्ष नेते तसेच इतर सदस्यांनी या ठिकाणी मागणी केलेली आहे. त्यांच्या म्हणण्यावर मला काही बोलावयाचे नाही. सदर मुख्याधिकारी काय करावयाचे ते शासनाने ठरवावे. परंतु या नगरपरिषदेचे उपाध्यक्ष सन्माननीय श्री. संजय पुरवाल, आणि नियोजन सभापती श्री. कैलास देवतळे यांनी मुख्याधिकारी यांचे बरोबर गैरवर्तन केल्यामुळे त्यांचे सभासदत्व रद्द करण्याचा प्रस्ताव मुख्याधिका-यांनी जिल्हाधिका-यांकडे पाठविला आहे हे खरे आहे काय ? ही गोष्ट खरी असेल तर जिल्हाधिकारी,बुलढाणा यांनी यासंदर्भामध्ये कोणती कार्यवाही केली ?

श्री. नितीन गडकरी : सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्यास माझी हरकत नाही. सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या आधी मी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे त्याचे मला उत्तर हवे आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सन्माननीय सदस्य श्री.कवाडे यांनी मुद्दा उपस्थित केला की, श्री. संजय पुरवाल आणि श्री.कैलास देवतळे हे नगरसेवक आहेत त्यांचे विरुध्द मुख्याधिकारी यांनी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केलेली आहे. सभापती महोदय, या मुख्याधिका-यांनी नगरसेवकांना आई-बहिणीवरुन शिविगाळ केली अशा प्रकारची तक्रार या दोन्ही नगरसेवकांनी पोलीस स्टेशनमध्ये केली ही गोष्ट खरी आहे काय ?

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी आपणाला जे डाक्युमेंट दिलेले आहेत त्यासंबंधी मला काहीही माहिती मिळालेली नाही..

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय..

**उप सभापती** : आपण उत्तर देण्यासाठी उभे आहात काय ?

श्री. राजेश टोपे : होय.

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : ठीक आहे.

श्री. राजेश टोप : सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. नितीन गडकरी यांनी या ठिकाणी मुद्दा उपस्थित केला. मी त्यांना पुन्हा विनंती करु इच्छितो की, यामध्ये शासन कुणालाही पाठिशी घालत नाही...

श्री. पांडुरंग फुंडकर : अनेक दिवसांपासून नगरपरिषदेच्या शिक्षकांचे पगार दिले गेलेले नाहीत. याचा अर्थ तुम्ही त्या अधिका-यांना निश्चितपणे पाठिशी घालत आहात ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या ठिकाणी कोणालाही पाठिशी घालण्याचा अजिबात प्रश्न नाही. जिल्हाधिकारी यांच्याकडून चौकशी अहवाल आल्यानंतरच या ठिकाणी मागणी केल्या प्रमाणे त्यांची बदली केली जाईल. तुम्ही म्हणता त्या प्रमाणे पुढील कारवाई देखील त्यांच्या विरुध्द केली जाईल. त्यांच्याकडून जर काही चूका झाल्या असतील, त्यांच्यावर काही आरोप असतील त्याबाबतीत निश्चितपणे चौकशी केली जाईल.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे ...

मा.सभापती महोदय,याठिकाणी मा.सदस्य श्री. कवाडे यांनी जी माहिती दिली ती वस्तुस्थिती आहे. 24.01.2005 रोजी नगराध्यक्षांनी रात्री 11.00 वा. मुख्याधिका-यांना धमकी दिली तसेच दिनांक 26.3.05 रोजी संध्याकाळी 7.15 वा. शिविगाळ केली. यासंदर्भात पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल झालेला आहे. मा. सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी जो प्रश्न विचारला आहे त्याबाबतची माहिती सध्या माझ्याजवळ उपलब्ध नाही. तरीसुध्दा ही माहिती निश्चितपणाने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

**उपसभापती** : मा.विरोधी पक्षनेते तसेच मा.सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर आणि मा.सदस्य श्री. जोगेंद्र कवाडे यांनी या चर्चेमध्ये भाग घेतला. विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन मी काही प्रश्न विचारण्याची संधी सदस्यांना दिली होती. या विषयाच्या संदर्भात 12 तारखेला जिल्हाधिका-यांकडे सुनावणी आहे. मा. विरोधी पक्षनेत्यांनी जे कागदपत्र माझ्याकडे दिलेले आहेत ते मी मंत्रीमहोदयांकडे तपासणी करण्यासाठी पाठवीत आहे. या कागदपत्रांची शहानिशा करण्याच्या सूचना जिल्हाधिका-यांकडे सुनावणी आहे त्यावेळेस द्याव्यात . या प्रकरणाची पूर्ण चौकशी करुन सभागृहाला यासंबंधातील माहिती सादर करावी.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी दिलेली माहिती खरी असेल तर मुख्याधिकारी यांची बदली करावी.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, जिल्हाधिका-यांचा यासंबंधातील अहवाल आल्यावर निर्णय घेऊन योग्य ती कारवाई केली जाईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: जळगांव-जामोद येथे 10.2.05 रोजी अल्पवयीन मुलीवर झालेला बलात्कार.

**मु.शी.**: जळगांव-जामोद येथे दि. 10.2.05 रोजी अल्पवयीन मुलीवर झालेंल्या बलात्काराबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर,जगदीश गुप्ता, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सिध्दराम म्हेत्रे (गृहराज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री पांडुरंग फुंडकर,जगदीश गुप्ता यांनी जळगांव-जामोद येथे 10.2.05 रोजी अल्पवयीन मुलीवर झालेला बलात्कार याविषयी नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती,तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती मा.सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

-----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**निवेदनानंतर**

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ही 93 ची सूचना राखून ठेवण्यात आली होती. परंतु या सूचनेवर यापूर्वी जे निवेदन करण्यात आले होते तेच निवेदन आजही करण्यात आलेले आहे. 10 तारखेला मुलीवर बलात्कार झाल्यानंतर 16 तारखेला पोलीस स्टेशनला तक्रार दाखल करण्यात आली. 19 तारखेला मुलीची वैद्यकीय तपासणी करण्यात आली आणि 22 तारखेला या तपासणीचा अहवाल आला. सभापती महोदय, 10 तारखेला बलात्कार झाल्यानंतर 16 तारखेला तक्रार नोंदविण्यात आली आहे. 16 तारखेला तक्रार आल्यानंतर पोलिसांनी 19 तारखेला वैद्यकीय तपासणी का केली ? मुलगी बाहेरगावी गेली आहे असे सांगण्यात आले आणि पोलिसांनी मुलीला आणायला सांगितले. दलित समाजाच्या मुलीवर बलात्कार झालेला आहे. तक्रार आल्यानंतर पोलिसांनी मुलीला पोलीस स्टेशनला न आणता मुलीच्या वडिलांना मुलीला घेऊन येण्यास सांगितले. 18 तारखेला संध्याकाळी मुलगी आली आणि 19 तारखेला वैद्यकीय चाचणी घेण्यात आली. जळगांव नगरपरिषेमध्ये लेडीज मेडिकल ऑफीसर असताना तेथे वैद्यकीय चाचणी न घेता 50 कि.मी.दूर अंतरावर 19 तारखेला वैद्यकीय चाचणी घेण्यात आली. वैद्यकीय चाचणी घेण्यास एवढा उशीर का झ ाला ? तसेच डॉक्टरांचे मेडिकल सर्टिफिकेट पोलिसांनी खोटे कसे ठरविले ?

यानंतर श्री. गायकवाड ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सिध्दाराम म्हेत्रें :सभापती महोदय,दिनांक 10.2.2005 रोजी अत्याचाराची घटना घडली होती हे बरोबर आहे. ही घटना घडल्यानंतर ज्यांनी त्या मुलीवर अत्याचार केला होता त्याच्या वडिलांनी आणि भावाने त्या मुलीला दम दिला होता की जर तू या घटनेची कोठे वाच्यता केली तर तुला खलास करु. त्यामुळे हे गरीब कुटूंब त्या दिवशी रात्री अकोल्याला निघून गेले होते अशा प्रकारची घटना घडली असल्याचा 16 तारखेला पोलिसांना सुगावा लागला होता. त्यानंतर बद्रुद्दीनला आणि त्याच्या वडिलांना व भावाला अटक करण्यात आली होती.त्यानंतर या मुलीला मेडिकल चेकअपसाठी आणि फिर्याद देण्यासाठी बोलाविण्यात आले होते.परंतु त्यावेळी ही मुलगी तेथे नव्हती. ही मुलगी अकोला येथे गेली होती.म्हणून तिला 18 तारखेला बोलावून घेण्यात आले होते आणि 18 तारखेला जळगाव जामोद येथील प्राथमिक आरोग्य केन्द्रात ...

श्री.पांडुरंग फुंडकर : निवेदनामध्ये त्याचा उल्लेख केलेला आहे .मी जो प्रश्न विचारला आहे त्याबाबत खुलासा करण्यात यावा.

श्री.सिध्दाराम म्हैत्रे : मी आपल्याला तेच सांगत आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : ज्या मुलीवर अत्याचार झाला होता त्या मुलीला ताबडतोब बोलावून तिची वैद्यकीय तपासणी करुन घेणे आणि तक्रार दाखल करुन घेणे हे पोलिसांचे काम नव्हते काय ?

श्री.सिध्दाराम म्हैत्रे : पोलिसांनी त्या मुलीच्या घरच्या लोकांना सांगितले होते की, तुम्ही जाऊन मुलीला घेऊन या. ती मुलगी तेथे नव्हती तर अकोला येथे होती.

श्री.पांडुरंग फुंडकर : वैद्यकीय तपासणी करुन घेण्यामध्ये तीन दिवसांचा कालावधीग गेला होता.त्यामुळे वैद्यकीय तपासणी करण्यासाठी पोलिसांनी जो विलंब लावला त्यास कोण जबाबदार आहे ?

श्री.सिध्दाराम म्हैत्रे : त्याला जबाबदार कोणीही नाही.हे कुटूंब घाबरुन दुसरीकडे गेले होते. गावगुंड असल्यामुळे त्यांना घाबरुन ते कुटूंब दुसरीकडे गेले होते.ते येथे परत येण्यास तयार नव्हते परंतु काही लोकांनी सपोर्ट दिल्यामुळे त्या मुलीने 18 तारखेला तक्रार दिली होती म्हणून 18 तारखेला वैद्यकीय तपासणीसाठी तिला नेण्यात आले होते. त्या प्राथमिक आरोग्य केन्द्रामध्ये चेकअप करण्याची सुविधा नव्हती.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी सभागृहात असे उत्तर दिले





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ....

होते की,हे प्रकरण घडल्यानंतर ते कुटूंब घाबरले आणि अकोला येथे निघून गेले होते. आमच्या पोलिसांना सुगावा लागला होता म्हणून ते तिकडे गेले आणि त्यानंतर संबंधिताना अटक केली.तेव्हा या प्रकरणी पोलिसांना सुगावा कसा काय लागला होता ?ही चोरी होती की आणखी काही प्रकार होता.? त्यानंतर 16 तारखेला तक्रार करण्यात आली असे सांगण्यात आले आहे तेव्हा तिला बोलावून तक्रार नोंदवून घेण्यात आली होती काय ? तसेच कुटूंब पळून गेल्यानंतर पोलिसांना सुगावा कसा काय लागला ? सो मोटो त्यांनी तक्रार कशी काय नोंदवून घेतली ? अटक केलेल्या आरोपीकडून कोणते जाब जबाब नोंदविण्यात आले होते ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, पोलिसांनी गुप्त बातमीदारा कडून ही माहिती मिळाली होती. 17 तारखेला तेथे रास्ता रोको आंदोलन होते त्यामुळे ती तेथे येऊ शकली नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर :माननीय मंत्रीमहोदय पुन्हा पुन्हा विषयाची गल्लत करीत आहेत. 10 तरारखेला बलात्कार झाल्यानंतर 16 तारखेला पोलिसांना सुगावा लागला होता.वडगाव हे गाव पोलीस स्टेशन पासून 7 किलोमिटर्स अंतरावर आहे . 7 किलोमिटर्स अंतरावर घडलेल्या घटनेचा सुगावा पोलिसांना 6 दिवसांनी लागाला होता त्या अगोदर पोलिसांना सुगावा का लागला नाही ?माझी माहिती अशी आहे की, या बाबतीत पोलिसांना काहीही सुगावा लागला नाही. पोलिसांना माहिती होते परंतु पोलिसांनी कोणताही गुन्हा नोंदवून घेतला नाही.तेथील काही सामाजिक कार्यकर्त्यांनी त्या मुलीच्या वडिलांना संरक्षण देऊन तक्रार दाखल करावयास लावली त्यानंतर पोलीस खाते खडबडून जागे झाले आणि पोलीस त्या ठिकाणी गेले होते.माझ्या दुस-या प्रश्नाचे उत्तर दिले गेले नाही खामगावच्या एक्सपर्ट मेडिकल ऑफिसरने एक सर्टिफिकेट दिले होते परंतु पोलिसांनी ते सर्टिफिकेट कशाच्या आधारे खोटे ठरविले ? आणि त्या डॉक्टरांना अटक का केली ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : पोलिसांनी डॉक्टरांचे सर्टिफिकेट खोटे ठरविलेले नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : निवेदनात तसे म्हटलेले आहे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, आपण मला संरक्षण द्यावे. मी जे काही सांगत आहे ते सन्माननीय सदस्यांनी प्रथम ऐकून घ्यावे. डॉ.महाले यांनी सर्टिफिकेट दिले होते ते कोर्टासमोर

3....



VTG/ KGS/ MAP/ प्रथम श्री.कानडे 15.50

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

गेल्या नंतर कोर्टानेच तसा आदेश दिला होता . ही घटना घडण्याच्या आठ महिने अगोदर एका व्यक्तीचा कु-हाडीने खून केला असतांना या डॉक्टरांनी असे सर्टिफिकेट दिले होते की त्या व्यक्तीचा दम्याने मृत्यू झाला होता.म्हणून न्यायाधीशांना याही सर्टिफिकेटच्या बाबतीत संशय आला होता. की त्यावेळी या डॉक्टरांनी खोटे सर्टिफिकेट दिले होते यावेळी  दिलेले सर्टिफिकेट खरे असेल काय ?त्यामुळे स्वत: न्यायाधीशांनी गुप्तपध्दतीने खाजगी डॉक्टरांकडून मुलीचे मेडिकल चेकअप करुन घेतले होते.त्यानंतर  27 तारखेला नागपूर येथे हे चेकीग करुन घेतल्यानंतर त्याचा असा रिपोर्ट आला की ,या मुलीचा बलात्कार झाला आहे . डॉक्टर महाले यांनी बलात्कार झाला नाही असे सर्टिफिकेट दिले होते.त्यामुळे न्यायाधीशांनी आदेश दिले होते ,या डॉक्टरांना अटक करण्यात यावी .म्हणून पोलिसांनी त्यांना अटक केली होती.

श्री.पांडुरंग फंडकर :माझा हरकतीचा मुद्दा आहे. या मुलीला चेकअपसाठी नागपूर येथे पाठविण्यात आले होते.बुलढाणा जिल्हयाला पॅनलसाठी औरंगाबाद आणि यवतमाळ ही दोन गावे आहेत असे असतांना औरंगाबाद व यवतमाळ ही दोन गावे सोडून तिला नागपूरला का नेण्यात आले होते?  तसेच नागपूरला नेल्यानंतर त्या मुलीला नागपूरच्या पॅनलसमोर उभे केले होते काय ? .

नतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/KGS/SBT/MHM/MAP. श्री.गायकवाड नंतर --- 15:55

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : अध्यक्ष महाराज, कोर्टाने सांगितल्यामुळेच आपण तिला नागपूरला नेलेले आहे.

श्री. दिवाकर रावते : अध्यक्ष महाराज, कोर्टाने काय काय सांगितले ते तरी माननीय मंत्री महोदयांनी सांगावे. ...

श्री. पांडुरंग फुंडकर : अध्यक्ष महाराज, या प्रश्नामध्ये अनेक गुंतागुंत निर्माण झालेली आहे. त्या डॉक्टरचे सर्टिफिकेट खोटे ठरविण्यापूर्वीच त्याला सूडबुद्धीने अटक पोलिसांनी केलेली आहे आणि हे सारे प्रकरणच डायव्हर्शन करण्याचा प्रयत्न पोलिसांनी केलेला आहे ....

**उपसभापती** : या निवेदनावरील चर्चा मी येथे थांबवित आहे, यानंतर पुढील निवेदन घेण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : अध्यक्ष महाराज, एका महिलेवर बलात्कार झाल्याचे हे गंभीर असे प्रकरण आहे. तेव्हा आपण या प्रकरणामध्ये त्या महिलेला न्याय देण्यासाठी तरी ...

**उपसभापती** : सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांना मी सांगू इच्छितो की, हे प्रकरण गंभीर आहे हे मलाही मान्य आहे आणि म्हणूनच आपण यावर लक्षवेधी सूचना देऊन निवेदन घ्यावयास पाहिजे होते. आपण नियम 93 खाली निवेदन करण्यास सांगून पुन्हा त्यावर इतके उपप्रश्न विचारून चर्चा करू लागलो तर त्याला काही मर्यादाच राहणार नाहीत. ...

श्री. नितीन गडकरी : अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्य येथे या प्रकरणाची वस्तुस्थिती सांगत आहेत आणि माननीय गृह राज्यमंत्री जे उत्तर देत आहेत त्या दोन्हीमध्ये खूप विसंगती आहे. तेव्हा याबाबतीत मंत्री महोदयांकडे जी माहिती आलेली असेल ती तपासून घेण्याची गरज आहे. कारण सन्माननीय सदस्य श्री.फुंडकर हे त्या जिल्ह्यातीलच असून संबंधित महिलेच्या घरी स्वत: जाऊन आलेले आहेत, विचारपूस करून, माहिती घेऊन आलेले आहेत. या प्रकरणी न्यायालयाने सांगण्यापूर्वीच त्या डॉक्टरवर पोलिसांनी कारवाई केलेली आहे. तेव्हा या ठिकाणी माननीय राज्यमंत्र्यांनी दिलेल्या माहितीचा सन्मान ठेवून मी सांगू इच्छितो की, हे संपूर्ण प्रकरण वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून तपासून घेण्याची आणि त्यानंतर योग्य ती कारवाई करण्याची गरज आहे तर तसे आपण करणार काय ? आणि त्याचा अहवाल सभागृहाला आपण देणार का ?

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : अध्यक्ष महाराज, माननीय विरोधी पक्षनेता यांनी सांगितल्याप्रमाणे या प्रकरणी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून पुन्हा चौकशी करून त्याचा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

*****

..... एक्स 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : राजीव मूकबधीर निवासी विद्यालय व अंजनाबाई वासनिक मतीमंद मुलामुलींची निवासी शाळा,कन्हान,जि.नागपूर या संस्थांमध्ये असलेली अनियमितता.

**मु.शी.** : राजीव मूकबधीर निवासी विद्यालय व अंजनाबाई वासनिक मतीमंद मुलामुलींची निवासी शाळा,कन्हान,जि.नागपूर या संस्थांमध्ये असलेली अनियमितता याबाबत श्री.व्ही.यू.डायगव्हाणे, प्रा.बी.टी.देशमुख, सर्वश्री व्ही.डी.खोटरे, नानासाहेब बोरस्ते, जी.एल.ऐनापुरे यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

----

श्री. धर्मरावबाबा आत्राम (सामाजिक न्याय मंत्री) : महोदय, श्री.व्ही.यू.डायगव्हाणे, प्रा.बी.टी. देशमुख, सर्वश्री व्ही.डी.खोटरे, नानासाहेब बोरस्ते, जी.एल.ऐनापुरे यांनी "राजीव मूकबधीर निवासी विद्यालय व अंजनाबाई वासनिक मतीमंद मुलामुलींची निवासी शाळा, कन्हान, जि. नागपूर या संस्थांमध्ये असलेली अनियमितता " याबाबत नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या आहेत. त्यामध्ये मला काही दुरुस्ती करावयाची आहे. निवेदनातील पृ.3 वरील (11) मध्ये पहिल्या ओळीत 'दिनांक 11.2.2002 पासून' या ऐवजी "दिनांक 11.10.2002 पासून " आणि दुसऱ्या ओळीमध्ये शेवटी '...दिनांक 18.8.2004 पासून कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी वेतनेतर अनुदान देय करण्यात आलेले आहे.' या ऐवजी "...कर्मचाऱ्यांना वेतनासाठी अनुदान देणे आहे.." अशी दुरुस्ती मला करावयाची आहे. तरी याप्रमाणे हे निवेदन दुरूस्त करून मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : कृपया सोबतचे निवेदन येथे छापावे. ... )

..... एक्स 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( नियम 93 खाली सामाजिक न्याय राज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर ..)

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : अध्यक्ष महाराज, नागपूर जिल्ह्यातील राजीव मूकबधीर निवासी विद्यालय व अंजनाबाई वासनिक मतीमंद मुला-मुलींची निवासी शाळा या संस्थेमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता निर्माण झालेली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून या संस्थेबाबत तक्रारी होऊनही कोणी दाद दिलेली नाही आणि जेव्हा आम्ही तक्रारी केल्या आणि येथे हा प्रश्न आला त्यावेळी मात्र या संबंधात चार सदस्यांची एक चौकशी समिती नेमली. मात्र या समितीकडूनही अद्याप पर्यंत पूर्णपणे चौकशी झालेली नाही असे या निवेदनात म्हटलेले आहे. अध्यक्ष महाराज, या संस्थेबाबत अनेक गंभीर मुद्दे आहेत की ज्याबाबत चौकशी चालली आहे. ही संस्था आणि या शाळा कन्हान मध्ये आहेत आणि त्यातील कर्मचारी देखील कन्हान मध्येच आहेत. परंतु त्यांचे बँक खाते मात्र नागपूर मध्ये आहे आणि त्या कर्मचाऱ्यांचे पत्ते कोठले आहेत हे पाहिले तर आपल्या लक्षात येईल की, ते सारे पत्ते या संस्थेच्या संचालिका यांच्या घराचे आहेत. म्हणजे बँक खाते आपल्या सोयीनुसार नागपूरमध्ये करून घेतलेले आहे तसेच सर्वच कर्मचाऱ्यांचे पत्तेही संचालिकेच्या घराचे आहेत. या संचालिका कोण आहेत ? तर आपल्याच खात्यातील वर्ग 2 च्या अधिकारी होत्या. आणि त्यांचे पती देखील समाजकल्याण खात्यातील एक निरीक्षक आहेत आणि तेही वर्ग 2 चे अधिकारी आहेत आणि या साऱ्या प्रकरणाची चौकशी समाजकल्याण खात्याचेच अधिकारी करीत आहेत. ही चौकशी पूर्ण झाली पाहिजे. या संस्थेतील कोठल्याही कर्मचाऱ्याला पगाराचे पैसे मिळालेले नाहीत आणि त्यांच्या खोट्या सह्या करून हा निधी संचालकांनी हडप केलेला आहे. म्हणून त्यांच्या सह्यांची देखील बारकाईने तपासणी केली गेली पाहिजे. या संस्थेमध्ये संपूर्णत: अनियमितता झालेली आहे. तेथील जुने कर्मचारी काढून टाकून तेथे नवीन कर्मचारी भरती केलेले आहेत. ....

( यानंतर श्री. जागडे ....वाय 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. डायगव्हाणे.....

सभापती महोदय, यामध्ये बरीच चौकशी व्हावयाची आहे. ही चौकशी 15 दिवसात पूर्ण होईल काय? या संचालिकेचे पती त्याच कार्यालयात निरिक्षक म्हणून काम करीत आहेत. म्हणून त्यांची बदली आजच्या आज करण्यात यावी. नाहीतर या बाबतची चौकशी योग्य प्रकारे होणार नाही. त्यामुळे त्यांची बदली करुन याबाबत चौकशी करण्यात यावी. चौकशी पूर्ण झाल्यानंतर एक महिन्याच्या आत या संस्थेवर प्रशासकांची नियुक्ती करण्यात येईल काय ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, एक महिन्यात याची चौकशी पूर्ण करण्याचे निर्देश देऊ. समाजकल्याण कार्यालयात त्याचे पती निरिक्षक म्हणून काम करीत आहेत, असे माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. असे असेल तर त्यांची ताबडतोब बदली करण्यात येईल.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : चौकशीत दोष दिसून आल्यानंतर सदरहू संस्थेवर प्रशासकाची नेमणूक केली जाईल काय ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, योग्य ती कारवाई करु.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: बदक चाळ, काळाचौकी, मुंबई येथील 10 रहिवाशांना म्हाडातर्फे विद्युत पुरवठा न होणे.

**मु.शी.**: बदक चाळ, काळाचौकी, मुंबई येथील 10 रहिवाशांना म्हाडातर्फे विद्युत पुरवठा न होणे याबाबत सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोत तावडे, अशोक मोडक यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

श्री. दयानंद मस्के ( गृहनिर्माण राज्यमंत्री ) : अध्य□ महोदय, मधुकर चव्हाण, विनोद तावडे, अशोक मोडक यांनी नियम 93 अन्वये बदक चाळ, काळाचौकी, मुंबई येथील 10 रहिवाशांना म्हाडातर्फत विद्युत पुरवठा न होणे, या विषयावर ि□यम 93 अ□्वये जी सूच□ा दिली होती, तिला अ□ुल□ू□ आप□ ि□र्देश दिल्याप्रमा□ मला ि□वेद□ □रावयाचे आहे. ि□वेद□ाच्या प्रती सदस्यां□ा अ□ोदरच वितरीत □ेलेल्या असल्या□मी हे ि□वेद□ सभा□ृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : ि□वेद□ सभा□ृहाच्या पटलावर ठेव□यांत आले आहे.

ि□वेद□

( प्रेस : येथे सोबतचे ि□वेद□ छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय गृहराज्यमंत्र्यांनी या ठिकाणच्या सर्व रहिवाशांना खोल्या दिल्या, त्याबद्दल मी प्रथम मा. मंत्रिमहोदयांचे अभिनंदन करीत आहे. असे करीत असताना मी एक गोष्ट माननीय मंत्रिमहोदयांच्या निर्दशनास आणून देऊ इच्छितो. अधिकारी माननीय मंत्रिमहोदयांना कसे अंधारात ठेवीत असतात, याचे हे उदाहरण आहे. पूर्वीच्या रहिवाशांची वीज बिले नवीन रहिवाशांनी भरावी अशा प्रकारचे पत्र म्हाडामार्फत देण्यात आलेले नाही, असे निवेदनात म्हटले आहे. परंतु तशी परिस्थिती नाही. कारण म्हाडाने रहिवाशाना जे पत्र दिले आहे, ते माझ्याकडे आहे. ते मी मा. मंत्रिमहोदयांना मा. सभापती महोदयांमार्फत देणार आहे. या पत्रात असे म्हटले आहे की, " थकबाकी न भरल्यामुळे वीज जोडणी होऊ शकत नाही. तेव्हा सदरहू थकबाकी त्वरीत भरण्यात यावी. " हे पत्र रहिवाशांच्या अध्यक्षांना देण्यात आले आहे. तेव्हा माननीय मंत्रिमहोदयांची जे अधिकारी दिशाभूल करीत आहेत, त्यांच्याविरुध्द कडक कारवाई होणे आवश्यक आहे. म्हाडामध्ये कोणकोणते गंभीर प्रकार चालतात, हे सांगून मी सभागृहाचा वेळ घेणार नाही. आता हे पत्र मी मा. सभापतींना देत आहे. या बाबत मा. मंत्रिमहोदयांनी योग्य ती कारवाई करावी, असे माझे मत आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी सर्व रहिवाशांनी सक्रमण शिबिरात गाळे वाटप केले आहे, त्याबद्दल मी त्यांचे आभार मानीत आहे.

--

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: टेन्युअरच्या जमिनीच्या खरेदी-विक्री व्यवहारावर शासनाने घातलेली बंदी.

**मु.शी.**: टेन्युअरच्या जमिनीच्या खरेदी-विक्री व्यवहारावर शासनाने घातलेली बंदी या बाबत सर्वश्री गोपीकिशन बाजोरीया, सुरेश जेथलिया, कन्हैयालाल गिडवाणी, पांडुरंग फुंडकर यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. राजेंद्र शिंगणे ( महसूल व पुनर्वसन राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, सर्वश्री. गोपीकिशन बाजोरीया, सुरेश जेथलिया, कन्हैयालाल गिडवाणी, पांडुरंग फुंडकर यांनी टेन्युअरच्या जमिनीच्या खरेदी-विक्री व्यवहारावर शासनाने घातलेली बंदी या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गोपीकिशन बाजोरीया : सभापती महोदय, बी टेन्युअर शासकीय जागेबद्दल शासनाने खरेदी-विक्रीवर बंद घातलेली आहे. तसेच यासाठी अर्जदारास जिल्हाधिका-यांची पूर्वपरवानगी घ्यावी लागते. बी टेन्युअर या बाबत कायद्यात ॲक्युपन्सी असा अर्थ दिलेला आहे. ॲक्युपन्सी राईट म्हणजे "alll plots assessed to or paying full revenue are settled in full occupancy right not restricted by any extra condition are classified in B tenure" असा अर्थ असतानासुध्दा शासनाने बंदी घातली आहे. या ठिकाणी माझे दोन प्रश्न आहेत. दिलेल्या शासकीय जमिनीच्या वारात बदल केले तर किती अनिर्णीत उत्पन्न भरावे लागेल आणि हस्तांतरण केले तर किती उत्पन्न भरावे लागेल ? ज्या अर्थी शासनाने 50 ते100 वर्षापूर्वी रहिवासी प्रयोजनासाठी जागा दिली होती व त्याच प्रयोजनासाठी लाभार्थींनी ती जागा उपयोगात आणली व वेळोवेळी रहिवाशानाच विकली आहे. या बाबत 10 ते 15 वेळा त्याबाबतचे खरेदी-विक्रीचे व्यवहार शासनाने मंजूरही केले आहेत. परंतु आता अचानक बंदी घालून जागेची 50 टक्के रक्कम मागितली जात आहे. ही बाब खरी आहे काय ? ही रक्कम खूपच जास्त असल्यामुळे लोकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे याबाबत शासन आता सवलत देणार आहे काय ?

( यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, बी टेन्युअर जमिनी या शासकीय जमिनी आहेत. त्या मंजूर केल्यानंतर त्यांच्या हस्तांतरणासाठी शासनाची पूर्व परवानगी घ्यावी लागते. माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे या जमिनी विकण्यासाठी कोणत्याही प्रकारची बंदी शासनाने घातली नाही. अशाप्रकारची जमीन विकतांना शासनाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक असते. ती घेतल्यानंतर अशाप्रकारच्या जमिनीची विक्री करता येते. माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न विचारला की, शेती प्रयोजनासाठी अनर्जित उत्पन्नाच्या 50 टक्के वाणिज्यिक व औद्योगिक प्रयोजनाच्या अनर्जित उत्पन्नाच्या 65 ते 75 टक्के इतकी रक्कम अर्जदारांकडून भरुन तिच्या विक्री किंवा हस्तांतरणासाठी परवानगी दिली जाते. माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे अनेक वर्षापासून अनेक लोकांच्या अशाप्रकारच्या जमिनी विकल्या आहेत. अनेक लोकांची एकेक मूळ जमीन असेल तर दहा-दहा, बारा-बारा लोकांनी त्या ठिकाणी व्यवहार केले आहेत. त्यामुळे महत्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. अशाप्रकारचा प्रश्न व इतर अनेक प्रश्न महाराष्ट्रातील वर्ग -2 च्या व बी टेन्युअरच्या जमिनीच्या बाबतीत निर्माण झाले आहेत. या सर्व बाबींचा अभ्यास करण्यासाठी आयुक्त औरंगाबाद डिव्हिजन यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली असून ती समिती या सर्व प्रकरणांच्या बाबतीत शासनाला अहवाल देणार आहे. तो अहवाल आल्यानंतर त्या बाबत योग्य ती कारवाई केली जाईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, अहवाल येईपर्यंत जे लाखो रुपये वसूल करण्यात आले आहेत ते थांबविणार काय? त्यांना स्थगिती देणार काय? आणि ही वसूली जुन्या पध्दतीने चालू ठेवणार काय?

डॉ. राजेंद्र शिंगणे : या मध्ये नवीन काही केले नाही. जुनी जी पध्दत आहे त्याच पध्दतीने व्यवहार चालू केला आहे. फक्त परवानगी देतांना जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी लागते. माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांच्या भावना लक्षात घेऊन या बाबतीत सहानुभूतीपूर्वक विचार करण्यात येईल. तसेच, विभागीय आयुक्तांच्या समितीचा अहवाल येईपर्यंत वसूली स्थगित ठेवण्याचा प्रश्न उपस्थित होत नाही. अहवाल आल्यानंतर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सार्वजनिक गृहनिर्माण प्रकल्पांमधील गुंतवणुकीस प्रोत्साहन म्हणून "विशेष वसाहत योजना" जाहीर करणे.

**मु.शी.**: सार्वजनिक गृहनिर्माण प्रकल्पांमधील गुंतवणुकीस प्रोत्साहन म्हणून "विशेष वसाहत योजना" जाहीर करणे या संबंधी मा. सदस्य सर्वश्री कन्हैयालाल गिडवाणी, विलास अवचट, डॉ. दीपक सावंत यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य सर्वश्री कन्हैयालाल गिडवाणी, विलास अवचट व डॉ.दीपक सावंत यांना मी सूचित करु इच्छितो की, आपण दिलेली लक्षवेधी सूचना स्वीकृत झाल्यानंतर ती सभागृहाची प्रॉपर्टी होते. तसेच, शासनातर्फे त्या लक्षवेधी सूचनेवरील सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर आपणाकडून सदरची लक्षवेधी सूचना चर्चेकरिता घेण्यात येऊ नये अशी पत्राव्दारे विनंती केली आहे. तेव्हा लक्षवेधी सूचना एकदा स्वीकृत झाल्यानंतर व ती सभागृहाची प्रॉपर्टी झाल्यानंतर व शासनाकडून त्यावरील कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर सदरची लक्षवेधी सूचना घेण्यात येऊ नये अशाप्रकारची विनंती या पुढील काळात करण्यात येऊ नये. सभागृहाच्या कार्यक्रमपत्रिकेमध्ये समाविष्ट झालेल्या लक्षवेधी सूचनेवर माननीय सदस्यांनी प्रश्न विचारण्याची अनुमती मागितली तर त्यांना डावलता येणार नाही. तेव्हा केवळ या लक्षवेधी सूचनेबाबतची आपली विनंती मी मान्य करतो.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. एकदा पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना सभागृहात चर्चेला आल्यानंतर त्यावर आम्हाला प्रश्न विचारता आले पाहिजेत...

**उपसभापती** : ती लक्षवेधी सूचना घेऊ नये असे मा. सदस्यांनी सांगितले आहे...

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, त्या लक्षवेधी सूचनेवर आम्हाला चर्चा करावयाची आहे. या लक्षवेधी सूचनेमागील रहस्य काय आहे हे आम्हाला समजले पाहिजे. या बाबतीत माननीय सदस्यांवर कुणी दबाव आणला आहे?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण माननीय सदस्यांनी या पुढील काळात अशाप्रकारची विनंती करु नये असे सांगितले असतांना व त्यावर आपण निर्णय दिला असतांना माननीय सदस्यांनी आपल्या निर्णयाला चॅलेंज करणे बरोबर नाही...

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना कार्यक्रम पत्रिकेवर आलेली आहे. या सूचनेवर प्रश्न विचारण्याचा आम्हाला अधिकार आहे. आम्हाला एक-दोन प्रश्न विचारावयास दिले पाहिजेत....

**उपसभापती** : मी दिलेल्या निर्णयाचा माननीय सदस्यांना आदर करावा.

श्री. जितेंद्र आव्हाड : विरोधी पक्षाच्या माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचनेच्या बाबतीत सेटींग बंद करावे...

**उपसभापती** : मा. सदस्यांच्या वक्तव्यामुळे सभागृहातील सर्व माननीय सदस्यांबाबत चुकीची भावना निर्माण होईल या करिता मा. सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांचे वाक्य सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकण्यात येत आहे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.: झोपडपट्टीवासियांचे माहुल गावात पुर्नवसन न करता विकासकाने ती जमीन विक्रीस काढणे.**

**मु.शी.: झोपडपट्टीवासियांचे माहुल गावात पुर्नवसन न करता विकासकाने ती जमीन विक्रीस काढणे याबाबत मा. सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.**

श्री. मधुकर चव्हाण (मुंबइ स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय सदस्यांचे लक्ष वेधू इच्छितो. या बाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"मुंबई येथील एम. विभाजातील माहुल जावात -ाजरी भू-माप-ा ज्रमांज 1/22- 355/356 धारज ज्रजा-या जमि-ीचा बी.पी.सी.एल. ज्र्मचा-यांच्या -िवासस्था-ा उद्दिष्टांज्रिता वापर ज्रतां-ाा घालज्यात आलेले बंध-ा वजळता ही जमी-ा -िवासी पट्टयात ठेवज्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिज व -ाजररच-ाा अधि-ियम, 1966 च्या ज्लम 37(1) अ-वये, शास-ाा-े मुंबई महा-ाजरपालिजे-ला बंध-ाजारज आदेश पाठविजे, सदरहू जमि-ीवर पी. डिमेलो (मुंबई) मार्जावरील व तुळशी पाईप ( मुंबई ) मार्जावरील पदपथावरील झोपडपट्टीवासियांचे पु-र्वस-ा ज्रज्याची अट विजासजाला घालू-ा देजील ती -ा पाळज्यात येजे तसेच मुंबई येथील पी. दजिज विभाजातील जोरेजावातील -ा.भू.ज्र. 1-अे / 1 बी /4ए1 ए /2 ( भाज ) 1 अे /1 भाज धारज ज्रजा-या जमि-ीवरील महा-ाजरपालिजे-े प्राथमिज शाळेचे आरजज बदलू-ा व ज्रिडांजज आरजज जेत्रफळ 4036.30 चौ.मी. विशेषत: 1856.68 चौ.मी. इतजे ज्मी ज्रज्याचे बंध-ाजारज आदेश महाराष्ट्र प्रादेशिज व -ाजररच-ाा अधि-ियम, 1966 च्या ज्लम 37 (1) अ-वये शास-ाा-े मुंबई महा-ाजरपालिजे-ला परिजामत: मुलां-ाा जेळज्यासाठी ज्रिडांजज -ा मिळाल्यामुळे त्यांच्यात व पालजांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भाव-ाा तसेच झ ोपडपट्टीवासियांत सुध्दा विजासजा-े माहुल जावातील जमी-ा पु-र्वस-ा ज्रज्याऐवजी विज्रीस जाढल्यामुळे -िर्माज झालेले असुरजिततेचे व संतापाचे वातावरज या दो-ही प्रज्रजी शास-ाा-े तातडी-े ज्रावयाची जार्यवाही व शास-ााची प्रतिज्रिया. "

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेवरील निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी हे निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदनाच्या प्रत सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : याठिकाणी सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

---

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/MHM/SBT पूर्वी श्री.सरफरे . . . . 16:10

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझे दोन प्रश्न आहेत. माझा पहिला प्रश्न असा आहे की, 3 हजार निवासी गाळे त्वरित बांधण्यात येतील का ? तसेच तेथील विकासकाला तेथील लोकांचे त्वरित पुनर्वसन करण्याच्या बाबतीत सांगितले जाईल का ? तसेच गोरेगाव येथील जमिनीसंबंधी महानगरपालिकेचे आरक्षण नाल्यामुळे काढलेले आहे. ते दुसरीकडे टाकण्याचा प्रयत्न करण्यात येईल का ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, 3 हजार गाळे एस.आर.ए. मधून बांधण्याच्या दृष्टीकोनातून बी.एम.सी.च्या माध्यमातून निर्णय घेण्यात आलेला आहे आणि याबाबतचे फायनल नोटीफीकेशन लवकरात लवकर काढण्यात येणार आहे. त्यानंतर लवकरात लवकर 3 हजार गाळे बांधले जातील. सन्माननीय सदस्यांनी गोरेगाव येथील आरक्षणाच्या संदर्भात जो दुसरा प्रश्न विचारलेला आहे, त्याबाबतीत सांगावयाचे तर आरक्षणाच्या बाबतीत महानगरपालिकेची प्लॅनिंग ॲथॉरिटी असते आणि प्लॅनिंग ॲथॉरिटीच्या पध्दतीने निश्चितपणे शाळेचे आणि क्रिडांगणासाठीचे आरक्षण त्यांना जसे पाहिजे, त्याप्रमाणे ते केले जाईल. याबाबतीत त्यांचा जो प्रस्ताव येईल, तो शासन मान्य करील.

-----

. . . .2 ए-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: त्सुनामी लाटांमुळे सिंधुदुर्ग किनारपट्टीला निर्माण झालेला धोका.

मु.शी.: त्सुनामी लाटांमुळे सिंधुदुर्ग किनारपट्टीला निर्माण झालेला धोका यासंबंधी सर्वश्री.गुरुनाथ कुलकर्णी, जितेंद्र आव्हाड, सदसशिवराव पोळ, जोगेंद्र कवाडे, जगन्नाथ शेवाळे, राजेंद्र जैन, वसंतराव चव्हाण, विनायक मेटे, प्रा.फौजिया खान, श्रीमती मंदा म्हात्रे, श्री.अरविंद सावंत, डॉ.दीपक सावंत, सर्वश्री.अनंत तरे, विलास अवचट, अनिल परब यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी(नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय बंदरे मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"दोन महिन्यापूर्वी त्सुनामी लाटांमुळे पूर्ण किनारपट्टीला धोका निर्माण होणे, त्याचे दुष्परिणाम सिंधुदूर्गच्या किनारपट्टीला जाणवू लागल्याने दिनांक 10 मार्च 2005 रोजी (अमावस्येपासून) भरती आल्याने समुद्राच्या उंचउंच लाटा माणवण तालुक्यातील देवबाग, तोंडवली, तळाशिल,दांडी व मालवण या भागात घुसल्याने समुद्राने जवळजवळ 50 मीटर जमीन आपल्या पोटात घेतली असून या भागातील 36 घरांना निर्माण झालेला धोका, देवबाग तोबाखाडी येथील स्मशानभूमीही पूर्णपणे वाहून जाणे, तारकर्ली किनारपट्टीतील सुरुची झाडे उन्मळून पडणे, परिणामी या परिसरातील संभावित धोक्यामुळे रहिवाशांत पसरलेले भीतीचे व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.दयानंद मस्के (बंदरे राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, दि.26-12-2004 रोजी इंडोनेशिया येथे भीषण त्सुनामी लाटा निर्माण झाल्या आणि संपूर्ण देशामधील समुद्रामध्ये मोठया प्रमाणात भुकंप झालेला आहे. त्सुनामी लाटांमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे सिंधुदूर्ग जिल्हयातील मालवण असेल, वेंगुर्ला इ.भागामध्ये मोठया प्रमाणात नुकसान झाले. मच्छिमारांचे नुकसान झाले आणि पुन्हा दि.10-3-2005 रोजी जेव्हा भूकंप झाला, तेव्हा मालवण तालुक्यातील देवबाग, तोंडवली, तळाशिल, मालवण येथील किना-यावरील भूभागाचे मोठया प्रमाणात नुकसान झाले. माझ्या लक्षवेधी सूचनेला जे उत्तर दिलेले आहे, त्यामध्ये हे जे नुकसान झालेले आहे, ते सर्व मान्य करण्यात आले आहे. या भागातील जवळजवळ 36 घरे नादुरुस्त झालेली आहेत. देवबाग येथील स्मशानभूमी देखील समुद्राने खाऊन टाकलेली आहे. याठिकाणी शासनाच्यावतीने जी कार्यवाही करण्यात येत आहे, त्यामध्ये तेथे संरक्षक भिंत बांधणे, बंधारा बांधणे इ.कामे तेथे काही प्रमाणात सुरु आहेत. पण उद्या पावसाळयामध्ये जर काही परिस्थिती निर्माण झाली तर त्यादृष्टीने कोणतीही उपाययोजना शासनाकडे नाही. त्याठिकाणी संरक्षण भिंत बांधण्यासाठी शासनाकडे निधी देखील उपलब्ध नाही. माझा प्रश्न असा आहे की, विशेषत: तळाशिल, मालवण, देवबाग येथे संरक्षण भिंत बांधण्याच्या कामासाठी त्वरित निधी उपलब्ध दिला जाईल का ? तसेच पावसाळयापूर्वी बंधारे बांधण्याच्या कामाला सक्रीयपणे सुरुवात केली जाईल का ?

श्री.दयानंद मस्के : सभापती महोदय, सिंधुदूर्ग जिल्हयातील मालवण,देवबाग इ.13 ठिकाणी शासनाच्यावतीने काम सुरु आहे. गेल्या 25 तारखेला मी स्वत: सिंधुदूर्ग जिल्हयातील वेंगुर्ला येथे जाऊन आलो. त्याठिकाणी ज्या गावांना धोका पोहोचण्याची शक्यता आहे, त्याठिकाणीच्या सर्व अधिका-यांबरोबर चर्चा करुन त्यांना सूचना दिलेल्या आहेत. मघाशी सांगितल्या प्रमाणे या जिल्हयातील 13 ठिकाणी काम सुरु आहे. शासनाच्या निधीबाबत सांगावयाचे तर सिंधुदूर्ग जिल्हयासाठी यासंदर्भात 20 लाख 91 हजार रुपयांचा निधी वापरण्यात येत आहे आणि त्यादृष्टीने कामे सुरु आहेत.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/ पूर्वी सौ.रणदिवे... 16:15

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, त्सुनामीच्या वादळाची आपल्याला कल्पना आहे. या वादळाच्या तडाख्यामुळे कोकणामध्ये नवीन बेट तयार झालेले आहे. भोगे खाडीचा प्रवाह बदलला आहे. हा प्रश्न 36 घरांच्या पुनर्वसनापुरता मर्यादित नाही, प्रश्न बंधाऱ्यापुरता मर्यादित नाही. पुढच्या काळामध्ये त्या ठिकाणी पुन्हा भय आहे. देवबाग खाडी जाऊन नवीनच त्या ठिकाणी बेट तयार व्हायची भीती आहे. म्हणून बंधाऱ्यापुरते मर्यादित न रहाता, आपल्याकडे थोर शास्त्रज्ञ आहेत, त्यांचा सल्ला घेऊन आपण बंधारा बांधणारच आहात आणि त्याचबरोबर घरांचे पुनर्वसनही करणार आहात. पण तज्ज्ञ समितीचा अहवाल घेऊन तातडीने बंधारा तर बांधाच. पण बेट निर्माण झालेले आहे, भोगे खाडीचा प्रवाह बदलला आहे, तो प्रवाह आता मोबारवाडीपर्यन्त जायला लागलेला आहे. पूर्वी असा प्रवाह त्या ठिकाणाहून जात नव्हता. तेव्हा तो प्रवाह देखील बदलण्याची आवश्यकता आहे किंवा त्या ठिकाणी बंधारे घालण्याची आवश्यकता आहे -जेणे करुन गावामध्ये पाणी जाणार नाही.- तसे आपण कराल काय ?

श्री.दयानंद मस्के : सभापती महोदय, कॅ.केरकर यांच्या अध्यक्षतेखाली या संदर्भात अभ्यास मंडळ काम करीत आहे. सन्माननीय सदस्यांच्या कोकण समुद्र किनाऱ्याच्यादृष्टीने भावना आहेत त्याबाबत अत्यंत समरसपणे विचार करुनच गेल्या 25 तारखेला सिंधुदूर्ग जिल्ह्याच्या काही भागामध्ये गेलो होतो. आता अधिवेशन संपल्यानंतर त्या भागामध्ये पुन्हा जाणार आहे. या निमित्ताने त्या विभागातील सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करेन की, त्या ठिकाणी ज्यावेळी मी दौऱ्यावर जाईन, त्यावेळेस त्या विभागातील सन्माननीय सदस्य माझ्याबरोबर असतील. त्यांच्या ज्या काही सूचना असतील त्या सूचनांची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाला शिफारस करण्यात येईल. येणारा धोका कायमस्वरुपाचा कसा टाळता येईल, हे पाहिले जाईल. कारण मी ज्या ठिकाणी गेलो त्या ठिकाणची परिस्थिती पाहिलेली आहे. यासाठी 1 कोटी 92 लाख रुपये मंजूर केलेले आहेत परंतु तेसुध्दा पाण्यात जातील की काय अशाप्रकारची शंका निर्माण झालेली आहे. त्या ठिकाणच्या वस्तींचे स्थलांतर करण्याची गरज आहे. त्या ठिकाणची वस्तींचे स्तलांतर करण्यासाठी सर्व सन्माननीय सदस्यांनी शासनाला सहकार्य करावे अशी विनंती आहे.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माझा लहानसा प्रश्न आहे. कोकण समुद्र किनाऱ्यावरील जी गावे आहेत, त्या ठिकाणची जीवित व वित्त हानी होऊ नये, अचानक संकट उद्‌भवले तर त्यापासून बचाव करण्याकरिता महाराष्ट्र सरकारला सल्ला देण्याकरिता महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाकडून मरिन कन्सलटंटची नियुक्ती करण्यात आलेली आहे, असे सांगण्यात आले.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/

प्रा.जोगेंद्र कवाडे (पुढे चालू....

माझा प्रश्न असा आहे की, या मरिन कन्सल्टंटची नेमणूक करण्यात आली, त्याचा अहवाल शासनाकडे प्राप्त झाला आहे काय, अहवाल प्राप्त झाला असेल तर आकस्मिक उपाययोजना करण्याच्या संदर्भामध्ये शासन ॲक्शन प्लॅन कोणता तयार करणार आहे ?

श्री.दयानंद मस्के : कॅ.केरकरांच्या अध्यक्षतेखाली या संदर्भातील अभ्यास करण्याचे काम सुरु आहे. त्यांच्याकडून ज्या ज्या सूचना येतील, त्या पध्दतीने शासन त्याबाबतची कार्यवाही करेल.

डॉ.नीलम गोऱ्हे : या संदर्भामध्ये स्थानिक पातळीवर लोकांना दिलासा आणि मदत देण्याची आवश्यकता आहे. तसे पुढच्या धोक्याच्या संदर्भामध्ये राष्ट्रीय पातळीवर जी यंत्रणा केंद्र सरकारने उभी केलेली आहे, त्या केंद्र सरकारच्या यंत्रणेशी राज्य शासनाचा संपर्क नसावा किंवा काय असे वाटते. याचे कारण 15 दिवसापूर्वी वेगवेगळया किनारपट्टयांना सूचना दिल्या जात होत्या, त्यामध्ये कनार्टक, केरळ किनारपट्टयांचा उल्लेख होता, परंतु महाराष्ट्राच्या किनारपट्टीवरील लोकांना धोक्याची सूचना आहे की नाही, याचा उल्लेख नव्हता.. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, केंद्राच्या आपत्कालिन व्यवस्थापनाची यंत्रणा आहे, त्यांना याबाबत आपण माहिती दिलेली आहे काय, दुसरा प्रश्न असा की, त्यांच्याकडून येणा-या सूचनांचा पाठपुरावा करुन आपण स्थानिक मच्छिमारांना आणि नागरिकांना, अशाप्रकारची यंत्रणा राबवून सुरक्षितता देणार आहात काय ?

श्री. दयानंद मस्के : सभापती महोदय, नियमितपणे आपत्कालिन धोका संभवण्याची शक्यता आहे, त्या त्यावेळेला शासनाचे सर्व अधिकारी सूचना देत असतात. काही ठिकाणी सूचना देण्याचे राहिले असेल आणि धोका निर्माण झाला असेल, त्या संदर्भात चौकशी करण्यात येईल आणि संबंधितांना त्या पध्दतीच्या सूचना देण्यात येतील.

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंतराव चव्हाण : सभापती महोदय, त्सुनामी लाटांमुळे नुकसान पोहचले आहे त्यांना मदत देण्याचे शासनाने ठरविलेले आहे. त्याचप्रमाणे मराठवाडयामध्ये मग तो परभणी जिल्हा असेल, नांदेड जिल्हा असेल त्या ठिकाणी काही दिवसापूर्वी गारपीट होऊ शेतक-यांचे अतोनात नुकसान झाले. घरांचे नुकसान झाले. जसे आपत्कालीन मदत सरकार करणार आहे.त्याचप्रमाणे मराठवाडयातील परभणी, नांदेड जिल्हयातील शेतक-यांना शासनने मदत द्यावी. त्या ठिकाणचे शासनाने नुकसानीचे पंचनामे केलेले आहेत पण अद्यात त्या ठिकाणी अर्थिक मदत दिलेली नाही. तेव्हा शासन त्याठिकाणी मदत करणार आहे काय?

श्री. दयानंद मस्के : सभापती महोदय, ज्या ज्या जिल्हयामध्ये आपत्कालीन परिस्थिती निर्माण होते, त्या ठिकाणी जिल्हा पातळीवर जिल्हाधिकारी पंचनामा करतात आणि मदत करतात.

श्री. अंनत तरे : सभापती महोदय, त्सुनामीमुळे संपूर्ण 720 कि.मी. वर किती नुकसान झाले आणि त्यासाठी शासनाने कुठे कुठे मदत केली ? निवेदनामध्ये 1 कोटी 42 लाख रुपयाच्या अंदाजपत्रकास मेरी टाईम बोर्डने मान्यता दिलेली आहे. हे काम शासन कधी सुरु करणार आहे? अशा संकटकालीन परिस्थितीमध्ये कोणालाही खरी माहिती मिळत नाही. खरी माहिती मिळण्यासाठी माहिती कक्ष शासन सुरु करणार आहे काय?

श्री. दयानंद मस्के : सभापती महोदय, आतापर्यंतच्या अनुभवावरुन शासनाला सर्व माहिती देण्यात येते. त्या पध्दतीने माहितीमध्ये जर कुठे त्रूटी आढळून आली असेल तर त्या अधिका-यांविषयी चौकशी करण्यात येईल. त्या बद्दल चौकशी करण्यात येईल. आणि त्याचा पाठपुरावा पुढे करण्यात येईल.

-----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कसारा परिसरामध्ये अज्ञात रोगाची लागण होऊन जनावरे मृत्यूमुखी पडणे.

**मु.शी.**: कसारा परिसरामध्ये अज्ञात रोगाची लागण होऊन जनावरे मृत्यूमुखी पडणे, यासंबंधी सर्वश्री संजय दत्त, धनाजी साठे, नतिकोद्दीन खतिब यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. संजय दत्त (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापति महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पशुसंवर्धन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"कसारा (जि.ठाणे) येथील वाशाळा, टोकरखांड, रावेळ, सुसरवाडी, राईचा पाडा, उंबरपाडा आदी परिसरामध्ये दिनांक 8 मार्च, 2005 रोजी वा त्यासुमारास एका अज्ञात रोगाची लागण होणें, त्यात सुमारे 50 जनावरे मृत्यूमुखी पडणें, वेळीच उपचार न केल्याने मृत्यूची वाढ होणें, त्याकडे पशुसंवर्धन विभागाने दुर्लक्ष करणे, परिणामत: ग्रामस्थ व शेतक-यांमध्ये पसरलेले चिंतेचे व असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने लक्ष घालून शेतक-यांना आणि ग्रामस्थांना दिलासा देऊन तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका "असे वाचावे.

श्री. हसन मुश्रीफ (राज्य मंत्री-पशुसंवर्धन विभाग) : सभापति महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो. तत्पूर्वी मला त्यामध्ये थोडीशी विस्तारीत उत्तराची दुरुस्ती करावयाची आहे.

"परिच्छेद तीन मध्ये चा-याचा अहवाल प्रयोगशाळेमधून प्राप्त झालेला असून त्यामध्ये त्यामध्ये अफ्डा टॉक्सीनचे अंश आढळून आले आहे."

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, कसारा, जिल्हा ठाणे येथील विविध गावांमध्ये आठ मार्च रोजी व त्या सुमारास अज्ञात रोगाने 50 जनावरे मृत्यूमुखी पडले आहेत. आता सन्माननीय मंत्रिमहोदयांनी त्याचा उल्लेख दुरुस्तीमध्ये केला आहे. माझा प्रश्न असा आहे की, या रोगाचा विस्तार ठाणा जिल्हयाच्या इतर तालुक्यामध्ये झाला आहे का? व रोगाचा विस्तार अन्यत्र होऊ नये म्हणून शासनाने कोणत्या उपाययोजना केलेल्या आहेत?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, ठाणे जिल्हयात आदिवासी विभागामध्ये जनावरे मोकाट सोडण्याची पध्दत आहे. ज्यावेळी भाताचे पीक संपते त्यावेळी जानेवारी, फेब्रुवारी आणि मार्च मध्ये पाणी नसते, तेव्हा ही जनावरे मोकाट सोडल्यानंतर भाताचा सिझन संपलेला असतो. त्यामुळे भाताचा पेंडा खावून त्यांच्यामध्ये विषबाधा होते. गेल्या वर्षी मुरबाड, साखरबाव, डोळखांब याही भागामध्ये अशीच मोकाट जनावरे मेलेली होती. ठाणे विभागामध्ये पुन्हा असा रोग होऊ नये म्हणून गावागावामध्ये सभा घेणे, गावसभेमध्ये प्रबोधन करणे आणि जनावरे मोकाट सोडू नये यासाठी शेतक-यांना अवगत करणे हे काम आमचे पशुसंवर्धन खाते करते. आता अनेक ठिकाणी जिथे ही जनावरे बांधून ठेवली जातात तेथे अशा प्रकारचे प्रकार यावर्षी झालेले नाहीत.

श्री. धनाजी साठे : सभापती महोदय, उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, समिश्र विषबाधा --- झाली असल्याचे सकृतदर्शनी आढळून आले आहे. रोगचे निदान न झाल्यामुळे समिश्र विषबाधा --- झ ाली असे म्हटले आहे. समिश्र विषबाधा हा काय प्रकार आहे?

यानंतर श्री. बरवड ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, त्याला बोटुलिझम असे म्हणतात. संमिश्र विषबाधा याचा अर्थ भाताच्या पेंडयाला लागलेल्या बुरशीमुळे असा रोग होत असतो. या संमिश्र विषबाधेत अफला टॉक्सीन व असपरजिलस नायगर या बुरशीमुळे होणाऱ्या रोगाचा समावेश होतो. यामुळे जी विषबाधा होते तिला संमिश्र विषबाधा म्हणतात.

श्री. जगन्नाथ शेवाळे : माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, त्या जनावरांनी भाताचा पेंडा खाल्यामुळे विषबाधा झाली. मूळत: कोकण भागामध्ये हेच जनावरांचे अन्न असते. पेंडा खाऊन विषबाधा झाली असे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले. एक तर वाळलेल्या पेंडयाला बुरशी लागत नाही. ती ओल्या चाऱ्याला लागते. त्या ठिकाणी नेमके काय झाले ? आपल्या खात्याने याबाबतीत काही शोध घेतला काय ?

श्री. हसन मुश्रीफ : हा पेंडा म्हणजे कापलेला पेंडा नव्हता तर हा भात कापून खालचा राहिलेला पेंडा आहे.

श्री. अरविंद सावंत : कोकणातील जनावरांना वेसण घातलेली नसते. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये जनावरे मोकाट सोडतात. त्या ठिकाणी जनावरे सुध्दा विषबाधा झालेली वनस्पती खात नाहीत. वाशाळा, ता. शहापूर हे कोकणातील गाव आहे. या निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, "वाशाळा व पोटोळवाडी गावातील 19 आजारी जनावरांवर पशुवैद्यकीय दवाखान्यामार्फत उपचार करण्यात आले. उपचार चालू असताना त्यापैकी 5 जनावरे मृत झाली." ही 5 जनावरे कोणत्या कारणाने मृत झाली ?

श्री. हसन मुश्रीफ : सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये मोकाट जनावरे फारशी सोडली जात नाहीत. मी सलग तिसऱ्यांदा खानदेश भागातील जिल्हयातील अशा मेलेल्या जनावरांच्या बाबतीत उत्तर देत आहे. ठाणे जिल्हयातील आदिवासी विभागाचा मी याबाबतीत बारकाईने अभ्यास केलेला आहे. त्या ठिकाणी भातकापणी झाल्यानंतर जनावरे सोडली जातात. भात लावणीच्या वेळी जनावरे परत बांधली जातात. इतर ठिकाणी रोज संध्याकाळी जनावरे घरी जातात. हा यामध्ये फरक आहे.

-----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सांगली जिल्हयातील वाळवा तालुक्यामध्ये वृक्ष लागवडीच्या प्रकल्पामध्ये झालेला अपहार.

**मु. शी.** : सांगली जिल्हयातील वाळवा तालुक्यामध्ये वृक्ष लागवडीच्या प्रकल्पामध्ये झालेला अपहार यासंबंधी प्रा. शरद पाटील व श्री. जयंत पाटील, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

प्रा. शरद पाटील ( पुणे विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सांगली जिल्हयातील वाळवा तालुक्यामध्ये वृक्ष लागवडीचा महत्वाकांक्षी प्रकल्प तालुक्याच्या विकासाच्या दृष्टीने पर्यावरणाचा बिघडत चाललेला समतोल टिकविण्यासाठी मंजूर झालेल्या योजनेअंतर्गत तालुक्यातील विविध ठिकाणी उपयुक्त अशा वृक्ष रोपाची लागवड करण्यात आली एकूण 671 हेक्टर एकरात 12 लाख 8 हजार 700 रोपे लावण्यात आल्याचे सांगण्यात आले. महसूल खात्याकडून वृक्षांची गणना केल्यानंतर निम्म्याहून अधिक वृक्षांची लागवडच झाली नसल्याची माहिती उजेडात येणे, त्यामुळे शासनाच्या अनुदानाचा वन अधिकाऱ्याकडून अपहार झाल्याचे स्पष्ट होणे, अशा प्रकारे शासनाच्या पैशाचा अपहार करणाऱ्या व शासकीय योजना राबविण्यात कुचराई करुन फसवणूक करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कारवाई व शासनाची भूमिका."

श्री. बबनराव पाचपुते ( वनमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

प्रा. शरद पाटील : सभापती महोदस, सांगली जिल्हयातील वनीकरणासाठी 27.2.2004 रोजी शासनाने मान्यता दिली. 31 मार्चला आणखी एकदा मान्यता दिली. अशा तऱ्हेने सांगली जिल्हयामध्ये एकूण 900 हेक्टर रोपवनासाठी 1 कोटी 45 लाख रुपये मंजूर झाले. प्रत्यक्षात सांगली जिल्हयामध्ये 792 हेक्टरचे काम झालेले आहे आणि त्यामध्ये 1.24 कोटी रुपये खर्च अपेक्षित असताना 1.44 कोटी रुपये खर्च झालेला आहे. यामध्ये 20 लाखाची तफावत आहे. त्याचप्रमाणे वाळवा तालुक्यातील 671 हेक्टर क्षेत्रावरील रोपवनापैकी तीन ठिकाणच्या 160 हेक्टर क्षेत्राखेरीज उर्वरित 511 हेक्टर क्षेत्रावरील रोवनात झालेल्या चौकशीत कोणत्याही प्रकारचा भ्रष्टाचार अथवा गैरव्यवहार आढळून आलेला नाही असे निवेदनात म्हटले आहे. फक्त गोटखिंडी, बावची, रेठरेहरणाक्ष या ठिकाणी झालेल्या गैरप्रकारामध्ये जवळपास 6 लाख 83 हजार 118 रुपयांचा खर्च कमी झाल्याचे उत्तरात दिले आहे. या सगळया उत्तरामध्ये विसंगती आढळून येते. माझा प्रश्न असा आहे की, फेब्रुवारीमध्ये पैसे मंजूर झालेले असताना या वनखात्याच्या अधिकाऱ्यांनी 792 हेक्टर क्षेत्रासाठी लागणारी एवढी रोपे कोठून आणली ? त्याची पूर्वतयारी केली होती काय ? गोटखिंडी, बावची गावामध्ये 12 टक्के, 20 टक्के एवढीच रोपे आढळून आली. त्यासंबंधी चौकशी समिती नेमली आहे. त्या समितीवर कोण सदस्य होते आणि त्यांनी काय अहवाल दिलेला आहे ?

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MHM/ SBT/ श्री.बरवडनंतर 16:30

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सांगली जिल्हयामध्ये वाळवा तालुक्यातील वृक्ष लागवडीचा अहवाल वर्तमानपत्रातून आल्यानंतर चौकशी सुरु झाली आहे. ही चौकशी दोन पध्दतीची आहे. एक म्हणजे प्रशासकीय स्वरुपाची आणि दुसरी अनियमिततेसंबंधीची चौकशी आहे. यासाठी दोन समित्या नेमलेल्या आहेत आणि या दोन्ही समित्यांमार्फत चौकशी चालू आहे. तासगांव व वाळवा या दोन्ही ठिकाणी 791 हेक्टरचे काम झालेले आहे. अनियमिततेसाठी एक समिती नेमली आहे. 2003-2004 या वर्षासाठी तासगाव व वाळवा या दोन्ही तालुक्यातील एकूण खर्च 144.92 लाख इतका आहे आणि 2004-2005 सालासाठी या दोन्ही तालुक्यांचा एकूण खर्च 139.00 लाख इतका आहे. चौकशीमध्ये असे लक्षात आले की, या कामाची सीसीटी कमी आहे त्यासाठी एक समिती नेमलेली आहे. या समितीमध्ये श्री.समीर सहाय, वनसंरक्षक हे अध्यक्ष आहेत आणि श्री.बी.जी.भोई, सहा.वनसंरक्षक, श्री.व्ही.जे.भिसे, सहा.वनसंरक्षक, श्री.जी.एस.खंडार्डे, सहा.वनसंरक्षक हे सदस्य आहेत तसेच यामध्ये श्री.एम.बी.धाईतडक हे सेक्शन इंजिनिअर आहेत. प्रशासकीय अनियमिततेबाबत नेमलेल्या चौकशी समितीमध्ये उप सचिव हे अध्यक्ष आहेत, विभागीय वन अधिकारी (मूल्यांकन, नागपूर), कार्यकारी अभियंता, सोलापूर हे सदस्य आहेत. पहिली समिती 21.12.2004 रोजी तर दुसरी समिती 18.12.2004 रोजी नेमली आहे. हे वृक्ष लागवडीचे काम करीत असताना रोपांच्या संदर्भात चौकशी केली असता प्रत्यक्षात रोपे कमी आढळून आली. त्याचप्रमाणे जीवंत रोपांची टक्केवारी 12.76 व 20.85 टक्के आढळून आली. रोपे न लावता गैरप्रकार केला आहे. त्याचप्रमाणे सीसीटीच्या कामाच्या संदर्भात चर घेतले आहे त्यांची मोजणी बाबतचे तंत्र असते ते माहीत करुन घेतले नाही तसेच रोपे न लावता लावल्याचे दाखविण्यात आले, शासनाने ही बाब गंभीरपणे घेतली आहे. या समित्यांचा 10-12 दिवसामध्ये अहवाल येईल. अहवाल आल्यानंतर कार्यवाही केली जाईल. चौकशी करण्यापूर्वी संबंधित अधिका-यांना तेथे ठेवून चौकशी करणे गैर होते म्हणून त्यांना बदलण्यात आलेले आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, जीवंत रोपांची टक्केवारी 12.76 व 20.85 टक्के आढळून आली. शासनाच्या निकषाप्रमाणे रोपे जीवंत राहण्याचे प्रमाण किती पाहिजे होते ? या कामात भ्रष्टाचार व अपहार झाल्याचे शासनाने कबूल केले आहे. तरीही शासनाने संबंधितांची केवळ बदली केली आहे. त्यांना ताबडतोब निलंबित करुन नंतर त्यांची चौकशी केली जाणार आहे का ?

04-04-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) EE-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते : मा.सदस्यांनी सांगितलेले बरोबर आहे. त्यांच्या निलंबनाची प्रक्रिया सुरु झालेली आहे. जोपर्यंत सविस्तर अहवाल येत नाही तोपर्यंत आपल्याला थांबले पाहिजे. या दोन्ही समित्यांचे अहवाल आल्यानंतर पुढील कार्यवाही करता येईल. अहवाल येण्यापूर्वी त्यांना निलंबित केल्यास त्यांना कोर्टात जाण्याची संधी मिळेल. तसेच तेथे नियमाप्रमाणे 80 टक्के झाडे जीवंत असावयास पाहिजे होती. पण त्यांनी झाडे लावलीच नाही तर झाडे जीवंत राहण्याचा प्रश्नच येत नाही त्यामुळे हा विषय शासनाने गंभीरतेने घेतला आहे.

प्रा.जोगेंद्र कवाडे : ही महत्वाची लक्षवेधी आहे, गंभीर विषय आहे, पर्यावरणासंबंधीशी संबंधित हा प्रश्न आहे. पर्यावरणाशी चालढकल करण्याचा हा प्रकार आहे. भ्रष्टाचार करणे हाच दृष्टीकोन यामागे आहे. यामध्ये जे अधिकारी गुंतले असतील मग ते वनसंरक्षक असोत की उपविभागीय वनअधिकारी असोत त्यांची केवळ बदली करुन चालणार नाही, बदली केल्यामुळे दबाव आणण्याची शक्यता असते म्हणून त्यांना ताबडतोब निलंबित करुन मगच चौकशी केली पाहिजे, कोर्ट वगैरे नंतर सरकार पाहील, परंतु ताबडतोब निलंबित करुन मग चौकशी केली पाहिजे. तसे केले जाईल काय ?

श्री.बबनराव पाचपुते : मा.सदस्यांची सूचना बरोबर आहे. यासाठी दोन समित्या काम करीत आहेत. हे काम किचकट आहे त्यांनी अनेक ठिकाणी जे चर घेतले आहेत त्यांचे मोजमाप करावे लागते. त्याचे रिपोर्ट आपल्यानंतर एक दिवस सुध्दा थांबणार नाही रिपोर्ट आल्याबरोबर कारवाई केली जाईल.

प्रा.शरद पाटील : हा अहवाल केव्हा अपेक्षित आहे ? शासनाने ही चौकशी कालबध्दरितीने करण्यासाठी चौकशी समितीला सूचना देणार आहात काय आणि श्री.थोरात आणि त्यांच्या हाताखाली ज्यांनी ज्यांनी ते गैर काम केलेले आहेत त्या सर्वांना निलंबित केले जाईल का ?

श्री.बबनराव पाचपुते : जे जे दोषी असतील त्यांच्याविरुध्द कारवाई केली जाईल. रिपोर्ट 15 दिवसात अपेक्षित आहे.

------

नंतर श्री.शिगम.....

अप्रकाशित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: लक्षवेधी सूचनेच्या निवेदनाबाबत अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री. बाबा सिद्दीकी ( अन्न व नागरी पुरवठा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "ग्रामीण जनतेच्या विकासासाठी शासनामार्फत राबविण्यात येणा-या योजनांमध्ये होत असलेला गैरवापर" या विषयावरील श्री. कन्हैयालाल गिडवाणी व इतर वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेबाबत दिनांक 17.12.2003 रोजी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहासमोर ठेवीत आहे.

**उप सभापती** : अधिक माहिती सभागृहामसेर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन कृपया छापावे.)

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MHM/ पूर्वी श्री. खंदारे 16:35

**पृ.शी.** : अनुदानीत खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक पर्यवेक्षक इत्यादी पदातील कर्मचा-यांची वेतनश्रेणी कमी केली जाणे

**मु.शी.** : अनुदानीत खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक पर्यवेक्षक इत्यादी पदातील कर्मचा-यांची वेतनश्रेणी कमी केली जाणे याबाबत श्रीमती संजीवनी रायकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उप सभापती** : माननीय सदस्य श्रीमती संजीवनी रायकर यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती संजीवनी रायकर (मुंबई शिक्षक) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

अनुदानीत खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळांची विद्यार्थी संख्या कमी झाल्यावर मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचा-यांमध्ये ऑफिस सुपरिन्टेन्डेन्ट, पर्यवेक्षक, सिनिअर लेखनिक आदी पदातील कर्मचा-यांची वेतनश्रेणी कमी केली जाणे, त्यांना वेतन संरक्षण देण्यात यावे, सदर विषय अत्यंत महत्वाचा असल्यामुळे तो मी आज सभागृहात विशेष उल्लेखाद्वारे मांडू इच्छितो.

सभापती महोदय, अनुदान प्राप्त खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थी संख्येच्या निकषावर मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक पर्यवेक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचा-यांमध्ये ऑफीस सुप्रिन्टेन्डेन्ट, सिनिअर लेखनिक, प्रयोगशाळा सहाय्यक, ग्रंथपाल,नाईक ही पदे निर्माण केली जातात. दिवसेंदिवस इंग्रजी माध्यमांच्या शाळांना भरमसाठ मान्यता दिली जात आहे. कायम विनाअनुदानित शाळांना मान्यता दिली जात आहे. या कारणामुळे विद्यार्थी संख्या कमी कमी होत आहे. नैसर्गिक कारणाने शाळेची विद्यार्थी संख्या कमी झाल्यास या पदावर काम करणारे कर्मचारी नियमानुसार अतिरिक्त होतात. परंतु संस्था लहान असल्याने त्यांचे समायोजन होत नाही. उलट त्यांची वेतनश्रेणी कमी करुन त्यांना खालच्या पदाची वेतनश्रेणी दिली जाते व यामध्ये वेतन निश्चित करताना त्यांच्या वेतनाला संरक्षण मिळत नाही. त्यांचा पगार कमी केला जातो. ही बाब

...3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्रीमती संजीवनी रायकर पुढे सुरु...)

अन्यायकारक आहे. 10-10 वर्षे काम केल्यानंतर काही कर्मचा-यांचे पगार एकदम हजार हजार रुपयांनी कमी झालेले आहेत. विद्यार्थी संख्या कमी झाल्यामुळे त्या कर्मचा-यांच्या कर्तव्य आणि जबाबदा-या यामध्ये काहीही फरक पडत नाही. त्यामुळे महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) यामधील नियम 11च्या तरतुदीनुसार जसा शासकीय कर्मचा-यांना वेतन संरक्षणाचा फायदा मिळतो तसा फायदा याही कर्मचा-यांना मिळावा. शासकीय कर्मचा-यांची रजा 8 दिवस केल्यानंतर शिक्षकांना देखील 8 दिवस रजा दिली जाते. परंतु त्यांना वेतन संरक्षण मिळत नाही. तेव्हा या कर्मचा-यांना वेतन संरक्षण देण्यात यावे आणि खालच्या वेतनश्रेणीच्या टप्प्यावर त्यांचे वेतन निश्चित करावे अशी मी विनंती करते.

---

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MHM/ पूर्वी श्री. खंदारे 16:35

**पृ.शी.** : सांगली जिल्हयातील इस्लामपूर येथील उद्योजक श्री.प्रकाश पोरवाल यांची श्री. ॲड्रयुज यांनी केलेली फसवणूक

**मु.शी.** : सांगली जिल्हयातील इस्लामपूर येथील उद्योजक श्री. प्रकाश पोरवाल यांची श्री. ॲड्रयुज यांनी केलेली फसवणूक याबाबत डॉ. नीलम गो-हे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उप सभापती** : माननीय सदस्य डॉ. नीलम गो-हे यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ. नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

"सांगली जिल्ह्यातील इस्लामपूर येथील एक उद्योजक श्री. प्रकाश पोरवाल यांना 200 कोटी रुपयांचे भारत-पाक सिमेवर तारेचे कुंपण घालण्याचे कंत्राट मिळवून देतो असे मुंबई भाईंदर येथे राहणा-या श्री. कांतन अँड्रयुजला या भामट्याने सांगून त्याबाबतची काही कागदपत्रे दाखवून इस्लामपूरचे उद्योजक श्री. प्रकाश पोरवाल यांच्याकडून 2 लाख 50 हजार रुपये घेऊन केलेला पोबारा. त्यानंतर श्री. पोरवाल यांनी आपली फसवणूक श्री. ॲड्रयुजला यांनी केल्याची लेखी तक्रार, इस्लामपूर पोलिसांत गुन्हा क्रमांक 36/2005, दि. 3.3.2005 रोजी केल्याने श्री. ॲड्रयुजला याला इस्लामपूर पोलिसांनी तक्रारदार श्री. अशोक पोरवाल यांच्या सहकार्याने अटक केली. आरोपी श्री.ॲड्रयुजलाने अनेक व्यापा-यांना फसविलेले असून त्यांच्याकडील बँकमध्ये अनेक आक्षेपार्ह कागदपत्रे, तीन मोबाईल फोन मिळाले असून त्याबाबत पोलिसांनी सखोल चौकशी केली नाही. उलट आरोपी श्री. ॲड्रयुजला याच्या भाईंदर मुंबई येथे असलेल्या पत्नीला इस्लामपूरला आणण्यासाठी खाजगी गाडीने इस्लामपूर पोलीस येऊन घेऊन गेले व इस्लामपूर मधील एका लॉजमध्ये त्यांच्या राहण्याची व्यवस्थाही केली. ॲड्रयुजला लवकर जामीन मिळण्याची व्यवस्था केली. इस्लामपूर पोलीस स्टेशनचे पोलीस उप अधीक्षक श्री. सारंग आवाड व पोलीस निरीक्षक श्री.दिलीप गोरे यांनी, आपल्या तक्रारीची पोलीस स्टेशनमध्ये चौकशी करण्यास गेले असताना श्री. पोरवाल यांना दम मारुन असे सांगितले की, या केसची वारंवार चौकशी केल्यास आरोपींच्या पत्नीचा विनयभंग केल्याची खोटी फिर्याद घेऊन तुम्हाला लॉकअपमध्ये टाकू असे सुनावले. एका फसवणूक



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. नीलम गो-हे....)

झालेल्या उद्योजकाला पोलिसांनी त्यांच्या तक्रारीची दखल घेऊन आरोपीवर कारवाई न करता इस्लामपूर पोलिसांनी आरोपीशी केलेली हातमिळवणी लक्षात घेता या प्रकरणी सखोल चौकशी करण्यासाठी हे प्रकरण सी.आय.डी.कडे सोपविण्यात यावे, अशी श्री. पोरवाल यांनी मागणी असून याबाबत सखोल चौकशी करण्याबाबत शासनाने तात्काळ निवेदन करावे."

सभापती महोदय, सांगली जिल्हयातील इस्लामपूर येथील एक उद्योजक श्री. प्रकाश पोरवाल यांना भारत-पाक सिमेवर तारेचे कुंपण घालण्याचे कंट्रात मिळवून देतो असे सांगून मुंबईतील भाईंदर येथे राहणा-या अँड्रयूजला नावाच्या भामट्याने त्यांच्याकडून 2 लाख 50 हजार रु. घेऊन पोबारा केला. याबाबतीत इस्लामपूर पोलीस स्टेशनमध्ये दिनांक 3.3.2005 रोजी गुन्हा क्रमांक 36/2005 नोंदविण्यात आलेला आहे.पोलिसांनी अँड्रयूजलाच्या पत्नीला आणण्यासाठी गाडी पाठविली होती. जेव्हा फिर्यादी श्री. पोरवाल हे इस्लामपूर पोलीस स्टेशनमध्ये गेले तेव्हा तेथील इन्स्पेक्टरने धमकावले आणि सांगितले की, जर या प्रकरणी आणखी ढवळाढवळ केलीत तर तुम्ही आरोपीच्या पत्नीचा विनयभंग केल्याची तक्रार दाखल करुन घेऊन तुम्हाला लॉकअपमध्ये बंद करीन. गुन्हेगाराकडून मोबाईल फोन जप्त केले होते. त्या मोबाईल फोनवरुन श्री. पोरवाल यांना मेसेज पाठविले जात होते. या प्रकरणी ॲड्रयुजला या आरोपीला पोलिसांनी अटक तर केली नाहीच, पण साधी चौकशी सुध्दा केलेली नाही. आरोपी ॲड्रयुजलाकडे अनेक प्रकारची बनावट कागदपत्रे देखील सापडलेली आहेत. या ॲड्रयुजलाने फसवणूक केलेली असताना त्याच्यावर कोणतीही कारवाई झालेली नाही. या भामट्याने केवळ श्री. पोरवाल यांनाच नाही तर अनेक लोकांना अशा प्रकारे भारत-पाक सिमेवर तारांचे कुंपण घालण्याचे कंत्राट मिळवून देतो असे सांगून फसविलेले आहे. या प्रकरणी ताबडतोबीने कारवाई व्हावी म्हणून मी ही विशेष उल्लेखाची सूचना दिलेली आहे.

--

...6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : मौजे चावळेवाडी (ता.जि.सातारा) येथील एक मृत खातेदार जिवंत दाखवून बनावट दस्तऐवज तयार करणे

**मु.शी.** : मौजे चावळेवाडी (ता.जि.सातारा) येथील एक मृत खातेदार जिवंत दाखवून बनावट दस्तऐवज तयार करणे याबाबत श्रीमती कांता नलावडे, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उप सभापती** : माननीय सदस्य श्रीमती कांता नलावडे यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती कांता नलावडे (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

"मौजे चावळेवाडी (ता.जि.सातारा) येथील एक मृत खातेदार 20 वर्षानंतर जिवंत दाखवून बनावट दस्तऐवज तसेच रेकॉर्ड तयार करण्याबाबतची तक्रार श्री. सिताराम पांडुरंग चाळके यांनी तत्कालीन मा. मुख्यमंत्री यांच्याकडे लोकशाही दिनी दिनांक 6.10.2003 रोजी सादर केली होती. त्यानंतर दिनांक 19.4.2004 रोजी मा. मंडळ अधिकारी, परळी (ता. जि. सातारा) यांच्याकडे सविस्तर माहिती सादर केली होती. या जागेत 800 एकरमध्ये पवन चक्कीचा घोटाळा सुध्दा झालेला आहे. परंतु गेल्या एक-दीड वर्षात याबाबत चौकशी झालेली नाही. त्यामुळे वारसदारांना त्रास होत आहे. त्याबद्दल सविस्तर चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्यात यावी, यासाठी मी ही बाब विशेष उल्लेखाद्वारे उपस्थित करीत आहे."

सभापती महोदय, मौजे चावळेवाडी (ता.जि. सातारा) येथील एक मृत खातेदार 20 वर्षानंतर जीवंत दाखवून बनावट दस्तऐवज तसेच रेकॉर्ड तयार करण्याबाबतची तक्रार श्री. पांडुरंग चाळके यांनी तत्कालीन मुख्यमंत्री यांच्याकडे लोकशाही दिनी म्हणजे 6.10.2003 रोजी केली.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे...

त्यानुसार 19.4.04 रोजी माननीय मंडळ अधिकारी,परळी,जि.सातारा यांच्याकडे देखील सविस्तर माहिती सादर केली होती. या ठिकाणी 800 एकर जागेवर पवनचक्कीचा घोटाळा झालेला आहे. 20 वर्षानंतर मृत व्यक्तीला जीवंत दाखवून खोटे अंगठे दाखवून जमिनीचा मोठा घोटाळा केलेला आहे. गेल्या एक-दीड वर्षापासून यासंबंधीची कोणत्याही प्रकारची चौकशी झालेली नाही. त्यामुळे त्यांच्या वारसदारांना न्याय मिळत नाही. त्यांच्या वारसदारांना त्रास होत आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी आश्वासन देऊन सुध्दा या वारसदारांना अद्याप न्याय मिळालेला नाही. सभापती महोदय 1980 साली मौजे चिखली या गावातून मौजे चाळकेवाडी हे स्वतंत्र गाव अस्तित्वात आणले आहे.चिखली या गावातून मौजे चाळकेवाडी असे विभाजन करीत असताना जुन्या सर्व्हे नंबरमध्ये बदल करण्यात आला होता यासंबंधीचे मुख्य हे कारण आहे. जुना सर्व्हे नं.88 असा होता. त्याऐवजी नवीन सर्व्हे नंबर 20 मौजे चाळकेवाडी असा करण्यात आलेला आहे. त्याच्यामध्ये कब्जेदार श्री.येसू नाथा चाळके यांच्या नावांची नोंद करण्यात आली. त्या गृहस्थांचा मृत्यू 28.4.1965 साली झालेला आहे. परंतु 1981 साली त्यांच्याच नावाची नोद करण्यात आली. त्या व्यक्तीचे खोटे अंगठे घेण्यात आलेले आहेत. येसू नाथा चाळके हे 1965 सालीच मृत झाले होते. तरी देखील श्री.सितराम चाळके व त्यांचे वडील यांची लेखी संमती अथवा तोंडी संमती परवानगी घेतलेली नव्हती. आणि सदरचे हिस्से पाडताना येथू नाथा चाळके हे मृत असताना त्या दस्तऐवजावर त्यांचे कसे काय अंगठे घेतले गेले हा एक संशोधनाचा विषय आहे. या गंभीर प्रश्नाकडे सरकारने दुर्लक्ष केलेले आहे. या प्रकरणी मुलाला आणि नातवाला न्याय स शासनाचा मिळावा अशी मी विनंती करते. या ठिकाणच्या जमिनीवर पवनचक्क्या आहेत. स्नोसम इंडिया लिमिटेड,मुंबईत सुजलॉन डेव्हलपमेंट प्रायव्हेट लिमिटेड,इनरकॉन इंडिया लिमिटेड, रिॲलिटी प्रायव्हेट लिमिटेड, व्हस्टाज प्रायव्हेट लिमिटेड वगैरे अशा दहा कंपन्याना संपूर्ण मिळकतीची विक्री करुन लाखो करोडो रुपये कमविलेले आहेत. या ठिकाणी बेकायदेशीर पवनचक्क्या बेकायदेशीर कंपन्यांची सदर रेकार्ड दप्तरी नोंदी केल्या गेलेल्या आहेत. या विषयाकडे शासनाने दुर्लक्ष केलेले आहे. शासनाने या बाबतीत गंभीरतेने लक्ष घालावे अशी विनंती करते आणि याबाबतचे माझे मनोगत पूर्ण करते.

--------------------

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : शिक्षकेतर कर्मचा-यांसाठी नवीन आकृतीबंध.

**मु. शी.** :शिक्षकेतर कर्मचा-यांसाठी नवीन आकृतीबंध याबाबत सन्माननीय सदस्य डॉ.अशोक मोडक वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य डॉ.अशोक मोडक यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ.अशोक मोडक ( कोकण विभाग पदवीधर ) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखा-संबंधीची सूचना मांडतो.

" शिक्षकेतर कर्मचा-यांसाठी नवीन आकृतीबंध "

सभापती महोदय, अतिशच चांगली गोष्ट आहे की, या ठिकाणी सन्माननीय शिक्षण मंत्री उपस्थित आहेत. माझ्याकडे दिनांक 16 मार्च,2005 रोजीचा "गावकरी" या वृत्तपत्राचा अंक आहे. त्या वृत्तपत्रातील बातमीचे शिर्षक असे आहे की, "शिक्षकेतर कर्मचा-यांवर बेकारीची कु-हाड". सभापती महोदय, याचे मागची पार्श्वभूमी अशी आहे की, ऑक्टोबर,2003 मध्ये सुध्दा शासनाने परिपत्रक काढून शिक्षकेतर कर्मचा-यांच्या भरतीवर शासन बंदी आणणार अशा प्रकारची हवा सगळीकडे उत्पन्न केली. 2003 च्या नागपूर अधिवेशनात यासंदर्भात मी आणि इतर काही सन्माननीय सदस्यांनी आवाज उठविला. तेव्हा शिक्षकेतर कर्मचा-यांना काहीसा दिलासा मिळाला होता. परंतु आता सरप्लस बजेट काहीही करुन मांडले पाहिजे आणि ते तसे टिकविले पाहिजे,या हट्टापोटी सरकार सर्वसामान्य माणसाच्या बजेटवर डेफीसिटची कु-हाड चालवित आहे असे आता मत झालेले आहे. मी केवळ माहितीसाठी मुद्दे सांगतो. चिपळूणकर पॅटर्न प्रमाणे 300 विद्यार्थी संख्या असेल तर 1 लिपीक, 310 ते 1000 विद्यार्थी असतील तर 1 कनिष्ठ आणि 1 वरिष्ठ लिपीक, 1 हजार ते 1 हजार 500 विद्यार्थी असतील तर 1 कनिष्ठ आणि 2 वरिष्ठ लिपीक, अशा त-हेचा पॅटर्न ठरलेला आहे. आता जो आकृतीबंध येऊ घातला आहे. माझी माहिती चूक असेल किंवा बरोबर असेल ती कृपया आपण तपासून पहावी. त्यात मात्र 1 हजार विद्यार्थी असतील तर 1 कनिष्ठ लिपीक,1 हजार ते 3 हजार विद्यार्थी असतील तर 1 कनिष्ठ आणि 1 वरिष्ठ लिपीक,

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3 हजार पेक्षा अधिक विद्यार्थी असतील तर 1 कनिष्ठ,1 वरिष्ठ आणि 1 मुख्य लिपीक अशा पदांना मंजुरी मिळेल. अधीक्षक पद नव्या योजनेत रद्द होणार असल्याचे कळते. सभापती महोदय, शहापूरच्या खाडे विद्यालयाच्या एका कारकुनाने मला पत्र दिलेले आहे. त्याने भीती अशी व्यक्त केली आहे की, ज्या ठिकाणी माध्यमिक शाळांना उच्च माध्यमिक विभागांचे वर्ग जोडलेले आहेत अशा शाळांसाठी शासनाने मुळातच स्वतंत्र कर्मचारीवर्ग न नेमता आहे त्या कर्मचा-यांनीच काम करावे अशी आताची स्थिती आहे...

यानंतर श्री. कानडे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ SBT/ 16:45

डॉ. अशोक मोडक ...

आहेत त्या कर्मचा-यांनाही कपात लागली म्हणजे ग्रंथपाल असतील किंवा लॅब असिस्टंट असतील शिपाई असतील तर तो भार या मंडळींवर वाढेल आणि त्याचा फटका विद्यार्थ्यांना बसेल आणि शिक्षणाच्या एकूण प्रणालीवर बसेल. मला शिक्षणमंत्र्यांना अशी विनंती करावयाची आहे की अशा त-हेच्या बातमीमुळे आज जो आतंक माजला आहे तो लवकर दूर करण्यासाठी प्रयत्न करावा अथवा महिनाभरात आपण जाहीर केले किंवा कळविले की ही सगळी वदंता आहे तर That will probably a relief for all of us तसे नसेल तर याचे लॉजिक शासनाने मांडावे आणि सभागृहाला अंधारात ठेवू नये.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कुणबी समाजाच्या सामाजिक,शैक्षणिक,व आर्थिक समस्यांबाबत

**मु.शी.**: कुणबी समाजाच्या सामाजिक,शैक्षणिक व आर्थिक समस्यांबाबत श्री. जयंत प्र.पाटील,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा.सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. जयंत प्र.पाटील (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित): महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"महाराष्ट्र राज्य कुणबी समाज उच्चाधिकार समितीचे तत्कालिन अध्यक्ष शंकरराव म्हसकर यांनी कुणबी समाजाच्या सामाजिक,शैक्षणिक व आर्थिक समस्यांबाबतच्या 58 शिफारशींचा अहवाल दिनांक 23 जुलै 2003 रोजी राज्याचे तत्कालिन मुख्यमंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे यांचेकडे सादर केलेला आहे.

गेले महिनाभरात ठाणे,रायगड,रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्हयातील कुणबी समाज संघटनेने तालुकानिहाय तसेच मुंबई येथे आपल्या समस्यांबाबत मोठया प्रमाणात मोर्चे काढले आहेत.

तरी शासनाकडे महाराष्ट्र राज्य कुणबी समाज उच्चाधिकार समितीचे तत्कालिन अध्यक्ष शंकरराव म्हसकर यांनी दिनांक 23 जुलै 2003 रोजी सादर केलेल्या अहवालानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येणार आहे याकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मी हा विशेष उल्लेख करीत आहे."

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: शिक्षण संस्थेवर प्रशासकाची नियुक्ती करणेबाबत

**मु.शी.**: शिक्षण संस्थेवर प्रशासकाची नियुक्ती करण्याबाबत श्री.व्ही.यू. डायगव्हाणे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा.सदस्य श्री. व्ही.यू.डायगव्हाणे यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे (नागपूर विभाग शिक्षक) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

कृषक विद्यालय,वर्धा येथील दोन शिक्षिकांनी न्याय मागण्यांसाठी डिसेंबर 2004 मध्ये आमरण उपोषण केले. तसेच सुभाष हायस्कूल,डोंगरगाव,ता.देवरी,जि.गोंदिया या शाळेतील सर्व शिक्षकांनी संस्था चालकाच्या मनमानी व नियमबाहय वर्तनाचे विरुध्द आमरण उपोषण,रस्ता रोको आंदोलन केले. कृाक विद्यालय वर्धा येथील श्री.शेंडे यांची संस्थेने नियमबाहय नियुक्ती केली होती. शिक्षण संचालक व शिक्षण उपसंचालक यांनी केलेल्या तपासणीत श्री.शेंडे यांची नियुक्ती नियमबाहयपणे केली असे संस्थेला व शिक्षणाधिकारी कार्यालयाला कळविले. तसेच मा.शिक्षण राज्यमंत्री यांनी दिनांक 1 जून 2004 रोजीच्या चर्चेनंतर श्री शेंडे यांची नियमबाहयपणे केलेली नियुक्ती रद्द करावी असे उपसंचालक,नागपूर यांना कळवूनही कारवाई झाली नाही. दिनांक 14.12.2004 रोजी विधानपरिषद सभागृहात प्रश्नोत्तरे झाली. लक्षवेधीचे निवेदन राखून ठेवले. शासकीय विधिज्ञाचा सल्ला घेण्यात आला. त्यांनी दिलेला सल्ला विचारात घेऊन दिनांक 16.12.2004 रोजी मा.शिक्षण मंत्र्यांनी नियम 46 अन्वये पुढीलप्रमाणे निवेदन केले. त्यात कृषक विद्यालय,वर्धा या शाळेवरील प्रशासक नियुक्तीचा कालावधी आता संपुष्टात आलेला नसल्याने मा.उच्च न्यायालयात शासनाचे म्हणणे सादर करुन संबंधित याचिका खारिज करण्याची विनंती करण्यात येईल. ही याचिका मा.उच्च न्यायालयाने खारिज केल्यास श्री.पी.जे.शेंडे यांच्या वैयक्तिक मान्यतेबाबत 15 दिवसात आवश्यक ती कारवाई करण्यात येईल. अद्यापही विभागाचे कोणतीच कारवाई केली नाही. या शाळेतील कु.अर्चना देशमुख,कु.शोभा खोडके,कु.शरणागत व अन्य एक अशा चार शिक्षिकांना संस्था सचिवांकडून मानसिक त्रास दिला जातो. तिघा शिक्षण सेवकांना नियममित केले नाही. सुमारे 5/6 महिन्यांपासून सर्व शिक्षक कर्मचा-यांचे वेतन मंजूर झाले नाही.

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

04-04-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) HH-4

SSK/ MHM/ SBT/ 16:45

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे ...

या संस्थेच्या दोन्ही शाळांचे ऑडिट न होणे,संगणक खरेदीतील भ्रष्टाचार,नियमबाहय नियुक्त्या,शासकीय निधीचा गैरवापर,शालांत परीक्षेचा निकृष्ट निकाल,आवश्यक विद्यार्थी संख्या नसणे इ.अनियमिततता आहेत. संस्थेवर प्रशासक नियुक्त करावा अशी शिक्षक कर्मचा-यांची मागणी आहे. या सर्व समस्या निकाली काढाव्या यासाठी मी विशेष उल्लेखची सूचना उपस्थित करीत आहे.

---

....5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: पुणे येथील संस्कृत विद्या मंदिर या संस्थेने अनधिकृत बांधकाम करणेबाबत.

. **मु.शी.**: पुणे येथील संस्कृत विद्या मंदिर या संस्थेने अनधिकृत बांधकाम करणेबाबत श्री. विनोद तावडे यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा.सदस्य श्री. विनोद तावडे यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. विनोद तावडे (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

पुणे येथी संस्कृत विद्या मंदिर या संस्थेला पर्वती स.न.75 ते 80 सिटी स.नं.2990-2191 ही मिळकत काही अटींवर पुणे महानगरपालिकेने 15 वर्षांच्या भाडेपट्टयावर दिलेली असणे. सदर क्रीडा संकुलात अनधिकृतपणे बांधकाम करणे तसेच महिलांचे अश्लिल छायाचित्रण करण्याचा प्रकार उघडकीस येणे. सदर संस्थेचा भाडेपट्टा शासनाने रद्द करणे आवश्यक असणे. अशा प्रकारच्या गंभीर विषयाची या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून सभागृह तीव्र चिंता व्यक्त करीत आहे.

मागे विकृत छायाचित्रणाचा प्रकार गाजला होता. त्याच्यावर भरपूर चर्चाही झाली होती. संस्कृत विद्यामंदिर संस्थेची भाडेपट्टयावर दिलेली लीजची मुदत आता संपत आलेली आहे. त्यांनी त्याच्यामध्ये ब-याच गोष्टींचे उल्लंघन केलेले आहे. क्रीडा संकुलाचा व्यापारी उपयोग करावयाचा नाही. क्रीडा संकुलाचे बांधकाम नकाशे सुध्दा महापालिकेची दिशाभूल करुन बांधले आहेत आणि महापालिकेने तशा प्रकारची नोटीस सुध्दा बजावली आहे. या सगळयामध्ये राष्ट्रशक्ती संघटना पुणे शहराची ज्ञानेश्वर धारवटकर यासंदर्भातील अटी होत्या. बंदिस्त बांधावे,व्यापारी वापर करु नये. पुणे महापालिकेकडून आराखडा मंजूर करुन घ्यावा .....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ SBT/ MHM/ प्रथम श्री.कानडे 16:50

श्री.विनोद तावडे..

त्यामध्ये काही अटींचा भंग झाला असेल तर हा भाडेपट्टे करार रद्द करण्यात यावा.शासनाने दिलेल्या जमिनीवर जर अशा प्रकारे काही गोष्टी घडत असतील तर लीज संपल्यानंतर त्याची मुदत वाढवावयाची किंवा नाही यावर विचार केला पाहिजे. तेव्हा या प्रकरणी योग्य ती चौकशी करुन ज्या ज्या नियमांचे उल्लंघन केलेले आहे त्या त्या बाबतीत त्या संस्थेवर योग्य ती कारवाई होण्याची आवश्यकता आहे यासाठी मी विशेष उल्लेखाची सूचना मांडत आहे.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2...

पृ.शी: माध्यमिक शिक्षण संस्थेच्या वेतनेतर अनुदानासाठी केलेली तरतूद 31 मार्चच्या आत वितरित करणे

मु.शी : माध्यमिक शिक्षण संस्थेच्या वेतनेतर अनुदानासाठी केलेली तरतूद 31 मार्चच्या आत वितरित करण्याबाबत.व्ही.यु.डायगव्हाणे यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

प्रा.वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) :सभापती महोदय, श्री.व्ही.यु.डायगव्हाणे व इतर यांनी " माध्यमिक शिक्षण संस्थेच्या वेतनेतर अनुदानासाठी केलेली तरतूद 31 मार्चच्या आत वितरित करणे " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून,आपण निदेश केल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. आपण आमच्यासाठी या सार्वभौम सभागृहाचे उच्च पदस्थ आहात व सन्माननीय आहात. आपण दिलेले आदेश राज्याला निश्चितच शिरसावंद्य आहेत.सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.व्ही.यू.डायगव्हाणे यांनी आणि इतर सन्माननीय सदस्यांनी नियम 93 अन्वये एक सूचना दिली होती त्या निमित्ताने माध्यमिक शिक्षण संस्थांच्या वेतनेतर अनुदानासाठी त्यांनी आग्रही मागणी केली होती.त्यात 242.91 कोटी रुपयापैकी 155 कोटी रुपयांची तरतूद केली होती आणि ते पैसे वितरितही केले होते.त्या दिवशी सन्माननीय सदस्यांनी आग्रह धरला होता. त्याचबरोबर सभापती महोदय, आपणही आदेश दिले होते की, 31 मार्चच्या आत हा निधी वितरित करण्यात यावा. या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनासुध्दा शंका होती व त्यांनी सांगितले होते की, 31 मार्चच्या आत निधी वितरित केला पाहिजे. मी सन्माननीय सदस्यांना अत्यंत नम्रपणे सांगू इच्छितो की,87.91 कोटी रुपये 31 मार्चच्या रात्री आम्ही निश्चितपणे वितरित केले होते.आम्ही आपल्याला आनंदाने सांगू इच्छितो की, शिक्षण क्षेत्र हे मानवी विकासाचे मुलभूत क्षेत्र आहे या क्षेत्रावर होणारा खर्च "is invested and not wasted" ही बाब आम्ही गांभीर्याने घेतलेली आहे.या संदर्भात एवढे निवेदन पुरेसे आहे . शासन शिक्षण क्षेत्रासाठी निधी उपलब्ध करुन देईलच परतु माझी एक अपेक्षा आहे की, या क्षेत्रात गुणात्मक बदल होईल आणि महाराष्ट्र राज्य पुरोगामी राज्य म्हणून उदयास येईल. अशा प्रकारची अपेक्षा व्यक्त करुन मी माझे निवेदन संपवितो.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे :सभापती महोदय , याबाबत आम्ही काही प्रश्न विचारले होते आणि त्या संदर्भात आपण शासनाला निर्देश दिले होते व त्या अनुषंगाने माननीय मंत्रिमहोदयांनी आश्वासन दिले होते की 31 मार्च पर्यन्त 87.91 कोटी रुपयाचे वितरण करण्यात येईल .विशेष बाब अशी आहे की रात्री 12.30 वाजता सर्व जिल्हयामध्ये संदेश गेला होता की यासाठी 87.91

3....



VTG/ SBT/ MHM/ प्रथम श्री.कानडे 16:50

श्री.डायगव्हाणे ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे तसेच या बाबतीत 1 तारखेला जी.आर. काढण्यात आला असून तो सुध्दा सरक्युलेट करण्यात आला आहे .यासंबंधी माझी एकच अडचण आहे की, काही जिल्हयांमध्ये अडचणी आलेल्या आहेत. तेव्हा त्या जिल्हया मधील हा निधी परत जाणार नाही यासंबंधी माननीय मंत्रीमहोदय दक्षता घेणार आहेत काय ?.माननीय मंत्रिमहोदयांनी जे आश्वासन दिले होते त्याचे 100 टक्के अंमलबजावणी केल्याबद्दल सभागृहाच्या वतीने आणि माझ्या वतीने मी आपले आभार मानतो.

प्रा.वसंत पुरके : एकाही जिल्हयातून निधी परत जाणार नाही.

**उपसभापती** : याबाबतीत मी निर्देश दिले होते.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय,आपणच निर्देश दिलेला असल्यामुळे तो आम्ही शिरसावंद्य मानला आहे.

श्री.व्ही.यु.डायगव्हाणे : सभापती महोदय, आपण निर्देश दिल्यामुळे याला व्हेटेज प्राप्त झाले होते व त्या प्रक्रियेला चालना मिळाली होती. हा संपूर्ण राज्याचा प्रश्न होता व आपल्या निर्देशामुळे हा प्रश्न सुटला आहे त्यामुळे संघटनेच्या वतीने आणि शिक्षकांचे प्रतिनिधी म्हणून मी आपले आभार मानतो. धन्यवाद.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**<u>औचित्याच्या मुद्याबाबत</u>**

श्री.जयंत प्र. पाटील : सभापती महोदय , मी औचित्याच्या मुद्याच्या निमित्ताने असा मुद्दा मांडला होता की, विधिमंडळाचे अधिवेशन सुरु असतांना ज्या समित्यांमध्ये आमदार हे सदस्य आहेत अशा समित्यांच्या बैठका घेण्यात येऊ नयेत. या बाबतीत माननीय सभापतींनी सुध्दा असे निर्देश दिले होते की ,या संदर्भात तातडीने रायगडच्या जिल्हयाधिका-यांना कळविण्यात यावे. असे असतांना 5 तारखेला दोन समित्यांच्या बैठका रायगडच्या जिल्हाधिका-यांनी बोलावल्या आहेत.त्यामुळे माननीय सभापतीनी दिलेल्या निर्देशाचा अवमान होत आहे.उद्या बोलाविण्यात आलेल्या बैठका ताबडतोब रद्द करण्यात याव्यात .अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

**उपसभापती** : बैठका रद्द करण्याबाबत त्यांना कळविण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय,माननीय सभापतींनी या संदर्भात कडक निर्देश दिले होते.विधिमंडळाचे अधिवेशन चालू असतांना आमदार सदस्य असलेल्या कमिटयांच्या बैठका घेतल्या जाता कामा नयेत. अशी प्रथा व पंरपरा आहे .याबाबतीत निर्देश दिल्यानंतरसुध्दा जर बैठका बोलावल्या असतील तर हा हक्क भंगाचा विषय आहे तेव्हा याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**उपसभापती** : आता यानंतर शासकीय विधेयके घेण्यात येतील. ...

श्री. नतिकोद्दीन खतिब : अध्यक्ष महाराज, आपण कृपया 10-15 मिनिटांसाठी चहासाठी सुटी घेतली तर बरे होईल.

काही सदस्य : होय, अध्यक्ष महाराज, थोडा ब्रेक घ्यावा. ...

**उपसभापती** : दोन छोटी विधेयके आहेत. ती संमत करून नंतर आपण सुटी घेऊ. ...

श्री. दिवाकर रावते : अध्यक्ष महाराज, झोपडपट्टी संबंधातील विधेयक आहे. त्यावर चर्चा आम्हाला करावयाची आहे. तेव्हा आताच आपण सुटी घ्यावी आणि त्यानंतर विधेयके आणि पुढील कामकाज घ्यावे.

**उपसभापती** : ठीक आहे. सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होऊन 5.15 वाजता पुन्हा भरेल.

( 4.55 ते 5.15 मध्यंतर )

( यानंतर श्री. जागडे .... केके 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( मध्यंतरानंतर )**

**( सभापतीस्थानी : मा. उपसभापती )**

**कॅबिनेट मंत्री सभागृहात उपस्थित नसल्याबाबत**

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, कॅबिनेट मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत.

**उपसभापती** : ठीक आहे. सभागृहाची बैठक मी दहा मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक 5 वाजून 15 मिनिटांकरिता, 10 मिनिटांसाठी स्थगित झाली. )

--

( यानंतर श्री. सरफरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>स्थगितीनंतर</u>**

**<u>(सभापतीस्थानी मा.उपसभापती)</u>**

**<u>नियम 46 अन्वये निवेदन</u>**

**पृ.शी.: 500 मेगावॅट व त्यावरील विद्युत निर्मिती क्षमतेचे धोरण**

**मु.शी. : .500 मेगावॅट व त्यावरील विद्युत निर्मिती क्षमतेच्या धोरणासंबंधी मा□□□य ऊर्जा मंत्र्यांचे □िवेद□**

श्री.दिलीप वळसे पाटील .( ऊर्जा मंत्री ) : अध्य□ महोदय, मी आपल्या अ□ुमती□ □ियम 46 अ□्वये पुढील □िवेद□ □रतो :-

(प्रेस : येथे सोबत जोडलेले □िवेद□ छापावे )

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. महाराष्ट्रातील वीजेच्या तुटवडयाच्या संदर्भात शासनाने उचललेले पाऊल निश्चितच स्वागतार्ह आहे. वास्तविक निवेदनावर चर्चा करता येत नाही व तशी पध्दत नाही. परंतु खाजगी कंपन्यांकडून वीज कोणत्या दराने शासन खरेदी करणार आहे? याची माहिती निवेदनात दिली नाही.आपल्याला एन्रॉनचा अनुभव चांगला नाही. म्हणून मनामध्ये साशंकता वाटते. तेवढयापुरता मी हा मुद्दा उपस्थित करीत आहे.

श्री. दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, मी या संदर्भात सांगू इच्छितो की, खाजगी गुंतवणुकीच्या क्षेत्रात खाजगी गुंतवणूकदारांनी गुंतवणूक करण्याच्या संदर्भात सरकारने धोरण जाहीर केले व ते या सभागृहामध्ये जाहीर केले. त्याच्या प्रती माननीय सदस्यांना सर्क्युलेट केल्या आहेत. त्या अंतर्गत करार झाला आहे. या धोरणात स्पष्टपणे म्हटले आहे की, ही वीज तयार होईल ती कॉंपिटेटीव्ह बिडींगच्या माध्यमातून एमएआरसीच्या माध्यमातून एमएआरसी परवानगी देईल तेवढया क्षमतेची वीज आपण खरेदी करु. या प्रकल्पामधून निर्माण होणारी 50 टक्के वीज राज्यामध्ये विकण्यास त्यांना बंधनकारक केले आहे. आणि 50 टक्के वीज राज्याला पाहिजे असेल तर त्यावर राज्य हक्क सांगेल. आणि राज्याला नको असेल तर बाहेरच्या राज्यात ती वीज घेऊन जावू शकतात. हा एक सामंजस्य करार आहे, त्यामध्ये आपण कुठलाही पीपीए करार केलेला नाही. आर्थिक लायाबिलिटी स्वीकारली नाही. आपण 2003 चा कायदा लक्षात घेतला तर वीज प्रकल्पासाठी सरकारची परवानगीची गरज नाही. आपल्या धोरणाप्रमाणे आपण त्यांना सुविधा देऊ केल्या आहेत, काही सवलती दिल्या गेल्या आहेत. त्यांचा लाभ त्यांना घ्यावयाचा असेल तर त्यामध्ये त्यांनी राज्य सरकारच्या बरोबर आज सामंजस्य करार करुन आज पासून सहा महिन्यात डीपीआर तयार करुन, आज पासून बारा महिन्याच्या आत फायनान्शिअल क्लोजर करुन त्यांनी पुढे जायचे आहे. आणि त्यांची पॉवर तयार झाल्यानंतर ती बाजारात विक्रीला आल्यानंतर एमएसईबी जेवढी वीज लागेल तेवढी ओपन बिडिंगच्या माध्यमातून खरेदी करील. त्याचा दर आज निश्चित ठरविण्याचे कारण नाही.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/MAP/KGS पूर्वी श्री.सरफरे . . . . 17:30

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी डिटेल प्रोजेक्ट रिपोर्टचा उल्लेख केला. साधारपणपणे ज्या बंधनांवर डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट अवलंबून असतो, तीच बंधने येथे ॲप्लीकेबल आहेत का ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, होय .

-----

. . . .2 एम-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास)

(सुधारणा) विधेयक.

L.C.BILL NO. V OF 2005.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA SLUM AREAS (IMPROVEMENT, CLEARANCE AND REDEVELOPMENT), ACT, 1971

श्री.दयानंद मस्के (गलिच्छ वस्ती सुधार राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक 5 - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, 1971 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी या बिलाच्या संदर्भात माहिती दिली पाहिजे.

श्री.दयानंद मस्के : सभापती महोदय, याठिकाणी सेवा प्रवेश नियमामध्ये न्यायिक अधिका-यांसाठी आणि वकीलांसाठी पात्रतेच्या अटीमध्ये या दोन्ही वर्गासाठी 8 वर्षाची अट असावी यासाठी सदरचे विधेयक याठिकाणी आणण्यात आलेले आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, ट्रॅब्युनल कशासाठी आहे ? ते काय काम करीत आहे ? हे देखील कळले पाहिजे. याठिकाणी फक्त दहा वर्षाची असलेली अट आठ वर्षे केली आहे, एवढेच याठिकाणी दिलेले आहे. पण शासनाला असे का करावेसे वाटले ? याची माहिती दिलेली नाही.

श्री.दयानंद मस्के : सभापती महोदय, दोघांमध्ये समानता असावी असा यातील उद्देश आहे. या दोघांसाठी आठ वर्षे आणि दहा वर्षे अशी अट होती.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, दोन ठिकाणी म्हणजे कुठे ?

श्री.दयानंद मस्के : सभापती महोदय, न्यायाधीश आणि वकील यांच्यामध्ये दोन वर्षाचा फरक जाणवत होता. तो यामुळे दूर होणार आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

----

. . . .2 एम-2



APR/MAP/KGS 17:30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, याठिकाणी सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक 5 - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम 1971 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यात आलेले आहे. त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या विधेयकाच्या उद्देश आणि कारणे यामध्ये जी माहिती दिलेली आहे, ती अतिशय मर्यादित स्वरुपाची आहे. खरे म्हणजे एकदा दहा वर्षाची अट घातल्यानंतर ती शिथिल करीत असताना त्याची कारणेही द्यावी लागतात. त्यापैकी यामध्ये समानता आणणे हे एक कारण आहे. पण यापूर्वी जेव्हा विधेयक मंजूर करुन त्यामध्ये दहा वर्षाची अट घालण्यात आली, तेव्हा ही बाब कोणाच्याही लक्षात आली नाही का ? आताच ही बाब कशी लक्षात आली ? याचा अर्थ असा आहे की, व्यक्तीनिहाय, एक व्यक्ती डोळयासमोर ठेऊन हे केलेले आहे आणि त्याला आठ वर्षाचा अनुभव असावा म्हणून हे असे करीत आहात का ? हा त्यातील महत्वाचा विषय आहे. जर वकील असेल तर आठ वर्षे प्रॅक्टीस केल्यानंतर त्याला संधी मिळावी. पण तो वकील असतो त्याला न्यायाधीशाचा अनुभव नसतो. पण जो जज्ज असतो, त्यांनाही आठ वर्षाची अट करीत आहात. म्हणजे जी व्यक्ती मॅच्युअर्ड नाही, जिला आवश्यक तेवढा अनुभव नाही अशी व्यक्ती तेथे बसविली तर झोपडपट्टीधारकांवर अन्याय होणार आहे. ज्यांना कायदा कळत नाही, कायद्यामुळे काय परिणाम होणार आहेत हे कळत नाही अशा लोकांचा गैरफायदा घेण्यासाठी अनेक दलाल निर्माण झालेले आहेत. असे लोक झोपडपट्टी प्राधिकरणासमोर निरनिराळी प्रकरणे घेऊन जातात आणि बनवाबनवी करतात. एखाद्याकडे जो फोटो पास असतो, तो बाजूला कुठेतरी जातो आणि त्याऐवजी बोगस फोटो पास तयार केला जातो आणि त्या जागा दुस-यांना विकल्या जातात. अशा प्रकारची कामे करणारी अनेक माणसे आहेत. मंत्रीमंडळात सुध्दा आहेत. जरुर पडली तर मी त्यांची नावे देखील सांगेन. गरीब जनतेला फसवून पैसे मिळविणे बरोबर नाही. याबाबतीत मी आपल्याला एक उदाहरण देऊ इच्छितो. वांद्रा-पश्चिम येथे नर्गिस दत्त झोपडपट्टी होती. डिसेंबर मध्ये नागपूर येथील अधिवेशनाच्या वेळी ती झोपडपट्टी जाळली गेली. त्याला आग लागली असे मी म्हणणार नाही. त्यावेळी तेथील सर्व झोपडया भस्मसात झाल्या आणि त्यांच्याजवळ असलेले सर्व रेकॉर्डही भस्मसात झाले. त्यानंतर त्याठिकाणी वाल्मिकी-आंबेडकर योजनेअंतर्गत पक्की घरे बांणण्याच्या कामास सुरुवात झाली आहे.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे चालू...

स्वाभाविकता काय होते की, ज्यांच्याकडे पुरावे होते, त्यांचे पुरावे देखील ग्राह्य न मानता भलत्या बोगस माणसांना तीन-तीन, चार-चार लाख रुपयांना झोपड्या विकाव्या लागतात. जे खरोखर हक्कदार आहेत, त्या लोकांना वंचित रहावे लागते, अशी परिस्थिती झालेली आहे. ही प्रकरणे या न्यायाधिकरणासमोर येणार. या न्यायाधिकरणामध्ये जर न्याय मिळाला नाही तर शेवटी त्यांनी जायचे कोठे ? त्याच्या वरच्या न्यायालयात जायचे म्हटले तर त्याच्याकडे एवढा पैसा नसतो. त्यांना जगणे मुष्कील, खाणे मुष्कील, मुलांची देखभाल करणे मुष्कील होते. अशी माणसे जर न्यायदानाच्या सापळ्यामध्ये अडकली तर त्यांना पुढे न्याय कसा मिळायचा ? म्हणून मला एका गोष्टीची माहिती पाहिजे होती की, 8 वर्षे आणि 10 वर्षे यामध्ये 2 वर्षे कमी करण्याच्या संदर्भात सांगितलेले आहे. पुष्कळ वेळा ही वर्षे वाढविली जातात. तेव्हा यासाठी माणसेच मिळत नाहीत अशी परिस्थिती आहे काय ? आपल्या महाराष्ट्रामध्ये अशा न्यायाधिकरणासाठी एखादे न्यायमूर्ती किंवा अन्य कोणी योग्य व्यक्ती मिळत नाही, म्हणून 10 वर्षाचा अनुभव जास्त आहे, त्यामध्ये 8 वर्षे रिलॅक्सेशन करून दुसरी माणसे नेमणार आहोत, अशी परिस्थिती गृहनिर्माण मंडळावर आलेली आहे काय ? मला याची कल्पना नाही. परंतु विधेयकामध्ये उद्देश आणि कारणामध्ये लिहिलेले आहे की, "न्यायदंडाधिकाऱ्याची न्यायाधिकरणाचा अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्याकरिता पात्रतेची कसोटी ठरविताना 10 वर्षाचा अनुभव आवश्यक असण्याची तरतूद केली आहे. तथापि, व्यवसाय करणाऱ्या अधिवक्त्याच्या बाबतीत फक्त आठ वर्षाचा अनुभव आवश्यक ठरविला आहे. ही विसंगती दूर करण्यासाठी, व्यवसाय करणाऱ्या अधिवक्त्यांप्रमाणेच न्यायिक अधिकाऱ्यांसाठीही आठ वर्षाच्या एकरूप अनुभवाच्या कालावधीची तरतूद करण्यासाठी उपक्त उप-खंड (अ) मध्ये यथोचितरित्या सुधारणा करण्याचे शासनाने ठरविले आहे." दोघांमध्ये समानता आणण्यासाठी हे केलेले आहे. परंतु ज्यावेळेस ही तरतूद केली, त्यावेळेस हे कारण होते की, त्यांना अनुभव जास्त असला पाहिजे. अधिवक्ता आणि न्यायाधीश या दोघांमध्ये फरक आहे. अभिवक्त्यांच्याबाबतीत त्यांना आज ना उद्या अनुभव मिळेल. एखादा न्यायाधीशाला आठ वर्षाचा अनुभव अनुभव नसेल तर अडचण होईल. या दृष्टीने आपण या प्रकरणाकडे पहावे, एवढीच मला या निमित्ताने सूचना करावयाची आहे. या संदर्भातील पुष्कळ मुद्दे आहेत, अनेक प्रकरणे मांडता येतील. परंतु विषय अत्यंत मर्यादित असल्यामुळे ओझरता उल्लेख मी केलेला आहे. धन्यवाद.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, केवळ आठ वर्षाच्या किंवा दहा वर्षाच्या अनुभवाच्या संदर्भातील हे बील आहे, असे वाटत असेल, परंतु हे अतिशय महत्वाचे असे बील आहे. आपल्याच कायद्यामध्ये म्हटलेले आहे की, जे न्यायाधीश आहेत त्यांच्या नेतृत्त्वाखाली दोन सदस्य असतील." जे न्यायदानाचे काम करणारे आहेत, त्यांची काय काय कामे आहेत, ते सांगितलेले आहे. मुळामध्ये झोपडपट्टी दादाची व्याख्या करावयाची आहे हे पान 3 वर (अ), (ह) मध्ये सांगितलेले आहे. आता आपण जो बदल करू इच्छितो, त्यांचे मुळामध्ये काम काय आहे, त्याबाबतीत अधिनियमाच्या पान 4 वर म्हटलेले आहे की, "जो जिल्हा न्यायाधीश काम करीत असेल किंवा तसे काम केलेले असेल, किंवा त्यांनी 8 वर्षाहून कमी नाही इतका काळ वकील किंवा अधिवक्ता असे दोन्ही मिळून काम केलेले असेल किंवा जो विधी व न्याय विभागाच्या सह सचिवाच्या दर्जाहून कमी नसेल, असे पद धारण करीत असेल किंवा ज्यांनी असे पद यापूर्वी धारण केले असेल किंवा जो 10 वर्षाहून कमी नसेल, इतका काळ कोणतेही न्यायिक पद धारण करीत असेल किंवा ज्यांनी असे पद धारण केले असेल..." आता मुळामध्ये हे चुकीचे आहे. जो वकील वकिली करतो, त्यापेक्षा न्यायदानामध्ये जे न्याय देतात, ते न्यायाधीश हे मोठे आहेत. त्यांचा उल्लेख पहिल्यांदा करायला पाहिजे. त्यांनी काय काम करायचे हे अतिशय महत्त्वाचे आहे. त्यांनी झोपडपट्टी दादांची व्याख्या करायची आहे, त्याप्रमाणे त्यांच्याबाबतीत तक्रारी आल्या तर त्यांना शिक्षा द्यायची आहे. झोपडपट्टी दादा म्हणजे काय, हे आपणच लिहिलेले आहे. "जी व्यक्ती कोणत्याही जमिनीचा -मग त्या जमिनी शासनाच्या मालकीच्या असोत किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या मालकीच्या असोत किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या मालकीच्या असोत, बेकायदेशीरपणे ताबा घेते किंवा अशा जमिनीवर प्रवेश करते, या बेकायदेशीरपणे त्या जमिनीच्या संबंधात भाडेकरूंच्या संमतीने परवानगी करार न करता, अन्य कोणते करार करते,

यानंतर कु.थोरात....

श्री. मधुकर चव्हाण....

जी व्यक्ती विकण्याच्या वा भाडयाने देण्याच्या उद्देशाने त्या जमिनीवर अनधिकृत बांधकाम करते किंवा अशा जमिनी कोणत्याही व्यक्तिला भाडयाने अथवा संमती परवानगी लिव्ह ॲन्ड लायसन तत्वावर बांधकामसाठी वा त्यावरील अधिकृत बांधकामाचा वापर, भोगवटा करण्यासाठी परवानगी देते किंवा जी व्यक्ती अशा जमिनीचा.... अध्यक्ष आणि दोन सदस्य समावेश असलेले न्यायाधीकरण राज्य शासनाने नियुक्त केलेले आहे त्यांच्याकडे गेल्या आठ ,दहा वर्षात सुमारे सात ते आठ हजार प्रकरणे प्रलंबित आहेत. म्हाडामध्ये एक दिवस सुध्दा ते बसत नाहीत. केवळ लोकांना तारखा देण्याचे हे काम करतात. यांना गाडी दिलेली आहे. म्हाडाच्या बिल्डिंगमध्ये पहिल्या मजल्यावर यांना एअरकंडशन रुम दिलेली आहे. म्हणून हे नियम करत असतांना त्यांच्या कर्तव्यात बदल करण्यासाठी हे बिल आणले असते, त्यांनी एवढी प्रकरणे हाताळली पाहिजे होती, आणखीन काही केले पाहिजे होते यासाठी हे बिल आणले असते तर बरे झाले असते. कोणताही माणूस दहा वर्षाचा अनुभव सोडून येथे येणार आहे हे आपण लक्षात घ्या. न्यायाधीश म्हणून दहा वर्षाचा अनुभव असलेली व्यक्ती तेथे राजीनामा देऊन येथे येईल, ती कशासाठी येईल? मी त्यांच्या हेतू बद्दल शंका घेत नाही. हे एक भ्रष्टाचाराचे फार मोठे आगार आहे. अशा जमिनीचा बेकायदेशीर ताबा घेतला जातो किंवा जमिनीवर अनधिकृत बांधकाम केले जाते त्यासाठी जी व्यक्ती दुस-या कोणत्याही व्यक्तीला जाणीवपूर्वक पैशाची मदत देते किंवा जी व्यक्ती अशा जमिनीवर रहिवाशांकडून भाडे भरपाई किंवा इतर आकार, धाक-धपटशाने वसूल करते वा वसूल करण्याचा प्रयत्न करते, वा जी व्यक्ती कोणत्याही कायदेशीर मार्गाचा अवलंब न करता तेथील भोगवटदारांना बळजबरीने हुसकावून लावते व तसा प्रयत्न करते. किंवा जी व्यक्ती वर नमूद केलेल्या पैकी कोणत्याही गोष्टी करण्यास अन्य कोणत्याही मार्गाने प्रोत्साहन देते, ही व्यक्ती दोषी असते. अशा किती झोपडपट्टी दादांची प्रकरणे सरकारने या प्राधिकरणाकडे किंवा ज्यांची नियुक्ती करण्यात येणार आहे किंवा प्राधिकरण गठीत करीत आहोत त्यांच्याकडे पाठविली आहेत? मुंबई महानगरपालिका आयुक्त जोसेफ यांनी झ ोपट्टी दादांची यादी प्रेस कॉन्फरन्स घेऊन शासनाला दिली. अतिशय वरिष्ठ असे ते आय.ए.एस. अधिकारी आहेत. एकाही झोपडपट्टी दादाला त्या

श्री. मधुकर चव्हाण..

ठिकाणी ॲरेस्ट केले नाही किंवा त्यांच्याकडून आलेली यादी या प्राधिकरणाकडे किंवा हे जे काही न्यायाधिकरण आपण गठीत करणार आहात त्यांच्याकडे आपण पाठविली आहे काय? पान क्रमांक 11 वर लिहिलेले आहे. यांचे काम काय आहे? यांच्याकडे कुठली प्रकरणे येतात? झोपडपट्टी पुनर्वसनाचे उदाहरण देतो.आपण सगळयांनी त्या दिवशी सांगितले की, राजीव गांधीनी 100 कोटी रुपये दिले आणि धारावीचे आपण पुनर्वसन केले. ज्याला मोफत घर दिले आहे, त्याला ते दहा वर्षे विकता येत नाही. त्यांने जर ते विकले आणि ते प्रकरण हे जे न्याधिकरण घटित करण्यात येणार आहे त्या संस्थेकडे गेले तर त्वरित ज्यांनी घर घेंतले त्याने ते खाली करावयाचे असते आणि तो गाळा आपल्या ताब्यात घ्यायचा असतो. आपण धारावीमध्ये अतिशय प्रामाणिकपणे काम केलेले आहे. धारावीमध्ये पी.एम.जी. स्कीमखाली शंभर कोटी रुपये राजीव गांधीनी दिल्या नंतर ज्या पुनर्वसित बहुमजली इमारती बांधल्या तेथे एक माणूस शिल्लक नाही. त्यांनी त्या सगळया जागा परत केलेल्या आहेत. आपण ज्यांची नियुक्ती करता त्या ऑथॉरिटीकडे अशी किती प्रकरणे गेलेली आहेत? किती प्रकरणांचा निर्णय लागलेला आहे ? त्याचप्रमाणे आणखी काय काय करावयाचे आहे? ज्यांना झ ोपडपट्टीचे खोटे पास दिले जातात ,फसवणूक होते, तक्रार केली जाते, अशी प्रकरणे यांच्याकडे येतात. या ठिकाणी मी एक व्यक्ती म्हणून बोलत नाही. आपण शासनाचे प्रतिधिनी आहात. आपण आपल्या अधिका-यांना विचारा की, गेल्या 10 वर्षामध्ये किती प्रकरणाचा निपटारा ज्यांची नियुक्ती आपण करणार आहात त्यांनी केलेला आहे? दोन सदस्य त्यांना दिलेले आहेत. हे सगळे लोक दलालांबरोबर बसलेले असतात. ज्या सगळया गोष्टी गैर आहेत, ज्यां सगळया गोष्टी भ्रष्टाचारी आहेत त्यांची प्रकरणे यांच्याकडे योग्य की अयोग्य आहेत हे ठरविण्यासाठी जाणूनबुजून नेली जातात.असे म्हटले जाते की, हल्ली कोर्टात ऑर्ग्युमेंट करुन प्रॅक्टीस होत नाही हल्ली 30 टक्के चेंबर प्रॅक्टिस होते. जामीन द्यायचा असेल तर आदल्या दिवशी जाऊन सांगायचे असते. येथे न्यायालयाच्या प्रक्रियेवर भाष्य करण्यासाठी ते भाष्य करत नाही. चेंबर प्रॅक्टीस जास्त वाढलेली आहे. मुद्यावर आधारित न्याय मिळत नाही. म्हाडामध्ये ज्या ॲथॉरिटी आहेत तेथे कधीही आर्ग्युमेंट झ ाले आहे असे दिसून येत नाही. आपण वेश बदलून जा. ज्यांच्यावर अन्याय झालेला आहे ते यांच्यासमोर बसलेले आहेत आणि ज्यांनी अन्याय केलेला ते देखील बसलेले आहेत. पूर्ण प्रकरणाची चौकशी करुन त्या ठिकाणी दोन्ही वकिलांनी प्रकरण मांडलेले

..3..

श्री. मधुकर चव्हाण..

आहे आणि या कायद्याच्या आधारे ज्यांची आपण नियुक्ती करणार आहात त्यांनी आपल्या न्यायबुध्दीला स्मरुन न्याय दिलेला आहे असे होत नाही. म्हणून येथे कुठल्याही व्यक्तीला आणवयाचे असेल आणि त्याच्यासाठी त्यांना आवश्यक असलेले क्वालिफिकेशन किंवा अर्हता कमी करावयाची असेल तर मी समजू शकतो. हजारो प्रकरणे त्यांच्याकडे पडून आहेत. मुळात ही व्यक्ती सेवानिवृत्त होत आहे किंवा नाही माहीत नाही. नवीन नियुक्ती करावयाची आहे की नाही, माहीत नाही. आता अध्यक्ष म्हणून ॲथॉरिटी म्हणून असलेली व्यक्ती निवृत्त होत असेल व नवीन पद निर्माण करण्याची स्थिती आली असेल म्हणूनच तुम्हाला अर्हता बदलण्याची स्थिती आली असेल. मग जर आपल्याला नवीन पद निर्माण करावयाचे असेल तर पहिल्या निवृत्त झालेल्या माणसाने किती केससचा निपटारा केलेला हे पाहिले पाहिजे.

यानंतर श्री. बरवड ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ....

आता आपण वेळोवेळी सभागृहात जाहीर केले. अतिशय गंभीर गोष्ट आहे. ज्यावेळी प्राधिकरण तयार केले गेले त्यावेळी कोटयवधी रुपये खर्च करुन त्यांना नागरी सुविधा मिळवून दिल्या जातील आणि अधिक झोपडया होणार नाहीत आणि याच्या ज्या केसेस तयार होतील त्या यांच्यापुढे गेल्या पाहिजेत. परंतु यांनी किती काम केले हे आपण तपासून पाहणे अत्यंत आवश्यक आहे. या मंडळासाठी किंवा हे मंडळ ज्याच्यासाठी आहे त्यांच्यासाठी आपण फक्त 1 कोटी 80 लाख रुपये ठेवलेले आहेत. त्यांना योग्य प्रकारे सुविधा मिळतात की नाही, आणि त्या सुविधा मिळत नसतील तर संबंधित झोपडीधारकाने अधिकृत ॲथॉरिटीकडे जावयाचे आणि सांगावयाचे की] आम्हाला पाणी मिळत नाही, आमच्यासाठी नळ नाही, हा झोपडपट्टी दादा पैसे वसूल करतो, त्यांचा या ठिकाणी काही संबंध नाही. सरकारी जमिनीवर सुध्दा झोपडपट्टी दादा असतो तो त्या ठिकाणी भाडे वसूल करीत असतो. डिपॉझीट घेत असतो. लिव्ह अँड लायसन्सच्या बाबतीत ज्याला काही अधिकार नाही, त्या जमिनीशी ज्याचा काही संबंध नाही तरी तो करार करीत असतो आणि करार केल्यानंतर तो दुसऱ्यांना झोपडया विकून जातो. दुसरा माणूस फसवणूक झाल्यावर ज्यावेळी प्राधिकरणाकडे जातो त्यावेळी त्याला न्याय मिळत नाही. त्याला सांगितले जाते की, ही जागा तुझी नाही. म्हणून एखाद्या अधिकाऱ्याची नियुक्ती करीत असताना ते काम नीट चाललेले आहे की नाही हे आपण पाहिले पाहिजे. एक साधा अधिक्षक नेमा. या ठिकाणी न्यायाधीशाच्या पात्रतेचा अधिकारी नियुक्त करुन जर सर्वसामान्य माणसाला नीट न्याय मिळत असेल तर त्यांना गाडी, त्यांना रुम, त्यांना शिपाई, त्यांना टंकलेखक, त्यांना आणखी सगळया सुविधा द्यावयाच्या, माझ्या माहितीप्रमाणे त्यांना बंगलावजा घर मिळते. घर मिळाले नाही तर या पदावर बसलेल्या व्यक्तीला महिन्याला पाच हजार रुपये भाडे मिळते. एवढया सगळया सुविधा दिल्यानंतर ज्या कारणासाठी यांची नियुक्ती होते ते कारण ते समाधानकारकरित्या पूर्ण करीत आहेत काय ? आपण परवा या ठिकाणी जाहीर केले की, सन 2000 पर्यन्तच्या लोकांना आम्ही सहानुभुतीने वागवू. म्हणजे तुम्ही काय करणार आहात ? सहानुभुतीने म्हणजे काय तर त्याला माणूस म्हणून जगण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सुविधा द्यावयाच्या. त्याला मान्यता द्यावयाची की नाही, पयायी जागा द्यावयाची की नाही हा नंतरचा प्रश्न आहे. त्या ठिकाणी तुम्ही सुविधा दिल्या तर तो त्या ठिकाणाहून हटणार नाही. तुम्ही त्याला

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

श्री. मधुकर चव्हाण ....

पाणी देणार, त्यांच्यासाठी शौचालय बांधणार, दिवाबत्तीची व्यवस्था करणार. पावसाळयामध्ये झोपडपट्टीतील जीवन किती विदारक असते हे आपण पाहिले असेल. आपल्यापैकी अनेकांनी ते पाहिलेले आहे. मला असे म्हणावयाचे आहे की, या अधिकाऱ्याची नियुक्ती करीत असताना किंवा हे क्वॉलिफिकेशन बदलत असताना झोपडपट्टयांच्या निर्मुलनासाठी आणि पुनर्वसनासंबंधी या ठिकाणी नंतर एस.आर.ए. योजना त्यांच्यासाठी आणली. आता हे एस.आर.ए. वाले काय करतात ? ही सगळी प्रकरणे या अधिकाऱ्याकडे जातात. हे एस. आर. ए. वाले एखादी जागा घेतात आणि एफ. एस. आय. मिळवितात. या लोकांना ते आपल्या ट्रान्झीट कॅम्पमध्ये जागा देतात. ही सगळी जागा मोकळी करुन घेतात. ही जागा मोकळी करुन घेतल्यानंतर प्लॅन सब्मीट करतात. विक्रीसाठी जे चटईक्षेत्र असते त्या चटईक्षेत्राला जोपर्यन्त ग्राहक मिळत नाही तोपर्यन्त विकासक त्या जागेचा विकास करीत नाही. ज्यांना उठवून, ज्यांच्या पुनर्वसनासाठी ही जागा रिकामी करुन दिलेली असते त्यांची व्यवस्था एक तर आपल्या ट्रान्झीट कॅम्पमध्ये करतो. ते लोक वर्षानुवर्षे त्या ट्रान्झीट कॅम्पमध्ये राहतात आणि हा विकासक त्या ठिकाणी विकास करीत नाही. अशी माणसे ज्यावेळी या ॲथॉरिटीकडे जातात, ज्यांच्यासाठी या पदाची अर्हता बदलण्यासाठी हे बिल आले आहे, त्यांच्याकडे पाच पाच वर्षे ही सगळी प्रकरणे पडून राहतात. ते सांगत असतात की, साहेब, हा एस.आर.ए.वाला आला, त्याने या ठिकाणी आमच्याकडून 70 टक्के कन्सेंट घेतले. आम्हाला सांगितले की, तुम्ही व्यवस्था करा. आम्ही काही लोकांनी आमची व्यवस्था केली. काही लोकांची व्यवस्था ट्रान्झीट कॅम्पमध्ये केली. दहा वर्षे झाली तरी ते घर बांधत नाहीत. ते सांगतात की, मी प्लॅन सब्मीट केलेला आहे. पुनर्वसनासाठीचा जो भाग असतो ती इमारत तो बांधत नाही. कारण पुनर्वसन करण्यासाठी जेवढे पैसे लागतात तेवढे पैसे त्याचा सेलेबल एफ. एस. आय. विकल्याशिवाय तो विकासक यामध्ये इन्व्हेस्ट करणार नाही. लोक दहा दहा वर्षे टान्झीट कॅम्पमध्ये राहतात. हे लोक ॲथॉरिटीकडें गेल्यानंतर पाच पाच वर्षे न्याय मिळत नाही. म्हणून एखाद्या अधिकाऱ्याची नियुक्ती करीत असताना ज्या कामासाठी त्या अधिकाऱ्याची नियुक्ती करतो, ज्या उद्देशाने आपण त्यांची नियुक्ती करतो तो उद्देश सफल होतो की नाही हे पाहिले पाहिजे. या ठिकाणी आपण "ऑन पार" आणावयाचे आहे असे उद्देश आणि कारणामध्ये दिले आहे. वकील

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

श्री. मधुकर चव्हाण .....

असेल तर त्याला 8 वर्षाची अट आहे. न्यायाधीश असेल तर 10 वर्षाची अट आहे. वकिलापेक्षा न्यायाधीश महोदयांचे पद हे अतिशय महत्वाचे असते. त्यांच्यामध्ये परिपक्वता आलेली असते. मला असे वाटते की, हे करीत असताना ज्या उद्देशाने हे पद निर्माण करीत आहात तो उद्देश सफल झ ाला की नाही हे पहावयास पाहिजे. आपण या उद्देशामध्ये हेही बघितले पाहिजे की, यांच्या कामाचा एवढा निपटारा आहे काय ? त्यांच्याकडे खूप नस्ती येतात. आपल्याकडे फाईलला नस्ती म्हणतात. ती नसती उठाठेव असते. एखाद्या कामाचे वाटोळे करावयाचे असेल, दोन मिनिटाचे काम असेल पण तरी त्याची एवढी मोठी फाईल तयार होते. म्हणूनच तुमच्याकडे "सरकारी काम आणि सहा महिने थांब" असे म्हणतात. नस्ती सुध्दा नसती उठाठेव आहे. एखादा साधा कारकुन सुध्दा तुमचे काम अडवू शकतो.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण...

हजारो फाईल्स या ॲथोरिटीसमोर आहेत आणि म्हणून माझी मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, हे पद निर्माण करणार आहात त्याबाबत सभागृह काय निर्णय घ्यायचा ते घेईल. परंतु हे करीत असताना या ॲथोरिटीकडे किती प्रकरणे पडून आहेत हेही पाहिले पाहिजे. येथे किती भ्रष्टाचार चालतो हे आपण पाहिले पाहिजे. येथे नियमांच्या आधारावर समोर आलेल्या केसचा निर्णय होतो का ? त्याठिकाणी निकषावर किंवा त्याच्या गुणवत्तेनुसार निर्णय दिला जात नाही. त्या पहिल्या किंवा दुस-या मजल्यावर दलाल उभे असतात, मग ते येऊन सांगतात की, हे माझे प्रकरण आहे. जो पैसा देणार नाही त्याला तारीख द्यावयाची आणि जो पैसा देईल त्याच्या बाजुने निर्णय घ्यावयाचा, असे करण्यासाठी हे पद निर्माण करीत असू तर हे न केलेले बरे. तेथे कोणी तरी हेड क्लार्क किंवा डेक्स ऑफिसरला नेमावे, त्यांना सांगावे की, तुला इतक्या केसेसचा निपटारा करावयाचा आहे. त्यांना महिन्याला 1-2 हजार रुपये पगार वाढवून दिल्यास ते प्रामाणिकपणे काम करतील. परंतु हे काही काम करणार नाहीत. ही ॲथोरिटी कोणाला ॲन्सरेबल आहे ते सांगावे. म्हणून माझी विनंती आहे की, महाराष्ट्र झोपडपट्टी सुधारणा निर्मूलन व पुनर्विकास अधिनियम 1971 या अन्वये त्या अधिका-यांची अर्हता निश्चित करण्यासाठी हे विधेयक आणले आहे. ते करीत असताना महाराष्ट्रातील गरीबांसाठी संबंधित असलेल्या ॲथोरिटीकडून त्यांना न्याय मिळतो किंवा नाही, उद्देश सफल होतो किंवा नाही हेही आपण तपासून पहावे अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

-----

2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MAP/ KGS/

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मा.मंत्रिमहोदयांनी सांगितले की, एक छोटीशी सुधारणा करण्यासाठी हे विधेयक मांडले आहे. न्यायदंडाधिकारी व सदस्य यांना समान पातळीवर आणण्यासाठी 8 वर्षाची तरतूद करीत आहोत असे म्हटले आहे. समान पातळीवर म्हणजे काय ? सर्वसाधारण पध्दत अशी असते की, न्यायाधीशांची ज्येष्ठता लक्षात घेऊन वकील म्हणून किती वर्षे प्रॅक्टीस केली तरी तो न्यायाधीश होऊ शकत नाही आणि न्यायाधीशांची पात्रता अंगिकारण्याकरिता किती वर्षे वकीली केली हा विषय असू शकत नाही. म्हणून दोघांना एका पातळीवर का आणले जात आहे ते समजले नाही. म्हणून आमचे मत झाले की, हे विधेयक आणण्यामागे तुमच्या नजरेसमोर कोणी तरी व्यक्त आहे आणि त्या व्यक्तीला तेथे बसवावयाचे आहे आणि पुढील कारभार करण्यासाठी हा कायदा मंजूर करावयाचा आहे. हा कायदा पास करीत असताना या सदनामध्ये बोलत असताना झोपडीच्या संदर्भातील चर्चा करणारे हे विधेयक आहे. झ ोपडपट्टीच्या कारभाराच्या विविध पैलूंना न्याय न देता अन्य मार्गाने मुंबईत घुसखोरीलस वाव देणारे, संधी देणारे प्राधिकरण कसे चालते ? याचे उदाहरण मा.सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी दिले आहे. पैसा देईल त्याला न्याय आणि पैसा देणार नाही त्याला तारीख असे त्यांनी विधान केले. प्रश्न असा आहे की, माझी मुंबईत 1995 च्या पूर्वीची झोपडी आहे परंतु त्यांनी नाही असे सांगितले तर माझे प्रकरण तेथे जाईल आणि ते माझी झोपडी 1995 च्या पूर्वीची आहे की नाही ते ठरवतील. समला या मुंबईमध्ये मी रहिवासी नाही. परंतु मला वाटले की, मला मुंबईत रहावयाचे आहे तर मला झोपडी बघितली पाहिजे. दिलेले पैसे बुडणार नाहीत याची काळजी घेतली पाहिजे. झोपडी घेताना 1995 पूर्वीची झोपडी घेतली पाहिजे. त्यामुळे ती झोपडी 1995 पूर्वीची आहे त्याचे पुरावे असू शकतात परंतु मी या मुंबईतील 1995 पूर्वीचा नागरिक आहे किंवा नाही त्याचे पुरावे असणार नाहीत. याचे उत्तर घटनात्मकदृष्टया तुम्ही कसे देणार ? कोणत्या पध्दतीने देणार ? 95 च्या झोपडीला कायदेशीर मान्यता दिली याचा अर्थ तेथे 95 मध्ये राहणारा कोणीही मग तो केव्हाही आलेला असला तरी चालेल, अशा वादविवादामध्ये जाईल त्यावेळी नेमके काय करणार ? झोपडपट्टी दादांचा बंदोबस्त करणे या कायद्यामध्ये खास तरतूद आहे. परंतु कायदेशीर मान्यता म्हणजे कायदेशीर असलेल्या झोपडीमध्ये बेकायदेशीर लोकांना गडगंज पैसा देऊन घुसविले आहे त्यांच्याकरिता रितसर एजंट नेमणे यासाठी प्राधिकरणाकडून मान्यता कशी घ्यावयाची अशाप्रकारची ही पध्दत चालू आहे.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ KGS/ MHM/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 17:55

(श्री. दिवाकर रावते पुढे सुरु...)

सभापती महोदय, एका गोष्टीचा खुलासा होणे अत्यंत आवश्यक आहे. हे प्राधिकरण झाल्यापासून प्रत्येक वर्षी ह्या तारखा का बदलण्यात येतात ? आज मुंबईमध्ये जवळ जवळ 60-65 टक्के इ ोपडपट्टी आहे. सर्वात जास्त नागरिक हे झोपडप्टीमध्ये राहात आहेत. या मुंबईच्या संदर्भात निर्णय घेण्याची क्षमता या प्राधिकरणामध्ये आहे. मग अशा या प्राधिकरणाकडे कोणकोणत्या प्रकारची किती प्रकरणे प्रलंबित आहेत ? किती प्रकरणी प्राधिकरणाने निर्णय घेतलेला आहे? शासनाच्या आकडेवारीनुसार 2005 सालापर्यन्त या मुंबईमध्ये 8 लाख झोपड्या बांधण्यात आलेल्या आहेत. हा आकडा शासनाचे नाकर्तेपणाचे लक्षण दर्शवितो. याठिकाणी आम्ही प्रत्येक अधिवेशनामध्ये मा.मुख्यमंत्र्यांकडून या झोपडपट्टयांच्या संदर्भात असे ऐकत आलो आहोत की, ज्या भागामध्ये अनधिकृत झोपड्या बांधल्या जातील त्या भागातील विभाग अधिका-यावर कारवाई केल्या शिवाय राहाणार नाही. परंतु आतापर्यन्त कारवाई झाल्याचे कुठे ऐकलेले नाही. मात्र शासनाच्याच आकडेवारीनुसार 8 लाख झोपड्या मुंबई शहरामध्ये झालेल्या आहेत. या झोपड्या कशा झाल्या ? अलीकडे काही दिवसांपूर्वी आम्ही 60 हजार झोपड्या पाडल्या, 80 हजार झोपड्या पाडल्या अशा प्रकारची वृत्ते वर्तमानपत्रातून प्रसिध्द होत होती. परंतु मग मात्र त्यांना वरुन तंबी मिळाली. 80 हजार झोपडया पाडल्या जाईपर्यन्त ते गरीब होते असे वाटले नाही. परंतु आता मात्र ते गरीब आहेत असे वाटू लागले आहे. पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांनी दिल्लीमधून सांगितले की, बेकायदेशीर झोपडपट्टी तोडणे जरी बरोबर असेल तरी ते करीत असताना त्यांचे पुनर्वसन करा. मानवतेच्या दृष्टीकोनातून, ह्युमन टच प्रमाणे त्यांचे पुनर्वसन झाले पाहिजे. असे सांगितल्या बरोबर सर्व कारवाया ताबडतोब थांबल्या आणि या झोपडपट्टयांच्या बाबतीत जे हवेत तरंगत कारवाई करीत होते ते श्रेष्ठींचे आदेश आल्या बरोबर पटकन खाली जमिनीवर आपटले. झोपडपट्टयांच्या संदर्भात कारवाई करीत असताना, आम्ही झोपडपट्टीदादांची गय करणार नाही असे मा. गृहमंत्री गर्जत होते. परंतु बुडाशी जड असलेला फुगा वर उंच उडविल्यानंतर जसा खाली जशाच्या तसा उभा राहातो, त्याप्रमाणे माननीय गृहमंत्र्यांची स्थिती आहे. नंतर अशी विधाने होत गेली की, फक्त इ ोपड्याच का पाडता, बंगले, इमले यांच्यावर देखील कारवाई का होत नाही ? आबांनी सांगितले

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते पुढे सुरु...)

की, आम्ही एकही पोलीस देणार नाही. राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था सांभाळणे हे पोलिसांचे काम आहे. झोपडपट्टयांच्या संदर्भात कारवाई करण्यासाठी महानगरपालिका ही संक्षम यंत्रणा आहे. त्या यंत्रणेला काम करीत असताना जर कुठे अडथळा येत असेल, कायदा आणि सुव्यस्थेची स्थिती निर्माण होणार असेल तर अशा वेळी पोलीस बंदोबस्त दिला जातो. परंतु आम्ही पोलीस देणार नाही असे मा. गृहमंत्र्यांनी सांगितले. या झोपडपट्टयांमध्ये बांगला देशी मुसलमान घुसलेले असण्याची आणि या बांगला देशीयांच्या माध्यमातून पाकिस्तानी गुप्तहेर संघटना कार्यरत असण्याची शक्यता नाकारता येत नाही. कारण अशी गुप्तहेर यंत्रणा एका झोपडीसाठी 1 लाख रुपयेही देईल आणि आपल्या कारवाया चालू ठेवील. तर मग अशा राष्ट्रविघातक कारवाया होत असतील तर त्यापासून सा-या हिन्दुस्थानलाच मोठा धोका आहे. याठिकाणी घुसलेले लोक हे 85 पूर्वीचे असते आणि कायद्यानुसार त्यांची झोपडी आणि वास्तव्य नियमित असते तर मी त्यांना मुसलमान म्हटले नसते.

...नंतर श्री. गिते...

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते..

बांगलादेशीय मुसलमांनाचा, देशद्रोही मुस्लीमांचा बंदोबस्त कोण करणार ? कसा करणार ? सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी सांगितल्याप्रमाणे मुंबई शहरामध्ये प्रचंड झोपडपट्टी असताना या ट्रायब्यूनलच्या अधिपत्याखाली एवढे कामकाज उरकरणार आहे काय ? सभापती महोदय, या झोपडपट्टयांच्या पुनर्वसनाचा शासन विचार करील असेल. या झोपडपट्टीमध्ये असलेल्या कायदेशीर लोकांचे योग्य माध्यमातून मुंबई शहरात अस्तित्व टिकवावयाचे असेल, तसेच या कायदेशीर लोकांना न्याय द्यावयाचा असेल त्यासाठी दोन, तीन ट्रायब्यूनल निर्माण करण्यात आली पाहिजेत. जास्तीचे ट्रायब्यूनल निर्माण करुन या कायदेशीरपणे रहात असलेल्या लोकांना न्याय देण्यासाठी शासनाने काही योजना आखलेल्या आहेत काय ? फक्त काही व्यक्तींना जवळ करण्यासाठी तुम्ही अनधिकृतपणे वास्तव्य करीत असलेल्या लोकांच्या हिताचे तुम्ही निर्णय घेणार आहात काय ? मुंबई शहरात अनेक वेगवेगळे प्रश्न निर्माण झालेले आहेत. हा विषय अतिशय मोठा असल्यामुळे यासंबंधीची चर्चा खूप होऊ शकते. परंतु ठराविक मुद्यापूरती ही चर्चा उपस्थित केलेली असल्यामुळे त्या सर्व मुद्दयांचे मंत्री महोदयांनी खंडन करावे एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

-----------------

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित. ) : सभापती महोदय, आज सभागृहात झोपडपट्टी विषयक कायद्यात दुरुस्ती करण्यासाठी विधेयक आलेले आहे. या विधेयकाच्या अनुषंगाने मी एका घटनेकडे सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. आतापर्यन्त किती झोपडपट्टी दादांवर कारवाई झाली ? किती झोपडपट्टीदादांनी इतक्या झोपडया घेतल्या, इतक्या झ ोपडया विकल्या असे कबूल केलेले नाही. तशी बातमी वृत्तपत्रातही छापून आलेली नाही. परंतु आमच्या विभागातील अनेक कामगार हे गोदीमध्ये काम करतात. तेथील ब-याच कामगारांची फसवणूक मुंबई शहरातील साठेनगर येथील झोपडपट्टी येथे झालेली आहे. त्या कामगारांची कशा प्रकारे फसवणूक झाली यासंबंधी सभागृहाने नोंद घेतली पाहिजे. एका व्यक्तीने गोदी कामगाराना सांगितले की, मी तुम्हाला एका लाखात झोपडया विकत देतो. त्या कामगारानी विचारले की, तुमच्या झोपडया 1995 या वर्षापूर्वीची आहेत काय ? त्या व्यक्तीने सांगितले की, माझ्या झोपडया हया 1995 पूर्वीच्या आहेत. या झोपडयांची सर्व कागदपत्रे माझ्याकडे आहेत. त्या कामगारांनी गावी जाऊन आपल्या जमिनी विकल्या आणि एक-एक लाख रुपये देऊन झोपडया विकत घेतल्या. त्या कामगारांच्या झोपडया पाडल्या. ते कामगार साठे नगरातील जागेवर जवळ जवळ आठ दिवस तंबू टाकून राहिले. आज सकाळी ते कामगार मला येऊन भेटले आणि त्यांनी मला सांगितले की, आमची फसवणूक झालेली आहे. आम्ही झोपडया विकत घेतल्या त्यावेळी त्या झोपडीच्या मालकांने सांगितले की, या झोपडया 1995 पूर्वीच्या आहेत. मी त्यांना विचारले की, तुम्ही झोपडया कोणाकडून विकत घेतल्या. त्यावेळी त्यांनी मला अतिशय धक्कादायक माहिती सांगितली. साठे नगरात झोपडी विकणारे झोपडपट्टीदादा नसून त्या दादांना पकडण्यासाठी ज्यांना नियुक्त केलेले आहेत. त्या पोलिसांनी या कामगारांना त्या झोपडया विकल्या आहेत. मी सांगितले की, जर त्या पोलिसांनी तुम्हाला जागा विकल्या असतील तर त्यांचेकडून पैसे परत घ्या. त्या पोलिसांना तुम्ही तुमची अडचण सांगा की, आम्हाला दुसरीकडे झोपडी घ्यावयाची असल्यामुळे आमचे पैसे परत करा. सदर पोलिसाकडे पैसे मागण्यासाठी ही कामगार मंडळी गेली, त्यावेळी त्या कामागारांना पोलिसांनी दम दिला की, तुम्ही आमच्याकडे पैसे मागावयास लागलात तर आम्ही तुमच्यावर खोटे गुन्हे दाखल करु. तुम्हाला आम्ही त्या विभागातून तडीपार करु. उलट पोलीस कामगारांना दम देऊ लागले. ते सर्व कामगार पुन्हा घाबरले. ते परत माझ्याकडे आले. त्यांना सांगितले की, तुम्ही लेखी तक्रार द्या. त्यातील श्री.महादेवन नावाच्या कामगाराने लेखी तक्रार संबंधिताकडे केली. ती

3...



श्री. प्रकाश शेंडगे..

तक्रार करुन जवळ जवळ तीन महिने होऊन गेले. परंतु आतापर्यन्त एकाही पोलिसावर कारवाई शासनाकडून करण्यात आलेली नाही. उलट पोलिसांनी श्री.महादेवन या कामगारामागे तसेच इतर कामगारामागे ससेमिरा लावलेला आहे. साठे नगरमधील जागा कोणी अडविली ? ती जागा पोलिसांनी या गरीब कामगारांना कशी काय विकली? या संपूर्ण प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे. झ ोपडपट्टीदादा किंवा पोलिसांनी या कामगारांना फसविले आहे त्यांचे विरुध्द कठोर कारवाई तातडीने केली गेली पाहिजे अशी माझी या निमित्ताने मागणी आहे. असे प्रकार या शहरात होऊ नयेत म्हणून व गोरगरीब कामगारांची अशा प्रकारे फसवणूक होऊ नये या गोष्टीकडे शासनाने लक्ष घालावे अशी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

----------------

यानंतर श्री. कानडे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MAP/ 18:05

श्री. दयानंद म्हस्के (गृहनिर्माण राज्यमंत्री): सभापती महोदय, या विधेयकाद्वारे एक छोटी दुरुस्ती करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे एका व्यक्तीची नियुक्ती 21.2.2004 रोजी करण्यात आलेली आहे. नव्याने नियुक्ती करण्याचा शासनाचा उद्देश नाही. ही नियुक्ती संबंधित व्यक्ती निवृत्त होईपर्यंत राहणार आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहामध्ये कोरम दिसत नाही. बिल मंजूर करुन घ्यावयाचे हे सरकारचे काम आहे. सभागृहात वारंवार असे प्रसंग निर्माण होत आहे. कामकाज सल्लागार समितीने मान्य केले म्हणजे सगळे काही चालते असे नाही. व्हॅट चे बिल मंजूर केले त्यावेळी सुध्दा अशी परिस्थिती निर्माण झाली होती. त्यावेळी फक्त सात सदस्य सत्ताधारी पक्षाकडून उपस्थित होते. वारंवार असे प्रसंग निर्माण होत असल्यामुळे कृपया समज देण्यात यावी.

**उपसभापती** : सत्ताधारी पक्षाने गंभीरपणाने हा विषय घ्यावा. विरोधी पक्षाचे सदस्य सहकार्य करीत असतील तर सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी सभागृहात हजर राहणे आवश्यक आहे.

खंड 2 ते खंड 6( दोन्ही सम्मिलित) हे विधेयकाचे भाग झाले.

खंड 1 संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. दयानंद म्हस्के : महोदय,मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.प.वि.क्र.5 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : सन 2005 चे वि.प.वि.क्र.5 संमत झाले आहे.

----

...2.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबई ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद
व पंचायत समिती(सुधारणा) विधेयक,2005.

**L.C. BILL NO. VI OF 2005.**

**(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY VILLAGE PANCHAYATS ACT, 1958 AND THE MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.)**

श्री. रणजित कांबळे (आरोग्य राज्यमंत्री): सभापती महोदय, सन 2005 चे वि.प.वि. क्रमांक 6 - मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, 1958 आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, 1961 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मी आपल्या अनुमतीने मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 6 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. रणजित कांबळे : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.प.वि. क्रमांक 6 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : सन 2005 चे वि.प.वि. क्रमांक 6 संमत झाले आहे.

यानंतर अल्पकालीन चर्चा घेण्यात येईल.

यानंतर श्री. गायकवाड

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती :** आता अल्पकालीन चर्चा घेण्यात येईल.

डॉ.दीपक सावंत : या चर्चेला कोणते मंत्री उत्तर देणार आहेत ?या चर्चेचा संबंध अनेक विभागाशी आहे. त्याचबरोबर गृह विभागाशीसुध्दा आहे.

श्री.रामराजे नाईक निंबाळकर :गृह विभागाच्या मागण्यांवर खालच्या सभागृहात चर्चा चालू असल्यामुळे गृह मंत्री खालच्या सभागृहात आहेत.

श्री.हसन मुश्रीफ : विधि व न्याय विभागाच्या वतीने उत्तर देण्यासाठी मी येथे उपस्थित आहे.

**उपसभापती** :ठीक आहे.अल्पकालीन चर्चा आता सुरु करु या.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

२...

पृ.शी. : यात्रेच्या काळात देवस्थानाच्या ठिकाणी असलेल्या अव्यवस्थेमुळे भाविकांचे चेंगराचेंगरीमुळे झालेले मृत्यू

मु.शी : यात्रेच्या काळात देवस्थानाच्या ठिकाणी असलेल्या अव्यवस्थेमुळे भाविकांचे चेंगराचेंगरीमुळे झालेले मृत्यू या विषयावर सर्वश्री नितीन गडकरी, संजय दत्त, अनंत तरे,रणजितसिंह मोहिते-पाटील, शरद पाटील, उल्हास पवार, सागर मेघे, धनाजी साठे, डॉ. नीलम गो-हे,सर्वश्री गुरुनाथ कुलकर्णी, जयंत पाटील,विनोद तावडे, सुधाकर गणगणे, डॉ. दीपक सावंत, सर्वश्री विनायकराव मेटे, पांडुरंग फुंडकर, नतिकोद्दीन खतिब, विलास अवचट, जितेन्द्र आव्हाड,श्रीमती कांता नलावडे, सर्वश्री सदाशीवराव पोळ,अरविंद सावंत,जगदीश गुप्ता, प्रा.फौजिया खान, सर्वश्री मधुकर चव्हाण, यशवंतराव गडाख, श्रीमती मंदा म्हात्रे, श्री.प्रतापराव सोनावणे ,श्रीमती सुधा जोशी, सर्वश्री रामनाथ मोते,सुधीर सावंत,प्रकाश शेंडगे,वसंत पवार,शांताराम करमळकर,डॉ.अशोक मोडक श्रीमती संजीवनी रायकर ,वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

**उपसभापती** : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही.या चर्चेसाठी मी अडीस तास वेळ दिलेला आहे.सूचना देणा-या माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे आपली सूचना वाचतील व भाषण करतील.

डॉ.नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेल्या) :सभापती महोदय,.मी नियम ९७ अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करते :

"महाराष्ट्रात लक्षावधी भाविक जमतात अशी तुळजापूर,पंढरपूर,अष्टविनायक,शिर्डी,कोल्हापूर,गाणगापूर,जेजुरी,शनीशिंगणापूर,सिध्दीविनायक, एकविरा (कार्ला), अंबादेवी (अमरावती) मांढरादेवी,(सातारा) औंढा नागनाथ अशी शेकडो देवस्थाने आहेत.भाविकांच्या सोई व सुरक्षितता त्याचसोबत गर्दीचे व्यवस्थापन ही एक मोठी समस्या बनलेली आहे.त्यापैकी देवस्थ्ांन विकास व भाविकांची श्रध्दा यामध्ये शासकीय भूमिका व धोरणामध्ये सयमन्वय व दृष्टीकोन तथा निधीचा अभाव दिसतो. परिणामी चेंगराचेंगरी व त्यात मांढरा देवी वाई.सातारा येथे दिनांक २५ जानेवारी २००५ रोजी २९१ भाविक मृत झाले व ९८ भाविक जखमी झाले त्याचप्रकारे तुळजापूर येथेही चेंगराचेंगरीत भाविकांचे मृत्यू झाले. यामध्ये स्त्रियांची संख्या

३...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

मोठी आहे. या खेरीज अनेक देवस्थानात चो-या,भ्रष्टाचार यामुळे ट्रस्टच्या व्यवस्थापनात व उदा.जेजुरी,शिर्डी,सिध्दीविनायक यांच्या विश्वस्त मंडळात बदल करण्याची वेळ शासनावर आली आहे. या पार्श्र्वभूमीवर मांढरादेवी दुर्धटनेची पूर्ण कारणमींमासा व तेथे तसेच इतर सर्व श्रध्दास्थानात अशा भीषण प्रसंगाच पुनरावृत्ती होऊ नये म्हणून तातडीच्या तसेच दूर पल्ल्याच्या योजना विचारात घेण्याची नितांत आवश्यकता विचारात घेण्यात यावी."

नंतर श्री.सुंबरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( सभापतीस्थानी - तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी )

डॉ. गोऱ्हे ...

अध्यक्ष महाराज, सगळ्यात प्रथम या मांढरदेवीच्या, काळूबाईच्या दर्शनासाठी गेलेल्यांमधील जे लोक मृत्यूमुखी पडले आहेत त्यामध्ये महिलांची संख्या मोठी होती, त्या सगळ्यांना मी श्रद्धांजली अर्पण करणार आहे. अध्यक्ष महाराज, या एका अतिशय गंभीर अशा प्रस्तावावर अल्पकालीन चर्चा येथे घडवून आणत असताना शासनाच्या गृह, ऊर्जा, ग्रामविकास, पर्यटन आदी विभागांच्या मंत्र्यांनी येथे उपस्थित रहावे आणि माणुसकीला कलंक म्हणता येईल अशा प्रकारची घटना जी 26 जानेवारी या भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला घडली आहे त्याबाबत शासन किती गंभीर आहे त्याचा दाखला आणि विश्वास महाराष्ट्रातील जनतेला द्यावा अशी अपेक्षा मी व्यक्त केली होती. माझी या निमित्ताने शासनाला विनंती राहील की, या चर्चेच्या माध्यमातून येथे मांडण्यात येणाऱ्या साऱ्या मुद्यांच्या बाबतीत शासनाचे एक ठोस असे धोरण पुढे आले पाहिजे. अध्यक्ष महाराज, मांढरदेवीची ही घटना 25 जानेवारीला घडली त्यापूर्वी पुरवणी मागण्यांवर बोलत असताना, 16 डिसेंबर 2003 रोजी नागपूर अधिवेशनामध्ये सदनामध्ये मी शासनाचे लक्ष वेधले होते. त्यावेळी पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या वेळी पंढरपूर तीर्थक्षेत्रासाठी शासनोन जी तरतूद केली त्याबद्दल मी शासनाचे आभारही मानले होते आणि त्याचबरोबर लक्ष वेधले होते की, ग्रामीण भागामध्ये लोकप्रिय अशी दोन दैवते आहेत. एक म्हणजे नगर जिल्ह्यातील मोटादेवी देवस्थान. तेथे जाण्यासाठी रस्ता अतिशय खराब, वाईट अवस्थेमध्ये आहे आणि त्यामुळे तेथे नेहमीच अपघात होत असतात आणि दुसरे देवस्थान म्हणजे सातारा जिल्ह्यातील काळूबाई देवस्थान म्हणजेच मांढरदेवी, या ठिकाणी देखील हजारो वाहने जात असतात. त्याच्या आतमधील रस्ता अत्यंत वाईट अवस्थेत आहे. थोडक्यात या दोन्ही देवस्थानांकडे जाणाऱ्या रस्त्यांची अवस्था अत्यंत वाईट आहे. खास करून बहुजन समाज या देवस्थानांकडे जात असतो आणि तेथे भाविकांची व्यवस्था झाली पाहिजे असा उल्लेख नागपूर अधिवेशनामध्ये पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या वेळी मी केला होता. अध्यक्ष महाराज, पुरवणी मागण्यांवरी चर्चेमध्ये उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यांना, ज्यांवर सभागृहामध्ये उत्तर देण्यात आलेले नाही अशा मुद्यांच्या बाबतीत सदस्यांना शासनाने लेखी स्वरूपात उत्तर देण्याची खरे तर पध्दत आहे. परंतु 16 डिसेंबर 2003 रोजी मी नगर जिल्ह्यातील मोटादेवी देवस्थान आणि साताऱ्यातील काळूबाई-मांढरदेवी देवस्थानच्या दुरूस्त्यांबाबत शासनाचे लक्ष पुरवणी

.... व्ही्व्ही 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. गोऱ्हे ....

मागण्यांवरील चर्चेच्या निमित्ताने वेधून देखील मला अजून पर्यंत, म्हणजे मांढरदेवी येथील दुर्घटना घडून गेल्यानंतर देखील, मी मांडलेल्या मुद्यांबाबत शासनाने काय कारवाई केलेली आहे वा काय दखील घेतली आहे, त्याबाबत शासनाने काय भूमिका घेतलेली आहे याबाबत आजतागायत काहीही उत्तर मिळालेले नाही. अध्यक्ष महाराज, याच प्रमाणे यापूर्वी देखील विविध तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी अनेक धक्कादायक घटना घडलेल्या आहेत. त्यामध्ये 26 जुलै 1990 रोजी पंढरपूर येथ चंद्रभागेत होडी उलटून भाविकांचे मृत्यू झाले होते., 14 जुलै 1992 ला पंढरपूर येथील गोपाळपूर येथील पुलावर चेंगराचेंगरी होऊन भाविकांचे मृत्यू झाले होते., 3 फेब्रुवारी, 1994 ला करमाळा तालुक्यातील चिखलठाणा येथे कोटलिंग देवस्थानाच्या यात्रेदरम्यान शोभेच्या दारूमुळे 40 भाविक मृत्यूमुखी पडलेले होते,. 27 ऑगस्ट 2003 ला नाशिक येथे कुंभमेळ्यामध्ये 29 भाविक मृत्यूमुखी पडले होते., त्याचबरोबर आश्विन पौर्णिमा, 2002 या दिवशी तुळजापूर येथे देखील देवी निद्रस्त असते आणि नंतर सिंहासनावर येऊन थांबते त्यावेळी देखील पोलिसांनी मध्यरात्री उशीरा दरवाजा उघडला आणि त्या मध्यरात्री त्यावेळी झालेल्या चेंगराचेंगरीमध्ये अनेक भाविक जखमी झाले त्यातील एक महिला सोलापूर येथे तीन दिवसानंतर मृत्यू पावली होती. नाशिक येथील कुंभमेळ्याच्या वेळी अलिकडेच झालेली चेंगराचेंगरी व त्यामुळे अनेक भाविकांचा झालेला मृत्यू, ही तर अगदी अलिकडचीच घटना आहे. त्यानंतर मांढरदेवीची ही घडलेली शोकांतिका आहे. त्यानंतर देखील 27 मार्च ला पोलिसांनी बरीचशी दक्षता घेऊनही चेंगराचेंगरीचा प्रकार पुन्हा घडला. या खेरीज 7 मे 2004 ला शिर्डी येथील दुकानदारांवर गोळीबार करण्यात आला आणि त्यात अनेक लोक जखमी झ ाले होते, अनेकांना अटक देखील झाली होती. 11.6.2004 रोजी जेजुरी येथे खंडोबा देवस्थानाबद्दल, खास करून तेथील खंडोबाची मूर्ती चोरीला गेली, दानपेट्यांमध्ये देखील गैरव्यवहार झाले म्हणून जेजुरी देवस्थानातील विश्वस्त मंडळ देखील बरखास्त करण्यात आले होते. अध्यक्ष महाराज, मांढरदेवीच्या घडलेल्या घटनेसंदर्भात आपण फार तपशीलामध्ये जाऊन पाहिले तर फार मोठ्या प्रमाणात दोन ते अडीच लाखापर्यंत भाविक, त्यातही महिलांची संख्या मोठी असते, तेथे दर्शनासाठी जात असतात. त्या दिवशी जी घटना घडली त्याबाबतचे खूप तपशील आतापर्यंत समोर आलेले आहेत. त्यातही खास करून चार कारणे सांगितली जात आहेत. कशा मुळे ही घटना घडली याबाबत शासनाकडून सातत्याने असे कारण सांगितले जात आहे की, तेथील

.....व्हीव्ही 3 ..



KBS/ SBT/MHM. श्री. गायकवाड नंतर --- 18:15

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जो परतीचा मार्ग आहे त्यावर नारळाचे पाणी आणि तेल पडलेले असल्यामुळे लोकं त्यावरून घसरली आणि त्यात काही महिलांची घसराघसरी झाल्यानंतर चेंगराचेंगरीला सुरूवात झाली. दुसरे जे कारण सांगितले जात आहे त्यामध्ये अर्थातच शॉर्ट सर्कीट झाले आणि त्यामुळे अनेकांना वीजेचे शॉक बसले. त्या ठिकाणी चोरून वीज घेतली गेली होती आणि त्या चोरीच्या वीजेची कनेक्शन भाविकांच्या डोक्यावरून गेली होती व त्यातून शॉर्ट सर्कीट झाले, त्यामुळे देखील अनेक लोक मारले गेले. तिसरा प्रकार म्हणजे अर्थातच बोकड कापणे म्हणजे बळी देणे हा जो प्रकार आहे .. त्याबाबत मी आपणास सांगू इच्छिते की, आम्ही जेव्हा त्या ठिकाणी गेलो होते तेव्हाही तेथे अनेक गिधाडे आकाशामध्ये घिरट्या घालत होती शिवाय दारू पिऊन आलेलेही अनेक भाविक होते, तसेच महिला देखील डोक्यावर देव्हारे नाचवत त्यांच्या भोवताली 40-45 जणांची एक टोळी अशी काही पथके वर आणि खाली येण्याच्या मार्गामध्ये... विशेषत: परतीच्या मार्गावर असताना एक भीषण प्रकार घडला आणि मग त्यातून मोठ्ठी चेंगराचेंगरी झाली. त्याचवेळी तेथे जी आग लागली तेव्हा तेथे ती विझ ाविण्यासाठी पाण्याची देखील सोय नव्हती. पोलीस अधिक्षकांना स्वत: तेथे पोहोचण्यासाठी देखील अडीच तास लागले. अशा प्रकारची अत्यंत वाईट परिस्थिती तेथे झाली होती. दुसरे म्हणजे अशा ठिकाणी इतक्या मोठ्या प्रमाणावर झालेल्या गर्दीचे नियंत्रण कसे करायचे याबाबत देखील प्रशासनाचा प्रचंड हलगर्जीपणा झालेला आहे. .....

( यानंतर श्री. जागडे .... WW 1 ===

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ASJ/ SBT/ MHM/ 18:20

डॉ. नीलम गो-हे....

ज्यावेळी आम्ही त्या ठिकाणी भेट दिली, तेव्हा तेथील विश्वस्ताना अनेक प्रश्न विचारले होते. मोठमोठ्या नेत्यांनी त्या ठिकाणी येऊन सांगितले होते की, नारळ आणि तेल यामुळे हा अपघात झाला आहे. आता याबद्दल मला खेद वाटत आहे. गर्दीचे व्यवस्थापन आणि भाविकांच्या श्रध्देबाबत योग्य प्रकारचे मार्गदर्शन करण्यामध्ये ट्रस्ट आणि शासन कमी पडले आहे, हे निश्चितपणाने येथील घटना पाहिल्यानंतर दिसून येत आहे. त्या ठिकाणी जे मृतदेह पडले होते, ते नेण्यासाठी कोणत्याही प्रकारची व्यवस्था नव्हती. देवीसाठी ज्या हिरव्या साड्या आणल्या होत्या, त्या साड्या गुंडाळून ती प्रेते नेण्यात आली. त्यावेळी जो दगड दिसेल त्यावर नारळ फोडून लोक परत जात होते, असे चित्र यावेळी दिसून येत होते. लोकांच्या भावना अतिशय प्रक्षुब्ध झाल्या होत्या. लोकांना आवरणारे त्या ठिकाणी कोणीच नव्हते. मांढरादेवीच्या ठिकाणी ज्या माता-भगिनी जात असतात, त्यांच्यामध्ये अंधश्रध्दा मोठ्या प्रमाणात आहे. तेव्हा या बाबत शासनाने आपली जी भूमिका पार पाडावयाला पाहिजे होती, ती शासनाने पार पाडलेली नाही.

सभापती महोदय, मला या ठिकाणी शासनाचे लक्ष पाच मुद्यांकडे वेधावयाचे आहे. पहिली गोष्ट अशी की, येथील ट्रस्ट कोणत्या प्रकारचे काम करीत असतात ? ट्रस्टकडील पैशाचा विनियोग कशा प्रकारे होतो ? सुरक्षा रक्षकांच्या बाबतीत कोणता निर्णय ट्रस्ट घेत असते ? माझे तर असे म्हणणे आहे की, सुरक्षा रक्षक हे ट्रस्टने नेमण्याची आवश्यकता आहे. ते मांढरादेवी येथे नेमण्यात आले नव्हते. आग लागली की पाण्याचे बंब, प्रथोमपचाराची व्यवस्था असावी लागते. परतु त्या ठिकाणी तशी व्यवस्था नव्हती. त्या ठिकाणचा रस्ता हा अतिशय अरुंद आहे. मांढरादेवीची घटना घडल्यानंतरही अनेक अपघात त्या ठिकाणी झाले आहेत. सभापती महोदय, नारळ आणि तेलामुळे या ठिकाणी घटना घडलेली आहे. परंतु लोकांनी कोठे नारळ फोडले पाहिजेत, या बाबत ट्रस्टने लोकांना सांगण्याची आवश्यकता होती. पाण्याचा आणि तेलाचा निचरा होण्यासाठी योग्य ती काळजी घेण्याची आवश्यकता होती. आता हे सर्व पाहण्याची जबाबदारी ज्या प्रमाणे शासनाची होती, तशीच विश्वस्तांची होती. मी या ठिकाणी एक उदाहरण देणार आहे. शनी शिंगणापूर या ठिकाणी लोक नारळ फोडीत असतात. परंतु त्या ठिकाणी नारळ फोडण्याची एक मशिन आहे आणि त्या ठिकाणी एक मोरी देखील करण्यात आली आहे. आणि त्याच ठिकाणी लोक नारळ फोडीत असतात. तेव्हा यात्रेला येणा-या भाविकांनी कोठे नारळ फोडले पाहिजेत, याची कल्पना ट्रस्टने

..2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे......

तसेच शासनाने देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, माझ्या माहितीप्रमाणे त्या ठिकाणी ध्वनीक्षेपकाचा आवाज इतका मोठा होता की, त्यामध्ये कोणाला काहीच ऐकू येत नव्हते. त्यामुळे पोलिसांच्या सूचना कोणालाही ऐकता येत नव्हत्या. आता या घटनेच्या तपशिलामध्ये जावयाचे म्हटले तर खूप बोलता येईल. या ठिकाणी जे लोक मेले होते, त्यांची प्रेते बाहेर काढण्यामध्ये शासनाला मेहनत घ्यावी लागली. म्हणून मला या अल्पकालीन चर्चेच्या निमित्ताने असे सांगावयाचे आहे की, या निमित्ताने शासनाने आपले धोरण ठरविले पाहिजे. तसेच निधी उपलब्ध करुन देणे अत्यावश्यक आहे. नाशिकच्या कुंभमेळ्याच्या वेळी देखील अशाच घटना घडल्या आहेत. तुळलापूरच्या बाबतीत बोलावयाचे झाले तर देवीच्या कृपेने त्या ठिकाणी आजपर्यन्त कोणतीही दुर्घटना घडलेली नाही. तुळजापूर मंदिराची रचना पाहिली तर देवळात जाण्याचा आणि येण्याचा मार्ग एकच आहे. तो मार्ग अरुंद आहे. त्या ठिकाणी पाण्यावरुन लोक घसरुन पडत असतात. सकाळी होत असलेल्या अभिषेकच्या वेळी गाभा-यात कोंदटल्यासारखे होते.  सर्वच ठिकाणच्या देवळांमध्ये आपण एक गोष्ट निश्चित केली पाहिजे ती ही की, देवळात जाण्याचा मार्ग वेगळा असला पाहिजे आणि बाहेर पडण्याचा मागै वेगळा असला पाहिजे. ज्या ज्या वेळी व्ही. आय. पीं. च्या पुजा होत असतात, त्यावेळी भाविकांना खूपच त्रास होत असतो. त्यामुळे पुजेच्या वेळाही मर्यादित करणे महत्वाचे आहे. तसेच देवळातील अंतर्गत सुरक्षेची व्यवस्था शासनाने करणे आवश्यक आहे. ही शासनाचीच जबाबदारी आहे. तुळजापूर या ठिकाणी तर पेटीतील पैसे चोरीला जाणे, देवीच्या साड्या चोरीला जाणे, देवीला आलेल्या भेटवस्तूही चोरीला जात असतात. आम्हाला कार्यकर्त्यांनी एक गोष्ट सांगितली आहे, ती मी या ठिकाणी सांगते. तुळजापूरच्या देवीला जे दागिने येत असतात, ते दागिने देखील देवस्थानचे विश्वस्त सरकारी अधिका-यांच्या पत्नींना भेट देत असतात. म्हणजे कोणत्या प्रकारचा कारभार या राज्यात चालला आहे ? या बाबत अस्वस्थ व्हावे अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. ज्यावेळी अशा प्रकारचे अपघात होत असता, त्यावेळी आपण तहसिलदार किंवा जिल्हाधिका-यांना जबाबदार धरीत असतो. सभापती महोदया, मांढरादेवी या ठिकाणी मरण पावलेल्या लोकांचे पोस्ट मार्टेम झालेले नाही. सकृतदर्शनी असे दिसून आले आहे की, शॉक सर्किटने अनेक लोकांना मृत्यू आला आहे.

( यानंतर श्री. सरफरे....

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

हे पोलीसांच्या अहवालात दिसत असतांना सुध्दा शासन म्हणते की, शॉक लागलेला नाही. ही विद्युत मंडळाची जबाबदारी नाही. त्यांना आपण काही प्रश्न विचारणार की नाही? या गोष्टीची मला खंत वाटते. जी माणसे मेली त्यांना शासनाने 15 कोटी जाहीर केली. ते जाहीर करुन त्यामधून काय साध्य होणार आहे? भाविकांच्या प्रबोधनाची जबाबदारी शासन सकारात्मकरित्या घेणार नसेल तर आज अनेक डोंगरावर तीर्थक्षेत्रे आहेत त्यामध्ये चांदवडची देवी डोंगराच्या उतारावर आहे, सप्तश्रृंगी देवी चढावर आहे, नांदेडला माहूरच्या रेणुका देवीचे संस्थान डोंगरावर आहे. अष्ट विनायकापैकी लेण्यांद्रीच्या जाण्या-येण्याच्या पायऱ्या बऱ्या असल्या तरी मंदिरामध्ये वीजेच्या कनेक्शनची परवानगी नाही. त्या ठिकाणी जनरेटरचा वापर करुन देव दर्शन घेतले जाते. एका बाजूला आपण फार सुधारणा करीत चाललो असे म्हणतो. पंढरपूरमध्ये बडव्यांना शिक्षा होणे आणि कोर्टाने त्यांना आदेश देणे की, तुम्ही अडवणूक करता. मध्यंतरी देवळाच्या आत मध्ये देऊळ मलीन करण्याचा प्रसंग घडला होता. त्याप्रमाणे पंढरपूर शहरात जे लोक निराधार आहेत, ते वेडे मतीमंद आहेत अशा लोकांना त्यांचे कुटुंब तेथे सोडून जाते. ती माणसे देवाच्या दारी आली म्हणून लोक त्यांना खायला प्यायला घालतात. त्या नंतर ते नागरिकांना सातत्याने त्रास देत रहातात. म्हणून पंढरपूर, तुळजापूर, गाणगापूर, कोल्हापूर अशी महाराष्ट्रात 550 ठिकाणे आहेत त्या ठिकाणी 1 लाखावर भाविक लोक यात्रेसाठी येतात. अशा वेळी त्यांचे जाण्या येण्याचे मार्ग वेगळे असले पाहिजेत. या बाबत धर्मादाय आयुक्तांनी सनियंत्रण करणे अत्यावश्यक आहे. ट्रस्टकडे किती पैसा जमतो, आणि त्या जमलेल्या पैश्यातून भाविकांची सुरक्षितता आणि भाविकांची श्रध्दा यांचा आदर केला जातो की नाही? देवाची पूजा होतांना स्वच्छता आणि सुरक्षितता याला बाधा आणणाऱ्या ज्या पूजा असतील त्या बाबत भाविकांना विश्वासात घेऊन त्यामध्ये बदल केला पाहिजे. मांढरा देवीच्या ठिकाणी पशुहत्या बंद केली पाहिजे. त्याचप्रमाणे जीपमधून मोठया प्रमाणात दारुची ने आण होते. त्या ठिकाणी भाविक लोक दारु पिऊन जातात. स्थानिक लोकांनी सांगितले की, संत गाडगे बाबा सुध्दा या भक्तांना कंटाळून तेथून निघून गेले होते. अशी परिस्थिती असतांना हे फार मोठे आव्हान आहे असे मला वाटते. आपण म्हणतो की, आपण तीर्थक्षेत्रांवर जबाबदारी टाकणार आहोत. मी पुढे जाऊन म्हणेन की, पाणी आणि स्वच्छता याबद्दल शासन भाविकांना काय सोयी-सुविधा उपलब्ध करुन देते? हा देखील महत्वाचा मुद्दा आहे.

04-04-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) XX 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

मांढरा देवी गडावर पिण्याच्या पाण्यासाठी ट्रस्टने फक्त स्वत:पुरते पाण्याचे कनेक्शन घेतले आहे.परंतु भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही. आता 15 कोटी आल्यानंतर शासन पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणार आहे. दोन-दोन लाख लोक येतात त्या गजानन महाराजांच्या शेगाव देवस्थानाच्या ठिकाणी अशी व्यवस्था केली आहे की, रांगेत असलेल्या व्यक्तीला फ्रेश व्हायचे असेल तर 10-15 मिनिटात येऊन परत त्याच्या नंबरवर येऊन तो थांबू शकतो. तसेच, बसण्यासाठी बाकांची व्यवस्था केली आहे. अशा चांगल्या गोष्टी इतर देवस्थानांमध्ये केल्या आहेत. त्या सर्व ठिकाणी करण्यासाठी शासनाने कणखर भूमिका स्वीकारली पाहिजे. ते होत नसेल तर त्यासाठी जिल्हाधिकारी, पर्यटन विभागाच्या लोकांनी देवस्थानाला ग्रामस्थांना विश्वासात घेऊन याबद्दल कार्यवाही केली पाहिजे. दुसरा महत्वाचा भाग असा की, ट्रस्ट, पोलीस, नागरीक, पत्रकार अशा सर्वांच्या सहकार्याने आपण डिझॅस्टर मॅनेजमेंट, आपत्कालीन व्यवस्थापन करतो त्यावेळी एखादी दुर्घटना घडते त्यावेळी ताबडतोब यशदा सारख्या संस्थेत आपत्कालीन व्यवस्थापनावर कशा बैठका झाल्या त्याच्या बातम्या वाचायला मिळतात. मांढरादेवीची घटना घडल्यानंतर व वर्तमानपत्रामध्ये छापून आल्यानंतर ज्योतिबाच्या चौथऱ्यावर इंटरनल क्लोज सर्किट टी.व्ही. बसविण्यात आले होते. त्यामुळे काही प्रमाणात नियंत्रण झाले. तरी देखील आपल्या निदर्शनास आणतो की, जेजुरीच्या खंडोबाची जत्रा झाली त्या जत्रेमध्ये मानकऱ्यांच्या काठयांवरुन प्रचंड तणाव निर्माण झाला होता. त्या मानकऱ्यांच्या काठयांवर बंदी आणल्यामुळे दीड ते दोन लाख भाविक जमले. तेथील पायऱ्यांवर नियंत्रण कशा पध्दतीने करणार? बऱ्याचशा ठिकाणी महिला चेंगरल्या जातात.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे . . . .

तेते चेंगराचेंगरी होते.अशा वेळी महिलांसाठी वेगळी बसण्यासाठी व्यवस्था नसेल तर त्यांची अवस्था अडचणीमध्ये सापडल्यासारखी होते. मांढरादेवीच्या संदर्भात सांगावयाचे तर रस्ता रुंदीकरण हा देखील महत्वाचा भाग आहे. खंडाळा आणि जगलवाडी रस्त्याची सुध्दा दुरुस्ती होणे आवश्यक आहे.तीर्थक्षेत्राजवळ जे रुग्णालय आहे, ते पुरेसे नाही. तेथे पाणी पुरवठयाची स्वतंत्र योजना असली पाहिजे. तसेच अनेक ठिकाणी पोलिसांच्यासारखीच मदत करणारे होम गार्ड किंवा स्वयंसेवकांची पथके भाविकांची मदत घेऊन जर तयार केली तर त्याचा देखील उपयोग होऊ शकेल. स्वत:चें सुरक्षा रक्षक आणि व्हिजीलन्स् कॅमेरे जर ठिकठिकाणी असतील तर लोकांना मार्गदर्शन मिळेल. मांढरदेवी यात्रेंमध्ये एक धक्कादायक गोष्ट घडली की, प्रेत कोणती आहेत हेच कळत नव्हते. कारण गर्दीमुळे कुठून माणसे आली आहेत वगैरे काहीच कळत नव्हते. तेव्हा ज्या गाडीतून प्रवासी आणले जातात, त्या प्रवाशांची नावे त्या गाडीच्या ड्रायव्हरकडे असली पाहिजेत आणि त्यांची काही ना काही ओळखीची व्यवस्था असली पाहिजे. प्रत्येकाच्या नावाचे कार्ड त्या व्यक्तीकडे असले पाहिजे. म्हणजे जर कोणी हरवले तर त्याचा उपयोग होऊ शकेल. या गोष्टी देखील पुढच्या काळामध्ये अत्यावश्यक असणार आहेत असे मला वाटते. आम्ही वर्तमानपत्रामध्ये असे वाचले की, या तीर्थक्षेत्रांसाठी एका मंत्री महोदयांची व्यवस्था होणार आहे. परंतु आम्ही पाहतो की, एखादे डिपार्टमेंट वेगळे झाले की त्याला कोणीच वाली नसतो. त्या मंत्र्यांसाठी केवळ लाल दिव्याच्या गाडीची सोय होते आणि बाकीची जे इतर विभाग आहेत, आज सदनातील या चर्चेमध्ये अशी परिस्थिती दिसत आहे की, याठिकाणी ऊर्जा मंत्री अनुपस्थित आहेत, गृह विभागाचे मंत्री अनुपस्थित आहेत, ग्रामविकास मंत्री अनुपस्थित आहेत, पर्यटन विभागाचे मंत्री देखील अनुपस्थित आहेत. म्हणजे या विषयामध्ये ज्यांच्या-ज्यांच्या विभागाचा संबंध आहे आणि ज्यांच्याकडून निधीची व्यवस्था झाली पाहिजे तेच अनुपस्थित आहेत. याबाबतीत "बोलाचाच भात, बोलाचीच कढी" तसे 15 कोटी रुपये केंद्र सरकारकडून येणार आहेत. राज्य शासनाने आपल्या अर्थसंकल्पात उल्लेख केलेला आहे की, आम्ही विकासासाठी पैसे देणार आहोत. पण हे विकासासाठी दिले जाणारे पैसे आपण कशा प्रकारे वापरणार आहोत ? यासाठी प्रत्येक तीर्थक्षेत्राचा आराखडा असणे अत्यावश्यक आहे हे खास करुन सांगावेसे वाटते. मांढरादेवीच्या यात्रेच्या वेळी घटना घडली, त्यानंतर महाराष्ट्रातील लोकांना खूप धक्का बसला आणि आज भविकांनी देखील थोडेफार स्वत:मध्ये बदल

. . . .2 वाय- 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे . . . .

करण्यास सुरुवात केली आहे असे मला वाटते. पण तरी देखील भाविकांच्याही भावना अनेक बाबतीत फार तीव्र आहेत. येथे मला खास करुन उल्लेख करावयास पाहिजे की, महात्मा फुले, तसेच प्रबोधनकार ठाकरे या लोकांप्रमाणे प्रबोधनाच्या विचाराने भारले गेलेले जे समाजसेवक आहेत, त्यांना समोर ठेऊन, लोकांना विश्वासात घेऊन याबाबतीत विचार केला पाहिजे. या भाविकांमध्ये महिलांचे प्रमाण फार मोठे आहे. अनेक ठिकाणी एक वेगळया प्रकारचे गैरव्यवहार होतात, ज्यामध्ये छोटया मुलींना यात्रेमध्ये पळविणे आणि आपल्यासारख्यांच्या स्मरणात अंजनाबाई गावितची केस असेल. ज्यामध्ये कोल्हापूरच्या अंबाबाईच्या मंदिरामध्ये अंजनाबाई गावित मुले पळविण्याचा धंदा करीत होती आणि नरबळी म्हणून तिला छोटया मुली लागत होत्या. तिने याबाबतीतील स्वत:ची कार्यपध्दती काय होती, ते कोर्टामध्ये सांगितले आहे. अंजनाबाई गावित असे म्हणाली की, जेव्हा बायका छोटया मुलांना कडेवर घेऊन देवीच्या देवळापर्यंत येत असत आणि देवीची छोटी मूर्ती दिसल्यानंतर त्या छोटया बालकाला कडेवरुन खाली ठेवावयाच्या आणि ती माता देवीला नमस्कार करीत असताना, तेवढया वेळामध्ये अंजनाबाई गावित त्या मुलांना पळवून नेत असे. यामध्ये मला एक धक्कादायक गोष्ट वाटते की, आमच्या सामान्य महिला देवीच्या श्रध्देने जातात, त्या श्रध्देचा अशा प्रकारे गैरफायदा घेणारे समाजकंटक अशा प्रकारे देवळांचा वापर करीत असतील तर शासनाने ही गोष्ट गांभीर्याने घ्यावयास पाहिजे. परंतु मी पुढे जाऊन असे सांगेन की, मांढरदेवीच्या यात्रेमध्ये ज्या महिला गेल्या, त्या गरीब घरातील होत्या. ब-याचशा महिलांना शिक्षणाची बॅकग्राऊंड नव्हती. त्यामुळे मुकी बिचारी कुणीही हाका अशी यांच्या मृत्यूच्या संदर्भात परिस्थिती झालेली आहे. आजही त्यांच्या घरातील लोकांना जरी काही लाखाची मदत मिळाली असली तरी देखील त्या कुटुंबांची कधीही भरुन न येणारी हानी झालेली आहे. म्हणून येथे हा प्रस्ताव मांडत असताना मला सूचवावेसे वाटते, आज विरोधी पक्षाच्यावतीने आम्ही हा प्रस्ताव सदनासमोर आणला आहे आणि या प्रस्तावाच्या चर्चेला सुरुवात करण्याची संधी शिवसेना आणि भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांनी खास करुन माननीय श्री.नितीन गडकरी, माननीय श्री.दिवाकरजी रावते, माननीय श्री.मधुकर सरपोतदार यांनी मला संधी दिली. परंतु ही चर्चेसाठी चर्चा नाही. तर जे लोक मृत्यूमुखी पडले किंवा नुकतीच तुकाराम-बीजेची देहू येथे यात्रा झाली. तेथे देखील दोन लोक मृत्यूमुखी पडलेले आहेत. त्यामुळे ढकलाढकली मध्ये,चेंगराचेंगरीमध्ये ज्यांची अवलेहना होते,

. . . .2वाय-3



APR/MHM/SBT 18:30

डॉ.नीलम गो-हे . . . .

जे मृत्यूमुखी पडतात अशा लोकांच्या संदर्भात करुणा आणि श्रध्दा याचा विचार करुन काही धोरणे आखली गेली पाहिजेत असा आमचा आग्रह आहे. यानंतर काही अंधश्रध्दा नेत्यांचे लेख देखील आम्ही वाचले.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अग्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/ पूर्वी सौ.रणदिवे... 18:35

डॉ.नीलम गोऱ्हे (पुढे चालू....

मला थोडे असे वाटते की, ज्यांची स्वत:ची या दैवतांवर श्रध्दाच नाही, ते या भाविकांच्या प्रश्नामध्ये ममत्वाची भावना किती ठेवतील याबद्दल मला शंका वाटते. म्हणून मला असे वाटते की, स्त्रियांची मानसिकता व भाविकांच्या मनामध्ये देवाबद्दलच्या भावनांचा आदर करून गर्दी आणि सोई व सुरक्षितता यांचे व्यवस्थापन करणे ही या शासनाची जबाबदारी आहे, अशाप्रकारे राजकीय इच्छाशक्ती ठेवत शासनाने यासंबंधामध्ये खास करुन भूमिका स्वीकारली पाहिजे. शिवसेनेचे कार्याध्यक्ष श्री.उध्दवजी ठाकरे यांनीही मांढरदेवीला भेट दिली. भेट दिल्यानंतर एक प्रश्न निर्माण झाला तो म्हणजे दुकानदारांचा. दुकानदारांना शिस्तीमध्ये बसविले पाहिजे हे जसे खरे आहे, त्याचबरोबर त्याच दुकानदारांच्या मार्फत देखील समाजामध्ये काही गोष्टींचा चांगल्या अर्थाने प्रचार करू शकतो. कारण त्यांना विश्वासात घेऊन तीर्थक्षेत्रांची आखणी केली नाही तर जसा पंढरपूरला बंद पाळला गेला, शिर्डीला शेवटी गोळीबार झाला, असे प्रकार होत राहतील. असे प्रकार व्हायचे नसतील तर मला वाटते की दुकानदारांना विश्वासात घेऊन व्यवस्थापन करावे. पोर्णिमा, अमावस्याचे कार्यक्रम 550 ठिकाणी होतात, त्यांचे वेळापत्रक शासनाचे जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक आणि त्या त्या संबंधित ट्रस्टचे लोक यांच्याकडून त्याबाबत पाठपुरावा होतो की नाही, याचे देखील नियंत्रण शासनाने आपत्कालीन व्यवस्थापनामध्ये राज्यस्तरावर केले पाहिजे. तीर्थक्षेत्र व पर्यटनासाठी सुरक्षित आणि निर्भय स्वरुपाचे वातावरण महाराष्ट्रामध्ये कसे होईल, यादृष्टीने कोटकर यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात आलेली आहे, परंतु या चौकशी समितीचा अहवाल, जे लोक मृत झाले आहेत, त्यांची मुले 10 वर्षे मोठी होईपर्यन्त उशीरा आला तर त्याला काहीच अर्थ रहाणार नाही.. म्हणून त्यांना ज्या काही सोयीसुविधा लागतात, जी काही माहिती लागते ती शासनामधून कशापध्दतीने ताबडतोब उपलब्ध करुन दिली जाईल आणि जे लोक शॉर्ट सर्किटने मृत्युमुखी पडलेले आहेत, त्याबद्दलचा अहवाल ताबडतोब पुढील एक महिन्याच्या आत मागवून घेऊन, त्याला जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर आणि मंत्री महोदयांवरदेखील कारवाई केली गेली पाहिजे, हे मला खास करुन सांगावेसे वाटते. कारण दोन अतिशय महत्वाची दिशाभूल करणारी स्टेटमेंटस् फार मोठ्या नेत्यांकडून सातत्याने झालेली आहेत. मा.शरदराव पवार यांच्याकडून स्टेटमेंट केले गेले की, हा अपघात होता. प्रश्न असा आहे की, हा दैवी अपघात नव्हता. हा मनुष्यनिर्मित अपघात होता. प्रशासनाच्या गलथानकारभारामुळे झालेला अपघात होता.

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

डॉ.नीलम गोऱ्हे (पुढे चालू....

या अपघाताची सगळी जबाबदारी ज्या महिलांनी तेथे तेल व पाणी टाकले त्या महिलांवर टाकली जाते, असे असेल तर त्याबद्दलची व्यवस्था करण्याची जबाबदारी शासनाची नव्हती काय, हा प्रश्न समोर येतो आणि दुसरा मुद्दा असा की, माझ्या माहितीप्रमाणे मा.मंत्री अजित पवार यांनी प्रेते हलविण्याच्याबाबतीत स्वत: लक्ष घातले. दुर्दैवाने ऊर्जामंत्री श्री.दिलीप वळसे-पाटील यांच्याकडून सातत्याने दूरचित्रवाहिन्यांवरून सांगितले जात होते की, शॉर्ट सर्किटमुळे लोक मेले नाहीत. जेव्हा एखाद्या पोलीस स्टेशनचे लोक हद्दीवरुन भांडण करतात, की माझ्या पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये हे प्रकरण झालेले नाही, हे दुसऱ्या पोलीसस्टेशनच्या हद्दीमध्ये येते. त्यामध्ये आपण सामान्य पोलीस अधिकाऱ्यांना दोषी धरतो. पण वेगवेगळे मंत्री जेव्हा स्वत:वरील जबाबदारी झटकण्यासाठी जेव्हा असे वागतात, त्यावेळेला त्यांना कोण प्रश्न विचारणार, याचा देखील विचार करण्याची वेळ आलेली आहे असे मला वाटते. म्हणून या सगळया व मांढर देवीच्या घटनेच्या निमित्ताने शासनाकडून जबाबदारीने व राजकीय इच्छाशक्तींने धोरण राबविले गेले पाहिजे, असे मी या ठिकाणी सांगते आणि माझे दोन शब्द संपविते. जय महाराष्ट्र.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MHM/ SBT/ प्रथम श्री. किल्लेदार... 18:40

कर्नल सुधीर सावंत ( नामनियुक्त ) :सभापती महोदय, अत्यंत महत्वाच्या विषयावर या सदनामध्ये चर्चा होत आहे. पाठीमागे काय झाले याचा आढावा घेण्यापेक्षा आपण पुढे काय केले पाहिजे यादृष्टीकोनातून विचार होणे अत्यंत आवश्यक आहे. सर्व श्रध्दास्थानात अशा भिषण प्रसंगाची पुनरावृत्ती होऊ नये, तातडीची तसेच दीर्घपल्याची योजना विचारत घेण्याची नितांत आवश्यकता विचारात घेण्यात यावी, या विषयावर आपण चर्चा करीत आहोत. जगातील अनेक देवस्थानामध्ये ऐतिहासिक काळात आपल्याला असे दिसून आलेले आहे की, दोन कारणामुळे अशा प्रकारची आपत्ती उद्‌भवते. पहिले कारण म्हणजे घातपात आणि दुसरे कारण म्हणजे ॲक्सिडेन्ट. या दोन्ही कारणांचा विचार करुन उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. कारण ज्या प्रमाणे अपघात होतात त्याचप्रमाणे मंदिर, मशीद, चर्च हे घातपाताचेही केंद्र असतात हे नव्याने सांगायला नको. म्हणूनच या गोष्टीचा विचार करतांना सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी चांगले विचार मांडलेले आहेत. त्याचा विचार करतांना, आपल्याला कुठल्या पध्दतीने पुढे जायचे आहे, याचा विचार करणे आवश्यक आहे. सर्वात महत्वाची गोष्ट अशी की, या विषयाला सामोरे जाण्यासाठी सरकारचे काही धोरण आहे की नाही? काही योजना आहे की नाही? कारण अनेक जिल्हयामध्ये अनेक देवस्थाने नव्याने सुध्दा निर्माण व्हायला लागली आहेत. भाविकांचा लोंढा या देवस्थांनाकडे वाढत चाललेला दिसतो. अशा प्रकारे अनेक ठिकाणी हा प्रश्न उद्‌भवू शकतो. म्हणून सर्वसमावेशक असे शासनाचे धोरण असण्याची अत्यंत आवश्यकता आहे.मांढर देवीची घटना घडल्यानंतर सिंधुदुर्ग आंगणेवाडीची यात्रा होती आणि त्यासाठी एक मिटिंगसुध्दा घेतली होती. त्या मिटिंगमध्ये आमच्या असे निदर्शनास आले की, प्रशासनाला याच्या बाबतीत माहितीच नाही. प्रशिक्षण तर नाहीच नाही. या विषयाला सामोरे कसे जायचे याच्याबद्दलची कल्पना देखील नाही. बेसिकली जबाबदारी कोणाची आहे? जिल्हा प्रशासनामध्ये आपण सगळेच काही कलेक्टरवर सोपवून देतो पण कलेक्टर अशा गोष्टींचा सारासार विचार करुन उपाययोजना करु शकतो की नाही, हे आपण बघत नाही. म्हणून या सर्व तीर्थस्थाना विषयी, देवस्थानाविषयी धोरण असणे गरजेचे आहे. एक त्याठिकाणी जाणा-या भाविकांचे संरक्षण होण्याच्या दृष्टीकोनातून आणि ती देवस्थाने कायदेशीर चालत आहेत की नाही हे बघण्याची आवश्यकता आहे. या दोन्ही विषयांना समोर ठेवून सरकारचे एक धोरण असणे अत्यंत आवश्यक आहे. हे धोरण आखण्याच्या दृष्टीने आज सरकारला पावले





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत...

उचलणे गरजेचे आहे. दुसरी गोष्ट अशी की, अनेक जिल्हयामध्ये अनेक देवस्थाने आहेत, अनेक तीर्थस्थाने आहेत. पण ते जाहीर आहेत काय? तेथे अशा प्रकारची यात्रा करण्यासाठी परवानगी आहे काय? तेथे अलिखित अशा अनेक गोष्टी चाललात. पण प्रत्येक ठिकाणी परवानगी असणे गरजेचे आहे. मगच त्यांचे काही तरी नियोजन होऊ शकतो. म्हणून आज पहिल्यांदा महाराष्ट्रात सगळीकडे अशा प्रकारच्या यात्रा कुठे होतात. जिथे पन्नास हजार लोक एकत्र येतात अशी कुठली देवस्थान आहेत. असे तीर्थस्थाने आहेत याची सर्व माहिती सरकारकडे असली पाहिजे. शेवटी ही चेंगराचेंगरी कां होते? याचे कारण असे की, अशा छोटयाशा जागेत प्रचंड जनमुदाय जेव्हा जमतो आणि कुठती तरी घटना घडते आणि त्यातून चेंगराचेंगरी होते. त्यामध्ये विशेषत: मुले आणि महिला आणि वृध्द हे त्याला सामोरे जातात. त्यांचे मृत्यू तेथे होतात. या महाराष्ट्रात प्रत्येक जिल्हयामध्ये अशा प्रकारच्या यात्रा, अशा प्रकारचे तीर्थस्थाने कुठे आहेत याचा पहिल्यांदा सर्व्हे सरकारने करावा.

यानंतर श्री. बरवड ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत ....

तीर्थस्थाने जाहीर करण्यासाठी शासनाची एक शासकीय समिती आहे. त्या समितीच्या बैठका कधी होतात, कधी होत नाही याचीही कल्पना नाही. मी चार वर्षापूर्वी कुणकेश्वर आणि आंगणेवाडी ही ठिकाणे तीर्थस्थान म्हणून जाहीर करावी अशी मागणी केली होती.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदया, या ठिकाणी चर्चा चालू असताना कोणीही मंत्रिमहोदय नोंद घेत नाही.

श्री. अनिस अहमद : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रिमहोदय थोडया वेळासाठी बाहेर गेलेले आहेत. मी नोट्स घेत आहे. मला मराठी समजते.

डॉ. नीलम गोऱ्हे : माननीय पुनर्वसन मंत्री सभागृहातून निघून गेले आहेत. त्यांना या चर्चेचे गांभीर्य नाही काय ? आम्हाला कोण उत्तर देणार आहेत ? आम्ही उगाच बोलत राहावयाचे काय ?

( अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. या ठिकाणी महत्वाच्या विषयावर चर्चा सुरु आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी या चर्चेचे महत्व जाणावे आणि योग्य त्या नोट्स घ्याव्यात.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदया, माझी शासनाला विनंती आहे की, शासनाने महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हयामध्ये अशा प्रकारे ज्या ठिकाणी यात्रा भरतात त्यांची नावे जाहीर करावीत.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे. नाशिकनंतर अनेक ठिकाणी ज्या दुघर्टना झाल्या त्याबाबत या ठिकाणी चर्चा होत आहे. यामध्ये महत्वाचे निर्णय घेणे आवश्यक आहे. पुनर्वसन विभाग, महसूल विभाग, गृह विभाग हे याच्याशी संबंधित विभाग आहेत. या ठिकाणी विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य काही विधायक सूचना करीत असतील तर असे प्रसंग यापुढे घडू नयेत यादृष्टीने या ठिकाणी असलेले माननीय मंत्रिमहोदय उत्तर देणार नाहीत. संबंधित मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी उपस्थित असावयास पाहिजे. याचा अर्थ असा की, तुम्हाला काय बोंबलायचे असेल ते बोंबला, आम्हाला त्याची काहीही काळजी नाही.

( काही सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

**तालिका सभापती** : या ठिकाणी माननीय मंत्रिमहोदय नोट्स घेत आहेत. सन्माननीय सदस्यांनी आपले मुद्दे मांडावेत.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदया, यामध्ये अनेक विभाग संबंधित असतील तर त्या खात्याच्या माननीय मंत्रिमहोदयांनी उपस्थित राहावयास पाहिजे.

**तालिका सभापती** : या ठिकाणी माननीय मंत्रिमहोदय नोट्स घेत आहेत. नोट्स घेतल्यानंतर माननीय मंत्रिमहोदय योग्य ते उत्तर देतील. समजा उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपल्याला पुन्हा यावर बोलण्याची संधी मिळेल.

डॉ. नीलम गोऱ्हे : आम्ही ज्यावेळी हा विषय दिला त्यावेळी आपल्या विधिमंडळ कार्यालयामध्ये भेटून आम्हाला यामध्ये कोणते खाते अपेक्षित आहे हे सांगितले होते. आता नगाला नग म्हणून कोणत्याही मंत्रिमहोदयांनी उत्तर देऊन आमचे समाधान करीत असाल पण याला काही अर्थ आहे काय ? यामध्ये गृह, पर्यटन, ग्रामविकास, पुनर्वसन, पाणीपुरवठा इत्यादी सहा विभागांची नावे सांगून सुध्दा वेगळया खात्याचे माननीय मंत्रिमहोदय कसे उत्तर देणार ?

**तालिका सभापती** : आपले म्हणणे अगदी योग्य आहे. माननीय मंत्रिमहोदय नोट्स घेत आहेत. ते काय नोट्स घेतात आणि काय उत्तर देतात त्यावर पुढचे सर्व अवलंबून आहे.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदया, मी सर्वात महत्वाचा मुद्दा सांगितला की, या सर्व देवस्थानांचा सर्व्हे होऊन त्याचा एक जी.आर. काढून ही तीर्थस्थाने जाहीर करण्यात यावीत. यासाठी वेळोवेळी त्या समितीच्या बैठका झाल्या पाहिजेत. दुसरे म्हणजे हे स्टॅम्पीड का होते ? एकाच ठिकाणी अशी गर्दी जमू दिल्यानंतर अशा प्रकारची चेंगराचेंगरी होणे सहाजिक आहे. म्हणून गर्दीमध्ये गॅप असली पाहिजे. याचे सर्व नियोजन एक तर पोलीस दल करु शकते आणि दुसरे म्हणजे तेथील जे ट्रस्ट आहे किंवा देवस्थान आहे त्यांनी स्वत: या विषयी नियोजन करुन एकाच ठिकाणी गर्दी जमू नये यासाठी खबरदारी घेणे आवश्यक आहे. त्या ठिकाणी फायर फाईटींग इक्विपमेंट्स आहेत की नाही, त्या ठिकाणी वैद्यकीय सुविधा आहेत की नाही या सर्व गोष्टीचे राज्य सरकारने एक डॉक्युमेंट निर्माण करावयास पाहिजे. ते कोण करणार आहे ? माझी एकच विनंती आहे. डिझास्टर मॅनेजमेंट हा जो विषय आहे तो त्सुनामीच्या दृष्टीकोनातूनही येतो.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत...

आणि अशाप्रकारचे अपघात झाल्यानंतर डिझास्टर मॅनेजमेंटचा प्रश्न येतो. म्हणून त्याच्यावर या राज्याने काय तोडगा काढला आहे ? परंतु अशा अपघातांना नियंत्रित करण्यासाठी आपल्याकडे यंत्रणा आहे की नाही हा फार शंकेचा भाग आहे. म्हणून आम्ही विनंती करुन 11 एप्रिल रोजी संरक्षण मंत्रालयाची बैठक लावण्यास सांगितले आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक विभागामध्ये इकोलॉजिकल ॲण्ड डिझास्टर मॅनेजमेंट टेरिटोरियल आर्मी बटालियन असावयास पाहिजे. आम्ही भारत सरकारला सूचना केली आहे की, भारतामध्ये असे अनेक ठिकाणी अपघात होतात आणि त्यामुळे प्रचंड निधीची तरतूद केली जाते. त्यासाठी यंत्रणा निर्माण केली जाते. परंतु अपघाताला सामोरे जायचे असेल, अपघात झाल्यानंतर काही करावयाचे असेल तर यामध्ये एकवाक्यता असावयास पाहिजे. त्याशिवाय हे काम होऊ शकत नाही. क्राऊड कंट्रोलची एक डॉक्युमेंट इंडियन आर्मीमध्ये आहे. अशाप्रकारचे अपघात घडतात मग महापूर नियंत्रण असेल, मग बॉम्ब स्फोट असेल, दुष्काळ निवारण्याचे काम असेल, गर्दीला आवरण्याचे काम असेल त्यासाठी आर्मीमध्ये स्टॅण्डिग ऑपरेटिंग प्रोसिजर बनवून ठेवलेले आहे. असे प्रोसिजर पोलीस दलात तरी असावयास पाहिजेत, एसआरपीत असावयास पाहिजे. महाराष्ट्र सरकारच्या कोणत्या तरी खात्यात असावयास पाहिजे. असे प्रकार घडल्यानंतर कशाप्रकारे कोणी काय काम करावयाचे आहे त्यासाठी नियोजन असावयास पाहिजे व ते जिल्हा पातळीवर असावयास पाहिजे. प्रत्येक जिल्हयात आपतकालीन प्रसंग येतात त्यासाठी एक कक्ष असावयास पाहिजे. जेव्हा एखादा अपघात होतो तेव्हा जिल्हा पातळीवरील अधिका-यांनी एकत्र येऊन काम केले पाहिजे. होमगार्डकडे काय काम दिले पाहिजे यासंबंधी डिझ ाास्टर मॅनेजमेंटमध्ये काहीही लिहिलेले नाही. होमगार्ड ही चांगली यंत्रणा आहे. आपण तिला वापरु शकता. डिझास्टर मॅनेजमेंटची संकल्पना चांगली आहे. तिला योग्य रुपरेषा देण्यासाठी तिच्यासाठी एक रोडमॅप देण्यासाठी म्हणून सरकारने महाराष्ट्रातील सहाही विभागामध्ये इकोलॉजिकल ॲण्ड डिझास्टर मॅनेजमेंट टेरिटोरियल आर्मी बटालियनची मागणी करावी. अनेक राज्यात त्या राज्यसरकारांनी बटालियनची मागणी केली असल्यामुळे तेथे आहेत. त्याला पर्यावरण, वन विभागाने फंड्स दिलेले आहेत. रोज अपघात होत नाहीत, परंतु पर्यावरणाच्या संरक्षणासाठी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत....

त्याचा उपयोग होईल आणि ज्यावेळी दुर्दैवाने अपघात होतील त्यावेळी त्या प्रसंगी त्याचा उपयोग करु शकतो असे मला वाटते.

सभापती महोदया, ट्रस्ट हा देखील यामध्ये एक विषय आहे. देवस्थानाचा कारभार योग्य चालतो किंवा नाही ? अनेक देवस्थाने आहेत. आंगणेवाडीची यात्रा भरते पण तेथे ट्रस्ट नाही. तेथे प्रचंड पैसा येतो, परंतु ही संपत्ती जाते कोठे ? पाच वर्षापूर्वी तेथे पाण्याचीही व्यवस्था नव्हती. मागणीमुळे तीर्थक्षेत्र म्हणून जाहीर झाल्यावर आता पिण्याचे पाणी मिळू लागले. अशाप्रकारच्या देवस्थानाच्या यात्रा होतात, त्या माध्यमातून प्रचंड पैसा येतो, ज्यावेळेला तुम्ही तीर्थक्षेत्र म्हणून जाहीर कराल त्यावेळी तेथे ट्रस्ट असणे आवश्यक आहे. त्याठिकाणच्या ट्रस्टची सुध्दा जबाबदारी आहे ना ? प्रत्येक वेळी पोलीस दल पुरे पडणार नाही. जर तुम्ही यात्रा भरवित असाल तर संरक्षणाच्यादृष्टीने काय काय उपाययोजना केल्या पाहिजेत याबाबत त्या देवस्थानने आणि ट्रस्टने विचार केला पाहिजे. तसेच तेथील अकाऊंटचे ऑडिट झाले पाहिजे. गैरकारभार होणार नाहीत याचीही खात्री करुन घेतली पाहिजे. या सर्व गोष्टींसाठी नियमावली केल्यास चांगली गोष्ट होईल. आज अनेक ठिकाणी कोणत्याही प्रकारची दुकाने थाटली जातात. तेथे कोणतेही खाद्य पदार्थ विकले जातात. तेथे कोणीही लक्ष देत नाहीत, प्यायला पाणी आहे की नाही हे कोण बघत नाहीत. त्यामुळे कॉलरा, कावीळसारख्या आजारांची सुरुवात हया देवस्थानाच्या यात्रेमधून होते. त्यामुळे अशावेळी शासनाने व प्रशासनाने तेथे मदत करण्याची, लक्ष देण्याची आवश्यकता असते असे मला वाटते.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ KGS/ MHM/ MAP/ पूर्वी श्री. खंदारे 18:55

(मेजर सुधीर सावंत पुढे सुरु...)

हा विषय अत्यंत महत्वाचा झालेला आहे. आजकाल फार मोठ्या प्रमाणावर लोक देवाकडे धावू लागलेले आहेत. आज महाराष्ट्रामध्ये अनेक ठिकाणी मोठ मोठया यात्रा भरतात आणि व्यवस्थापन नीट नसल्यामुळे दुर्दैवी घटना घडतात. अशा प्रकारच्या घटना भविष्यात घडू नयेत, देवस्थानाच्या ठिकाणी चेंगराचेंगरीमध्ये माणसे मृत्यूमुखी पडू नयेत यासाठी शासनाने योग्य उपाय योजावेत एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : नियम 97 अन्वये दिलेल्या प्रस्तावावर किती मा.सदस्य बोलू इच्छित आहेत हे कृपया मला समजले तर चर्चेसाठी देण्यात येणा-या अडीच तासाच्या वेळेचे मला वाटप करता येईल. कामकाजपत्रिकेवर नियम 97 अन्वये प्रस्ताव देणा-या मा.सदस्यांची नावे असली तरी आता बोलू इच्छिणा-या सदस्यांची नावे माझ्याकडे आली पाहिजेत.

श्री. मधुकर चव्हाण : माझा हरकतीचा मुद्दा आहे. या प्रस्तावावर भारतीय जनता पार्टीचे पाच मा.सदस्य बोलणार असून सह्यासहीत त्यांच्या नावांची यादी सचिव श्री. कळसे यांच्याकडे आम्ही दिलेली आहे. तरी देखील आम्हाला नावे देण्यास सांगितले जाते हे बरोबर वाटत नाही. दुस-यांदा असा प्रकार होत आहे.

श्री. अरविंद सावंत : खरे म्हणजे ज्या ज्या माननीय सदस्यांची दिलेल्या प्रस्तावावर नावे असतात त्यांना बोलण्याची संधी मिळाली पाहिजे. सभागृहामध्ये अर्थसंकल्पावरील चर्चेच्या वेळी किंवा पूरक मागण्यांवरील चर्चेच्या वेळी बोलू इच्छिणा-या सदस्यांच्या नावांची यादी करणे मी समजू शकतो. परंतु प्रस्तावावर ज्या ज्या मा.सदस्यांची नांवे आहेत, त्यांना बोलण्याची संधी दिली गेली पाहिजे.

**तालिका सभापती** : प्रस्तावावर जेवढया मा.सदस्यांची नावे आहेत त्या प्रत्येक मा.सदस्यांना तुम्हाला प्रस्तावावर बोलायचे आहे काय, अशी मी त्यांना विचारणा करावी अशी मा.सदस्यांची अपेक्षा आहे काय ? जे मा.सदस्या या प्रस्तावावर बोलू इच्छित आहेत. त्यांनी आपली नावे सभापतींकडे देणे आवश्यक आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदया, अगोदर नावे दिलेली असतील आणि ती नावे आपल्या पर्यन्त आली नसतील तर ते योग्य आहे काय ?

**तालिका सभापती** : नावे दिली असतील आणि ती येथे आली नसतील तर ते अयोग्य आहे. ती नावे आली पाहिजेत. आता मा.सदस्य श्रीमती कांता नलावडे भाषण करतील.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ KGS/ MHM/ MAP/ पूर्वी श्री. खंदारे 18:55

श्रीमती कांता नलावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नियम 97 अन्वये मा. सदस्य डॉ. नीलम गो-हे यांनी महाराष्ट्रातील देवस्थाने यांची व्यवस्था आणि भाविकांच्या सुरक्षिततेच्या संदर्भात जी अल्पकालीन चर्चा उपस्थित केलेली आहे त्या चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभी आहे.

मांढर देवीची घटना ही काही नैसर्गिक घटना नाही किंवा देवाचा प्रकोप होऊन घडलेली घटना नाही. खरे म्हणजे अशा प्रकारच्या यात्रांमधून अनेक निरपराध बळी गेलेले आहेत. अशा प्रकारच्या दुर्दैवी घटनांमुळे प्रत्येक देवस्थानाच्या व्यवस्थापनाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. मांढर देवी हे देवस्थान सातारा जिल्हयातील वाई तालुक्यातील वाईगावापासून 22 कि.मी. अंतरावर आहे. त्याठिकाणी दरवर्षी पौष पौर्णिमेला मोठी यात्रा भरते.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MHM/ KGS/ SBT/ MAP/ प्रथम शिगम 19:00

श्रीमती कांता नलावडे...

आणि या यात्रेला प्रत्येक वर्षी लाखो भाविक येतात. महाराष्ट्रातली सर्वात मोठी यात्रा मांढरादेवी येथे भरते. या यात्रेत कोटयावधी रुपयांची उलाढाल होते. या यात्रेस जवळपास चार ते साडेचार भाविक आले होते. या यात्रेस साधारणत: किती भाविक येतात याचा प्रशासनाने आधी विचार केला पाहिजे होता. महाराष्ट्रात ज्या ज्या ठिकाणी अशा प्रकारच्या मोठया यात्रा भरतात, त्या ठिकाणी जे विश्वस्त असतील किंवा प्रशासकीय अधिकारी असतील, सामाजिक संस्था असतील, यांची एक समिती असावयास पाहिजे. त्या समितीच्या बैठका यात्रेच्या पूर्वी झाल्या पाहिजेत. त्या बैठकांमधून अशा यात्रेंचे नियोजन व्हावयास पाहिजे. प्रत्येक वर्षी लाखो भाविक या ठिकाणी येतात. या वर्षी मांढरादेवी यात्रेस चार ते साडेचार भाविक येण्याची शक्यता आहे असे गृहीत धरुन प्रशासनाने त्या संदर्भात व्यवस्था का केली नाही ? या वर्षी ही यात्रा मंगळवारी आली होती. मंगळवार हा देवीचा वार आहे. त्याच बरोबर 26 जानेवारी हा शासकीय सुटीचा दिवस होता. त्यामुळे मोठया संख्येने भाविक या यात्रेस उपस्थित होते. ही दुर्घटना 25 तारखेस दुपारी 11.30 वाजता घडलेली आहे. आपण त्या ठिकाणी गेलात तर आपल्याला दिसून येईल की, देवीच्या मंदीरात जाण्यासाठी अतिशय चिंचोळा रस्ता आहे. देवीच्या दर्शनासाठी पाच-पाच रांगा लावण्यात आलेल्या होत्या. त्याच बरोबर देवीचे देव्हारे घेऊन भक्त त्या देवीस जात असतात. त्यावरुन तेथे यात्रेकरुनंची एकमेकाशी वादवादी झ ाली. त्या वादावादीचे भांडणात रुपांतर झाले. या ठिकाणीच पोलिसांची चूक झालेली आहे. पोलिसांनी त्या ठिकाणी लाठीहल्ला केला. पोलिसांनी लाठीहल्ला केला नसता तर पुढचा गोंधळ झ ाला नसता असे मला वाटते. या ठिकाणी लाखोने भाविक येत असतात त्या प्रमाणे हजारो पशुंचे बळी या यात्रेत दिले जातात. त्या देवीला नवस म्हणून बक-यांचे बळी दिले जातात, कोंबडयांचे बळी दिले जातात. याबाबतची कल्पना असून सुध्दा त्यासंदर्भात व्यवस्था केली गेली नव्हती. या ठिकाणी आंगणेवाडीचा उल्लेख केला गेला. नाशिक येथे कुंभमेळयात सुध्दा चेंगराचेंगरीने अनेक भाविक मृत पावले होते. मुंबईत सिध्दी विनायकाचे देवस्थान आहे. त्या ठिकाणी दर मंगळवारी भाविकांची खूप गर्दी होत असते. ज्या दिवशी संकष्टी चतुर्थी असते त्या दिवशी तर दर्शनासाठी भाविकांची प्रचंड गर्दी होत असते. ती गर्दी पाहिल्यानंतर या ठिकाणी देखील अशा प्रकारची घटना घडेल की काय अशी शंका कधी कधी निर्माण होत असते. कारण या ठिकाणी देखील देवळास लागूनच पुजेच्या साहित्यांची दुकाने आहेत. मांढरादेवी मंदीराच्या 100

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MHM/ KGS/ SBT/ MAP/ प्रथम शिगम 19:00

श्रीमती कांता नलावडे..

मिटर अंतरावर पुजेच्या साहित्यांची दुकाने न ठेवता ती मंदीरास लागूनच उभारण्यात आली होती. महाराष्ट्रातील शिगणोबा, क-हाडच्या जवळ पाली आहे त्या ठिकाणी पालीचा खंडोबाचे तीर्थक्षेत्र आहे. तेथे सुध्दा लाखो भाविक दर्शनासाठी येत असतात. या वर्षी मी त्या ठिकाणी दर्शनासाठी गेले होते. या यात्रेत प्रशासकीय अधिका-यांचे काहीही नियंत्रण नव्हते. एक-दोन पोलीस फक्त बंदोबस्तासाठी ठेवण्यात आले होते. लाखो भाविकांवर एक-दोन पोलीस कसे काय नियंत्रण आणू शकतात. 12 सप्टेंबर रोजी प्रतापगडावर प्रतापगड उत्सव समितीचे शिवभक्त मोठया संख्येने येणार असे कळल्या बरोबर त्याच जिल्हयाच्या प्रशासकीय अधिका-यांनी पोलिसांची रचना व्यवस्थित केलेली होती. व्यवस्थित नियोजन केलेले होते. प्रतापगडावरील अफझलखानाच्या थडग्याला धक्का लागू नये म्हणून या भक्तांकडून धक्का लागू नये म्हणून व्यवस्थितपणे नियोजन करण्यात आले होते. या शासनाला अफझलखानाच्या थडग्याची काळजी आहे.मांढरदेवीला यात्रेस लाखो भक्त येतात त्या ठिकाणी प्रशासनाने तशी व्यवस्था का केली नाही. प्रशासनाने कोणत्याही प्रकारचे नियोजन केले नाही म्हणून ही मोठी दुर्घटना या ठिकाणी घडलेली आहे. तुळजापूर येथील देवस्थान हे खाजगी विश्वस्तांकडे आहे. त्या विश्वस्तावर शासनाचा प्रशासकीय एकही प्रतिनिधी नाही. त्यांना वाटेल त्या प्रमाणे कारभार चालतो. तेथे भाविकांमध्ये चेंगराचेंगरी होत असते, महिलांना मोठया प्रमाणात लुबाडले जात असते. असे प्रकार त्या ठिकाणी वारंवार होत असतात. शेगाव येथे सुध्दा असाच प्रकार आहे. शेगाव येथे दररोज हजारोंच्या संख्येने त्या ठिकाणी भक्त जात असतात. दुर्देवाने सांगावे लागते की, ज्या ज्या ठिकाणी अशा प्रकारच्या यात्रा असतात, त्या त्या ठिकाणी महिला भक्तांची संख्या जास्त प्रमाणात असते. मांढरादेवीच्या यात्रेत झालेल्या चेंगराचेंगरीमध्ये महिला आणि मुलींची संख्या जास्त आहे.

यानंतर श्री. कानडे..

`

अस्धारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

कानडे पूर्वी श्री. गिते 19.05 वा.

श्रीमती कांता नलावडे..

25 तारखेला ही दुर्घटना घडल्यानंतर 26 तारखेला मी त्याठिकाणी गेले होते. डोंगरावरील ते भयाण दृष्य पाहिले. सरकारी रुग्णालयात लाद्यांवर प्रेते ठेवलेली होती. प्रेतांवर देवीच्या साडया होत्या आणि लहान मुले आणि महिलांची प्रेते होती. चेंगराचेंगरीमुळे या लोकांचे मृत्यू झाले होते हे प्रेते पाहिल्यानंतर लक्षात येत होते. या देवस्थानचे जे विश्वस्त आहेत त्यांची कोटयवधी रुपयांची उलाढाल आहे. 91 लाख रुपयांची थैली त्यांच्याकडे होती. परंतु देवळाच्या तुटलेल्या पाय-या देखील विश्वस्तांनी दुरुस्त केलेल्या नाहीत. एवढया पैशांचे विश्वस्त काय करतात असा माझा प्रश्न आहे. पोलीस बळाचा विचार केला तर त्याठिकाणी फक्त 35 पोलीस होते. कोणी 50 होते तर कोणी 500 पोलीस होते असे सांगतात पण वस्तुस्थिती तशी नाही. फक्त 35 पोलीस त्याठिकाणी होते. 35 पोलीस काय करणार ? मुळातच भांडणे झाल्यानंतर पोलिसांनी लाठीहल्ला केला तेव्हा जो-तो आपला जीव वाचविण्यासाठी मंदिरातून सैरावैरा पळत सुटला आणि जाणा-या व येणा-या भक्तांमध्ये चेंगराचेंगरी झाली. त्याठिकाणी काही तरुण धारावी विभागातून आले होते असे त्यांच्या बोलण्यावरुन दिसून आले. ज्यावेळी आपल्या मित्राला मारले आणि तो मेला असे त्यांना कळले त्यावेळी लोकांनी दुकानांना आगी लावल्या आणि आगीचा धूर आणि ज्वाळा यामध्ये एकेकांना काही दिसत नव्हते. आगीच्या भक्षस्थानी अनेक लोक पडले आणि इकडे तिकडे पळत सुटले. याठिकाणी असलेल्या वाहनतळाचा ठेक्याचा 4 लाख 50 हजाराला लिलाव झाला होता यावरुन पोलीस यंत्रणेला गर्दीचा अंदाज येणे आवश्यक होते. असे असूनही काहीही व्यवस्था केली नाही याची जबाबदारी प्रशासनावर जाते. उपमुख्यमंत्र्यांनी दारुबंदीची घोषणा केली आहे. मात्र गडावर मोठया प्रमाणात दारु मिळत होती. भक्तांनी सांगितले की गावठी दारु उपलब्ध होती. दारुबंदीची घोषणा केली मग गडावर एवढया मोठया प्रमाणावर दारु कुठून आली ? याठिकाणी तरुण धारदार शस्त्रे घेऊन जातात याचे पोलिसांनी नियंत्रण केले नाही काय ? दुकानदारांना लुटण्यात आले. तेथील अनेक महिलांनी आम्हांला सांगितले की मॅडम धारदार शस्त्रे घेऊन दुकानदारांचे गल्ले लुटण्यात आले. मोठया प्रमाणावर गडावर दारु असल्यामुळे दारु स्वस्त आणि पिण्याचे पाणी महाग अशी परिस्थिती होती. 15 लिटर पाण्याला 40 रुपये मोजावे लागत होते. त्यामुळे अनेक लोकांना पिण्याचे पाणी सुध्दा मिळाले नाही. दर्शनासाठी पाच छोटया छोटया रांगा होत्या. प्रत्येकाला दर्शनाची घाई होती. नारळ फोडले जातात त्यातील पाण्याचा निचरा होण्यासाठी कोणतीही सोय

...2...



असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

कानडे पूर्वी श्री. गिते 19.05 वा.

श्रीमती कांता नलावडे ...

नव्हती. तसेच विविध पशुंचे बळी दिले जातात त्यांचे रक्त वाहून जाण्यासाठी किंवा ते साठविण्यासाठी कोणतीही सोय नव्हती त्यामुळे रक्त आणि नारळातील पाणी एकत्र होऊन त्यावर भक्त घसरुन पडत होते. एका ठिकाणी पाहिले की ज्याठिकाणी नारळ फोडले जातात त्याच्या पश्चिमेला झुडुपामध्ये 15-20 कोंबडया बसून होत्या. आवाज आणि किंकाळया यामुळे कोंबडयांची सुध्दा अशा प्रकारची अवस्था झाली होती. अशा प्रकारची जी देवस्थाने आहेत त्याठिकाणी यात्रा भरत असल्यामुळे भक्तांच्या झुंडीच्या झुंडी येत असतात आणि एक प्रकारे स्फोटक वातावरण तयार होत असते. अशा वेळी भडका उडण्यासाठी एक ठिणगी पुरेशी आहे.

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे ..

सभापती महोदया, या प्रस्तावावर बोलत असतांना मी मघाशी पालीचे उदाहरण दिले होते त्याचबरोबर अक्कलकोट येथे सुध्दा मोठया प्रमाणावर भक्त जमा होत असतात.परंतु तेथेसुध्दा भक्तांसाठी व्यवस्था करण्यात आलेली नाही. अष्टविनायका यात्रेच्या ठिकाणी सुध्दा भक्तांसाठी सुलभ शौचालयाची व्यवस्था करण्यात आलेली नाही.ज्या ज्या ठिकणी अशी देवस्थाने आहेत त्या त्या ठिकाणी ही व्यवस्था करणे अत्यंत आवश्यक आहे. मांढरादेवीला तर कसलीही व्यवस्था करण्यात आलेली नव्हती. तेथे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केलेली नव्हती तसेच सुलभ शौचालयाची व्यवस्था केलेली नव्हती.मोठया संख्येने त्या ठिकाणी महिला येतात परंतु तेथे सुलभ शौचालयाची व्यवस्था नसल्यामुळे त्यांची गैरसोय होत असते.मात्र तेथे दारुची मिळण्याची व्यवस्था आहे.त्या ठिकाणच्या विश्वस्तांनी दुकानदारांना बेकायदेशीर विजेची कनेक्शन्स दिली होती.त्यामुळे काही ठिकाणी वायर्स लोंबकाळत होत्या व त्यामुळे सुध्दा शॉर्ट सर्किट झाले असण्याची शक्यता आहे.या प्रश्नाकडे दुर्लक्ष झालेले आहे असे माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी सांगितलेले आहे.मांढरादेवी येथे जी दुर्घटना झालेली आहे त्यामुळे मोठया प्रमाणावर जीवित हानी झालेली आहे सरकारच्या आकडेवारीनुसार तेथे 281 जणांचा मृत्यू झाला आहे परंतु मला येथे असे सांगावयाचे आहे की, तेथे 400 लोक मृत्यूमुखी पडलेले आहेत.ही घटना घडल्यानंतर दुस-या दिवशी मी तेथे गेले होते.आपला नातेवाईक चेंगराचेंगरीत मृत्यूमुखी पडल्यानंतर काही लोकांनी परस्पर मृतदेह आपआपल्या गावी नेलेले होते त्यामुळे त्याची गणती झालेली नाही.यासबंधीची सी.डी. माझ्याकडे आहे. ती मी आपल्याकडे देते. ती पाहिल्यानंतर आपल्याला दिसून येईल की काही नातेवाईक ही प्रेते घेऊन आपल्या गावी चालले आहेत.अशा मृतांची गणती झालेली नाही. त्यामुळे मला असे सांगावयाचे आहे की या दुर्घटनेमुळे फक्त 281 जणांचे मृत्यू झालेले नाहीत तर त्यापेक्षासुध्दा अधिक जणांचे मृत्यू झालेले आहेत.या दुर्धटनेमुळे जीवित हानी झालेली आहेच परंतु त्याबरोबरच वित्त हानीसुध्दा मोठया प्रमाणावर झालेली आहे. त्या ठिकाणी जे दुकानदार होते त्यांची वित्तहानी झाली होती. त्या ठिकाणी हळदी, कुंकू,बांगडया विकणारे काही दुकानदार आहेत.त्या दुकानदारांना तहसीलदार त्रास देतात. या वस्तूची विक्री करण्यासाठी काही महिला तेथे बसतात. त्यापैकी दोन तीन महिलांनी असे सागितले की, आमच्याकडून पैसे मागितले जातात परंतु बिल मात्र दिले जात नाही. तेथे श्रीमती विजयाताई मांढरे नावाची महिला दरवर्षी हळदीकुकू

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे ...

विकण्यासाठी बसते.त्या महिलेने बिल मागितले असता तहसीलदारांनी तिला मारले होते.अशा प्रकारचे जर प्रशासकीय अधिकारी असतील तर तेथे अशा घटना घडणारच. असे मला सांगावयाचे आहे. भक्तांना किंवा दुकानदारांना सुरक्षितता देण्या ऐवजी त्यांच्याकडून पैसे घेतले जातात हे मला आपल्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे.त्या ठिकाणी बक-यांचा बळी दिला जातो आणि या बक-यांच्या कातडयांचा दोन तीन लाख रुपयाचा लिलाव दरवर्षी तेथे होत असतो यावरुन आपल्याला कल्पना येईल की ,तेथे किती मोठया प्रमाणावर भक्तगण यात्रेसाठी येत असतात.तेथील विश्वस्तांनी पाय-यांची दुरुस्ती त्वरित करावयास पाहिजे होती.पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावयास पाहिजे होती.परंतु ती करण्यात आली नाही. तेथे असेही सांगण्यात आले की, पोलीस आणि विश्वस्त यांच्यामध्येसुध्दा वादविवाद झाले होते.तेथील विश्वस्तांनी असे सांगितले होते की, यावेळी आम्ही पोलिसांना जेवण देणार नाही.पोलीस जर त्या ठिकाणी मोठया संख्येने उपस्थित असतील तर त्यांच्या जेवणाची व्यवस्था कोण करणार आहे? हा सुध्दा वाद तेथे निर्माण झाला होता या विश्वस्तापैकी काही विश्वस्त मुंबईचे होते असेही सांगण्यात आले होते. त्यांचे काही तरुण नातेवाईक वा ओळखीचे लोक त्या ठिकाणी आले होते.त्या मंडळीनी तेथे वादावादी केली होती.काही दुकानदारांनी आकडे टाकून विजेची चोरी केली होती.वीज चोरी करणा-याच्या विरुध्द जर शासन पावले टाकत असतील तर या ठिकाणी शासनाचे लक्ष का गेले नाही? तेथील दुकानदारांना अधिकृत व पुरेसा वीज पुरवठा का केला नाही ? जर त्यांना अधिकृत वीज दिली असती तर त्यांनी आकडे टाकून चोरुन वीज घेतली नसती.तेथे दारु विकली जात होती तेव्हा तेथील दुकानदारंना दारुचे लायसन्स दिले होते काय ? की त्या ठिकाणी बेकायदेशीरपणे दारुची विक्री सुरु होती? त्या ठिकाणी जे दूरध्वनी होते त्याचे नंबर्स बदललेले होते.यात्रेच्या वेळी तेथील प्रशासकीय अधिका-यांना किंवा यात्रेसाठी येणा-या यात्रेकरुंना तेथील बदललेले नंबर्स देण्यात आलेले नव्हते. त्यामुळे कोणताही नंबर फिरवला तरी "रॉग नंबर" एवढेच उत्तर दिले जात होते.एकही फोन लागत नव्हता. घरामध्ये जर एखादा लहानसा कार्यक्रम करावयाचा असला तरी त्याचे नियोजन आपण करीत असतो. परतु एवढया मोठया प्रमाणावर यात्रा असतांना तेथील प्रशासकीय अधिकारी, विश्वस्त, स्वयंसेवी संस्था तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी या सर्वानी मिळून नियोजन करावयास पाहिजे होते.लोकांनी व्यवस्थित रांगा लावण्यास होमगार्डसना सांगता आले

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे ....

असते व त्यांची मदत घेता आली असती.मुंबईमध्ये अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणपतीच्या विसर्जनासाठी लाखोच्या संख्येने भाविक जात असतात. त्या ठिकाणी सर्व प्रकारची चोख व्यवस्था असते अशा प्रकारची व्यवस्था देवस्थानाच्या ठिकाणी का केली जात नाही? मी मघाशी प्रतापगडाच्या संदर्भात सुध्दा उदाहरण दिलेले होते. ..

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/KGS/MAP. श्री. गायकवाड नंतर --- 19:15

श्रीमती नलावडे ....

काही सूचना मला या निमित्ताने करावयाच्या आहेत. अध्यक्ष महोदय, अनेक विषय सन्माननीय सदस्या डॉ. गोऱ्हे यांनी ही चर्चा उपस्थित करताना मांडलेले आहेत त्यामुळे मी पुन्हा ते येथे सांगत नाही. परंतु अशा ठिकाणी दुर्घटना होऊ नये म्हणून आपत्कालीन समयी संयमाने वागण्याच्या दृष्टीने येणाऱ्या भक्तगणांचे प्रबोधन करण्यात आले पाहिजे. कारण शेवटी भाविकांनी देखील स्वयंशिस्त पाळली पाहिजे हे त्यांना समजून सांगितले पाहिजे. महाराष्ट्रामध्ये अशा शेकडो यात्रा होत असतात त्या दृष्टीने त्या सर्वच यात्रांच्या संदर्भात एक स्थायी समिती आपण नेमली पाहिजे. तसेच अशा ठिकाणी ज्या पशूहत्या होतात त्यावर देखील बंदी घातली गेली पाहिजे. अध्यक्ष महाराज, या पूर्वी या ठिकाणी अंधश्रद्धा निर्मूलन व्हावे म्हणून एक ठराव मी मांडणार होते पण त्या दृष्टीने आम्ही कायदा करीत आहोत त्यामुळे तुम्ही हा ठराव मांडू नका असे मला शासनाकडून, मंत्री महोदयांकडून सांगण्यात आले होते त्यामुळे मी तो ठराव येथे आणला नाही. पण देवीला बळी दिल्यामुळे, तेथे पशूहत्या केल्यामुळे देवी प्रसन्न होते अशी अंधश्रद्धा मोठ्या प्रमाणात भक्तांमध्ये आजही आहे. काल परवाच या ठिकाणी कळकी महाराजांच्या तसबिरीतून कुंकू वहात होते म्हणून अंधश्रद्धेतून तेथे मोठी गर्दी जमली होती. एक प्रकारे लोकांची फसवणूक केली जात होती. अशाच अंधश्रद्धेतून देवस्थानांचे ठिकाणी बळी दिले जात असतात. तेव्हा ही प्रथा बंद होण्यासाठी पशूहत्या विरोधी कायदा आपण केला पाहिजे. त्याचबरोबर ज्या ज्या ठिकाणी अशा यात्रा होतात तेथे तहसिलदार, पोलीस अधिकारी, महसूल यंत्रणेचे अधिकारी, होमगार्डचे अधिकारी, लोकप्रतिनिधी तसेच स्वयंसेवी संस्था या सर्वांबरोबर तेथील विश्वस्त मंडळाने यात्रेपूर्वी नियोजनाच्या दृष्टीने बैठका घेतल्या पाहिजेत आणि त्या सर्वांची एक समिती यात्रेच्या काळात तेथे निर्माण केली पाहिजे आणि त्या समितीने प्रत्येक यात्रेच्या दोन दिवस वा दोन आठवडे अगोदरपासून तेथील व्यवस्था, नियोजन वगैरे बाबत लक्ष घालून सर्व सोयी तेथे उपलब्ध करून दिल्या पाहिजेत आणि जी समिती आपण निर्माण तेथे करणार आहात त्या समितीचे कार्यालय देखील तेथे असले पाहिजे. तसेच यात्रेच्या ठिकासणी पोलीस चौकी असणे देखील अत्यंत गरजेचे आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र मांढरदेवी यात्रेच्या ठिकाणी कोठेच नव्हते किंवा ॲम्ब्युलन्सची वा तत्सम अशी कोणतीही व्यवस्था तेथे नव्हती. इतर यात्रांच्या ठिकाणी देखील अशी व्यवस्था असतेच असे नाही. तेव्हा ही व्यवस्था देखील यात्रेच्या ठिकाणी असणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच अग्निशामक दलाचीही व्यवस्था

.... 3एच 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती नलावडे ...

मांढरदेवी यात्रेच्या ठिकाणी नव्हती. त्या दृष्टीने देखील यात्रांच्या ठिकाणी व्यवस्था केली गेली पाहिजे. तसेच तक्रार निवारण केंद्र देखील असले पाहिजे. यात्रेमध्ये लहान मुलेच काय पण मोठी माणसे देखील चुकतात, गर्दीमध्ये हरवतात त्यादृष्टीने ही सोय असणेही आवश्यक आहे. तसेच गाड्यांच्या पार्कींगची देखील व्यवस्था असणे आवश्यक आहे. अशी व्यवस्था करण्यावरूनही अनेक वाद झालेले लक्षात येतात. अध्यक्ष महाराज, मांढरदेवी यात्रेच्या ठिकाणी ही भीषण दुर्घटना घडून गेल्यानंतर तिसऱ्या दिवशी ज्या ठिकाणी ही दुर्घटना घडली तेथून जरा दूर अंतरावर, सुमारे 50 मीटर अंतरावर झुडुपामध्ये 15 वर्षे वयाच्या युवतीचे प्रेत सापडले होते. तेथून इतक्या दूरवर हे प्रेत सापडले होते आणि तेही तीन दिवसांनंतर, तेव्हा तिच्यावर अत्याचार झाला होता किंवा काय, तिचा मृत्यू कशामुळे झाला असावा याबाबत काहीच कळू शकले नाही. त्या डोंगरावर मृत्यूचे तांडव झाले होते तेथे काही समाजकंटक देखील होते आणि त्यांनी त्यावेळी हा आमचा नातेवाईक आहे, ही बाई आमची नातेवाईक आहे असे सांगून प्रेताच्या अंगावरील दागिनेदेखील लुबाडले आहेत, ही यातील मनाला अतिशय वेदना देणारी गोष्ट आहे. तेथे आम्हाला एक 25 वर्षे वयाचा तरूण भेटला होता त्याने सांगितले की, तो देवीच्या दर्शनासाठी आपल्या पत्नीला घेऊन आलो होता आणि तिच्या अंगावर काही दागिने होते. पण चेंगराचेंगरीमध्ये सापडली आणि त्यात तिचा मृत्यू झाला पण जेव्हा तिचे प्रेत मिळाले तेव्हा तिच्या देहावर सोन्याचा फुटका मणी देखील नव्हता. इतकी लुटालुट तेथील समाजकंटकांनी केली होती. तेव्हा अध्यक्ष महाराज, या यात्रांच्या ठिकाणी होणाऱ्या, अंधश्रद्धांमधून होणाऱ्या बळी देण्याच्या प्रथा बंद केल्या पाहिजेत. या माध्यमातून मला सांगावेसे वाटते की, नाशिक येथील कुंभमेळा, साताऱ्यातील काळूबाईची जत्रा म्हणजेच मांढरदेवीची यात्रा, औंध येथील यमाई देवीची यात्रा होते, त्या ठिकाणी देखील देवीचे देऊळ उंचावर आहे आणि तेथेही मोठ्या संख्येने भाविक येत असतात. ....

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( यानंतर श्री.जागडे ..... 3आय 1 ...

श्रीमती कांता नलावडे.....

मांढरादेवीला दुर्घटना घडल्यानंतर औंधच्या यात्रेच्या वेळी भाविकांची संख्या रोडावलेली दिसली. याचे कारण भाविक घाबरले होते. आपल्या प्राणाचे काय होईल या भीतीने भाविक त्या यात्रेला गेले नाहीत. सभापती महोदय, या अल्पकालीन चर्चेच्या माध्यमातून माननीय सदस्या श्रीमती नीलम गो-हे यांनी एक गंभीर प्रश्न या सदनात मांडला आहे. त्यामुळे या घटनेकडे शासन संवेदनशीलतने पाहील. यापुढील काळात आम्ही ज्या सूचना केल्या आहेत, त्या सूचनांचे पालन शासन करील. भक्तांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने शासन योग्य ती काळजी घेईल. सभापती महोदय, मांढरादेवी या ठिकाणी जी दुर्घटना झाली, त्या दुर्घटनेला जे प्रशासकीय अधिकारी जबाबदार आहेत, त्या सर्व प्रशासकीय अधिका-यांच्या विरुध्द कारवाई होणे गरजेचे आहे. कारण त्यांच्यामुळेच ही दुर्घटना घडली आहे. या यात्रेची व्यवस्था कशी करण्यात आली होती, याचा प्रश्न त्यांना मा. मंत्रिमहोदयांनी विचारावयाला पाहिजे होता. पोलीस कमी का होते ? तसेच इतर आवश्यक त्या सोयी आणि सुविध का नव्हत्या ? सभापती महोदय, त्या दिवशी पौर्णिमा असूनसुध्दा ती काळी पौर्णिमा ठरली आणि मृत्यूंचे तांडव या महाराष्ट्राला बघावे लागले. सर्व देशामध्ये याचे पडसाद उमटले आहेत. तेव्हा आता तरी प्रशासनाला जाग यावी.

धन्यवाद.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदया, दुर्देवाने मांढरादेवी या ठिकाणी झालेल्या दुर्घटनाच्या अनुषंगाने मी बोलत आहे. विविध तिर्थक्षेत्र, त्या ठिकाणी होणा-या यात्रा, त्यासाठी घ्यावी लागणारी काळजी आणि त्या संबंधातील सूचना या बाबतची चर्चा या ठिकाणी उपस्थित करण्यात आली आहे. ही गोष्ट खरी आहे की, मांढरादेवीच्या यात्रेच्या वेळी ही दुर्घटना घडली आहे. शासकीय आकड्यानुसार 291 यात्रेकरुंचा त्या ठिकाणी दुर्देवी अंत झाला आहे. या देशात किंवा जगात कित्येक वर्षे, काही ठिकाणी कित्येक शतके तर काही ठिकाणी त्याही पेक्षा अधिक काळ यात्रा होत असतात. हजच्या यात्रेचे मी उदाहरण देईन. सभापती महोदया, त्या त्या काळानुसार वाढणारी लोकसंख्या, त्या त्या काळानुसार बदलणारे प्रश्न, त्या काळानुसार निर्माण झालेल्या समस्या या अनुषंगाने या सर्व गोष्टींचा विचार केला पाहिजे. शेकडो वर्षे या ठिकाणी यात्रा भरत आहेत. शेवटी अनेक वर्षानंतर अशा प्रकारची दुर्घटना घडत असते. तेव्हा त्याला आपण अपघात म्हणत असतो. सभापती महोदय, हा अपघात टाळता आला असता. मी तर असे म्हणेन की, मांढरादेवी यात्रेच्या दुर्घटनाच्या निमित्ताने यापुढे होणा-या यात्रांबाबत आपण कोणती काळजी घेतली पाहिजे. त्या ठिकाणच्या ट्रस्टने, त्या ठिकाणी स्थानिक स्वराज्य संस्थांनी, लोक प्रतिनिधींनी तसेच सामाजिक संस्थांनी अशा दुर्घटना टळण्यासाठी काय काळजी घेतली पाहिजे, याचा सांगोपांग विचार करण्याची आवश्यकता आहे. ही आजच्या काळाची गरज आहे, असे मी समजतो. कारण शेवटी यात्रा या होत राहणार. आपण या ठिकाणी श्रध्दा आणि अंधश्रध्देबाबत खूप चर्चा केली आहे. माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुळकणी आणि श्रीमती कांता नलावडे यांनी अंधश्रध्दा निर्मुलनाच्या कायद्याबाबत सांगितले आहे. कायदा होईल किंवा न होईल हा भाग वेगळा आहे. कायदा झाल्यानंतर अंधश्रध्दा मोडून पडणार आहे, नष्ट होणार आहे. असे नाही. मी आपणाला एकच सांगतो की, विज्ञानाच्या युगामध्ये अमेरिका फारच पुढे गेली आहे. अमेरिकेचे पहिले यान जेव्हा चंद्रावर जात होते, त्यावेळी ते यान सुखरुप परत यावे, तसेच त्या यानातील माणसे सुखरुप परत यावीत, यासाठी अमेरिकेतील सर्व चर्चमध्ये प्रार्थना झाल्या होत्या. याला तुम्ही काय म्हणणार ? तेव्हा कायद्याच्या निमित्ताने फार मोठे घडणार आहे, असे नाही.

( यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार...

सभापती महोदया, पहिला मुद्दा असा की, महाराष्ट्रामध्ये मी आपल्याला एकच उदाहरण देतो. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी भारताचे पहिले राष्ट्रपती माननीय राजेंद्र प्रसाद यांना एक योजना दिली. ती योजना या देशात ज्या ठिकाणी यात्रा घडतात त्या ठिकाणी यात्रेकरुंना न बोलाविता लक्षावधी माणसे त्या ठिकाणी येतात. त्या लक्षावधी माणसांच्या मनाला, एकूण विचारांना धार्मिकतेबरोबर सामाजिक जाणीव देऊन तिला वळण कसे लावता येईल याची एक उत्तम योजना 1952-53 मध्ये सादर केली. दुर्दैवाने ती योजना पुढे साकार झाली नाही. त्यावेळी त्यांनी एक वाक्य वापरले की, "ज्याठिकाणी न बोलाविता लक्षावधी माणसे मोठया श्रध्देने जमतात त्यांना देवभक्तीबरोबर देशभक्तीची जोड कशी देता येईल , त्यांचे उत्तम चांगल्या प्रकारचे प्रबोधन कसे करता येईल , त्यांच्यामध्ये जागृती कशी करता येईल" . ही योजना त्यांनी मांडली होती परंतु ती साकार झाली नाही. परंतु या सदनामध्ये होत असलेली चर्चा पाहिल्यानंतर मांढरदेवी यात्रेच्या निमित्ताने या ठिकाणी आपण आपले मुद्दे परस्पर बोलतांना विसरुन जातो . मी या ठिकाणी सांगतो की, शेवटी शासन प्रशासन हे आपल्या परीने काही तरी करीत राहील. मांढरदेवी यात्रेत घडलेली दुर्घटना म्हणजे त्याठिकाणी निश्चित नियोजनाचा अभाव, प्राथमिक सोयींचा अभाव होता. मी 15 वर्षे पंढरपूरचा विश्वस्त होतो, मी पाहिले आहे. पंढरपूरला यात्रा शेकडो वर्षे भरते त्याठिकाणी अलिकडच्या काळात आषाढी असो कार्तिकी यात्रेच्या अगोदर स्थानिक लोकप्रतिनिधी जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त, स्थानिक स्वराज्य संस्था आणि त्या ठिकाणी असलेले विश्वस्त मंडळ... पूर्वी त्याठिकाणी बडवे व उपाध्यायांचे मंडळ होते. नंतर आपण कायदा करुन त्यांची अधिसत्ता घालविली. आणि कायदा करुन विश्वस्त मंडळ नेमले. मी एकच उदाहरण देतो. त्या ठिकाणी श्री. झा हे उपजिल्हाधिकारी, प्रांताधिकारी होते.. मी लहान असतांना मला आठवते की, पंढरपूरला एक छोटा असा बोळकंडा वजा रस्ता होता. त्यांनी तेथील सर्व घरे पाडली. त्यामध्ये लोकांचा सहभाग घेतला, त्यावेळी आंदोलन झाले.त्याठिकाणी असलेल्या काही दुकानदारांचे पुर्नवसन करण्यात आले. तो रस्ता रुंद झाल्यानंतर आज त्या ठिकाणी लक्षावधी लोक येतात. आषाढी एकादशीला 6 ते 7 लाख लोक येतात, प्रत्येक महिन्याच्या एकादशीला सरासरी 50 हजार लोक येतात, कार्तिकीला 4 लाख लोक येतात. चैत्र पोर्णिमेला 2 लाख लोक येतात. त्या ठिकाणी स्थानिक स्वराज्य संस्था, लोकप्रतिनिधी, प्रशासन, धार्मिक काम करणाऱ्या संस्था, किर्तनकार,

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार...

प्रवचनकार यांचे सहकार्य बरोबर नसेल रस्ता रुंद करुन सुध्दा लोक दुकाने थाटतांना 5-6 फूट पुढे रस्त्यावर कशी आणता येतील असा प्रयत्न करु लागले. माननीय गृह राज्यमंत्री हे त्या जिल्हातील आहेत. त्यांना हे पटत असेल. मी प्रामाणिकपणे सांगतो की, त्याठिकाणी आमदार असेल, खासदार असेल, नगराध्यक्ष असेल, नगरसेवक असेल या सर्वांनी या साठी सहकार्य केले पाहिजे. परंतु त्यांच्याकडून सहकार्य मिळत नाही हे मी नम्रपणे सांगतो. मी 16 वर्षे विश्वस्त म्हणून काम केले. त्या ठिकाणी नम्रपणे सांगतो की, लोकांची सोय व्हावी याकरिता रस्ता रुंद केला. पुन्हा 5-5 फूट दुकाने पुढे आली. रोड डिव्हाईड केला आहे. त्याठिकाणी महाव्दार व भक्तमार्ग वेगळा आहे. त्या ठिकाणी लोक आकडे टाकून वीज घेतात. त्या ठिकाणी गर्दी बघितल्यानंतर काळजी घेतली पाहिजे. त्यासाठी या सर्व गोष्टींचा साकल्याने विचार करुन महाराष्ट्र सरकारने त्यावेळचे माननीय मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांनी त्यावेळच्या सरकारी प्रशासनाने गृहमंत्र्यांनी सर्वांनी मिळून तीर्थक्षेत्र विकास योजना आखली. पहिल्या टप्प्यामध्ये पंढरपूर, तुळजापूर, शेगाव देहूआळंदी ही पाच तीर्थक्षेत्रे घेतली. टप्प्या टप्प्यानें त्यामध्ये आणखी तीर्थक्षेत्रांची भर पडत गेली. आणि त्या ठिकाणी दरवर्षी किती निधी कशासाठी द्यावा, त्याचा वापर कसा करावा याचे एक नियोजन करण्याचा प्रयत्न केला. मी नम्रपणे सांगतो की, पूर्वी पंढरपूरला स्ट्रीटलाईच्या वरुन तारा होत्या. त्या वीजेच्या तारा जमिनीखालून गेल्या आहेत. टोपल्यांचे संडास होते, गटार योजना नव्हती. कॉलऱ्याच्या साथीने लोक पंढरपूरला त्रस्त होत होते. बहुतांशी टोपल्यांचे संडास गेले आहेत, व ड्रेनेज लाईन आल्यामुळे आधुनिक काळातील संडास आल्यामुळे बरीचशी घाण आरोग्याच्या दृष्टीने दूर झाली आहे. आता मुद्दा असा आहे की, लोकांनी त्याचा वापर कसा करावयाचा?

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार . . . .

मी याठिकाणी सांगू इच्छितो की, आता त्याठिकाणी हजारो फॅब्रीकेटेड संडास होत आहेत. स्ट्रीट लाईटच्या बाबतीत सुध्दा तेथे जमिनीखालून वायर टाकण्यात आलेल्या आहेत. अशा योजना आखल्या जात आहेत. मघाशी आमच्या ताईंनी एवढया तीर्थक्षेत्रांची नावे घेतली आणि ती खरी गोष्ट आहे की, तुम्ही एखाद्या गावामध्ये गेल्यानंतर, एखाद्या तालुक्यामध्ये गेल्यानंतर प्रत्येक ठिकाणी तीर्थक्षेत्र आहे आणि त्याठिकाणी कमी-अधिक प्रमाणात गर्दीही आहे. मी मघाशी सांगितले की, पंढरपूरच्या यात्रेपूर्वी तेथे एक बैठक घेतली जाते.मांढरादेवी देवस्थानाच्या बाबतीत मला आता सांगण्यात आले की, तेथील जो ट्रस्ट आहे किंवा न्यास आहे हा खाजगी आहे. त्या मंदिरामध्ये खाजगी हक्क आहेत. मग काय होते ? तर तेथे पैसे घेऊन, हप्ते घेऊन मग त्यात प्रशासकीय अधिकारी असतील किंवा त्या ट्रस्टमधील लोक असतील, दुकाने कुठेही थाटली जातात. म्हणजे ज्याठिकाणाहून लोकांचा जाण्याचा मार्ग आहे, त्याठिकाणी दुकाने थाटावयाची. मघाशी मी सांगितले की, पंढरपूरला डिव्हायडर केलेला आहे. पण त्या डिव्हायडरवर लोकांनी दुकाने थाटली. त्याला आम्ही विरोध केला, तर तेथील स्थानिक लोकप्रतिनिधी आम्हाला विरोध करण्यासाठी तेथे आले हे मी अतिशय नम्रपणे सांगतो. मी आपल्याला एक उदाहरण देतो. ठाणे येथे एक सेवाभावी संस्था आहे, अध्यात्मिक संस्था आहे. पुरंदरच्या पायथ्याजवळ नारायणपूरला नारायण महाराज आहेत. त्यांचे एक गुरुसेवा मंडळ आहे. त्यांचे जवळजवळ 500-600 लोक मंदिर समितीच्या सहकार्याने, स्वयंस्वेच्छेने तेथे येतात. एकाही पै चे मानधन घेत नाहीत आणि तेथे ते अतिशय उत्तम काम करीत आहेत. शेवटी पोलीस 2 होते की 35 होते यापेक्षाही स्वयंशिस्त महत्वाची आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताईंनी सांगितल्याप्रमाणे त्याठिकाणी अवैध दारु आणि पशुहत्या होते. आपण पशुहत्याच्या कायद्याचा उल्लेख केला. माझ्या माहितीप्रमाणे आपण पशुहत्या बंदीचा कायदा केलेलाच आहे. एवढेच नव्हेतर संत गाडगे महाराज, संत तुकडोजी महाराज, संत कैकाडी महाराज, संत तनपूरे महाराज अशा अनेक संतांनी जनतेचे प्रबोधन करुन, जी कल्पना तुकडोजी महाराजांनी मांडलेली होती, त्याप्रमाणे प्रबोधन करुन लोकांना सांगितले. तनपुरे महाराजांच्या गावी पाथर्डीला दगडवाडी नावाचे एक गाव आहे. ते दगडवाडी येथे देवीच्या यात्रेला कोंबडे, बकरे मारले जात नाहीत. शेवटी तुम्ही-आम्ही या सगळया गोष्टींचे प्रबोधन करणार आहोत की नाही ? आपण देवीच्या दर्शनासाठी जातो आणि देवीच्या पायाखाली असलेल्या दैत्यासाठी दारुचा नेवैद्य

. . . . 3 के-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार . . . .

लागतो. काय भयानक आहे हे मला समजत नाही. ताई, आपण तुळजापूरचा उल्लेख केला.

श्री.अनंत तरे : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे. काही धर्माच्या प्रथा आहेत, श्रध्दा आहेत. बकरी ईदला बक-याचा बळी दिला जातो . . . . .

श्री.उल्हास पवार : सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरेसाहेब, बरोबर आहे. तुमचा मुद्दा . . . .

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे, यांनी आपल्या भाषणात मुद्दे मांडावेत.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरेसाहेब, तुमचा मुद्दा अतिशय बरोबर आहे. मी अगोदरच सांगितले की, श्रध्दा ही गोष्ट अशी आहे की श्रध्दा आणि अंधश्रध्दा यात फरक करणे आणि त्यावर मात करणे ही अतिशय अवघड गोष्ट आहे. मी आपल्याला अगोदरच सांगितले आहे.

श्री.अनंत तरे : सभापती महोदया, यावर सातत्याने चर्चा होत आहे. याठिकाणी प्रत्येक धर्माच्या काही भावना असतात. कोणालाही . . . .

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य आपले मुद्दे मांडत आहेत . . . .

श्री.अनंत तरे : सभापती महोदय, यामध्ये आमच्या श्रध्देला हात घातला जात आहे. ईदला बकरे कापले जातात, त्याबद्दल बोलावे.

(काही सन्माननीय सदस्य एकदम बोलतात)

**तालिका सभापती** : पशुहत्तेबद्दल सन्माननीय सदस्या नीलमताई बोलल्या, सन्माननीय सदस्या श्रीमती कांताताईही बोलल्या आहेत. सन्माननीय सदस्य आपल्यापरीने त्यांचा मुद्दा मांडत आहेत. कृपा करुन आपण आपल्या भाषणाच्या वेळी बोलावे.

(काही सन्माननीय सदस्य बोलतात)

**तालिका सभापती** : मी कोणालाही बोलण्याची परवानगी देत नाही.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, मी सांगितले की, त्यांच्या भावनांच्या बाबतीत माझा विरोध नाही. मी सहमतच आहे. मग मला असे सांगा की, संत गाडगेबाबांना, संत तुकडोजी महाराजांना कोणी विरोध केला का ? मी असे म्हणत आहे की, याबाबतीत लोकांचे प्रबोधन करावे.

. . . .3 के-3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार . . . .

लोकांनी प्रबोधन ऐकले तर ठीक आहे, नाही ऐकले तरीही ठीकच आहे. मग ती व्यक्ती कोणत्याही धर्माची असेल. मी मघाशी अमेरिकेचे उदाहरण का दिले ? म्हणजे अंधश्रध्दा ही प्रत्येक धर्मामध्ये आहे.

श्री.अनंत तरे (खाली बसून) : देव सोमरस घेत होते, म्हणजे काय ?

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय,तरेसाहेब, मला एक सांगा की, देवीच्या पायाखाली असलेल्या दैत्याला दारु लागते म्हणून आपण जर दारु पिऊ लागलो तर ते योग्य आहे का ? धार्मिकदृष्टया तरी योग्य आहे का ? श्रध्देच्या दृष्टीने तरी योग्य आहे का ? हे मी अतिशय नम्रपणे सांगतो. शासनाच्या ज्या चुका असतील, प्रशासनातील जे अधिकारी असतील आणि ज्यांनी वेळेवर याचे नियोजन केले नसेल, ज्यांनी वेळेवर याबाबतीत सभा घेतली नसेल, बैठका घेतल्या नसतील यामध्ये जे-जे दोषी असतील, त्या सर्वांवर आपण योग्य ती कारवाई, योग्य तो इलाज केलाच पाहिजे. म्हणून मी पंढरपूरचे उदाहरण दिले. तेथील यात्रेच्या अगोदर दोन-दोन, तीन-तीन महिने सभा घेतल्या जातात. त्यामध्ये सर्वांना सहभागी करुन घेतात. मी तर यापुढे जाऊन असे म्हणतो की, माननीय श्री.बाळासाहेब भारदे हे 92 वर्षाचे आहेत आणि अंथरुणाला खिळून आहेत.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/ पूर्वी सौ.रणदिवे... 19:35

श्री.उल्हास पवार (पुढे चालू....

पण त्यांनी किर्तनकारांच्या संमेलनात सांगितले की, अरे, पांडुरंगाची भक्ती सांगा, भागवत सांप्रदाय सांगा, संतांचे वाङ्मय सांगा, त्यांचे अभंग सांगा, त्यांचे निरूपण करा, पण हेही किर्तनामध्ये सांगा की, चद्रभागेच्या किनारेला हागंदारीला बसू नका. शेवटी चराचे संडास हजारो केले आणि त्याचा वापर करायचा नाही, असे कोणी ठरविले तर मला सांगा, शेवटी शासन, अधिकारी, यंत्रणा या सर्वांबरोरब सामाजिक संस्था आणि भक्त आणि यात्रेकरू यांची स्वत:ची काही जबाबदारी आहे. अतिशय नम्रपणे सांगू इच्छितो की,ही सर्व तीर्थक्षेत्रे ..मी सुरुवातीला पाचच तीर्थक्षेत्र घेतली. मी आळंदीचे उदाहरण देतो. मी देहू-आळंदी परिसर विकास निधीचा 20 वर्षे विश्वस्त आहे. आपल्याला गंमत वाटेल की, एक सन्माननीय उपमुख्यमंत्री आताचे नाहीत. आळंदीला मोठा मेळावा होता, त्या समारंभामध्ये त्यांना असे वाटले की, इंद्रायणीच्या काठावर देहू आणि आळंदी येथे घाटावर काम झ ाले, ते सरकारनेच केले, असा त्यांचा समज झाल्याने भाषणात त्याबाबतचा उल्लेख ते करीत होते. नंतन मी माझ्या भाषणामध्ये अतिशय नम्रपणे सांगितले की, कोट्यावधी रुपये खर्चून आळंदी आणि देहूला इंद्रायणीच्या काठचा घाट झालेला आहे, त्यामध्ये सरकारचा एकही पैसा नाही. देहू-आळंदी विकास समिती ही वेगळी समिती आम्ही स्थापन केली. ह.भ.प.वैकुठवासी गुंडा महाराज देगलुरकर यांच्या हस्ते आम्ही त्या ठिकाणी भूमीपूजन केले. स्व.वसंतदादा पाटील, स्व.शंकरराव चव्हाणसाहेब या सर्व मंडळींना त्या ठिकाणी आम्ही नेले. श्री. साकरे महाराज, मा.श्री. बाळासाहेब भारदे, मी स्वत:आणि प्रा.कऱ्हाड हे त्या ठिकाणी ट्रस्टी आहोत.. कोट्यावधी रुपयाचे त्या ठिकाणचे अप्रतीम काम झालेले आहे. त्यामध्ये एकही पैसा शासनाचा नाही. हें मला त्यावेळेला सन्माननीय उपमुख्यमत्र्यांना जाहीर भाषणामध्ये सांगावे लागले. त्यामध्ये लोकांचा सहभाग आहे. त्या ठिकाणी 14 इंच गटार होते, शासनाची परवानगी घेऊन आम्ही 7 फूट केले. इंद्रायणी येथे बंधारा केलेला आहे त्याच्या पलिकडे गटार नेऊन सोडले. कारण लोक अस्थी विसर्जनासाठी येतात, गर्दी करतात. त्या ठिकाणचे नियोजन व्हावे म्हणून या सर्व गोष्टी केलेल्या आहेत. उत्तम घाट झालेला आहे हे मी अतिशय नम्रपणे सांगू इच्छितो. त्या ठिकाणी नगरपालिका आहे, त्या ठिकाणी किर्तनकार आहेत. त्या घाटाच्या ठिकाणी आम्ही गोमुख केलेले आहे. प्रत्येक गोमुखामध्ये फिल्टर बसविलेले आहे. तेच इंद्रायणीचे पाणी माझ्या खेड्यापाड्यातून आलेल्या पांडुरंगाच्या भक्ताच्या माऊलीला शुध्द पाणी मिळावे, म्हणून आम्ही व्यवस्था केली. पण आळंदीला जे स्थानिक लोक आहेत. मी अतिशय नम्रपणे सांगू इच्छितो की, विशेषत: त्या ठिकाणच्या

श्री.उल्हास पवार (पुढे चालू....

महिला या घाटाची एक इंच जागा रिकामी ठेवत नाहीत, त्या धुणी धुण्याचे काम करतात. त्यामुळे कोणाला त्या ठिकाणी अंघोळ करता येत नाही आणि कोणाला तीर्थही घेता येत नाही. हे पहाण्याचे काम नगरपालिकेचे, स्थानिक लोप्रतिनिधींचे, स्थानिक प्रशासनाचे काम आहे की नाही ? आम्ही त्या ठिकाणी गेल्यानंतर 2 फूटही जागा मिळत नाही. मग घाट धुणी धुण्यासाठीच बांधला आहे की काय ? शेवटी प्रशासन, जनता, किर्तनकार, भक्त या सगळयांनी मिळून त्या ठिकाणचे नियोजन केले पाहिजे. सन्माननीय सदस्या शॉर्ट सर्किटच्या संबंधाने बोलल्या. त्या ठिकाणच्या दुकानांवर पाला घातला जातो, मांडव घातला जातो, त्या ठिकाणी ज्वालाग्रही पदार्थ ठेवलेले असतात, कापूर, उदबत्ती असते या लवकर पेटणाऱ्या वस्तू आहेत. अशा ठिकाणी पाण्याची व्यवस्था नसते. माझे गाव सातारा जिल्ह्यातील असल्यामुळे आम्हाला पालीचा खंडोबाला जावे लागते. ही खरी गोष्ट आहे की, पूर्वी त्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची काहीच व्यवस्था नव्हती. आता थोडीफार झालेली आहे. त्या ठिकाणच्या मंदिराचा परिसर आहे, ज्या ठिकाणी आपण प्रवेश करतो, ज्या ठिकाणी भंडारा वरून उधळला जातो. त्यापरिसरामध्ये साधी फरशीदेखील चांगली केलेली नाही. त्या ठिकाणीही ट्रस्टचा गोंधळ आहे. तुळजापूरला जिल्हाधिकारी हे ट्रस्टचे प्रमुख आहेत. म्हणजे उस्मानाबाद जिल्ह्याचे जिल्हाधिकारी हे त्या ट्रस्टचे प्रमुख आहेत. पंढरपूरचा कायदा आणखी वेगळा आहे, शिर्डीचा कायदा आणखी वेगळा आहे. देहूला तुकोबांचे वंशज आहेत, त्यांचा खाजगी ट्रस्ट आहे. आळंदीला सरदार जगन्नाथ महाराज पंडित यांचा लोकमान्यांच्यावेळचा उल्लेख वाचतो. त्यांनी जुन्या मंडळींना घेऊन ट्रस्ट करण्याचा प्रयत्न केला, तो जुना कायदा तसाच आहे. जिल्हाधिका-यांकडे मूळ असलेल्या लोकांनी आलेल्या नावांपैकी काही नावे सुचवायची, त्यातील निवडून जिल्हाधिकाऱ्यांनी ट्रस्ट करायचा. मला या चर्चेच्या निमित्ताने सुचवावेसे वाटते की, खरी गोष्ट आहे की, काही ठिकाणी खाजगी मालकीचा ट्रस्ट केलेला आहे. अंगणवाडीच्या ठिकाणी मी सहज विचारले की, या देवस्थानचे काय, त्यावर ते म्हणाले खाजगी मालकी आहे. ज्या ठिकाणी लक्षावधी यात्रेकरू येतात, भक्त येतात त्या ठिकाणी शासनाने कायद्यामध्ये काहीतरी तरतूद करुन त्या ठिकाणी शासन नियंत्रित...त्यामध्ये हस्तक्षेप होणार नाही असे पाहिले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. तरे साहेबांच्या मताशी सहमत आहे. शासनाच्या काही मूलभूत शब्दांवर हस्तक्षेप होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. शासन नियंत्रित ट्रस्ट किंवा विश्वस्त मंडळ त्या ठिकाणी असणे ही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

श्री.उल्हास पवार (पुढे चालू....

काळाची गरज आहे. प्रत्येक ठिकाणी वेगळा ट्रस्ट, प्रत्येक ट्रस्टचा मनमानी कारभार असे होत असेल तर ते बरोबर नाही. मला सांगिले पाहिजे की, माढरदेवीच्या रस्त्यांच्याबाबतीत मी अनेक वर्षापासून पाहिलेले आहे की, वाईकडून येणारा रस्ता आणि भोरकडून जाणारा रस्ता पूर्वी अतिशय चिंचोळा होता, पूर्वी लोक बैलगाडीतून जात होते. पण आता त्या ठिकाणी उत्तम प्रकारे रस्ता रूंदीकरण करून रस्ता चांगला करण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु आरोग्याच्या बाबतीमध्ये मात्र जी काळजी घेणे आवश्यक आहे, आता प्रत्येक तीर्थक्षेत्रेच्या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र असावे की, जवळपास असावे, हा भाग चर्चेचा असू शकेल.

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ MAP/ प्रथम श्री. किल्लेदार... 19:40

श्री. उल्हास पवार..

वाईकडून येणारा रस्ता आणि भोरकडून जाणारा रस्ता पूर्वी अतिशय चिंचोळा होता. पूर्वी लोक बैलगाडीतून जात होते. आता त्या ठिकाणी उत्तमप्रकारे रस्ता रुंद करण्याचा प्रयत्न केलेला आहे. पण आरोग्याच्या बाबतीत मात्र तेथे काळजी घेणे आवश्यक आहे. प्रत्येक तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र असावे की, नसावे की, तीर्थक्षंत्राच्या जवळपास प्राथमिक आरोग्य केंद्र असावे हा चर्चेचा भाग होऊ शकेल. परंतु तेथे फिरता दवाखाना मोबाईल व्हॅन असणे ही काळाची गरज आहे. यात्रेच्या ठिकाणी अपु-या पाण्यामुळे म्हणा किंवा आणखीन काही गोष्टींमुळे गलिच्छपणा वाढतो, आरोग्य धोक्यात येते, म्हणून आरोग्याची काळजी घेण्याकरिता डॉक्टरांचे एखादे मंडळ किंवा एखादी समिती त्या ठिकाणी कार्यरत करणे, ही काळाची गरज आहे. तसेच मुबलक पाण्याची सोय असली पाहिजे. ब-याच ठिकाणी पाणी नाही. ज्या ठिकाणी तुकोबा महाराजांनी गाथा लिहिली त्या भंडारद-याच्या डोंगरावर पाणी नव्हते, त्या ठिकाणी स्वर्गीय वसंतदादा पाटील यांनी रस्ता, लाईट आणि पाणी वर पर्यंत नेलेले आहे. त्या ठिकाणी आता सप्ताह भरतात आणि पंधरा/पंधरा हजार लोक त्या डोंगरावर असतात. त्याठिक्णी वेडी-वाकडी, घाटासारखी वाट आहे आता तेथे काही ठिकाणी कठडे बांधलेले आहेत आणि रस्ते रुंद करण्याचा प्रयत्न केलेला आहे.वाहने कुठे थांबवावीत याला एक बंधनच घातले पाहिजे. जेजुरीला देखील मी जातो. जेजुरीच्या बाबतीत आपण म्हणतो. "नऊ लाख गडाला पायरी." याचा अर्थ या गडाला खूप पाय-या अहेत.पण जेव्हा एक रस्ता रुंद करुन जवळ जवळ गडापर्यंत कार किंवा इतर वाहने जातील अशी व्यवस्था करण्याची शासनाने योजना जाहीर केली की, तेव्हा तेथे आंदोलन झाले. ते आंदोलन इतके भयानक झाले की, हे नैसर्गिक सौंदर्य टिकवले पाहिजे, येथे रस्ता करता कामा नयें, पाय-यावरुनच गेले पाहिजे, असे म्हणणेही काही इतके बरोबर नाही. काही लोक पाय-यावरुन जातील, काही लोक कारने देवळापर्यंत जातील. त्यामुळे गर्दी विभागली जाईल. त्यामुळे गर्दीमुळे निर्माण होणा-या अडचणी, संकटे किंवा अपघात हे टाळले जातील,हे शेवटी तेथे सांगावे लागले. आणि बराच प्रयत्न करुन आता तो जेजुरीचा पाठिमागचा रस्ता तयार होऊ लागला आहे. सप्तश्रृंगीला पूर्वी पाय-यावरुन जात असत. आता वाहने जाण्यासाठी रस्ता तयार झालेला आहे. अशा ब-याच ठिकाणी जवळ जवळ सगळी वाहने जाण्यासाठी सोयी निर्माण झालेल्या आहेत. अशा नवीन सोयी वैज्ञानिक युगात होत

श्री. उल्हास पवार...

असताना श्रध्दा कायम ठेवून गर्दीच्या ठिकाणचे सगळे धोके टळण्याकरिता शासनाने प्रयत्न केले तर त्या प्रयत्नांना साथ, समाजाने, भक्तांनी आणि सर्वांनी द्यावी. या निमित्ताने अत्यंत मूलभूत चर्चा डॉ. नीलम गोऱ्हेनी उपस्थित केलेली आहे. केवळ चर्चाच उपस्थित केली नाही तर अतिशय चांगल्या सूचनाही त्यांनी केलेल्या आहेत. मला असे वाटते की, या चर्चेच्या निमित्ताने ज्या सूचना शासनाकडे एकत्रित होतील त्याचा साकल्याने विचार करुन सर्व महाराष्ट्रभर एक सुसुत्रता आणण्याकरिता सर्व मंदिरांना ज्या ठिकाणी अशा यात्रा भरतात त्यांना एकाच पध्दतीचा न्याय, एकाच पध्दतीची व्यवस्था कमी अधिक प्रमाणात गर्दीचे स्वरुप पाहून, जर आपल्याला करता आली तर ते अधिक सोयीचे होईल, एवढयाच या निमित्ताने माझ्या भावना व्यक्त करुन, मला बोलण्याची संधी दिली, याबद्दल मी आपले आभार मानून या ठिकाणी थांबतो. जय हिंद. जय महाराष्ट्र.

--------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे ( रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) :सभापती महोदया, मी या ठिकाणी आपले मनापासून आभार व्यक्त करतो. नियम 97 अन्वये सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी चर्चा उपस्थित केली आहे. त्याच्या अनुषंगाने काही मिनिटातच माझे विचार व्यक्त करणार आहे. हिंदु धर्माच्या प्रथा, श्रध्दा, रीतिरिवाज, धार्मिक विधी आहेत. मला कुठल्याही धर्माच्या श्रध्देला हात घालायचा नाही. परंतु हिंदू धर्माच्या ज्या काही श्रध्दा आहेत,प्रथा आहेत त्याचा अपमान झालेला आम्हाला सहन करता येणार नाही. सभापती महोदया, फक्त मी एकवीरा देवीच्या संदर्भात बोलणार आहे. एकवीरा देवी हे महाराष्ट्रातील जागृत देवस्थान आहे.कारला-लोणावळा, मावळ या तालुक्यामध्ये ते आहे. मी गेले पंधरा वर्षे त्या ठिकाणी विश्वस्थ म्हणून काम करतो. मी याठिकाणी फक्त माझे अनुभव सांगणार आहे. महाराष्ट्रामध्ये इतर देवस्थाने आहेत त्याचप्रमाणे एकवीरा देवीचे देवस्थानसुध्दा अत्यंत प्रसिध्द देवस्थान मानले जाते. या देवस्थानला राजयमंत्री श्री. पाटील यांनी भेट दिली. त्यानंतर महाराष्ट्राचे एवढे मुख्यमंत्री होऊन गेले पण कुठल्याही मुख्यमंत्र्यांना असे वाटले नाही की, या देवस्थानाला भेट द्यावी. युती शासनाचे पहिले मुख्यमंत्री आदरणीय श्री. मनोहर जोशी आणि आदरणीय बाळासाहेब ठाकरे यांनी एकत्रित त्या ठिकाणी भेट दिली, दर्शन घेतले. त्यानंतर माननीय विलासराव देशमुख साहेबांनी सुध्दा तेथे जाऊन देवीचे दर्शन घेतले.याठिकाणी यात्रेनिमित्त जवळ जवळ चार ते पाच लाख लोक एकत्र येतात. कोळी, गुणबी, सी.के.पी., सोनार या सगळयांचे कुलदैवत म्हणून या देवीकडे पाहिले जाते.

यानंतर श्री. बरवड ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे .....

परंतु खेदाने सांगावेसे वाटते की, महाराष्ट्र शासनाने या देवीच्या ठिकाणी पाच पैसे सुध्दा खर्च केलेले नाहीत. त्या ठिकाणी जाणाऱ्या महिला भगिनी असतील, असंख्य भाविक असतील त्यांच्यासाठी साधी शौचालयाची व्यवस्था नव्हती. हे देवस्थान पुरातत्व खात्याच्या अधिपत्याखाली येते. कोणतेही काम सांगितले की, पुरातत्व खात्याकडे बोट दाखविले जाते. हे पुरातत्व खाते स्वत: काही करीत नाही आणि दुसऱ्यालाही काही करु देत नाहीत अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. पाच वर्षापूर्वी त्या ठिकाणी एक पूल कोसळला. त्या पुलावर साधे छत घालण्याचे काम पुरातत्व खात्याकडून झाले नाही. शासनानेही याकडे पाहिले नाही. विश्वस्त मंडळाने सुधारणा केली. गेल्या वर्षी अर्धा भाग बनविला. ते काम सुध्दा पूर्ण झाले नाही. देवीच्या देवळाच्या पाठीमागे शितलादेवीचे देऊळ आहे. तिकडे शंकराची पिंड आहे. त्या ठिकाणाकडे जाणारा रस्ता अत्यंत अरुंद आहे. त्या बाजूने कोणत्याही प्रकारचे संरक्षण नाही. रेलींग तुटलेले आहे. पुरातत्व खात्याला वारंवार विनंती केली परंतु ते दुरुस्त करुन देत नाहीत आणि संस्थेला सुध्दा काही करु देत नाहीत. या ठिकाणी यात्रेमध्ये एखादी फार मोठी घटना घडली की, शासन जागे होते. एखादा रोग झाल्यानंतर तो रोगी बरा करण्यापेक्षा रोग्याला वर पाठविलेले बरे अशी उपाययोजना शासन करते. मांढरदेवी येथील दुर्घना घडली. त्या दुघटनेत 291 लोक मृत्युमुखी पडले. एकविरा देवीची क्षेत्रयात्रा येत्या 14, 15 आणि 16 तारखेला आहे. त्याची उपाययोजना म्हणून शासनाने मोठी कारवाई करण्याचे ठरविले. त्या ठिकाणी 60 ते 70 वर्षापूर्वीची घरे आहेत. त्या ठिकाणी देवस्थानासाठी हार, फुले, नारळ, खण या सगळया गोष्टी आवश्यक असतात. त्यासाठी काही स्टॉल्स आवश्यक आहेत. त्या ठिकाणी 60 ते 70 वर्षापासून असलेले स्टॉल्स, दुकाने गेल्या रविवारी फॉरेस्टच्या अधिकाऱ्यांनी आणि प्रांत अधिकाऱ्यांनी जाऊन संपूर्ण डिमॉलीश केले. गेले आठ दिवस त्या ठिकाणी देवीला हार सुध्दा मिळू शकला नाही अशी परिस्थिती आहे. अशी कारवाई करण्यापूर्वी त्या ठिकाणच्या नागरिकांची बैठक घेऊन ज्या गोष्टी रस्त्यात येत असतील, ज्या गोष्टी यात्रेला त्रासदायक होत असतील त्यांच्या बाबतीत निर्णय घेतला असता तर बरे झाले असते. मी या चर्चेच्या माध्यमातून माननीय मंत्रिमहोदयांना विनंती करतो. हजीमलंग गडाच्या ठिकाणी सुध्दा रस्त्यावर अशा प्रकारची घरे आहेत, रस्त्यावर स्टॉल्स आहेत, दुकाने आहेत, त्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्री. अनंत तरे ....

ठिकाणी आपण कारवाई का केली नाही ? या देवीच्या ठिकाणी पारंपारिक पध्दतीने काही स्टॉल्स आहे, घरे आहेत, पुजाऱ्याची काही घरे आहेत. गुरवांची काही घरे आहेत. आज ते लोक रस्त्यावर आले आहेत. उन्हाळयामध्ये त्यांना छत नाही. ते सर्व तोडण्यापूर्वी त्यांच्या पुनर्वसनाची व्यवस्था करण्याच्या बाबतीत विचार करावयास पाहिजे होता. ज्या ठिकाणी अशी देवस्थाने आहेत त्या ठिकाणी यात्रेला त्रास होणार नाही तसेच काही आवश्यक गोष्टी आहेत त्या गोष्टीला न्याय देण्याची गरज आहे. मी पुन्हा एकदा विनंती करीन की, त्या ठिकाणी 14 तारखेला यात्रा सुरु होणार आहे. 14, 15 आणि 16 तारखेला म्हणजे तीन दिवस यात्रा सुरु राहणार आहे. त्या काळात देवीच्या दर्शनासाठी येणारे श्रध्दाळू आहेत त्यांना फुले लागतात, हार लागतात, देवीसाठी पूजेचे सामान लागते. त्या ठिकाणी देवीचे पुजारी आहेत, गुरव आहेत त्याची राहण्याची घरे सुध्दा पाडण्यात आलेली आहेत. याचाही विचार करण्याची आवश्यकता आहे. त्या ठिकाणी आंतरराष्ट्रीय लेणी म्हणून कार्ला लेणीला मान्यता मिळालेली आहे. दोन ते पाच टक्के लोक सुध्दा लेणी पाहण्यासाठी जात नाही पण 95 टक्के पेक्षा जास्त लोक देवीच्या दर्शनासाठी येतात. अशा लोकांसाठी शासनाने एखादे सुलभ शौचालय तरी बांधण्याचा प्रयत्न केला आहे काय ? अशा लोकांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याचा प्रयत्न शासनाने केला आहे काय ? त्या ठिकाणी एखाद्या महिला भगिनीला शौचास जावयाचे असेल तर त्याची सोय नव्हती. मला सांगताना आनंद वाटतो की, हिंदुह्रदयसम्राट माननीय बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने मी आमदार झालो. कोकणातून निवडून आल्यानंतर माझा आमदार निधी त्या ठिकाणी वापरला. त्या ठिकाणी दोन सुलभ शौचालये बांधण्याचा प्रयत्न केला. ट्रस्टच्या माध्यमातून एक सुलभ शौचालय बांधले. अत्यंत कमी उत्पन्नाचे ट्रस्ट त्या ठिकाणी आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

NTK/ MAP/ KGS/ श्री.बरवडनंतर 19:50

श्री.अनंत तरे....

म्हणूनच त्याठिकाणी शासनाने पर्यटन क्षेत्र ठरवावयाचे असेल तर यासाठी काही तरी खर्च करावा. यात्रेच्यावेळी अधिकारी किंवा पदाधिकारी नसतात त्याठिकाणी पालकमंत्र्यांनी हजर रहावे. एखादी महत्वाची व्यक्ती, व्हीआयपी व्यक्ती आली तर जिल्हाधिकारी, एस.पी.येतात. परंतु एरवी 4-5 पोलीस आणि 1-2 पोलीस इन्सपेक्टर असतात. 4-5 लाख भाविकांना त्यांना आवरणे कठीण जाते. 1999 मध्ये एकविरा देवीच्या दर्शनासाठी मा.श्री.विलासराव देशमुखसाहेब आले होते तेव्हा तत्कालीन गृहराज्यमंत्री श्री.माणिकराव ठाकरे, श्री.कृपाशंकर सिंह हे आले होते. त्यांनी जाहीर केले होते की, तेथे ताबडतोब पोलीस स्टेशन निर्माण केले जाईल. परंतु आजपर्यंत काहीच कार्यवाही झाली नाही. त्याठिकाणी देवीच्या अंगावर 10 लाख रुपयांचे दागिने असतात, त्याची काळजी घेण्यासाठी साधे पोलीस नसतात. जर चोरांनी चोरी करण्याचे ठरविले तर ते साध्य होऊ शकते. म्हणून मी मागणी करतो की, तेथे दिवस रात्र गार्ड राहू शकतील अशी व्यवस्था करावी. त्याचप्रमाणे तेथे अनेक गैरसोयी आहेत. त्याठिकाणी अनेक धर्माचे भाविक येतात. मी मा.मंत्रिमहोदय श्री.हसन मुश्रीमसाहेबांना विचारतो की, बकरी ईद पर बकरे काटते है, कुर्बानी देते है ना ? त्याप्रमाणे आम्ही सुध्दा देवीला नवस करतो, देवीचा मान देतो, तेथे कोंबडया कापणे हे बंधनकारक नाही, परंतु देवीचा मान सन्मान दिला जातो,ज्याला पटते तो करतो, ज्याला पटत नाही तो करीत नाही. परंतु यामध्ये कोणाच्याही भावना दुखावण्याचे कारण नाही. आम्ही पंढरपूरला जातो, आषाढी एकादशीच्या दिवशी 15-20 लाख भाविक येतात, त्यांना कोणी बोलवित नाही, पांडुरंगाच्या भेटीला सर्वजण जातात. हिंदु धर्माप्रमाणे विविध प्रथा आहेत त्या प्रथांप्रमाणे सर्वजण पूजाअर्चा करतात. मा.सदस्य श्री.उल्हास पवारसाहेबांना माहीत आहे, देवीची पालखी निघते त्याच्या दुस-या दिवशी ऑफिशीयली बोकडाचा मान दिला जातो. प्रांताधिका-यांच्या कार्यालयात त्याची नोंद आहे. त्यादिवशी तहसीलदारांना हजर रहावे लागते. यामध्येही पहिला मान कोणाचा, दुसरा मान कोणाचा यावरुन सुध्दा मानक-यामध्ये भानगडी असतात. अशा ज्या प्रथा व परंपरा भाविकांच्या मनामध्ये श्रध्दा आहे तोपर्यंत चालू राहणार आहेत. यानिमित्ताने चर्चा करीत असताना मा.श्री.म्हेत्रेसाहेबांना विनंती करतो. त्याठिकाणच्या भाविकांना 2-4 पोलीस थांबवू शकणार नाहीत. गडावर जाण्यासाठी जो रस्ता असतो त्याच रस्त्याने भाविकांना खाली यावे लागत

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MAP/ KGS/

श्री.अनंत तरे...

असेल तर अशा ठिकाणी गर्दी झाल्यावर काही ठिकाणी लोकांना थांबविले पाहिजे. मांढरदेवीची घटना घडल्यावर पोलिसांनी काय केले आहे ? आता देवळापासून 1 कि.मी.अंतरावर वाहने थांबविली जातात. त्यामुळे एखाद्याचे 4 महिन्याचे मूल, 6 महिन्याचे मूल असेल तर त्याला कडेवर घेऊन चालत जावे लागणार आहे. म्हणून माणूसकीच्या दृष्टीकोनातून असे अपघात घडणार नाही याची काळजी निश्चितपणे घ्यावी. पण अशाप्रकारचा अपघात घडेल असे गृहित धरुन सगळया लोकांना होईल अशाप्रकारची कार्यवाही केली जात आहे ती थांबविण्याची गरज आहे. यामध्ये एस.पी. वा जिल्हाधिकारी हे देवस्थानाचे संबंधित ट्रस्ट असतात त्यांनीही लक्ष घातले पाहिजे. यात्रेसंबंधी काय काळजी घेतली पाहिजे, संबंधित नेते मंडळी असतील त्यांनी त्यांचे म्हणणे ऐकून घेतले पाहिजे. यात्रेच्या कालखंडात का घडते त्याचा विचार केला पाहिजे. काही ठिकाणी जिल्हाधिकारी, एस.पी. वा तत्सम अधिकारी ट्रस्टी असतात. हे अधिकारी त्या देवस्थानाला जातच नाहीत. ते आपल्या कार्यालयात बसूनच बैठका घेतात व तेथून आदेश देत असतात. म्हणून जे कोणी अधिकारी देवस्थानावर नेमलेले असतील त्यांनी जागेवर जाऊन बैठका घेतल्या पाहिजेत. त्यानुसार जिल्हाधिकारी, एस.पी. या अधिका-यांनी एकविरा देवीच्या देवस्थानाशी संबंधित असलेल्या लोकांची बैठक घेतली पाहिजे.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अनंत तरे पुढे सुरु...)

आणि त्या बैठकीत आमचे जे काही अनुभव असतील ते एकूण घेऊन त्यामधील योग्य अशा सूचना स्वीकारल्या गेल्या पाहिजेत. असे केले तर यात्रेच्या ठिकाणी अधिक चांगल्या प्रकारे व्यवस्था होऊ शकेल. आपण काही बाबतीत बंदी घातल्यामुळे लोकक्षोभ वाढलेला आहे. तेव्हा अशा देवस्थानाच्या संदर्भात कोणताही निर्णय घेताना भाविकांच्या श्रध्देला तसेच प्रथा परंपरेला कोणताही धक्का लागणार नाही याची दक्षता शासनाने घ्यावी अशी माझी या निमित्ताने सूचना आहे. देवस्थानाच्या ठिकाणी भरणा-या यात्रांना अत्यंत महत्व असते. एक घटना घडल्यानंतर त्या घटनेची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून शासनाने काळजी घेतलेली आहे. परंतु ही काळजी घेत असताना काही लोकांच्या श्रध्देला धक्का लागलेला आहे. देवस्थानच्या ठिकाणची ज्यांची दुकाने, घरे तोडलेली आहेत. त्यांचे पुनर्वसन करण्याची गरज आहे. धर्मादाय आयुक्तालयामध्ये देवस्थानाच्या संदर्भातील जी जी काही प्रकरणे असतील त्याबाबतीत तातडीने निर्णय होणे आवश्यक आहे. एकवीरा ट्रस्टच्या संदर्भातील एक प्रकरण गेली तीन वर्षे धर्मादाय आयुक्तालयामध्ये प्रलंबित आहे. अशा विविध ट्रस्टची प्रकरणे प्रलंबित आहेत. म्हणून माझी या निमित्ताने शासनाला सूचना आहे की, ट्रस्टच्या संदर्भात एखादी महत्वाची केस असेल तर त्या केसचा निकाल मुदतबंद कालावधीमध्ये दिला गेला पाहिजे आणि तसे झाले तर ट्रस्टच्या कारभारामध्ये देखील सुधारणा होईल एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ MAP/ KGS/ SBT/ 19:55

श्री. मधुकर चव्हाण ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : तालिका सभापती महोदया, नियम 97 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. मूळ प्रश्न असा आहे की , 291 माणसे कशामुळे मेली ? मी याठिकाणी एक धक्कादायक माहिती देऊ इच्छितो. ती माहिती तपासून पहावी. तत्कालीन मुख्यमंत्री श्री. मनोहर जोशी यांच्याकाळात 1997-98मध्ये डिझ ाास्टर मॅनेजमेंटच्यावतीने एक अहवाल तयार करण्यात आला. हा अहवाल प्रत्येक जिल्हाधिका-याकडे आहे. अशा प्रकारची एखादी दुर्दैवी घटना घडली, चेंगराचेंगरी झाली, माणसांची हानी झाली, नैसर्गिक आपत्ती आली तर त्यासंदर्भात प्रत्येक जिल्ह्यामध्ये आपत्कालीन व्यवस्था करण्याच्या संदर्भात तो अहवाल आहे. हा अहवाल गेल्या 8 वर्षामध्ये अप-ट-डेट केलेला नाही. एखाद्या तालुक्यामध्ये किती ब्लड बॅंक आहेत, ॲम्ब्युलन्स किती आहेत, रुग्णालये किती आहेत, खाजगी डॉक्टर्स कती आहेत, ब्लड डोनेशन करणा-या संस्था किती आहेत अशा सर्व मुद्यांची माहिती जिल्हाधिका-यांकडे उपलब्ध नाही. याठिकाणी सांगितले गेले की, सर्व जबाबदारी ही जिल्हाधिका-यांवर टाकली जाते. आपण राज्यकर्ते राज्य करतो. परंतु काही अपवादात्मक अधिकारी सोडले तर - त्यांच्याबद्दल आदर ठेवून मी सांगतो की, हे शासकीय अधिकारी सम्राटासारखे वागतात. ते तुम्हाला अजिबात जुमानत नाहीत. शेवटी माझे मत असे आहे की, हे आयएएस आणि आयपीएस अधिकारी प्रशासन चालवितात. आपण जे कायदे करतो त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी आपण यंत्रण उभी केलेली असते. या यंत्रणेचा जिल्हाधिकारी हा प्रमुख असतो. या महत्वाच्या चर्चेच्या वेळी याठिकाणी आयुक्त, एसपी, सचिव असे संबंधित खात्याचे अधिकारी यावयास पाहिजे होते. याठिकाणी किती अधिकारी आलेले आहेत त्याची मला कल्पना नाही. ते आलेले नसतील तर का आले नाहीत याची चौकशी केली पाहिजे. याठिकाणी महसूल खात्याचे, पुनर्वसन खात्याचे मंत्री नसतीलही. परंतु चर्चा ज्या विषयाला अनुसरुन होणार आहे त्याच्याशी संबंधित अधिकारी चर्चेच्या वेळी उपस्थित राहिले पाहिजेत. येथे सर्व दुय्यम दर्जाचे अधिकारी आलेले आहेत. माझी अशी सूचना आहे की, डिझास्टर मॅनेजमेंटच्या अहवालानुसार प्रथम यादी अप-टू-डेट करा. अशा त-हेने एखादी नैसर्गिक आपत्ती आल्यानंतर तिला तोंड देण्यासाठी प्रशासन जागरुक असले पाहिजे. हा एक अफझालखानाच्या कबरीचा किंवा हिंदू

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ MAP/ KGS/ SBT/

(श्री. मधुकर चव्हाण पुढे सुरु....)

मुसलमानांचा भावनिक मुद्दा नव्हता. पोलिसांची अशी माहिती आहे की, तेथे मोजून 700 ते 800 माणसे येणार होती आणि हजारो पोलीस सात दिवस साता-याला ठेवलेले होते. मांढर देवीच्या दर्शनासाठी दरवर्षी 7 ते 8 लाख भाविक येतात हे जिल्हाधिका-यांना किंवा एसपीला समजले नाही काय ? नाशिकला देखील अशा त-हेने अपघात होऊन माणसे मृत्यूमुखी पडली. कशा प्रकारची व्यवस्था आपण करायला पाहिजे हे अधिका-यांना समजायला नको काय ? आपण किती अधिका-यांना मेमो दिलेले आहेत ? कोणत्या जिल्हाधिका-याला मेमो दिलेला आहे ? कोणत्या जिल्हाधिका-याला सस्पेन्ड केलेले आहे ? अशा प्रकारच्या घटना घडल्यानंतर कधी क्लार्क, कधी हेड क्लार्क तर कधी सुपरिन्टेन्डेन्ट यांनाच बळी दिले जाते. सातरा जिल्हयामध्ये तीन महिन्यापूर्वी घटना घडली. मृत व्यक्तींना आपण श्रध्दांजली वाहिली. या महत्वाच्या प्रस्तावावर मा. पुनर्वसन मंत्री उत्तर देतील. ते अतिशय प्रभावीपणे बोलतात. त्यांना चढविण्यासाठी मी बोलत नाही. त्यांच्याबद्दल मला आदर आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण...

पण हे माझे खाते आहे, मी पुर्नवसन मंत्री आहे,मी महसूल मंत्री आहे, महाराष्ट्रात या ठिकाणी 300 माणसे मेली आहेत. त्यामुळे विरोधी पक्षातर्फे अडीच तास चर्चा या सभागृहात उपस्थित केलेली आहे. या ठिकाणी मंत्री म्हणून हजर राहण्याची माझी जबाबदारी नाही काय ? जिल्हाधिकारी यांना विचारा की, 1997-98 या वर्षाचा डिझास्टर मॅनेजमेंटचा जो अहवाल आहे तो अप-टू-डेट केला आहे काय ? मोबाईल फोन आहेत काय ? या ठिकाणी सांगण्यात आले की, त्या ठिकाणी दूरध्वनी केल्यानंतर रॉंग नंबर जात होते. दूरध्वनीच्या बाबतीत त्या ठिकाणी पूर्व तयारी काहीच करण्यात आली नव्हती म्हणून रॉंग नंबर जात होते. आज आपण आधुनिक काळात आहोत. आपल्याकडे पुरेसे वायरलेस सेट तरी आहेत काय ? अशा घटना घडल्यानंतर एकमेकांशी संपर्क साधण्यासाठी काही अत्याधुनिक साधने उपलब्ध आहेत काय ? मला असे वाटते की, या दोन तीन गोष्टींचा प्रामुख्याने उल्लेख केला पाहिजे.सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांनी या ठिकाणी सांगितले की, त्या ठिकाणच्या दुकानदारांना तुम्ही हटविले. मी आपले आभार मानतो की, या ठिकाणी आपण वाहतूकीची दखल घेऊन त्वरीत कारवाई केली. पाच-दहा वर्षे दादागिरी करणा-यांची दादागिरी मोडून काढली. ज्यावेळी शासनाकडून चुकीचे काम झाले असेल तर त्यास आम्ही विरोध करु. परंतु शासनाने चांगले काम केले तर त्या कामाचे कौतूक करणे हे आमचे काम आहे. परंतु माहीम येथील चर्च आहे. त्या ठिकाणी वाहतूकीची फार मोठया प्रमाणात कोंडी होत असते. तेथील चर्चमध्ये जाणा-या भाविकांच्या भावनेबद्दल मी बोलत नाही. चर्चमध्ये पुजेसाठी मेणबत्ती आणि हार लागतो. त्या चर्चच्या आजुबाजूला सर्व प्रकारचे व्यवसाय सुरु आहेत. कपडे,कॉस्मेटीक इत्यादि वस्तुंची दुकाने थाटण्यात आलेली आहेत. चर्चमधील पुजेला या सर्व गोष्टी लागतात काय ? त्या ठिकाणी वाहतूकीची फार मोठी कोंडी होते. तुमचे पोलीस तेथे सरळ सरळ हप्ते गोळा करीत असतात. बी.एम.सी.चे कर्मचारी त्या दुकानदारांकडून हप्ते घेत असतात. तेथील रस्ता पादचारी माणसास क्रास करणे जमत नाही. मुंबई शहरात अशी जी गर्दीची ठिकाणे आहेत ती लक्षात घेऊन वाहतूक आयुक्त, अतिरिक्त आयुक्त यांच्या मनात लागलीच टयूब पेटली पाहिजे. अशा प्रकारची घटना मुंबई शहरात देखील होऊ शकते. म्हणून अशा गर्दीच्या ठिकाणी आधीच काळजी त्यांनी घेतली पाहिजे. प्रत्येक पोलीस स्टेशनच्या अंतर्गत किती तीर्थस्थळे आहेत,

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण..

किती मंदीर आहेत, किती धर्मस्थळे आहेत, किती अग्यारी आहेत, जेथे नियमितपणे लोक दर्शनासाठी येतात. त्या कार्यक्षेत्रातील पोलीस अधिकारी, वाहतूक विभागाचे अधिकारी यांचे मन वृत्तपत्र वाचण्याशिवाय तेथे धावत गेले पाहिजे. येथे चर्चा झाल्यानंतरच त्या ठिकाणी धावणार काय ? माहिमच्या चर्चेत जे भावीक जातात ते मेणबत्ती घेण्यासाठी बाहेर येतात हे मी समजू शकतो. पोटभरण्यासाठी तेथे मेणबत्त्या, हार यांची दुकाने अनधिकृतपणे लावतो हेही मी समजू शकतो. मी धर्माभिन्वेषाने बोलत नाही. परंतु हिंदुच्या भावनांची कदर या देशात कमी प्रमाणात केली जाते. त्यासाठी पटकन कायदे केले जातात. बाकीच्यांच्या भावनांची कदर करु नये असे माझे मत नाही. परंतु हा एकमेव देश असा आहे की, या ठिकाणी अन्य धर्मीयांची कदर केली गेली आहे. या ठिकाणी अनेक चर्च झाले, अनेक अग्यारी झाल्या. पूर्वीच्या राजा,महाराजांनी सांगितले की, तुम्हाला काय पाहिजे ते घ्या. ज्यावेळी हे सगळे लोक केरळमध्ये आले त्यांना सांगण्यात आले की, येथे चर्च बांधा. येथे अग्यारी उभारा. या ठिकाणी पारशी समाज जेवढया सन्मानाने जगत आहेत तेवढया सन्मानाने पारशी समाज हा जगाच्या पाठीवर कुठेही जगत नाही. हिंदुच्या देवस्थानांची काळजी घेण्यासाठी काही निधी उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करणार आहात की नाही ? दुसरी गोष्ट अशी आहे की, गुंडांनी या ठिकाणी दुकाने लुटली असे कारण सांगितले गेले. हिंदु धर्मीयांची काही देवस्थाने ही उंचावर आहेत. सप्तश्रृंगी देवीचे मंदीर उंच डोंगरावर आहे. रेणुका देवीचे मंदीर देखील उंच डोंगरावर आहे. काही भाविक देवस्थान कितीही उंचावर असले तरी श्रध्देने ते चालत जात असतात. पंढरपूर येथील पांडुरंगाचे रुप आपल्या डोळयात सामावून घेण्यासाठी न बोलविता हजारो भाविक चालत जातात. देवस्थानाचे मंदीर उंच जरी असले तरी भाविक लोक श्रध्देने पाय-या चढून जातात. या भाविकांमध्ये कोणाला बी.पी.चा त्रास असतो, इतरही आजार असलेले भाविक दर्शनासाठी येतात. परंतु अशा गर्दी होणा-या तीर्थक्षेत्राच्या जागी, यात्रेच्या जागी त्या ठिकाणी वैद्यकीय उपचाराची व्यवस्था केली गेली पाहिजे. डॉक्टर,नर्सेस इत्यादि कर्मचारी त्या ठिकाणी ठेवले गेले पाहिजेत असे कंपलशन शासनाकडून घातले गेले पाहिजे. सभापती महोदया, मी रोष पत्करुन एका मुद्याची पुनरावृत्ती करु इच्छितो की, माननीय मंत्री महोदयांनी आपतकालीन व्यवस्थेची पाहणीच्या संदर्भातील सर्व जिल्हाधिका-यांबरोबर त्वरीत बैठक घेतली पाहिजे. या बैठकीत आढावा घेतला गेला पाहिजे की, जिल्हयात एकूण शासकीय रुग्णवाहिका किती आहेत ?

3...



ABG/ KGS/ MAP/ SBT/ MHM/ शिगम 20:00

श्री.मधुकर चव्हाण..

जिल्हयात स्वयंसेवी संस्था किती आहेत ? ब-याच ठिकाणी तरुण मुले सहा सहा महिन्यात रक्त डोनेट करीत असतात अशा तरुणांची यादी जिल्हाधिकारी यांच्याकडे आहे काय ? सभापती महोदया, या ठरावाच्या अनुषंगाने विरोधी पक्षाच्या सदस्यांकडून ज्या सूचना केल्या गेलेल्या आहेत त्या सूचनांचा सर्वंकष यादी करुन त्याची त्या ठिकाणी अंमलबजावणी करण्याचे आश्वासन मिळाले तर या अडीच तास चर्चेला महत्व येईल. नाही तर "नळी फुंके सोनारी, इकडून तिकडे गेले वारे " अशा प्रकारे या ठरावाची वाताहात होऊ नये अशी अपेक्षा आहे. सभापती महोदया,राज्याच्या दृष्टीने एखादा विषय अतिशय महत्वाचा आहे. एखादी मोठी दुर्घटना घडली, अशा गोष्टींच्या बाबतीत शासनाने गंभीर नोंद घ्यावी,त्यावर सभागृहात सांगोपांग चर्चा व्हावी या चर्चेच्या अनुषंगाने सदस्यांकडून आलेल्या विधायक सूचनांची अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासनाला प्रभावीपणे आदेश द्यावेत अशी नियम 97 अन्वये चर्चा उपस्थित करण्यामागची अपेक्षा असते. या ठिकाणी नुसती हरिनामाची कथा चालत नाही. या चर्चेच्या अनुषंगाने काही सुधारणा होतील अशी मी अपेक्षा व्यक्त करतो आणि माझे भाषण संपवितो.

--------------

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत ...

आपण जरी महालक्ष्मीला दर्शनासाठी गेलो तरी खाली असलेल्या दुकानातून हाराचे ताट घेत नाही तर वरच्या बाजूला देवळा जवळ असलेल्या दुकानातून हाराचे ताट घेत असतो कारण आपल्याला ताट घेऊन चढण्याचा त्रास नको असतो.हीच सायकालॉजी मांढरादेवीच्या दुर्घटनेस कारणीभूत झाली होती .माकडीणीने ज्याप्रमाणे आपल्या पिल्लांना खाली ठेऊन व त्यांच्यावर चढून आपला जीव वाचवला त्याप्रमाणे प्रत्येकाने या दुर्घटनेत केले होते. ही घटना घडल्यानंतर 40 मिनिटे तेथे स्मशान शांतता होती.ही घटना घडल्यानंतर काही डॉक्टर्स घटनास्थळी गेले होते त्यातील काही डॉक्टर्स माझ्या परिचयाचे आहेत.तेथे जाऊन पाहिल्यानंतर त्यांना असे दिसून आले की ,फार थोडे लोक ट्रिटमेन्ट घेण्याच्या प्रयत्नात होते बाकीचे लोक सैराभैरा पळत होते.40 मिनिटानंतर लुटालूट आणि मारहाण करण्यास सुरुवात झाली. त्या ठिकाणी जी लुटालूट करण्यात आली ती माणुसकीला काळिमा लावणारी होती.त्याचे वर्णन सन्माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे यांनी केलेले असल्यामुळे मी पुन्हा त्याचा उल्लेख करणार नाही. या दुर्घटनेस कोण जबाबदार आहे? त्या ठिकाणी असलेला अरुंद रस्ता या दुघर्टनेस जबाबदार आहे ? की पोलीस यंत्रणा जबाबदार आहे ? की ट्रस्टी - पुजारी आणि तहसीलदार यांच्यातील वाद जबाबदार आहे ? की त्या ठिकाणची वायर जबाबदार आहे? सभापती महोदया, मी त्या ठिकाणी जाऊन आलो असल्यामुळे मी खात्रीपूर्वक आपल्याला सांगू इच्छितो की,ही घटना घडण्यास विद्युत मंडळ जबाबदार आहे. ज्या हाय व्होल्टेजच्या वायरवरुन आकडे टाकून वीज चोरुन घेतली जाते ती वायर त्या गर्दीत पडली. त्यामुळे शॉर्ट सर्किट झाले आणि हा दुर्देवी प्रसंग घडला होता.या सर्व गोष्टीकडे पोलिसांनी लक्ष द्यावयास पाहिजे होते परंतु पोलिसांचा अपुरा फौजफाटा, अपुरी व्यवस्था या सर्व कारणांमुळे ही घटना घडली आहे. त्यांचा जरी अपुरा स्टाफ असला तरी पोलिसांनी त्या सदर्भात पुरेसे लक्ष द्यावयास पाहिजे होते. किती वाहने आलेली आहेत याची पोलिसांकडे आकडेवारी होती.वाहनतळाच्या ठेक्याचा सौदा किती रुपयांचा ठरविला गेला होता याचीसुध्दा माहिती सन्माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे यांनी दिलेली आहे.या वर्षीचा वाहन तळाचा ठेका चार लाख रुपयांचा दिला गेला होता. तेव्हा या वर्षी किती भाविक येणार आहेत याची आकडेवारी जिल्हाधिकारी आणि तहसीलदार यांच्याकडे असावयास पाहिजे होती.परतु जाणीवपूर्वक नेहमीप्रमाणे या गोष्टीकडे दुर्लक्ष करण्यात आले होते. सभापती महोदया, या प्रस्तावावरील चर्चेच्या निमित्ताने मी

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत ...

फक्त दोनच गोष्टींचा उल्लेख करणार आहे.ही दुघर्टना घडल्यानंतर पुन्हा असा प्रकार घडू नये यासाठी जे व्यवस्थापन करावयाचे आहे त्यासाठी आपण 15 कोटी रुपयें मंजूर केलेले आहेत. त्याचबरोबर केन्द्र सरकारकडे 16.25 कोटी रुपयांची मागणी केलेली आहे .केन्द्र व राज्य सरकार मिळून 25 कोटी रुपये यासाठी खर्च केले जाणार आहेत.माझी माहिती जर चुकीची असेल तर माननीय मंत्रिमहोदयांनी ती दुरुस्त करावी.आज पर्यन्त या पैकी एक पैसासुध्दा देण्यात आलेला नाही.त्या ठिकाणी आजपर्यन्त कोणतेही काम सुरु झालेले नाही .रस्ता रुंदीकरणाचे काम तर सुरु झ ाालेले नाहीच परंतु ज्या लोकांचे स्टॉल्स या दुर्घटनेत जळाले त्या लोकांचे पुनर्वसन देखील आद्याप करण्यात आलेले नाही.तेव्हा हे काम शासन केव्हा करणार आहे ? ही घटना होऊन आज साडे तीन महिने होऊन गेलेली आहेत तरीसुध्दा अद्यापी तेथे कोणतेही काम सुरु झालेले नाही.सभापती महोदया, या निमित्ताने आपल्या माध्यमातून मला शासनाला अशी विनती करावयाची आहे की, महाराष्ट्रातील जत्रांचे एक कॅलेन्डर तयार करण्यात यावे.कोणत्या दिवशी कोणती
यात्रा भरते याचे कॅलेन्डर बनविणे आवश्यक आहे.त्याचबरोबर त्या यात्रेच्या ठिकाणचे स्टॅटिस्टीक्स मेन्टेन करणे आवश्यक आहे.त्या यात्रेच्या ठिकाणी किती यात्रकरु येणार आहेत आणि त्यांच्या व्यवस्थेकरता किती फौजफाटा लागणार आहे याचे नियोजन करणे आवश्यक आहे. डिझॉस्टर मॅनेजमेन्ट प्लॅनच्या बाबतीत आपण अनेकदा उल्लेख करीत असतो तेव्हा अशा प्रकारचा प्लॅन तयार करणे आवश्यक आहे आणि मॉब सायकोलॉजीचे ज्ञान असलेल्या स्वयंसेवी सघटनेची स्थापन करणे आवश्यक आहे. या चर्चेत भाग घेणा-या अनेक सन्माननीय सदस्यांनी असे सागितले की, या संदर्भात समाज प्रबोधन करण्याची आवश्यकता आहे.मला त्याबाबतीत असे सांगावयाचे आहे
 की, जर आपण हिंदू धर्मियाच्या रुढी बंद करणार असाल तर अन्य धर्मियांच्या बाबतीत देखरल हाच कायदा लागू करण्यात आला पाहिजे. आम्ही बोकड कापण्याचे बंद केले तर कुर्बानी देण्याचे सुध्दा बंद व्हावयास पाहिजे ही माझी आग्रहाची मागणी आहे. सभापती महोदया, त्या ठिकाणी जे मिशन हॉस्पिटल होते त्यांनी अत्यंत चांगली कामगिरी केली होती.यात्रेच्या ठिकाणी मोबाईल डिस्पेन्सरी असावी अशी मागणी अनेक सन्माननीय सदस्यांनी केलेली आहे.त्या ठिकाणी जत्रेच्या आठ दिवसामध्ये कायम स्वरुपी मोबाईल डिस्पेन्सरीबरोबरच प्राथमिक आरोग्य केन्द्र सुरु करुन त्या ठिकाणी चांगल्या तज्ज्ञ डॉक्टरांची सोय करणे आवश्यक आहे.अशा प्रकारे सिंधुदूर्ग

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत ....

जिल्हयातील कुणकेश्वर आणि आंगणेवाडी येथे यात्रा होणार आहे.त्या जिल्हयात कोणाची अंधश्रध्दा असेल नसेल हे मला माहीत नाही. परंतु या निमित्ताने मला असे सांगावयाचे आहे की, कुणकेश्वर येथील रस्ता अतिशय अरुंद आहे. त्या ठिकाणी लाखो भाविक येत असतात .तेथील अरुंद रस्त्याचे काम काही वादात अडकलेले आहे तेव्हा हे काम शासनाने त्वरित सुरु करावे.मांढरादेवी येथे घडलेल्या दुर्घटनेवरुन धडा घेऊन या रस्त्याचे काम शासनाने सुरु करावे.हे सर्व काम करीत असतांना श्रध्दाळुंच्या भावनेला कोणत्याही प्रकारचा तडा जाणार नाही अशा प्रकारची कोणतीही स्टेप शासनाने घेऊ नये आणि पोलीसी खाक्या वापरु नयेत अशी मी आग्रहाची विनंती करुन माझे भाषण संपवितो.

----

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर (मुंबई शिक्षक) : अध्यक्ष महोदया, साताऱ्यातील मांढरदेवी यात्रेमध्ये जी न भूतो न भविष्यती अशी दुर्घटना घडली आहे तसा प्रकार पुन्हा कोठेही घडू नये या दृष्टीने या ठिकाणी जी चर्चा उपस्थित करण्यात आली आहे त्या चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभी आहे. अध्यक्ष महोदया, काही संकटे ही अस्मानी असतात तर काही सुलतानी असतात. निसर्गापुढे मानव थिटा आहे याची जाणीव अस्मानी संकटांच्या वेळी होत असते. उदाहरणच सांगावयाचे तर त्सुनामी, वादळ, कोसळणारा पाऊस, महापूर, भूकंप यांचे रौद्ररूप संपल्यानंतर मानव प्रयत्नांची पराकाष्ठास करून त्यातून झालेले नुकसान भरून काढण्याचा, संकटग्रस्तांना मदतीचा हात देण्याचा प्रयत्न करत असतो. या उलट सुलतानी संकटे ही मानव निर्मित असतात. दंगे, युद्ध, दरोडे, विषारी दारू आणि आता हे यात्रांच्या ठिकाणी गर्दीत होणारी चेंगराचेंगरी आणि त्यातून होणारी जीवितहानी वगैरे ही सुलतानी संकटे म्हटली जातात. ही संकटे टाळण्याचा उपाय म्हणजे अगोदरच त्या दृष्टीने नियोजन करून, दक्षता घेऊन, जागरूकतेने दक्षता घेतल्यास अशी संकटे आटोक्यात आणता येतील, नव्हे उद्भवणारच नाहीत.

अध्यक्ष महाराज, 26 जानेवारीचा गुजरात येथील भूकंप आणि त्यात झालेली जीवित व वित्तहानी आजही कायम स्मरणात राहणारी आहे तसेच 30 सप्टेंबरला अनंत चतुर्दशीच्या दिवशी झ ालेला लातूर येथील भूकंप.. याचीही आठवण कायम स्मृतीपटलावरून जाणार नाही. तसेच आता या वर्षी 25 जानेवारीला प्रजासत्ताक दिनाच्या आदल्याच दिवशी दुपारी मांढरदेवी येथे भीषण दुर्घटना घडली. मांढरदेवी गडावर पौष पौर्णिमेच्या दिवशी लाखो भाविक काळूबाईचे दर्शन घेण्यासाठी, पौर्णिमा पूजेच्या आदल्या दिवसापासूनच गर्दी करीत असतात. एखाद्या देवस्थानाविषयी, तेथील देवी नवसाला पावते अशी आख्यायिका पसरली की मग अधिक संख्येने भाविक तेथे येतात आणि या वर्षी देखील मांढरदेवीच्या यात्रेमध्ये तसेच घडले. मंगळ, शुक्र आणि रवि हे देवीचे वार. यंदा मंगळवारी पौर्णिमा आली होती त्यामुळे तेथे गर्दीचा उच्चांक झाला होता. जसे अंगारकीच्या दिवशी मुंबईतील प्रभादेवी येथील श्री सिद्धीविनायक या देवस्थानी मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी होते आणि तसे होणार याची कल्पना प्रशासन आणि देवस्थानाला असूनही त्याकडे दुर्लक्ष आणि तुटपुंजा पोलीस बंदोबस्त ठेवला जातो. तसेच मांढरदेवी यात्रेच्या काळातही घडले होते. तेथील महसूल, पोलीस यंत्रणांचा हलगर्जीपणा मोठ्या प्रमाणात होता आणि त्यातूनच ही भीषण दुर्घटना महाराष्ट्रात प्रथमच घडली. इतकी चेंगराचेंगरी झाली आणि मग बैल गेला व झोपा केला अशी

..... 3 टी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

परिस्थिती झाली. यात्रा म्हटली म्हणजे मग तेथे हौसे, गवसे, नवसे असतातच. त्यात गोंधळ माजला म्हणजे मग बघायलाच नको. भयंकर लुटालूट मग ती दुकानांची आणि भाविकांची देखील करण्यात आली. कपडे, चपला, पैशांची रिकामी पाकीटे पडलेली होती. शासन आर्थिक मदत करीलही पण गेलेल्या जीवांचे काय ? गडावर आणि जवळच्या हॉस्पिटलमध्ये मृतांचा खच पडलेला होता. आशेने नातेवाईकांचा शोध घेणे सुरू होते. त्यातच झालेल्या लुटालुटीमुळे मृताच्या शरीरावर एकही दागिना शिल्लक राहिलेला नव्हता. तेवहा निदान झालेल्या चुका निस्तरण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आतापर्यंत केंद्र आणि राज्य सरकारने अनुक्रमे 50 आणि 1 लाख अशी दीड लाख रुपयांची मदत केली आहे शिवाय केंद्र सरकारने विकासासाठी 15 कोटी रुपये देऊ केले आहेत. बकरी कापणे, तेल वाहणे, नारळ फोडणे यासाठी यात्रांच्या ठिकाणी स्वतंत्र व्यवस्था करायला पाहिजे होती. परंतु तेथे नेमके काय झाले ते माहीत नाी. तातडीने तेथे रस्ता रूंदीकरण्याचे काम केले पाहिजे. दुकानांचीही व्यवस्था वेगळी अशी केली पाहिजे. एवढ्या संख्येने भाविक येतात तेव्हा तेथे निधी चांगला जमा होतो, त्याचा विनियोग कशा प्रकारे होतो याबाबतही चौकशी केली गेली पाहिजे. कुंभमेळ्याच्या वेळी नाशिकला गोदावरी काठी अखेरच्या पर्वामध्ये मोठ्या प्रमाणात छोट्या गल्लीमध्ये चेंगराचेंगरी झाली, त्यावेळी तेथे पोलीस बंदोबस्त व्यवस्थित असताही ही चेंगरा चेंगरी झाली. त्यामध्ये खूप माणसे मृत्यूमुखी पडली. हा अनुभव देखील शासनाला काही शिकवून गेला नाही असेच मांढरदेवीमध्ये घडलेल्या दुर्घटनेवरून म्हणावे लागते. अशा ठिकाणी दोन दोन वर्षे अगोदर पासून तयारी करण्यात येऊनही दुर्घटना घडली होती. नाही तरी सध्याच्या विज्ञान युगामध्ये लोक अधिकाधिक श्रद्धाळू बनू लागले आहेत. प्रभादेवी येथील सिद्धी विनायक मंदिरामध्ये मंगळवारी, संकष्टी, अंगारकी चतुर्थीला तर प्रचंड गर्दी होते त्यावरून हे सिद्ध होते आहे. वैष्णोदेवी, पंढरपूर, शिर्डी येथे नित्यनियमाने दर्शनाला जाणारे भाविक अनेक आहेत. वैष्णोदेवी तर उंच डोंगरावर आहे पण तेथील मंदिर दिवसरात्र उघडे असते आणि तेथे 4-5 तास चालत जावे लागते. संपूर्ण चढ आहे पण ठिकठिकाणी विश्रांती आणि चहा-नाश्त्याची सोय केलेली असते. तशा प्रकारची सोय आपल्याकडील यात्रांच्या ठिकाणी, विशेषत: डोंगरावरील यात्रांच्या ठिकाणीही करता येऊ शकते. त्यादृष्टीने विचार व्हायला पाहिजे. 6 डिसेंबर ला आंबेडकर परिनिर्वाण दिनाच्या दिवशी देखील शिवाजी पार्कवर जनसागर उसळलेला असतो. पण बऱ्याचशा शिस्तीमध्ये ही मंडळी जात असतात. ....

( यानंतर श्री. जागडे ...3यू 1 ...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ASJ/ MHM/ SBT/ 20:20

श्रीमती संजीवनी रायकर....

कालच 3 एप्रिलला मी शिवाजी पार्क येथे मी गेले होते. त्या वेळी त्या ठिकाणी खूप मोठा जमाव जमला होता. मोठ्या पुढा-यांच्या सभेला जो जमाव जमतो त्यापेक्षाही मोठा जमाव त्या ठिकाणी जमला होता. मी माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता, मला असे दिसून आले की, निरंकारी बाबांचे प्रवचन त्या ठिकाणी होते. मोठी गर्दी असून लोकांमध्ये उत्साह होता. परंतु कोणत्याही प्रकारचा गोंधळ त्या ठिकाणी नव्हता. दि 29 मार्चला अंगारकी संकष्टी होती. त्या ठिकाणी प्रभादेवी येथील सिध्दीविनायकाचे दर्शन घेण्यासाठी 18 लाखाच्या वर भाविक आले होते. 12-12 तास भाविक रांगेत उभे होते. त्यामध्ये वृध्द होते, तरुण होते, महिलाही होत्या. परंतु त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचा गोंधळ झाला नाही. कारण त्या ठिकाणी स्वयंसेवी संस्थेचे कार्यकर्ते काम करीत होते. तेथील व्यवस्थापनाचे काम अतिशय स्पृहणीय होते. त्या ठिकाणी मेडिकल उपचारासाठी सोय करण्यात आली होती. मोफत बसेस दादर पासून सिध्दीविनायक मंदिरापर्यन्त सोडण्यात आल्या होत्या. तिरुपतीच्या ठिकाणी ज्या प्रमाणे व्यवस्था करण्यात आलेली आहे, तशाच प्रकारची व्यवस्था करण्यात आली होती. जनतेला सिध्दीविनायक दर्शन सहजतेने होण्यासाठी चार रांगा लावण्यात आल्या होत्या. ठिकठिकाणी तंबूंची सोय करण्यात आली होती. भाविकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, अशी व्यवस्था करण्यात आली होती.

सभापती महोदया, माझ्या असे वाचण्यात आले आहे की, 1990 सालानंतर मांढरादेवी या ठिकाणी सुधारणा करण्यात आली आहे. त्या ठिकाणी चांगला रस्ता करण्यात आला आहे. तसेच पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. या ठिकाणी सर्व व्यवस्था ट्रस्टने केली आहे. शासनाने यासाठी एकही पैसाही दिला नाही. तसेच जे उत्पन्न येईल त्यातील 40 टक्के हिस्सा हा त्या गावाला देण्यात येतो. त्या ठिकाणी चार फुटी रस्ता, रेलिंग, दोन्ही बाजुला चार फुटाचे फुटपाथ करण्यास सहा महिन्यापूर्वी सुरुवातही करण्यात आली आहे. परंतु गावकरी आणि गुरव यांच्या असहकारामुळे ही योजना पूर्ण झाली नाही. आता ही योजना पूर्ण झाली असती तर कदाचित येथील दुर्घटना टळली असती. परंतु या जरतरनेच सर्व तत्वज्ञानाला पांगळं केले आहे. सभापती महोदय, मांढरादेवी येथे दुर्घटना झाल्यानंतर जाळपोळ झाली आहे. ट्रस्टच्या विरुध्द वाद सुरु झाला आहे. या दुर्घटनेमध्ये ट्रस्टचीच सर्व चूक आहे, अशा प्रकारचे वातावरण आज निर्माण झाले आहे. पूर्वी गुरव आणि गावक-यांची चंगळ होती. त्यांना आर्थिक लाभ भरपूर झाला होता. त्यामुळे

..2.

ASJ/ MHM/ SBT/ 20:20

श्रीमती संजीवनी रायकर....

पूर्वी कोणीच लक्ष दिले नाही. कारण सर्वांची कमाई सुरळीत होत होती. सभापती महोदया, या ट्रस्टने लक्ष घातल्यानंतर या मंदिराचे उत्पन्न 10-15 हजारावरुन 20 लाख रुपयाच्या वर गेले आहे. या ठिकाणी 50 लाखाचे देवीचे दागिने आहेत. गुरवांचे उत्पन्न होते, ते कमी झाल्यामुळे त्यांनीच सगळ्यांना भडकविण्याचा प्रयत्न केला आहे. सभापती महोदया, ही दुर्घटना शॉक सर्किटमुळे झ ालेली नाही तर त्या मागे दुसरी काही कारणे आहेत. तेव्हा त्याचा विचार शासनाने करण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदया, धार्मिक स्थळांच्या व्यवस्थापनानेच स्वतंत्र स्वयंसेवी दलाची स्थापना केली पाहिजे. स्वयंसेवकांना प्रशिक्षण दिले पाहिजे. प्रजापिता ब्रह्माकुमारी तसेच निरंकारी बाबांकडे जसे स्वयंसेवक आहेत, तसेच स्वयंसेवक निर्माण केले पाहिजे. गडावरील तसेच डोंगरावरील जी देवस्थाने आहेत, तेथे कालबध्द कार्यक्रम घेऊन रस्ते, पाणी आणि इतर सर्व सुविधा उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत. पुन्हा अशी दुर्घटना पाहण्याचे दुर्भाग्य लाभू नये, अशी परमेश्वराजवळ प्रार्थना करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करते.

--

( यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, मांढरादेवीच्या दुर्घटनेतून हा नियम 97 अन्वये प्रस्ताव सभागृहापुढे आला. दुर्दैवाने संकट आल्याशिवाय आम्हाला शहाणपण सुचत नाही. समाज असो नाहीतर प्रशासन असो हे सातत्याने होत असते. तिकडे "दोडापाणी देव रोकडा सज्जनी," किंवा "मनाचा निर्मळ वाचेचा रसाळ, त्याच्या गळा माळ असो वा नसो" असे संत तुकारामांनी सांगितले. तरी सुध्दा आमची श्रध्दा "घरात देव असला तरी कां फिरसी दारो दारी, देव असूनी तुझ्या घरी, तरी जातोस तू". कारण आम्हाला वाटत असते की, आमच्या घरातल्यापेक्षा तिथेच त्याचे स्थान आहे. सिंहासनाधिष्ठित बसलेले राजे तसे सभापती महोदया, तुम्ही इथे बसणे आणि तिथे बसणे यामध्ये सुध्दा फरक आहे. तसेच आम्हाला वाटते की, मंदिरात बसलेला देव हा त्याच्या स्थानावर आहे म्हणून आम्ही तिथे जात असतो. मांढरादेवी दुर्घटना आम्हाला अंतर्मुख करते. मघाशी माननीय सदस्य श्री. उल्हास पवार म्हणाले की, त्या ठिकाणी खाजगी ट्रस्ट आहे. माझ्या माहितीप्रमाणे तेथील ट्रस्टचे अध्यक्ष आता जिल्हा न्यायाधीश आहेत. त्या ट्रस्टचे ट्रस्टी पत्रकार श्री. द.म. पटवर्धन यांचेसारखे सिनियर पत्रकार आहेत. यामुळे एक चांगली गोष्ट झाली की, कालपर्यंत गावकरी आणि पुजारी यांची त्या ठिकाणी हातमिळवणी होती. ते आज पर्यंत सगळी लुटालूट करीत होते. माझ्या माहितीप्रमाणे मांढरा देवीचा मुकुट 1 किलो सोन्याचा आहे, तिच्या गळयात घातलेला हार सुध्दा सोन्याचा आहे. अशा प्रसंगी आपण संत तुकडोजी महाराजांची म्हटलेली ओळ खूप आवडली. ती मला इतकी भावली की, "लाकडाचा देव त्याला आगीचे भ्यव, दगडाचा देव त्याला पाण्याचे भ्यव, आणि सोन्याचा देव त्याला चोराचा भ्यव" चोरांची आळंदी त्या ठिकाणी भरली होती. हे पाहिल्यांनतर अंतर्मनाला वेदना होतात. म्हणून मला असे म्हणावयाचे आहे की, अनेक सूचना येत रहाणार आहेत. पण आपल्याला शहाणपण कधी येणार? किती जणांचे बळी जाई पर्यंत आपण वाट पहात रहाणार आहोत? हे पशु बळी आहेत की नर बळी आहेत? या पध्दतीचे तेथील व्यवस्थापन पाहिल्यानंतर वाटते की, मघाशी आपण संत सज्जनांची, समाज सुधारकांची नावे घेतली. मला या निमित्ताने प्रबोधनकारांची आठवण येते. म्हणजे श्रध्दा आणि अंधश्रध्देमध्ये फरक कसा असला पाहिजे? याबाबत त्यांनी एक मजेदार किस्सा सांगितला. एकदा प्रबोधनकारांची आई, तिला ते बय म्हणायचे. ते चाळीत रहात असत, चाळीमध्ये बाथरुम कॉमन असायचा, नळ कॉमन असायचा. त्या ठिकाणी ती कपडे धुवायला जायची. एक

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

दिवस ती बाथरुममध्ये पडली. पडल्यानंतर तिच्या हाताचे हाड मोडले, संध्याकाळी प्रबोधनकार आले. बय हाताला हळद पट्टी लावून बसली होती. प्रबोधनकारांनी विचारले की, बय काय झाले ? तू पडलीस? ती म्हणाली ते मद्रासी मेले, ते तिकडे तेलाची आंघोळ करतात. सगळा नळ तेलकट करुन ठेवला आहे. मांढरादेवीच्या बाबतीत हे उदाहरण कसे समर्पक आहे ते आपल्याला सांगतो. ते बाथरुम तेलकट करुन ठेवल्यानंतर प्रबोधनकारांनी शेजारी रहात असलेल्या मद्राशांना विचारले की, कृपया माझी आपल्याला विनंती आहे की, तुम्ही त्या बाथरुममध्ये तेल लावून आंघोळ करु नका. कृपया तेवढे तरी संभाळा. ते म्हणाले, "No, no, this is a religious thing. Do not interfere". त्यांनी सकाळी जातांना बयेला सांगितले की, बये एक काम कर. कोळीण आली की, तिच्याकडे सुके कुसलेले मासे तिच्याक्डून घे. नेहमीप्रमाणे कोळीण दरवाजात आली. तिला म्हणाली की, तुझ्याकडील सुकट वगैरे कुसलेले काही असेल ते मला दे. कोळीण म्हणाली की, बये तुला काय झाले. मी तुला रोज चांगले मासे देतो. आज कुसलेले मासे कां मागते? ती म्हणाली नाही मला आज मुद्दाम पाहिजे. दादांनी घेऊन ठेवायला सांगितले आहे. संध्याकाळी दादा आले, त्यांनी शेगडी घेतली, शेगडीमध्ये कोळसे घातले बाहेर नेऊन पेटविली आणि त्यामध्ये सुके जाळायला सुरुवात केली. त्या सुक्या मासळीचा वास, घाण चाळीमध्ये पसरल्यानंतर सगळे मद्रासी कानाला जान्हवे लावून धावत आले. आणि म्हणाले, "What are you doing? Do not interefere. This is a religious thing going on." धर्माचे, अंधश्रध्देचे कसे समर्पक उत्तर त्यांनी त्यांना दिले. हे आपण लक्षात घेतले पाहिजे. म्हणून माझी आपणास विनंती आहे की, विरारला जीवदानीला जा. चुकुन मागून जर एखादा माणूस जरासा धावला तर त्याला नंतर थांबता येणार नाही. तोल गेला तर तो दरीत जाईल. इतका तेथील पायऱ्यांचा स्लोप आहे. ज्या मांढरादेवी ट्रस्टचे अध्यक्ष जिल्हा न्यायाधीश आहेत त्या ठिकाणी हे घडते. म्हणजे किती गैर व्यवस्थापन, किती दुर्लक्ष व किती हलगर्जीपणा घडला असेल हे आपण समजून घ्यावे. सभापती महोदया, या संदर्भात माननीय सदस्या डॉ. नीलम ताईंनी भरपूर सूचना केल्या आहेत. त्यामध्ये मी आणखी भर घालू इच्छित नाही. मला एकच आठवते की, आता आपण शिर्डीला व्यवस्था सुरु केली आहे. तिरुपती बालाजी म्हणतो परंतु तो तिरुमलाई आहे. तिरुपती खाली आहे, त्या ठिकाणी बार पासून सर्व धंदे आहेत. तिरुमलाईवर काही मिळत नाही. तिथे गेल्यानंतर त्याठिकाणी दर्शनाची जी पध्दत आहे ती देशातील सर्वोत्तम पध्दत आहे, अतिशय सुंदर आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत . . . .

तेथे एक अतिशय सुंदर स्टेडिअम बांधलेले आहे. त्या स्टेडिअममधील प्रत्येक विंगमध्ये एकेका ठिकाणी एक हजार लोक बसू शकतात. तेथे टी.व्ही.चा एक सेटही आहे. तेथून सातत्याने रांग कुठपर्यंत गेलेली आहे ते समजते. त्याप्रमाणे एका विंगमधून दुस-या विंगमध्ये जाऊन बसावयाचे. म्हणजे रांगेतील माणसांना त्रास होत नाही. तेथे पाण्याची व्यवस्था केलेली आहे, टॉयलेटची व्यवस्था केलेली आहे, चहाची देखील व्यवस्था केलेली आहे. आम्ही येथे जो ठराव मांडलेला आहे, त्यातील दृष्टीकोन तशाच प्रकारचा आहे. आम्ही ठरावामध्ये शिर्डी, सिध्दीविनायकच्या बाबतीत उल्लेख केलेला आहे. आम्हा राजकारण्यांना त्याठिकाणी ट्रस्टी व्हावे असे वाटत असते. कशासाठी? देवावरील श्रध्देसाठी, काहीतरी यातून चांगले करता यावे म्हणून तुम्ही जाता का ? मग ही भांडणे कशासाठी ? शिर्डीच्या ट्रस्टीवरुन किती भांडणे होतात ? कशासाठी ? हे सर्व पाहिल्यावर असे वाटते की, हे सगळे थोतांड आहे. यानिमित्ताने मला असे सांगावयाचे आहे की, ज्या काही प्रेकॉर्शन घ्यावयास पाहिजेत, खरे म्हणजे प्रिव्हेन्टीव्ह मेजर्स् असावयास पाहिजेत. पण आमच्याकडे सगळे रेमिडिअल असते म्हणजे काही झाल्यानंतर औषधोपचार सरु. पण त्याकरता अगोदरच प्रिव्हेन्टीव्ह मेजर्स् घेत नाही. आम्ही भराडीदेवीला जातो. मला एस.टी.च्या लोकांचे कौतुक करावेसे वाटते. या एस.टी.च्या लोकांचे सर्व वर्तमानपत्रातून कौतुक झाले आहे. अपघातग्रस्त झालेल्या लोकांना हे लोक आपल्या वाहनातून घेऊन गेले. हे सर्व पाहिल्यानंतर असे वाटते की, अजूनही कुठेतरी माणुसकी शिल्लक आहे. श्रध्देमध्ये आपण काय-काय अर्पण करतो. तर श्रीफळ अर्पण करतो, नारळ फोडतो, तेलही वाहतो. पण यासाठी तेथे व्यवस्था करावयास पाहिजे. तेथे पाण्याचा निचरा कसा होईल किंवा जे तेल वाहिल्यानंतर त्याचा निचरा कसा होईल हे देखील पाहिले पाहिजे. पण दुर्दैवाने यातही वाकडे धंदे करणारी माणसे आहेत. म्हणजे लोकांकडून जे तेल वाहिले जाते, ते साठवून पुन्हा तेच तेल बुडकूल्यामध्ये भरुन आपल्याला दिले जाते. अशा वेळी तेल आणि पाणी यांचा निचरा होण्याची व्यवस्था झाली तर हे प्रकार थांबू शकतात. या छोटया-छोटया गोष्टींकडे आतापर्यंत लक्ष देण्यात आलेले नाही. लाख्यासूर नावाचा राक्षस होता. देवीच्या बाबतीत ब-याच अख्यायिका आहेत की, तिने राक्षसाचा वध केला किंवा त्याचा पराभव केला वगैरे. या लाख्यासूराने मांढरादेवीला सांगितले की, मला तुझ्या पायाशी ठेव. मला वर्षातून एकदा तू दर्शन तरी दे. तसेच त्याने तिच्याकडे मागणी केली की, वर्षातून एकदा नरबळी

. . . .3 डब्ल्यु- 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत . . . .

दे. त्यावर ती म्हणाली की, मी तुला नरबळी देणार नाही. मी तुला पशु देईन. म्हणून बकरे कापले जातात अशी अख्यायिका आहे. आता ती श्रध्दा आहे, पण त्याला सुध्दा व्यवस्थित वळण लावता येईलह. त्यासाठी सुध्दा वेगळी जागा ठेवता येईल. बक-याच्या कातडयापासून देवस्थानच्या ट्रस्टला उत्पन्न मिळते. ठीक आहे, त्यांना हे उत्पन्न मिळू द्या, चांगले होऊ द्या. पण याबाबतीत योग्य प्रकारे व्यवस्थापन व्हावयास पाहिजे. आम्ही असे ऐकत आहोत की, आपण देवस्थान मंत्री नेमणार आहात. चांगली गोष्ट आहे. उद्या त्याचीच मूर्ती केली नाही म्हणजे झाले ? कदाचित यामागची संकल्पना चांगली असेल. ही सर्व देवस्थाने शासनाच्या अखत्यारित आणलीच पाहिजेत असे माझे मत आहे. खाजगी ट्रस्ट म्हणजे निव्वळ घ्यावयाचे आणि खावयाचे आणि तेथील बाकीच्या व्यवस्थेशी आमचा काही संबंध नाही असे त्यांना वाटते. म्हणून याठिकाणी जो प्रस्ताव आणलेला आहे, त्याला मी मनापासून पाठिंबा देतो. तसेच तीर्थस्थानाच्या ठिकाणी ज्या घटना घडल्या आहेत, त्याबाबतीतही काही सूचना केल्या आहेत. त्यामध्ये वाहनतळ असावा, ध्वनिक्षेपक असावा. पण त्याठिकाणी दुकानांमधून एवढया मोठया आवाजात कॅसेट लावल्या जातात की, ध्वनिक्षेपकावरुन दिलेल्या सूचना कोणालाही ऐकू जात नाहीत. याबाबतीत शेवटी आणखी एक गोष्ट करावयास पाहिजे आणि ती म्हणजे देवस्थानाच्या ठिकाणी एक दिशा मार्ग करावयास पाहिजे. दर्शन एका बाजूने घ्यावयाचे आणि बाहेर पडण्याचा मार्ग दुसरा असला पाहिजे. असे केले तर अपघात घडतील असे मला वाटत नाही. आपण सिध्दीविनायक मंदिरामध्ये गेल्यावर आपल्या लक्षात येते. तेथील ट्रस्टकडे गणपतीच्या दयेने भरपूर पैसे आहेत आणि ते लोक मंडप घालतात, चांगली शेड बांधतात. जेणेकरुन रांगेमध्ये उभे असणा-या लोकांना उन्हाचा त्रास होऊ नये. तशाच प्रकारची व्यवस्था आपण केली तर ते लोकांच्यादृष्टीने सोयीचे होईल. सन्माननीय सदस्यांनी मघाशी पंढरपूरचे उदाहरण दिले. मी 1988 मध्ये पंढरपूरचा संपर्क प्रमुख होतो. तेथील यात्रेच्या वेळी मी मुंबईमधून ॲम्ब्युलन्स् घेऊन जात असे आणि त्यावेळी माझ्यासोबत डॉक्टर, औषधे असावयाची. पंढरपूर येथे वेगवेगळे स्पॉटस् आहेत, जेथे एका वेळी बरेच लोक जमतात आणि फेर धरतात, नाच करतात. आता तेथे ब-यापैकी व्यवस्था आहे पण पूर्वी तशी स्थिती नव्हती. तेव्हा तेथे चिखल, घाण असावयाची. सन्माननीय सदस्यांनी मघाशी सांगितले त्याप्रमाणे चंद्रभागेच्यादारी हांगणदारी अशी अवस्था होती. त्यामुळे तेथे दोन गोष्टी सातत्याने जाणवत असत आणि त्या म्हणजे डिसेन्ट्री, ताप किंवा वांत्या याचा लोकांना

. . . .3 डब्ल्यु-3

श्री.अरविंद सावंत . . . .

त्रास होत असे. अशा वेळी लोकांना प्राथमिक स्वरुपाची मदत आम्ही तेथे नेत होतो. अशा प्रकारच्या अनेक संस्था आहेत, एन.जी.ओ. आहेत की, जे चांगले काम करीत आहेत. त्यांचाही सहभाग या कामामध्ये शासनाने घ्यावयास पाहिजे. सन्माननीय सदस्यांनी मघाशीच सांगितले की, अशी संस्था आहे की, जेथील लोक मोफत स्वरुपात अशा ठिकाणी जाऊन काम करतात. अशा संस्थांनाही या कामामध्ये सहभागी करुन घेतले तर ते सोयीचे होईल. ही चर्चा उपस्थित करण्यामागचा एकच उद्देश आहे की, दुर्दैवाने पुन्हा अशा प्रकारच्या घटना घडू नयेत आणि त्यासाठी काही शकलो तर या चर्चेतून आपण काही मिळविले असे मी समजेन. धन्यवाद.

-----

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, आज या सभागृहापुढे ग्रामीण भागाशी निगडित असलेला अतिशय ज्वलंत प्रश्न आज चर्चेसाठी आलेला आहे. मांढरदेवीची घटना ही या महाराष्ट्राच्या इतिहासातील काळी घटना होऊन गेली. पण एवढ्या मोठ्या घटनेला फक्त 'अपघात' म्हणून हा प्रश्न वाऱ्यावर सोडून देण्याचा शासनाचा जो प्रयत्न आहे, तो चांगला नाही. वास्तविक पहाता, ग्रामीण भागातील देवस्थाने ही ग्रामीण भागातील जनतेची श्रध्दास्थाने आहेत, त्या ठिकाणी जत्रा भरतात. हा ग्रामीण भागातील संस्कृतीचा, त्यांच्या श्रध्देचा त्यांच्या परंपरेचा, रूढींचा एक अनमोल ठेवा आहे, असे याकडे पहाणे आवश्यक आहे. ज्या काही रूढी, परंपरा असतील त्याला 'अंधश्रध्दा' म्हणून हिनवणे हे या महाराष्ट्राच्या सभागृहाला शोभणारे वक्तव्य नाही. पशु बळीचा विषय या ठिकाणी चर्चिला गेला. ग्रामीण भागातील रुढी आणि परंपरा जतन करण्यासाठी एखाद्याने श्रध्देने बोकड कापले, म्हणून ती 'अंधश्रध्दा' आहे, असे म्हणून त्यास हिनवणे बरोबर नाही. परंतु बकरी ईदला एखादा मुस्लीम भाविक जर बकरे कापत असेल तर जी भावना त्या मुस्लीम भाविकाची असते तीच भावना हिंदू भाविक एखाद्या श्रध्देच्या ठिकाणी बोकड कापून व्यक्त करत असेल तर दोन्हीमध्ये फरक करणे, माझ्या मते चुकीचे आहे. अशाप्रकारचा कायदा देखील करणे हेही माझ्या मते योग्य होणार नाही.. मी धनगर समाजातील आहे. धनगर समाजाचे सांगली जिल्ह्यातील तारेवाडी या ठिकाणी "विरोबा"चे दैवत आहे. त्या ठिकाणच्या यात्रेसाठी 5 लाख भाविक जमतात. मला आठवते, माझ्या लहानपणी माझ्या आजीने माझे डोळे चांगले व्हावेत, म्हणून पाच बोकडाची दावन देण्याचा नवस केला होता. तशी माझी आजी माळकरी होती. स्वत: ती वारकरी होती, परंतु नातवाचे डोळे व्यवस्थित व्हावेत, म्हणून आजीने विरोबाला पाच बोकडाची दावन देण्याचा नवस केला होता. डोळ्यात फूल पडणे, असे त्यावेळेस म्हटले जात होते, ते माझ्या डोळयात फूल पडलेले होते. सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार साहेब ग्रामीण भागामध्ये याला फूल पडणे असे म्हणतात. त्यावेळेस माझ्या डोळ्यासाठी खूप काही प्रकार केले. कानात मोळी बांधणे, पान खाऊन फुंकर घालणे, अशा ग्रामीण भागामध्ये ज्या रुढी, परंपरा होत्या त्याप्रमाणे इलाज करुन पाहिला. त्या मागची भावना महत्वाची आहे. एखादा मुस्लीम बांधव कुर्बानी म्हणून बोकड देतो. बोकड एक लाखाचे घेतो, आता तर दहा-दहा लाखाचे बोकड घेतले जातात. त्या मागची त्यांची भावना आहे. म्हणून माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, अशाप्रकारचा कायदा करुन, त्यांच्या भावनांशी आपण खेळू नका... त्यावेळेस माझ्यासाठी आजीने

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/

श्री.प्रकाश शेंडगे (पुढे चालू.....

नवस बोलल्याप्रमाणे बोकड बळी दिलेच. आता मी डोळ्यासाठी डॉक्टरकडे जाऊन इलाज करुन घेतो.

श्री.मधुकर चव्हाण (बसून) : दोन डोळ्यांसाठी बोकडांचे दहा डोळे बळी घेतले.

श्री.प्रकाश शेंडगे : आता डोळ्याच्या रोगाच्या साथीमध्ये माझे डोळे आल्यानंतर मी बोकड बळी देत नाही, तर मी डॉक्टरांकडून इलाज करुन घेतो. हा जो फरक झालेला आहे, तो जनरेशन गॅप आहे, हा शिक्षणाचा प्रभाव आहे. ग्रामीण जनता ही अशिक्षित जनता आहे, तिला योग्य ते शिक्षण दिले तर माझ्या मते, या ज्या रुढी, परंपरा आहेत, त्या कालांतराने आपोआपच संपून जातील. आधुनिकता, ग्लोबलायझेशन या सर्वांचा परिणाम आपोआप होत आहे. म्हणून मला सुचवावयाचे आहे की, ग्रामीण जनतेला अशाप्रकारे कायद्याच्या चौकटीत बांधून त्यांच्या भावनेशी आपण खेळू नये, अशी नम्र विनंती सरकारला आणि सर्व सन्माननीय सदस्यांना करीत आहे.

यानंतर कु.थोरात.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ MHM/ प्रथम श्री. किल्लेदार... 20:40

श्री. प्रकाश शेंडगे...

महाराष्ट्रात खूप देवस्थाने आहेत. काही बंजारा समाजाचे शेवराज महाराज हे देवस्थान आहे तेथे लोखो बजांरे जमतात. वंजा-याचे देवस्थान आहे. धनगर समाजाचे देवस्थान आहे. या सर्व समाजाची जी देवस्थाने आहेत, त्यांना तीर्थक्षेत्राचा दर्जा देऊन त्यांना निधीची करुन तेथे नियोजन करणे आवश्यक आहे. भैरोबाच्या यात्रेमध्ये एक लाख बोकडे एका दिवशी कापली जातात. प्रत्येक वेळी जत्रेच्यावेळी अंधश्रध्दा, ग्रामस्थ आणि समाजात तणाव निर्माण होतो. तेथे पोलीस बंदोबस्त, कलेक्टरची माणसे असणे आवश्यक आहे. हा प्रकार थांबवायचा असेल तर माझी शासनाला नम्र विनंती आहे की, अंधश्रध्दा निर्मूलनाचे लोक प्रत्येक ठिकाणी जातात त्यामुळे तेथे विनाकरण तणाव निर्माण होतात. त्या तणावातून उद्या कदाचित काही विपरित घडण्याची शक्यता आहे. म्हणून माझ्यामते हे प्रकरण कोर्टात आहे. औरंगाबाद खंडपिठाने याच्यासाठी काही निर्णय दिलेले आहेत. ज्या ठिकाणी बकरे कापावयाचे आहेत त्याठिकाणी काही तरी व्यवस्था करा, असे आदेश दिलेले आहेत. ते बकरे कुठे कापले पाहिजे यासंबंधात काही निर्देश दिलेले आहेत. ते बकरे उघडयावर कापू नका, त्याच्या रक्ताचे नियोजन व्यवस्थित करा. हे सगळे आदेश कोर्टाने दिलेले आहेत. कोर्टाने आदेश दिलेले असतांना, कोर्टाने यावर बंधन घातले नाही. कोर्टाने या सगळया भावनांची कदर केली. पण तेथे निधी अभावी काही कमी पडत असेल तर शासनाने अशा ठिकाणी जाऊन एकाद्या अधिका-यांची नेमणूक करुन तेथे निधी कमी पडत असेल तर निधीची व्यवस्था करणे आवश्यक आहे. तसेच त्याठिकाणी नारळाच्या पाण्याची, रक्ताची व्यवस्था करणे अतिशय आवश्यक आहे. पुणे जिल्हयामध्ये इंदापूर तालुक्यात बाबीर देवस्थान आहे. ते धनगर समजाचे असेच एक मोठे देवस्थान आहे. तेथे जाण्यासाठी रस्ताच नाही. पिण्यासाठी पाणी नाही. मागच्यावेळी मी त्या यात्रेला गेलो होतो. आपले संसदीय कार्यमंत्री तेथील आमदार आहेत. मंत्री आहेत. त्यांना त्यावेळेस विनंती केली होती, की, देवस्थानात येण्यासाठी रस्ता नाही. मुख्य रस्त्यापासून कच्या रस्त्याने मंदिरात येण्यासाठी जवळ जवळ दोन अडीच तास लागले. त्यावेळी त्यांनी त्या मंदिराच्या देवस्थानाच्या सभेतच जाहीर केले होते की, मी आमदार फंडातून रस्ता करुन घेईन. त्याप्रमाणे त्यांनी तो रस्ता पूर्ण केला आहे. पण तो रस्ता सिंगल रस्ता आहे. त्यामुळे एखादे वाहन जात असेल तर येणा-या वाहनाला रस्ता रहात नाही. त्यामुळे तेथे थोडाफार निधी उपलब्ध करुन

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे..

देऊन तो रस्ता डबल केला तर बरे होईल. कोणी तरी सूचना केली की, ज्या रस्त्याने जायचे असते त्या रस्त्याने परत येता कामा नये. गर्दी एका रस्त्याने गेल्यानंतर दुस-या रस्त्याने ती परत आली पाहिजे. त्याप्रमाणे या ठिकाणी दुसरा रस्ता तयार केला तर माझ्यामते यात्रेच्यावेळी वाहतुकीची जी कोंडी होते ती कोंडी होणार नाही. मी जेजुरीच्या बाबतीत शासनाचे लक्ष वेधू इच्छितो की, तेथे पाण्याचा अतिशय गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. तेथे चोरांचा सुळसुळाट
झालेला आहे. त्यामुळे तेथे पोलीस बंदोबस्त व्यवस्थित करावा आणि पाण्याचाही प्रश्न सोडवावा. तुळजापूरच्या बाबतीत एका प्रश्नाचा प्रामुख्याने उल्लेख करतो. तेथे खाली फरशी लावलेली आहे. उन्हाळयामध्ये ती फरशी तापलेली असते. उन्हामध्ये शेकडो, हजारो भाविक त्या फरशीचे चटके सहन करत त्या ठिकाणी उभे असतात. ब-याचशा म्हाता-या बायका चक्कर येऊन पडतात. अशा प्रकारे काही बायका पडल्यानंतर तेथील लोक असे म्हणतात की, देवी अंगात आली म्हणून पडली. वास्तविक पाहता तेथे खाली लादी लावलेली आहे. वरती छत करण्याची नितांत आवश्यकता आहे. ज्या ज्या ठिकाणी लोक उन्हात रांगेत उभे असतात त्या त्या ठिकाणी छत करण्याची आवश्यकता आहे. शेगावला बाहेरपर्यंत छत केलेले आहे. त्यामुळे त्यांना तेथे सावली निर्माण होते. तशा प्रकारची सोय तुळजापूरला करण्याची आवश्यकता आहे. माझ्या मते ज्या ज्या सूचना डॉ. निलम गो-हे आणि श्रीमती कांता नलावडे यांनी केल्या आहेत त्या त्वरित अंमलात आणाव्यात आणि यासाठी सर्वंकष अशी समिती नेमून एखादा व्ही.आय.पी. आल्यानंतर तेथे जसा हजारो पोलिसांची फौज असते. मला आठवते पंढरपूरच्या मेळाव्यात जवळ जवळ चार ते पाच हजार पोलीस मी तेथे बघितले. मी एका एस.पी.ला विचारले तेव्हा त्याने सांगितले की, 12 एस.पी. तेथे आहे. एक डी.जी. लेव्हलचा माणूस तेथे आहे. अशा त-हेने व्ही.आय.पी. आल्यानंतर तुम्ही जशी पोलिसांची सोय लावता तशी ग्रामीण जनतेसाठी थोडीफार तरी सोय करावी अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो. जय हिंद . जय महाराष्ट्र.

-----

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ ( विधी व न्याय राज्यमंत्री ) : सभापती महोदया, सन्माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी नियम 97 अन्वये हा प्रस्ताव या ठिकाणी मांडलेला आहे. सर्व सन्माननीय सदस्यांची भाषणे मी अतिशय मन:पूर्वक ऐकलेली आहेत. माननीय उपमुख्यमंत्री विधानसभेमध्ये होते. त्यांनी या ठिकाणी यावे आणि उत्तर द्यावे अशी सन्माननीय सदस्यांची अपेक्षा होती. माननीय उपमुख्यमंत्री हे गृह खात्याबाबत बोलणार आहे. या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे, सन्माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे, सन्माननीय सदस्य कर्नल सुधीर सावंत, सन्माननीय सदस्य सर्वश्री उल्हास पवार, अनंत तरे, डॉ. दीपक सावंत, सर्वश्री अरविंद सावंत, प्रकाश शेंडगे, मधुकर चव्हाण इत्यादी सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला. विशेषत: मांढरदेवीच्या दुर्दैवी घटनेनंतर आपण सगळेच खडबडून जागे झालो. प्रजासत्ताक दिनाच्या आदल्या दिवशी ही दुर्दैवी घटना घडली आणि आपले राज्यच नव्हे तर संपूर्ण देश शोकाकुल झाला. दुसऱ्या दिवशी प्रजासत्ताक दिन अतिशय विमनस्क अवस्थेमध्ये आपण सर्वांनी साजरा केला. ज्यावेळी अशा घटना घडतात त्याचवेळी त्याची फार मोठी चर्चा होते याचा उल्लेख अनेक सन्माननीय सदस्यांनी केला. अनेक सन्माननीय सदस्यांनी त्या ठिकाणी जाऊन तेथे ज्या गैरसोयी होत्या, ज्या अडचणी होत्या, ज्या गोष्टींमुळे या घटना घडल्या त्यावर प्रकाश टाकण्याचे काम केलेले आहे. सभापती महोदया, ही घटना घडत असताना पोलिसांची चूक, विश्वस्तांची चूक, रस्ते रुंद नव्हते, ते अरुंद होते, त्या ठिकाणी सांडलेले रक्त, तेल, पाणी, शॉर्ट सर्कीट, मुंबईतील धारावीचे लोक आले आणि त्यांनी लुटालूट केली या सगळया घटना ऐकल्या की, मन अतिशय विदीर्ण होते. ज्याची ही जबाबदारी आहे त्याचा उल्लेख सर्व सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणामध्ये केला. ती त्या विश्वस्तांची जबाबदारी आहे, पोलिसांची जबाबदारी आहे तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, नगरविकास विभाग, पर्यटन विभाग या सर्व खात्यांनी आपापल्या परीने ही व्यवस्था करणे गरजेचे होते. म्हणून आमच्या विधी व न्याय खात्याने धर्मादाय आयुक्तांना, सर्व विश्वस्तांना सूचना दिलेल्या आहेत की, यात्रेच्या पूर्वी ज्या ठिकाणी अशी गर्दी होते, मोठया प्रमाणावर भाविक जमतात त्याबाबत विभागीय आयुक्तांवर जबाबदारी टाकावी. जिल्हाधिकारी, स्थानिक स्वराज्य संस्था, लोकप्रतिनिधी, विश्वस्त, पुजारी यांची बैठक घ्यावी आणि ज्या यात्रेच्यावेळी एवढया मोठया संख्येने लोक येतात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

श्री. हसन मुश्रीफ ......

त्यावेळी त्या ठिकाणी व्यवस्था कशी होईल यासाठी साधकबाधक चर्चा करुन यात्रेच्या वेळी व्यवस्था केली पाहिजे. अशा सूचना विभागीय आयुक्तांना देण्यात येतील. काही ठिकाणी हजारो लोक येतात परंतु त्या ठिकाणी ट्रस्ट नाही, शासनाचे कोणतेही नियंत्रण नाही, याचा उल्लेख सन्माननीय सदस्य कर्नल सुधीर सावंत आणि इतर अनेक सन्माननीय सदस्यांनी केला, आंगणेवाडीचा उल्लेख करण्यात आला. त्यासंदर्भात कायद्यात बदल करुन त्यांचा न्यास स्थापन केला जाईल आणि विधिमंडळात तो कायदा केला जाईल. ज्या ठिकाणी न्यास नाही, ट्रस्ट नाही त्या ठिकाणी विश्वस्ताची योजना विधिमंडळामध्ये कायद्यात बदल करुन आणू. न्यासाच्या वतीने त्यांच्याकडे जे पैसे असतील उदा. मांढरदेवी ट्रस्टकडे 96 लाख रुपये असूनही त्यांनी पायऱ्या दुरुस्त केल्या नाहीत. अशा सर्व न्यासांना सूचना देण्यात येतील. त्यांनी आपल्या पैशातून सुविधा करणे मग त्यामध्ये पिण्याच्या पाण्याची सोय असेल, कत्तलखाना असेल इत्यादी सोयी करणे भाग पाडूच परंतु त्यांच्याकडे पैसे नसतील तर शासन, लोकप्रतिनिधी, स्थानिक आमदार असतील यांच्या माध्यमातून ते करुन देण्यासाठी सर्व विश्वस्तांना कळविण्यात येईल.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MHM/ श्री.बरवडनंतर 20:50

श्री.हसन मुश्रीफ....

त्यांच्यावर बंधन टाकले जाईल. डिझास्टर मॅनेजमेंटचा अहवाल जिल्हाधिका-यांनी गंभीरपणे विचारात घेतला नाही असे मा.सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी म्हटले. आमच्या विश्वस्तांनी डिस्झास्टर मॅनेजमेंटच्या अहवालानुसार यात्रेच्या वेळी काही झाले तर काय केले पाहिजे यासाठी वाचन केले पाहिजे. त्यामध्ये ज्या सूचना असतील त्यांचे पालन करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले पाहिजेत. तशा सूचना व बंधन आमच्या खात्याकडून टाकले जाईल. मा.सदस्य श्री.उल्हास पवार यांनी एक चांगली सूचना मांडली. तुकडोजी महाराजांनी देशाचे पहिले राष्ट्रपती डॉ.राजेंद्रप्रसाद यांना एक पत्र लिहिले होते की न बोलविता फक्त श्रध्देने लाखो लोक येतात त्या देवाचे दर्शन तर व्हावेच, परंतु देशभक्ती कशा निर्माण होईल यासाठी जो अहवाल पाठविला होता तो जर अहवाल आला तर महाराष्ट्र शासन निश्चित विचार करील आणि येणा-या लोकांमध्ये देशभक्ती कशी जागृत राहील यासाठी शासन प्रयत्न करील असे अभिवचन देतो. ट्रस्ट व न्यासासंबंधी काही सूचना आल्या आहेत. यामध्ये शिर्डी व सिध्दीविनायक ट्रस्टमध्ये बदल केल्याचा उल्लेख झाला. हे चुकीचे झाले. फक्त चांगली मॅनेजमेंट यावी म्हणून आम्ही त्या न्यासात बदल केलेला आहे. जेजुरीबाबत वाद आहे, परंतु तो भ्रष्टाचाराबाबत नाही, ते प्रकरण न्यायालयात असून त्याच्या तारखा चालू आहेत. ही चर्चा चालू असताना माझ्यासारख्या राष्ट्रीय मुसलमानाचे मन विदीर्ण झाले. हाजीमलंग येथील दुकाने का पाडली नाहीत असे मा.सदस्य श्री.अनंत तरे म्हणाले. मा.सदस्य श्री.उल्हास पवार म्हणाले की, पशुहत्येवर बंदी आणावी. परंतु कोणीतरी कुर्बानीच्य बक-यावर बंदी आणावी असे सांगितले. अफझलखानाच्या कबरीचा उल्लेख केला, हे सर्व ऐकल्यानंतर माझ यासारख्या राष्ट्रीय मुसलमानाचे हृदय किती विदीर्ण होते ? त्याचा कोणीही विचार केला नाही.

डॉ.दीपक सावंत : पशुवध कायदा आणणार असाल तो सर्वांना लागू झाला पाहिजे असे आमचे म्हणणे होते. जो कायदा आणला जाईल तो सर्वांना लागू झाला पाहिजे, आम्हाला लागू होतो तो इतर धर्मियांना लागू होईल अशी व्यवस्था करावी असे म्हणणे होते. त्यामुळे तुमच्या भावना दुखावण्याचा प्रश्न नाही.

2....



NTK/ SBT/ MHM/

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ : मुसलमानांच्या कुर्बानीवर बंधन घालण्याची मागणी केली जी आमच्या धर्मामध्ये आवश्यक आहे. माझे मत आहे की, त्या घटनेनंतर जे दिसले ते काळिमा फासणारे आहे.ज्याचा उल्लेख झाला आहे. माझ्या घरातील स्त्री आहे असे समजून स्त्रियांच्या अंगावरील दागिने काढण्यात आले. एका नववधूच्या अंगावरील सर्व दागिने काढले गेले, तिच्या अंगावर फाटका मणीही ठेवला गेला नाही असे मा.सदस्या श्रीमती कांता नलावडे यांनी सांगितले. ही दु:खदपूर्ण गोष्ट आहे. अशा घटनांमध्ये अशा लोकांचे फावते, त्यामुळे जे जे फायदा घेणारे लोक असतात त्याबाबत मा.उपमुख्यमंत्री महोदय बोलतील. परंतु अशा जत्रा भरतात त्याच्यावरुन असे दिसते की, लोक दैववादी होत चालला आहे. माणूस चंद्रावर गेल्यावर ते अंतरिक्ष यान सुरक्षित यावे म्हणून लोक चर्चमध्ये प्रार्थना करतात. जसे सायन्स वाढले आहे तसा माणूस दैववादी होऊ लागला आहे. प्रत्येकाच्या श्रध्देचा भाग वेगळा आहे. आमच्या तालुक्यात 2-3 गावात मारुतीचे मंदिर आहे तेथे कोणीही जात नाही. आम्ही दोघे जातो. तेथे बकरे कापले जातात, पण गाडया रस्त्यावर उभ्या करण्यासाठीही जागा नसते. सांगण्याचा हेतू हा की, आता माणूस दैववादी होऊ लागला आहे. माणसाचा विश्वास विज्ञानावर आहे तसा दैवाकडेही झुकत आहे. हा संशोधनाचा विषय आहे. पण अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी जे जे काही करता येईल ते शासन आवश्यक करील. ज्ञानेश्वरांनी सांगितले होते की, स्वत:चा पैसा खर्च करीत असतानाही साक्षीदारांना ठेवून खर्च करावा.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. हसन मुश्रीफ पुढे सुरु...)

देवासाठी दिलेल्या पैशाचा देखील अपहार केला जातो. भ्रष्टाचार केला जातो ही गोष्ट लांच्छनास्पद आहे. तेव्हा देवाच्या ठिकाणी अशा प्रकारे जो पैसा येईल त्याचे ऑडिट होईल आणि त्या पैशाचा योग्य प्रकारे विनियोग होईल यासाठी आवश्यक ते कायदे करण्यासाठी आमचे शासन प्रयत्न करील एवढेच अभिवचन मी या निमित्ताने देतो.

---

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, एवढया महत्वाच्या चर्चेला या सदनामध्ये मी सुरुवातीपासून उपस्थिती राहू शकलो नाही याबद्दल मी दिलगिरी व्यक्त करतो. खालच्या सभागृहामध्ये गृह विभागाच्या मागण्या होत्या. हे अर्थसंकल्प विषयक अधिवेशन असल्यामुळे त्या मागण्या मंजूर करुन घेण्यासाठी मला थांबावे लागले आणि त्यामुळे काही माननीय सदस्यांनी याठिकाणी नाराजी व्यक्त केली. परंतु त्यांनी माझी अडचण समजून घ्यावी. एका मोठ्या महत्वाच्या विषयाला ख-या अर्थाने तोंड फोडण्याचे काम या चर्चेच्या माध्यमातून झालेले आहे. मांढर देवीची घटना घडली नसती तर डिसास्टर मॅनेजमेंटच्या संदर्भात या सदनामध्ये चर्चा करण्याचा कधी प्रश्न उद्‌भवला नसता. 25 जानेवारीला मांढर देवी येथे एक मोठी दुर्दैवी घटना घडली. त्यामध्ये 291 लोक मृत्यूमुखी पडले आणि 128 लोक जखमी झाले. त्यामुळे सगळयांनीच राज्यामध्ये विविध ठिकाणी होणा-या यांत्रांच्या बाबतीत गांभीर्याने बोलायला आणि त्याबाबतीत आपले विचार मांडायला सुरुवात केली. खरे म्हणजे मांढर देवी येथे वर्षानुवर्षे नेहमीच यात्रा भरते. माननीय राज्यमंत्र्यांनी अत्यंत समर्पक शब्दात या जत्रेचे वर्णन केलेले आहे. अलीकडच्या काळात वाहनांच्या सुविधा वाढल्या, लोकांची ऐपत वाढली आणि त्याचा परिणाम म्हणून अनेक ठिकाणी यात्रेसाठी फार मोठ्या प्रमाणावर गर्दी वाढायला लागलेली आहे. त्या दिवशी पौर्णिमा दीड वाजता संपणार होती. पौर्णिमेच्या दिवशी दीड वाजण्यापूर्वी आपले दर्शन झाले पाहिजे अशी भाविकांची भावना होती. त्यामुळे त्याठिकाणी फार मोठ्या प्रमाणावर लोक जमले होते. ही गोष्ट खरी आहे की, भाविकतेने येथे येत असताना फारशी शिस्तही ठेवली जात नाही. तेथेच पाय-यांवर नारळ फोडले जात होते, तेलही ओतले जात होते. अपघात घडायला ज्या ज्या गोष्टी कारणीभूत असू शकतात अशा गोष्टी तेथे झाल्या होत्या. तेथे आज पर्यन्त अशा प्रकारचा दुर्दैवी प्रसंग कधी घडलेला नव्हता. सर्व भाविक आपापल्यापरिने दर्शन घेण्यात मश्गुल होते. काही बाबींचा उल्लेख झाला. परंतु त्याला आणखी वेगळे फाटे फुटू नयेत. काही भाविक असे सापडले की ते तेथे दारु पित होते. काही लोक वेगवेगळया वाईट भावनेने अशा गर्दीच्या ठिकाणी एकत्र झालेले होते. प्रेताच्या अंगावरचे सोने ओढणारे लोक तेथे होते. गर्दीचा फायदा घेऊन दुकाने लुटणारे लोक होते. लाखो भाविक तेथे आलेले होते. अशा सर्वांचा मोठा समुदाय तेथे होता. साधारणत: जेथे मोठया प्रमाणावर बळी दिले जातात अशा ठिकाणी दारु पिणारे लोकही आढळून आले. असा सगळा

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MHM/ MAP/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 20:55

(श्री. आर.आर.पाटील पुढे सुरु...)

मॉब एकत्र झाल्यानंतर दीडच्या आत दर्शन घेण्याची लोकांची घाई झाली. काही प्राथमिक माहिती शासनाकडे आलेली आहे. परंतु ती माहिती स्पष्टपणे सांगणे उचित होणार नाही. याचे कारण असे की, शासनाने ही घटना फार गांभीर्याने घेतलेली आहे. जे मृत्यू पावले त्यांच्या बाबतीत मुख्यमंत्री फंडातून मदत देण्याची भूमिका शासनाने स्वीकारलेली आहे. मा. पंतप्रधानांनाही विनंती करुन पंतप्रधान फंडातूनही मृत्यू पावलेल्या व्यक्तींच्या संदर्भात मदत मिळवून देण्याची भूमिका शासनाने स्वीकारलेली आहे. शेतकरी कुटुंबासाठी राज्य सरकारने विमा उतरविलेला आहे. ती मदत देखील मिळवून देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. ही मदत लोकांना अत्यंत तातडीने मिळेल अशा प्रकारची भूमिका शासनाने स्वीकारलेली आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MAP/ MHM/ SBT/ KGS/ प्रथम शिगम 21:00

श्री.आर.आर.पाटील...

ही घटना घडली त्याच दिवशी मी आणि माननीय मुख्यमंत्री त्या ठिकाणी गेलो होतो. त्या ठिकाणी जिल्हयाचे पालक मंत्री श्री.दिलीप वळसे पाटील उपस्थित होते. माननीय मंत्री श्री. अजित पवार हे त्या ठिकाणी उपस्थित होते. केंद्रीय नेत्यांपासून ते राज्यातील विरोधी पक्ष नेत्यांपर्यन्तची सर्व मंडळी त्या घटनेच्या ठिकाणी तातडीने मदतीसाठी आले होते. अपेक्षा पेक्षा जास्त राजकीय नेते त्या ठिकाणी उपस्थित होते. एक गोष्ट खरी आहे की, देवीच्या डोंगरावर जाळपोळ सुरु झाली होती, त्यावेळी शेकडो माणसे मेल्याच्या बातम्या खाली येत होत्या, पण त्यांना खालून मदत करण्याचे म्हटले तर कुठलेही वाहन वर जाऊ शकत नव्हते. आपण खाली सुखरुप पोहोचले पाहिजे यासाठी भाविकांची घाई चालली होती. डोंगरावरुन खाली येणा-या वाहनांचा लोंढा एवढा प्रचंड होता की, खालून कुठल्याही पध्दतीची मदत डोंगरावर करणे शक्य होत नव्हते. मदत करण्यामध्ये अत्यंत अडचणी निर्माण होत होत्या. जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांना डोंगरावरील देवीच्या मंदीराजवळ चालत जाण्यास जवळपास दीड तास लागला. ते चालत त्या ठिकाणी पोहोचले. त्या ठिकाणी एकंदर परिस्थिती भयानक प्रकारची त्यांना दिसून आली. प्रशासनातील काही लोकांना मारहाण करण्याचा प्रयत्न त्या ठिकाणी केला जात होता. त्या ठिकाणची दुकाने लुटली जात होती. लाखोचा जनसमुदाय डोंगरावर होता. या ठिकाणी प्रश्न उपस्थित केला गेला की, त्या ठिकाणी पुरेसा पोलीस बंदोबस्त होता काय ? आज पर्यन्त कधीच ठेवला नव्हता एवढा बंदोबस्त त्या ठिकाणी ठेवण्यात आला होता. जवळपास 263 पोलीस कर्मचारी बंदोबस्तासाठी ठेवण्यात आले होते. सातारा जिल्हयातील पोलीस दलाची संख्या लक्षात घेता त्या ठिकाणी पोलिसांची संख्या त्या ठिकाणी कमी होती असा अर्थ निघू शकत नाही. शेवटी स्वयंशिस्त सुटते त्यावेळी कितीही पोलीस ठेवले तरी एवढा मोठा भाविकांचा प्रचंड जमाव कंट्रोल होऊ शकेल हा उत्तर न सापडणारा प्रश्न आहे. अशा यात्रांना जात असताना भाविकांनी देखील स्वयंशिस्त पाळली पाहिजे. ती त्या ठिकाणी पाळली गेली नाही. विरोधकांनी फारशी मागणी केलेली नसताना,यासंबधी आग्रही भूमिका घेतली नसताना देखील या संदर्भात सदस्यांकडून चांगल्या सूचना येतील म्हणून ही चर्चा सभागृहात उपस्थित केली गेली आहे.राज्यामध्ये अशा प्रकारच्या शेकडो यात्रा भरविल्या जात आहेत, त्या यात्रेसाठी लाखो भाविक जमतात. देवांची काही वैशिष्ठ आहे. देवांना सुध्दा दुर्गम ठिकाणी वास्तव्य पसंत आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी पर्वतावर, डोंगरावर अशा यात्रा भरता आहेत. ब-याच ठिकाणी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील...

मंदीरात जाण्यासाठी रस्ते नाहीत. ब-याच मंदीरांवर चालत जावे लागते. मांढरादेवीच्या यात्रेच्या घटनेची पुनरावृत्ती राज्यात इतरत्र कुठेही होऊ नये. म्हणून झालेल्या प्रकाराचे योग्य पध्दतीने विश्लेषण झाले पाहिजे. त्याची कारणे कळली पाहिजे. अशा प्रकारची घटना कुठे होऊ नये म्हणून मार्ग सुध्दा सुचविले पाहिजे, म्हणून या घटनेची निवृत्त न्यायाधीशामार्फत चौकशी करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतलेला आहे. मी दरम्यानच्या काळात वर्तमानपत्रात वाचले केली की, या घटनेची चौकशी करण्यासाठी अजून निवृत्त न्यायाधीशांची नेमणूक केली जात नाही. हा न्यायाधीश चीफ जस्टीस यांच्या सल्ल्याने नेमावयाचा होता. या घटनेची निपक्षपातीपणे चौकशी झाली पाहिजे आणि भविष्यात असे प्रकार होऊ नयेत म्हणून चांगल्या उपाययोजना सुचविल्या जाव्यात यासाठी ही कमिटी राज्य सरकारला नेमावयाची होती. हायकोर्टाने प्रथम जिल्हा न्यायाधीशांचे नाव सुचविले. यासंदर्भात राज्य सरकारने चीफ जस्टीस यांना पुन्हा विनंती केली की, ही बाब मोठी आहे.ही घटना गंभीर आहे. म्हणून ही चौकशी हायकोर्टाच्या निवृत्त न्यायाधीशांच्या मार्फतच करावयाची आहे. राज्य सरकारची विनंती माननीय हायकोर्टाने मान्य केलेली आहे. न्यायमूर्ती श्री. कोचर हे या घटनेची संपूर्णपणे चौकशी करणार आहेत. या घटनेची संपूर्ण चौकशी न्यायमूर्तीमार्फत करण्यात येणार असल्यामुळे त्यासंदर्भात राज्य सरकारने आधीच मत व्यक्त करणे, काही निष्कर्ष व्यक्त करणे, हे चौकशीच्या दृष्टीने अडचणीचे होईल. म्हणून मी या घटनेच्या बाबतीत फारशी मते व्यक्त करीत नाही. चार महिन्यात न्यायमूर्तींचा अहवालच आपल्याला प्राप्त होणार आहे. त्यांचा अहवाल दोन्ही सभागृहाच्या पटलावर ठेवला जाणार आहे. त्या अहवालातील शिफारशींचा निश्चितपणे विचार केला जाईल. मांढरादेवी घटनेची चौकशी न्यायमूर्ती करणार असल्यामुळे मी फारसे बोलू इच्छित नाही. एकंदर महाराष्ट्रात भरविल्या जाणा-या यात्रेंच्या संदर्भात काही गोष्टी करण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे. राज्यातील देवस्थानांचे ट्रस्ट कार्यक्षम केले गेले पाहिजे. केवळ पोलीस दलावर, प्रशासनावर अवलबून न रहाता त्या ठिकाणच्या स्वयंसेवी संघटना आहेत, सामाजिक कार्यकर्ते आहेत अशांचे सहकार्य त्या ठिकाणी शांतता राखण्यासाठी घेतले गेले पाहिजे. तसा प्रयत्न विश्वस्तांकडून केला गेला पाहिजे. म्हणून प्रत्येक देवस्थानांच्या विश्वस्तांना तशाही प्रकारच्या सूचना करण्यात येतील...

यानंतर श्री. कानडे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MAP/ 21:05

श्री. आर.आर.पाटील ...

सुदैवाने अनेक ट्रस्टकडे आज मोठा निधी शिल्लक आहे. मांढरादेवी ट्रस्टकडे आजही खात्यावर 60 लाख रुपये शिल्लक आहेत. हे पैसे ब-याच ठिकाणी सुविधांसाठी वापरले जातात. सुविधांसाठी पैसा वापरण्यासाठी कोणाचीच हरकत असण्याचे कारण नाही. सुविधांपेक्षाही सुरक्षा महत्वाची आहे.असे प्रकार होऊ नयेत म्हणून किमान सुरक्षेच्या बाबतीत ज्या गोष्टी कराव्या लागतील त्या गोष्टी केल्या पाहिजेत. या गोष्टी करण्याची भूमिका प्राधान्याने ट्रस्टने घेतली पाहिजे अशा पध्दतीच्या सूचना सगळया ट्रस्टना देण्यात येतील.याबाबतीत कोणाचे तरी सनियंत्रण असणे आवश्यक आहे. मांढरादेवीच्या दुर्घटनेत हे स्पष्ट झालेले आहे की पुरेशा सुविधा अभावी लोक प्राणास मुकले. मरणारांना त्याठिकाणी पाणी सुध्दा दिले जात नव्हते. औषधे मिळणे दुरापास्त होते. सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी औषधे उपलब्ध करुन देण्यासाठी कोणी तरी जिल्हा स्तरावर नियंत्रण करण्याची गरज आहे. 7 तारखेला राज्य सरकारने मार्गदर्शक सूचना जिल्हाधिका-यांना दिलेल्या आहेत. जिल्हाधिका-यांनी किमान प्रत्येक देवस्थानचा आढावा घेऊन तेथील सुरक्षिततेच्या बाबतीत आणि असे प्रकार घडू नयेत यासाठी काय करावे लागेल ते करण्याच्या सूचना जिल्हाधिका-यांना देण्यात आलेल्या आहेत. राज्य सरकारने सुध्दा याबाबतीत धोरण ठरविले पाहिजे तेही धोरण ठरविले जाईल आणखी अभ्यास केला जाईल. महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यामध्ये यात्रेमुळे 291 माणसे मरणे ही राज्याला कमीपणा आणणारी गोष्ट आहे. लाखो लोक एकत्र जमून पशुंचा बळी देतात. श्रध्दा आणि अंधश्रध्देमुळे बळी दिले जात असतील तर प्रत्येकाने आपल्या देवापुढे बळी देणे सहज शक्य आहे. अशा घटनांमुळे फायदा होण्याऐवजी तोटा होणार असेल तर समाज प्रबोधन करण्याची गरज आहे. सक्ती केल्यामुळे सगळे शक्य होत नाही. भविष्यामध्ये यातून जे निष्कर्ष निघतील त्या त्रृटी दिसून येतील त्या दूर करण्यासाठी निश्चित प्रयत्न केले जातील. यात्रांमध्ये असे प्रकार घडू नयेत याची पूर्ण दखल शासनाकडून घेण्यात येईल. आमच्या उणिवा,शासनाच्या उणिवा आणि ट्रस्टमधील उणिवा दूर केल्या जातील. लाखो लोकांच्या गर्दीत 291 प्रेते होती काही स्वयंसेवी संस्था पुढे आल्या आणि त्यांनी 291 मृतदेह गावाकडे पोहोचविण्यासाठी मदत केली. प्रशासन कामाला लागले की झटकन आणि कार्यक्षमतेने किती गोष्टी करु शकते याची प्रचिती महाराष्ट्राच्या प्रशासनाने या दुर्घटनेच्या निमित्ताने आणून दिली आहे. पोस्टमार्टेम झाल्यावर मृतदेह गावापर्यंत पोहचविणे कारण एकाच

===2===



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MAP/ 21:05

श्री. आर.आर.पाटील...

गावातील हे मृतदेह नव्हते तर अनेक गावातून लोक जत्रेसाठी आले होते. एकेक माणूस ओळखणे हे खूप कठीण काम होते. प्रशासनाने देखील आपल्या घरावर संकट आले आहे असे मानून रात्रीचा दिवस करुन रात्रभर जागून वाहने उपलब्ध करुन दुस-या दिवशी मृतदेह रवाना केल्यावर आपल्या घराकडे जाण्याची भूमिकाघेतली आणि सगळया लोकांना मदत व्हावी म्हणून प्रयत्न केले. जे जखमी होते त्यातील कमीत कमी मृत्यू कसे होतील यादृटीने दवाखान्यांमध्ये पुरेशी व्यवस्था केली. प्रसंग दुर्देवी होता. सरकारने कोणालाही पाठीशी न घालता न्यायमूर्तींची चौकशीसाठी नेमणूकम केलेली आहे. जे कोणी अधिकारी दोषी किंवा निर्दोषी असतील त्यांच्या बाबतीत भूमिका व्यक्त केली तर न्यायालयीन कामकाजामध्ये हस्तक्षेप केला असे होऊ नये म्हणून याबाबतीत मी अधिक भावना व्यक्त करीत नाही. सभागृहाने ज्या सूचना केलेल्या आहेत त्याचे जास्तीत जास्त पालन करण्याचा प्रयत्न केला जाईल. कोणालाही मोकळे सोडले तर अशा दुर्घटना होऊ शकतात यासाठी नियम करण्याची गरज आहे.

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील ..

सन्माननीय सदस्यांच्या मतांशी आणि भावनांशी मी सहमत आहे.सन्माननीय सदस्यांना आणखी काही सूचना करावयाच्या असतील तर त्या लेखी स्वरुपात ते करु शकतील. यांत्रांच्या संदर्भात सर्व समावेशक असे धोरण या राज्यात निश्चित ठरविले जाईल असा मी शासनाच्य वतीने विश्वास देतो.या अल्पकालीन चर्चेला राज्यमंत्र्यांनी सविस्तर उत्तर दिलेले असल्यामुळे कोणत्याही प्रश्नाला उत्तर देण्याचे शिल्लक राहिलेले नसेल असे मला वाटते .तरी सुध्दा काही उत्तर देण्याचे राहिले असेल तर ते शासनाच्या वतीने नंतर दिले जाईल. या चर्चेला आणखी काही उत्तर देण्याची आवश्यकता नाही. या ठिकाणी येण्यास मला थोडा उशीर लागला याबद्दल मी पुन्हा दिलगिरी व्यक्त करतो आणि माझे भाषण संपवितो.

----

श्री.मधुकर चव्हाण : या दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी समितीची स्थापन करण्यात आलेली आहे परंतु या समितीला चौकशी करण्यासाठी किती कालावधी दिला आहे तसेच त्यांना टर्म्स ऑफ रेफरन्स काय दिले होते हे माननीय मंत्रीमहोदय सांगतील काय ?

श्री.आर.आर.पाटील : ही दुर्घटना का घडली आणि अशा दुर्घटना पुन्हा घडू नयेत यासाठी काय उपाययोजना केल्या पाहिजेत या टर्म्स ऑफ रेफरन्स त्या समितीला देण्यात आल्या आहेत तसेच साधारणपणे चार महिन्यात या घटनेची चौकशी व्हावी अशी शासनाची इच्छा आहे.

श्री.अनंत तरे :सभापती महोदय, मघाशी चर्चेत भाग घेत असतांना मी काही सूचना केल्या होत्या आता माननीय उपमुख्यमंत्री येथे उपस्थित आहेत त्यामुळे मला त्यांना सांगावयाचे आहे की काही देवस्थानाचे दागिने जास्त किंमतीचे असतात आणि त्याचे संरक्षण करण्याकरता तेथे एकही पोलीस नसतो याबाबतीत मी मघाशी एक उदाहरण दिले होते.एकवीरा देवीच्या देवस्थानाकडे दहा लाख रुपयांचे दागिने असतात तेव्हा तेथे दिवसा आणि रात्री दोन - दोन पोलीस राहतील अशी व्यवस्था शासनाने करावी अशी माझी विनंती आहे .तेव्हा ही व्यवस्था केली जाईल काय ?

श्री.आर.आर.पाटील :ज्या ठिकाणी मोठया प्रमाणावर अशी संपत्ती आहे आणि ज्या ठिकाणी मोठी मालमत्ता आहे अशा देवस्थानाच्या ठिकाणांचा अभ्यास करुन निश्चितपणे तसे धोरण राबविले जाईल.

---

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे :सभापती महोदया, सर्व यात्रांच्या संदर्भात व्यापक धोरण आखले जाईल आणि निरनिराळे जे न्यास आहेत त्या न्यासांनीसुध्दा भाविकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य दिले पाहिजे आणि त्याचेही संनियंत्रण केले जाईल अशा प्रकारे माननीय उपमुख्यमंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे. मांढरादेवी येथे गंभीर घटना घडल्यानंतर शासन अंतर्मुख झालेले आहे.केवळ शासनानेच नव्हे तर शासन आणि समाज या दोघांनीही एकत्रित अंतर्मुख होण्याची गरज आहे असे मत माननीय उपमुख्यमंत्र्यांनी त्यांच्या भाषणातून व्यक्त केले आहे. त्याबद्दल मी त्यांचे आभार मानते.सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे यांनी अशी सूचना केली होती की, दिनांक 14.15 व
16 एप्रिल रोजी एकविरा देवीची यात्रा कार्ला येथे मोठया प्रमाणावर भरणार असून . त्याठिकाणी लाखापेक्षा जास्त भाविक येत असतात. तेव्हा तेथे यात्रेसाठी जे धोरण राबविण्यात येणार आहे त्याकरता चार महिने थांबण्या ऐवजी लवकर धोरण राबविले पाहिजे तसेच सन्माननीय सदस्यांनी माननीय उपमुख्यमंत्र्यांना एकविरा देवीच्या दर्शनाला बोलावले आहे.त्यांना बोलाविण्यामागे सन्माननीय सदस्यांचा असा स्वार्थ आहे की, या निमित्ताने भाविकांची चांगली सोय होईल आणि त्यांची सुरक्षिततासुध्दा चांगली राहील. माननीय उपमुख्यमंत्री वा मुख्यमंत्री आले तर ही व्यवस्था चांगली राहील असे त्यांना वाटते .तसेच तेथील दुकानदारांच्या प्रश्नाकडेसुध्दा त्यांनी लक्ष वेधले होते.सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे यांनी इंदापूर मधील बाबदेवचे उदाहरण दिले होते त्याठिकाणी भाविकांना जाण्यासाठी चांगली सोय नाही.तेथे मोठया सख्येने भाविक जात असतात. त्याचबरोबर त्यांनी जेजुरीचे उदाहरण दिलेले होते. मला असे सुचवावेसे वाटते की, या संदर्भात आपण ठीक ठिकाणच्या आयुक्तांवर ही जबाबदारी टाकलेली आहे. तेव्हा सर्व आमदारांना जिल्हा नियोजनाच्या बैठकीत तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी कोणती व्यवस्था करण्यात आली आहे याची माहिती दिली जावी.जिल्हाधिकारी जेव्हा कामाचा आढावा घेण्यासाठी बैठक घेत असतात तेव्हा ही डी.पी.डी.सी.ची बैठक सहा महिन्यातून किंवा वर्षातून एकदा घेतली जाते.असे सुध्दा अनेक जिल्हयात झालेले आहे.तेव्हा ज्यावेळी जिल्हाधिकारी तेथील यात्रांच्या व्यवस्थेचा आढावा घेत असतात तेव्हा त्यासबंधीची माहिती विधान सभा आणि विधान परिषदेच्या सदस्यांना दिली गेली तर त्यात योग्य वेळी हस्तक्षेप करुन त्यातून मार्ग काढणे आम्हाला सोपे जाईल.प्रथमोपचाराच्या सोयी संबंधी आणि तातडीच्या मदतीसंबंधी डॉ.दीपक सावंत यांनी सांगितले होते. तेव्हा सर्व यात्रांच्या

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ठिकाणी वेळ पडली तर  वेद्यकीय पथके तातडीने पाठविण्याच्या बाबतीत शासनाने लक्ष घालावे. सभापती महोदया, ही अल्पकालीन चर्चा गृह विभागाच्या बरोबरच पर्यटन आणि ग्राम विकास विभाग आपत्कालीन व पुनर्वसन विभागाशी संबधित आहे. सन्माननीय सदस्य्य श्री.मधुकर चव्हाण यांनी सांगितले की, माननीय मुख्यमंत्री श्री मनोहर जोशी मुख्यमंत्री असतांना आपत्कालीन व्यवस्थेसंबंधी आराखडा तयार करण्यात आला होता. तो अपडेट झाला आहे काय  ?आणि त्याची अंमलबजावणी कशी चालली आहे ? याची माहिती देण्यात यावी अशा प्रकारची अपेक्षा  त्यांनी व्यक्त केली होती..सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांनी प्रबोधनाचे महत्व सांगितले होते.या प्रबोधनाची जबाबदारी शासनावर आहे की नाही हा खरा महत्वाचा प्रश्न आहे.शासनावर ही प्रबोधनाची जबाबदारी असेल तर शासनाने ठीक ठिकाणच्या भाविकांच्या संघटना तयार करुन त्यांचा आणि ट्रस्टचा  सुसंवाद ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. गोऱ्हे ....

त्याचबरोबर आमच्याकडील सदस्यांनी श्रद्धा आणि अंधश्रद्धेसंबंधात भाविकांच्या भावना न दुखाविता त्यांच्या श्रद्धेचे आणि गर्दीचे नियोजन व व्यवस्थापन करण्याची जी अपेक्षा व्यक्ती केली आहे त्याचाही योग्य तो आदर सन्माननीय उपमुख्यमंत्री महोदय आणि शासन करील अशी मी अपेक्षा व्यक्त करते. अध्यक्ष महाराज, मी सुरूवातीलाच मांढरदेवी यात्रेतील दुर्घटनेमधील मृत व्यक्तींच्या बाबतीत श्रद्धांजली अर्पण केली आहे .. त्यावेळी या ठिकाणी माननीय उपमुख्यमंत्री महोदय उपस्थित नव्हते, किंबहुना तेव्हा शासनाचे फारच कमी प्रतिनिधी येथे उपस्थित होते आणि एकूणच बहुतेक संबंधित सर्वच विभागाच्या मंत्र्यांकडून जी सकारात्मक भूमिकेची अपेक्षा होती ती पूर्ण झाली नाही. परंतु प्रशासनाने योग्य पातळीवर मांढरदेवी यात्रेच्या ठिकाणी ही घटना घडल्यानंतर जे प्रयत्न केले त्याबद्दल प्रशासनातील अधिकाऱ्यांचे तसेच अन्य व्यक्ती, संघटना यांनी जी मदत केली त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त कराविशी वाटते आणि या ठिकाणी आपण सर्वांनीच चर्चेत सहभागी होऊन चांगल्या प्रकारे चर्चा केल्याबद्दल सर्वांचेच मी आभार मानते आणि माझे भाषण संपविते.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : प्रस्तावावरील चर्चा आता संपली आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन, उद्या, मंगळवार, दिनांक 5 एप्रिल, 2005 रोजी दुपारी 1.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक रात्री 9 वाजून 16 मिनिटांनी, मंगळवार, दिनांक 5 एप्रिल 2005 रोजीच्या दुपारी 1.00 वाजे पर्यंत स्थगित झाली. )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही